।। श्रीराम समर्थ ।।

परमहंस परिव्राजकाचार्य
श्री हंसराज स्वामी कृत

श्रीमत् ग्रंथराज दासबोधाची

# श्री संकेत कुबडी



टीपाकार
**स.भ.अनंतदास रामदासी**

भावार्थ
**प्रा.डॉ.कल्याण काळे**

प्रकाशक
**सत्कार्योत्तेजक सभा धुळे आणि श्री हंस मंडळ परंडा**





**कल्याण वासुदेव काळे** (ज.१६-१२-१९३७)

एम.ए. (संस्कृत), एम.ए.(मराठी),
पीएच.डी.(मराठी)

- महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे शिक्षक (५ वर्षे);
- जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार येथे अधिव्याख्याता (६ वर्षे);
- पश्चिम विभागीय भाषा केंद्र, पुणे येथे अधिव्याख्याता (१० वर्षे);
- १९८१ पासून निवृत्तीपर्यंत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात प्रपाठक, विभाग ५
- संतसाहित्य आणि भाषा विज्ञान यावर दीडशेच्यावर शोधनिबंध.
- रसास्वाद, आकलन, (ज्ञानेश्वरी १२ वा अध्याय)
- वर्णनात्मक भाषाविज्ञान : स्वरूप आणि पद्धती या पुस्तकाचे सह संपादन.
- 'कर्नाटक संस्कृती : स्वाभिमान आणि संस्कृती' या पुस्तिकेचा अनुवाद.
- व्यावहारिक मराठी, Learning Marathi या पुस्तकाचे संयुक्त लेखन.
- 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाचे सहसंपादन.
- वैदिक देवता-संप्रदाय आणि परंपरा, भाषांतर - मिमांसा संपादन.

श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे



।। श्रीराम समर्थ ।।



श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

श्री हंसराज स्वामी

कृत

श्रीमत् ग्रंथराज दासबोधाची

# श्री संकेतकुबडी

उतरावया चंचळ सागर । दासबोध जहाज थोर ।

साधक पावती पैलपार । कुबडी तेथें होडगें ।।४३।। कुबडी, द.२०

टिपा : श्री अनंतदास रामदासी

भावार्थ : प्रा. कल्याण काळे


● प्रकाशक ●

चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे

आणि

हंस मंडळ, परंडा

श्रीरामसमर्थ



श्रीमत् ग्रंथराज दासबोधाची

# श्री संकेत कुबडी


- रचना : प.प.हंसराज स्वामी
- टिपा : श्री प.पू.अनंतदास रामदासी
- भावार्थ : प्रा.कल्याण काळे

- संयुक्त प्रकाशन : **सत्कार्योत्तेजक सभा, धुळे**
**आणि**
**हंस मंडळ, परंडा**

- प्रकाशक : **चिटणीस,**
**सत्कार्योत्तेजक सभा,**
द्वारा श्री समर्थ वाग्देवता मंदिर,
रामवाडी, धुळे - ४२४००१ (महाराष्ट्र)

- मांडणी, मुद्रक : **विजयश्री एंटरप्राईजेस,**
३४८, गुरुवार पेठ, सातारा.
भ्रमणध्वनी : ९४२२०२९४०१ - ४०२

- प्रथमावृत्ती : **मार्गशीर्ष शु.पौर्णिमा**
**शके १९३१**

- निर्मिती मूल्य : रुपये साठ मात्र

।। श्रीरामदास ।।



# प्रस्तावना...

श्रीसमर्थांच्या अखंड चिंतन प्रवासाचा शब्दरूपी ठेवा - दासबोध. रामदासी संप्रदायाच्या प्रस्थानत्रयीतील आधारभूत प्रमाण ग्रंथ - दासबोध. गुरु-शिष्यांच्या अध्यात्म निरूपणाच्या उत्कट संवादाचे प्रकट रूप - दासबोध. सगुणाच्या आधारे निर्गुणाची आराधना करणाऱ्या बद्ध ते सिद्ध या पारमार्थिक प्रवासातील साधकांचा पथदर्शक - दासबोध. निजबोध सुखाचा आनंद देणाऱ्या ग्रंथराज दासबोधाला म्हणूनच रामदासी संप्रदायामध्ये विशेष महत्त्व आहे. रघुनाथ पंडित याचे सुरेख वर्णन करतात.

**शोभे शतद्वय समास समास भारी ।**
**जो दासबोध निजबोध सुखा उभारी ।।**
**त्या शेवटी दशक जोडित जो विसावा ।**
**श्रीरामदास गुरु तो अमुचा विसावा ।।**

श्रीसमर्थांचे अस्तित्व दासबोधापासून वेगळे नसल्यामुळे दासबोध हा केवळ पारायणाचा ग्रंथ नाही, तर जीवनातील विसाव्याचे ठिकाण अनुभवण्याचे साधन आहे. शब्दसामर्थ्याने नटलेल्या वीस दशक, दोनशे समास, ७७५१ ओव्यांमधून श्री समर्थांनी वेगवेगळ्या विषयांचे आत्मप्रचितीतून केलेले विवरण जीवाला देहबुद्धि निरसनातून आत्मबुद्धिप्रकाशनाकडे घेऊन जाते. दासबोधामध्ये सांगितलेल्या चतु:सूत्रीतील पहिले सूत्र याचे व्यापकत्व स्पष्ट करते. 'मुख्य ते हरिकथा निरूपण' यातील हरिकथा आणि निरूपण या दोन शब्दांनी सजविलेले हे सूत्र 'सगुणाचे नि आधारे । निर्गुण पाविजे निर्धारे ।।' दास.६.६.५५ या सगुणातून निर्गुणाकडे जाणाऱ्या उपासकाच्या उपासनेसाठी श्री समर्थ वापरतात. यातील 'हरिकथा' हा शब्द सगुणरूपाचे गुणगान गाणे म्हणजेच सगुणरूपाची भक्ती, उपासना दर्शवितो. परंतु जीवाचा प्रवास सगुणरूपाशी थांबू नये म्हणून लगेचच 'निरूपण' या शब्दातून आत्मचिंतनाने अरूपी, विश्वव्यापी परब्रह्मतत्त्वाचा शोध ही निर्गुणाची आराधना ही ध्येय निश्चिती दर्शवितो. 'मी देह आहे.' या लौकिक अर्थातून 'मी चिदानंद रूप परब्रह्मतत्त्व आहे.' या अलौकिकतेची अनुभूती हे दासबोधाचे सार आहे. मायातीत परब्रह्माच्या आकाशव्यापी अस्तित्वाच्या अनुभूतीतून जीवांना शाश्वत सुखाची प्राप्ती व्हावी हाच विषय दासबोधाच्या केंद्रस्थानी आहे. २० व्या दशकाच्या १० व्या समासातून श्री समर्थ हेच सांगतात -

**झालें साधनाचें फळ । संसार झाला सुफळ ।**
**निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ।।**
**हिशेब झाला मायेचा । झाला निवाडा तत्त्वांचा ।**
**साध्य होता साधनांचा । ठाव नाहीं ।।** (दास.२०.१०.२६-२७)

दासबोधाच्या मनन चिंतनातून आत्मा आणि परमात्मा यांच्यातील द्वैतभावाची पोकळी नाहीशी होऊन अद्वैताची अनुभूती जीवाला प्राप्त व्हावी हे दासबोधाचे मुख्य सूत्र आहे. या सूत्राशी एकरूपता साधण्यासाठी समर्थ कर्म, उपासना, ज्ञान आणि मोक्ष या मार्गाने साधकाचा प्रवास व्हावा असे सांगतात.

**आधीं तें करावें कर्म । कर्ममार्गें उपासना ।**
**उपासकां सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पावणें ।।** (मानपंचक ३.१)

कर्माधिष्ठित उपासनेची साधना झाली की अंत:करणामध्ये ज्ञानाचा शुभ्र प्रकाश प्रज्वलित होतो. या ज्ञानप्रकाशात अज्ञानरूपी अंधकार नाहीसा होतो आणि दु:ख आणि भ्रांतीचे पडदे आपोआप दूर होतात. दासबोधाची फलश्रुती हेच सांगते.

**नासे अज्ञान दु:ख भ्रांती । शिघ्रचि येथे ज्ञान प्राप्ती ।**
**ऐसी आहे फलश्रुती । इये ग्रंथीं ।।** (दास.१.१.३०)

ज्ञानाने रूप पाहता येते, तर विमळ ज्ञानाने स्वरूपाची ओळख पटते. दासबोधातून ज्ञानाची व्याख्या करताना श्रीसमर्थ हेच सांगतात. -

**ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।**
**पाहावें आपणासि आपण । या नाव ज्ञान ।।** (दास.५.६.१)

आत्मबुद्धी प्रकाशित होणे हेच खरे ज्ञान आहे. आत्मबुद्धीच्या प्रकाशातून स्वरूप कळले की चिद्रूप उजळून निघते. हरिहरहृदयीचे गुह्य प्रकट करून दाखविणारा दासबोध म्हणूनच बद्ध ते सिद्ध या पारमार्थिक प्रवासातील लामणदिवाच आहे. कल्याणस्वामी दासबोधाच्या आरतीमध्ये याचे यथार्थ वर्णन करतात -

**हरिहर हृदयीचे गुह्य प्रकट दावी ।**
**बद्धचि सिद्ध झाले असंख्यात मानवी ।।**
**जय जया दासबोधा । ग्रंथराज प्रसिद्धा ।**
**आरती ओवाळीन । विमळज्ञान बाळबोधा ।।**

अध्यात्म ज्ञानाच्या याच सूत्राचा विस्तार प.प.हंसराज स्वामी यांनी 'संकेत कुबडी' या दासबोधाच्या सार ग्रंथातून केला आहे. वीस दशक, ६४८ ओव्यांच्या माध्यमातून प.प.हंसराज स्वामींनी 'संकेत कुबडी' तून दासबोधाच्या २०० समासांचे निरूपण सूत्रबद्ध रीतीने मांडले आहे. उद्धव स्वामींची शिष्यपरंपरा लाभलेल्या प.प.हंसराज स्वामींच्या या लेखनातून त्यांची दासबोधाप्रती असणारी नितांत श्रद्धा दृष्टिक्षेपात येते.

**दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।**
**जेथे अति सूक्ष्म विचारा । फडके होती ।।** -(संकेत कुबडी-दशक ५ ओवी २१)

दासबोधातील वेगवेगळ्या विषयांचेवर स्वतंत्र लेखन असलेले अनेक ग्रंथ आहेत. परंतु दासबोधातील सर्वही ७७५१ ओव्यांना 'अपरोक्ष समाधान प्राप्ती'च्या अध्यात्म निरूपणात सूत्रबद्ध करून लिहिलेला 'संकेत कुबडी' हा एकमेव ग्रंथ आहे. या ग्रंथाची फलश्रुती हे अधिक स्पष्ट करते.

**येथे अज्ञानाची बोळवण । ज्ञानाचे होते विज्ञान ।**
**आणि अनिर्वाच्य समाधान । हे फलश्रुती ये ग्रंथी ।।**
**ग्रंथाचे पाहता वीस दशक । आणि समास तरी दोन शतक ।**
**परि इतुकीयांचे तात्पर्य येक । जे अनिर्वाच्य अपरोक्ष ।।** (संकेत कुबडी १.९.१०)

अभ्यासू आणि विद्वत्तापूर्ण लेखन आणि श्री समर्थांप्रती असणाऱ्या अनन्य भक्तीतून केलेले अभ्यासू लेखन यातील फरक हा ग्रंथ अधोरेखित करतो. यामुळेच भक्ती आणि ज्ञान यांचा सुरेख संगम या ग्रंथातून अनुभवास येतो. 'संकेत कुबडी'च्या प्रत्येक दशकामध्ये केवळ विमळ ज्ञानाचीच चर्चा आहे, परंतु प्रत्येक दशकाचा शेवट मात्र श्रीसमर्थ भक्तीचा जिव्हाळा प्रकट करतो.

**इति श्री संकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी ।**
**वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।** (संकेत कुबडी १.४७ आणि इतर दशकांच्या पुष्पिका)

या ग्रंथाचे नावच मोठे विलक्षण आहे. 'संकेत कुबडी'. व्यावहारिक भाषेमध्ये आधाराच्या वस्तूला कुबडी असे संबोधले जाते. पारमार्थिक जीवनप्रवासात वाटचाल चालू असताना अनेक प्रलोभने अडथळ्यांच्या रूपाने सामोरी येतात. या प्रलोभनांवर मात करण्यासाठी मनाला आधार देणारा हा ग्रंथ असल्यामुळें हे नाव तो सिद्ध करतो. प.प. हंसराज स्वामींनी 'संकेत कुबडीचे' दोन विभाग केलेले आहेत. एक पूर्वार्ध आणि दुसरा उत्तरार्ध. पूर्वार्धामध्ये १ ते ८ दशकांचे विवेचन आहे, तर उत्तरार्ध हा ९ ते २० दशकांचा आहे. संकेत सूचनेपासून ज्ञान दशक हा पूर्वार्ध आहे. कर्म, उपासनेच्या योगे ज्ञानप्राप्ती हा पारमार्थिक जीवनाचा पूर्वार्ध असतो. बद्ध, मुमुक्षू आणि साधक या तीन अवस्था पारमार्थिक प्रवासातील पूर्वार्ध ठरतात. साधकाची ज्ञानप्राप्ती हा परमार्थ मार्गातील पहिला टप्पा आहे. म्हणूनच 'संकेत कुबडी' मध्ये हंसराज स्वामींनी ज्ञान दशकापर्यंत पूर्वार्ध सांगितला आहे. या ज्ञानाच्या साहाय्याने मोक्षप्राप्ती म्हणजेच साधक ते सिद्ध हा प्रवास या मार्गातील उत्तरार्ध ठरतो. मोक्षप्राप्ती म्हणजे सिद्धावस्था म्हणजेच निरतिशय आनंदानी अनुभूती. ही या मार्गातील सर्वोच्चता आहे. ही सर्वोच्चता साधताना या प्रवासातील प्रलोभनांवर मात करण्यासाठी साधकाने घ्यावयाची काळजी प.प.हंसराजस्वामी संकेत कुबडीच्या उत्तरार्धात स्पष्ट करतात. सहजस्थिती ही अलिप्तपण, विदेहस्थिती, संगत्याग, वासना क्षयासह मनोजय, शोकनिरसन आदी गोष्टी साधल्या की ही प्राप्त होते. आत्यंतिक समाधान आणि म्हणूनच 'निरतिशय आनंद' हा संकेत कुबडीचा विसावा दशक आहे. विसाव्याचे ठिकाण आहे.


श्री समर्थ वाङ्मयाचे भांडार प्राणांच्या पलिकडे जतन करून निष्ठेने समर्थ भक्तांसाठी सेवाकार्य म्हणून उपलब्ध करून देणारी धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता मंदिर, ही संस्था आणि रामदासी सांप्रदायाच्या परंपरेचे समर्थ कार्य करणारे परंडा येथील हंसमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'संकेत कुबडी' पुन्हा एकदा प्रकाशित होते आहे. या ग्रंथात पुण्याचे सिद्ध हस्त लेखक पुणे विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख आणि प.प. हंसराज स्वामींचे उपासक श्रद्धेय प्रा.डॉ. कल्याण काळे यांनी संकेत कुबडींच्या सर्व ओव्यांचा योग्य शब्दात नेमकेपणाने अतिशय सुरेख अर्थ सांगितला आहे. प.प.हंसराज स्वामींनी व्यक्त केलेले नेमकेपण अतिशय सुलभ आणि सोप्या भाषेत श्रद्धेय डॉ.काळे यांनी विस्तारित केल्यामुळे प्राप्त होणारा आनंद द्विगुणित झाला आहे. उपासनेतून केलेली शब्दसाधना, शब्दसाधनेतून बांधलेली पूजा आणि या पूजेतून मिळालेला प्रसाद असेच डॉ. काळेंच्या या

अर्थपूर्ण विवेचनाचे वर्णन योग्य ठरेल. डॉ. काळे यांच्या शब्दांच्या पाठीमागे असणारे उपासनेचे तेज आणि त्यांच्या वरती असणारा प.प.हंसराज स्वामी यांचा कृपाशीर्वाद या लेखनाला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन पोहचवितो. समर्पित भावनेतून केलेले समर्पक विवेचन हेच डॉ. काळे यांच्या लेखनाचे अव्यक्त रूप आहे.

समर्थ भक्त श्रद्धेय श्री.शरदजी कुबेर यांच्या अधिकाररूपी आग्रहामुळे हा लेखनाचा योग आला. त्यांच्यामुळेच प.प.हंसराज स्वामी यांच्या चरणी या लेखनाच्या रूपाने सेवा समर्पित करण्याची संधी मला मिळाली. श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, आणि श्री हंसमंडळ, परंडा यांचे समर्थ कार्य असेच वृद्धिंगत होवो हीच श्रीसमर्थ चरणी प्रार्थना करतो आणि प.प.हंसराज स्वामींचे चरणी त्रिकाल मस्तक ठेवीत प्रस्तावनेला पूर्णविराम देतो. इति.

दि.१-१२-२००९
श्रीदत्त जयंती

**भूषण स्वामी**
श्री समर्थांचे ११ वे वंशाधिकारी
विश्वस्त - श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड
संपादक - 'रघुवीर समर्थ'



शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।
कवि वाल्मिका सारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ।।

।।श्रीरामसमर्थ ।।

# सत्कार्योत्तेजक सभा आणि श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर,धुळे



समर्थहृदय
शंकर श्रीकृष्ण देव

समर्थहृदय देवांनी सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना १९ मे १८९३ रोजी धुळे येथे केली. लोकमान्यांच्या तेजस्वी स्वातंत्र्यलढ्यांचे नेतृत्व खानदेशांत देवांनी केले. सत्कार्योत्तेजक सभेच्या माध्यमांतून राष्ट्रधर्मप्रेरक असे अनेकविध उपक्रम देवांनी समाजप्रबोधनासाठी केले. 'भाषा प्राकृत उन्नतीस चढवा' हे ध्येय आणि 'श्रीशिवसमर्थांचे स्मरण हेच राष्ट्राचे जीवन; त्यांचे विस्मरण म्हणजे राष्ट्राचे मरणच!' हा समर्थ सिद्धांत या दृढ पायावर सत्कार्योत्तेजक सभेचे कार्य चालते.

सत्कार्योत्तेजक सभेने एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरी, त्रिखंडात्मक श्रीसमर्थ चरित्र, मनाचे श्लोक-सार आणि संगती यासारखे उत्तमोत्तम ग्रंथ प्रकाशित केले आहेत. श्रीदासबोधाच्या प्रथमावृत्तीच्या शताब्दीनिमित्ताने नुकतेच श्रीदासबोध पारायण प्रतीचे सर्वांगसुंदर प्रकाशनही झाले आहे. १५० हून अधिक ग्रंथांचे दर्जेदार प्रकाशन कार्य करून सभेने प्राकृत भाषेची सेवा महाराष्ट्र शारदेस अर्पण केली आहे.

सभेच्या श्रीरामदासी साहित्याचे संशोधनास १०० हून अधिक वर्षांचा कालावधी लोटला आहे. भारतभरातील श्रीसमर्थांच्या मठांतून शेषरूपानें प्राप्त झालेला हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह समर्थहृदय देवांनी श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर या ख्यातकीर्त संशोधन संस्थेत अतिशय नेटक्या पद्धतीने केलेला आहे. श्रीसमर्थकालीन भारतातील बहुतेक सर्व संतांचे साहित्य हस्तलिखित स्वरूपात प्राणपणाने जपून ठेवले आहे. त्यात भर पडत असते. त्याचे संरक्षण, वर्गीकरण, संशोधन, प्रकाशन सतत चालू असते. देश-विदेशांतील अभ्यासक नित्य येथे येत असतात. अभ्यासकांची ती काशीच आहे.

श्रीसमर्थांचे त्यांच्या जन्मस्थानीं उभारलेले मंदिर, श्रीसमर्थ स्थानांचा, समर्थ शिष्यस्थानांचा शोध, जीर्णोद्धारादी कार्ये आणि मुख्यत्वे समर्थांच्या ग्रंथांचे प्रकाशन, अ वर्गाचे सार्वजनिक वाचनालय, भारतीय विद्या संशोधन केंद्राचे वर्तमानाचे भान राखून उज्ज्वल भविष्याचा वेध घेणारे उपक्रम अशा नानाविध कार्यातून सत्कार्योत्तेजक सभा शताब्दीनंतरही जोमाने कार्यरत आहे.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातील अमूल्य हस्तलिखित संग्रहातून निवडक रत्नहार, मणिसरांची जाणत्या अभ्यासकांकडून परीक्षा होत असते. श्रीसंप्रदायाच्या, साहित्यांच्या अभ्यासासाठी पैलू पाडलेले, तजैलदार हिरे माणके ग्रंथरूपाने प्रकाशित होतात. प्रकाशनाची जबाबदारी सत्कार्योत्तेजक सभेकडे असते. संकेत कुबडी, वेणास्वामींचे सीता स्वयंवर, करुणाष्टके-धाट्या-सवाया असे देवांनी प्रकाशात आणलेले एकाहून एक सरस ग्रंथ सध्या उपलब्ध नाहीत. जाणकारांची मागणी असते, पण असे ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी पुरेसे अर्थबळ नसते. म्हणून सुपंथ धरण्यासाठी समविचारी - खरे म्हणजे सारखीच अर्थ विवंचना असणाऱ्या - सत्कार्यप्रेरक संस्थांचे साहाय्य घेऊनही सत्कार्योत्तेजक सभा उत्तमोत्तम ग्रंथ प्रकाशित करीत असते.

श्रीमत् ग्रंथराज दासबोधाच्या वेदान्तपर अर्थाकडे लक्ष वेधणारा आणि त्याच भूमिकेतून संक्षेपाने २०० समासांचे सार सांगणारा 'संकेत कुबडी' हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा मनोदय २-४ वर्षांच्या विचार मंथनातून 'हंस मंडळ, परंडा' यांच्या साहाय्याने साकार होत आहे. कितीयेक दासबोध प्रेमी आतां दासबोधाच्या अंतरंगाचा ठाव घेण्यासाठी आतुर आहेत. त्यांना या प्रकाशनाने विशेष आनंद लाभणार आहे. त्याला कारणही तसेच महत्त्वाचे आहे. हंसराज स्वामींसारखा श्रीसमर्थ - उद्धव परंपरेतील शाब्देपरे निष्णात अधिकारी - गिरड मठपती अनंतदासांसारखा समर्थहृदय देवांचे समर्थ साहित्याचे हृद्गत आत्मसात केलेला टीपकार आणि प्रा.कल्याण काळे यांच्या सारख्या हंसराज स्वामींचे हार्द जाणणाऱ्या ऋजुस्वभावी मर्मग्राही ज्ञानसाधकाचा भावार्थ - एवंगुण विशिष्ट असा ग्रंथ हाती आल्यावर 'कोण ग्रंथ' म्हणून पृच्छा करणारे साधक 'जाले साधनाचे फळ' अशी तृप्ती पावतील. असा विश्वास आम्हा उभय संस्थांना हा ग्रंथ आपले हाती देताना होत आहे.

'हंस मंडळ, परंडा' आणि प्रा.डॉ.कल्याण काळे यांनी या प्रकाशनास अनुकूल होऊन श्रीसंप्रदायाच्या साहित्य संशोधनावर महदुपकार केले आहेत.

श्रीसंप्रदायाचे अधिकारी स्वामी आणि समर्थवंशज भूषणस्वामी या नव्या पिढीच्या उगवत्या भानूने लिहिलेली प्रस्तावना ग्रंथाचे अंतरंग उकलून दाखविणारी आहे.

भक्तिधाम, सातारा येथील प.पू.श्रीदत्ता महाराजांच्या भक्त मंडळींनी या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी उचित योगदान दिले आहे. श्रीदत्तामहाराज आणि श्रीअनंतदास महाराज हे सज्जनगडावर श्रीसमर्थ सेवा करीत असताना १९५० साली सर्व रामदासींचे एक दुर्मिळ छायाचित्र भक्तिधाममधून उपलब्ध झाले ते या ग्रंथात समाविष्ट केले आहे.

नेहमीप्रमाणेच सुबक, निर्दोष आणि सुंदर अशा प्रकाशनाची जबाबदारी श्री.लिपारे बंधू यांनी पार पाडली आहे.

दि.१-१२-२००९
श्रीदत्त जयंती

डॉ.वि.आ.चितळे
अध्यक्ष,
सत्कार्योत्तेजक सभा, धुळे

।।श्रीरामसमर्थ ।।

# हंस मंडळ, परंडा



समर्थभक्त
अनंतदास रामदासी

हंसराजस्वामी परंड्यात ज्या मठात राहात होते व जिथे त्यांनी आपले प्राण अनंतात विलीन केले त्या मठाची देखभाल करणे, त्यांची पुस्तके छापून प्रसिद्ध करणे इ. कामे त्यांचे निकटचे शिष्य त्यांच्या समाधीनंतरच्या काळात यथाशक्ती करत राहिले. त्यांच्या प्रयत्नांनी हंसराजस्वामींचे वेदेश्वरी, वाक्यवृत्ती, सदाचार, वेदाज्ञा, अमृतानुभव टीका, वेद नांवाचे काही अभंग व पदे आणि चूडालाख्यान हे ग्रंथ छापून निघाले हे मोठेच काम या काळात झाले. पण ही पिढी अस्तंगत होताच या कामांना खीळ बसली. त्यांचा मठ दुर्लक्षित होऊ लागला. ग्रंथ ही दुर्मिळ होऊ लागले.

सन १९३५ च्या सुमारास परंड्यातील काही सुशिक्षित सज्जनांना मठाची ही दुरवस्था पाहवली नाही. त्यांनी एकत्र येऊन मठाची डागडुजी केली. मठाच्या दैनंदिन साफसफाईची व्यवस्था केली. नित्य पूजा-आरतीची व्यवस्था केली. हंसराज स्वामींचे ग्रंथ मिळवून त्यांचा संग्रह जतन करण्याचे काम सुरू केले. या कामाला स्थायी स्वरूप देण्यासाठी त्यांनी १९३८ च्या सुमारास हंसमंडळाची स्थापना केली. या काळात प.पू.अनंतदास रामदासी, कै.सेतु माधवराव पगडी अशा जाणकार लोकांचे त्यांना मार्गदर्शन व साहाय्य लाभले. हंस मंडळाच्या संस्थापक सदस्यांमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होतो. १. नारायणराव विश्वनाथराव हतोळकर, २. लक्ष्मणराव गोपाळराव मुगावकर, ३. वासुदेवराव गोपाळराव मुगावकर, ४. गोपीनाथराव नारायणराव माढेकर, ५. सेठ बन्सीलाल बापूचंद, ६. दुर्गादयाल चंडीप्रसाद दीक्षित आणि ७. नारायणराव बळवंतराव देशमुख. या मंडळाचे स्वत:साठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम आखून घेतला. मठाची दैनंदिन देखभाल करणे, नित्यपूजा आणि आरतीची व्यवस्था करणे, हंसराजस्वामींचे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ जमवणे, दररोज या ग्रंथांचे मठात क्रमश: वाचन करणे, त्यांच्या अप्रकाशित ग्रंथांचे प्रकाशन करणे. ही कामे या मंडळाने अतिशय निष्ठेने आणि नियमितपणे चालू केली. मंडळामार्फत हंसराजस्वामींचे आगमसार, कथा कल्पलता, हंसराज स्वामींच्या गुरुपरंपरेची सविस्तर माहिती देणारा हंसपद्धती हा ग्रंथ आणि हंसराज स्वामींची संकेत कुबडी हे ग्रंथ यथावकाश प्रसिद्ध केले. यातील हंसपद्धती श्री. पारखे शास्त्री, पुणे यांनी, कथा- कल्पलता श्री. शंकरनाना भाळवणकर यांनी, संकेत कुबडी श्री. अनंतदास रामदासी यांनी संपादित केली. या सर्व सज्जनांनी अपार कष्ट घेऊन अगदी निरपेक्षबुद्धीने स्वत:चे नावही कोठे येऊ न देता हे मोठे काम केले. आगमसाराला वै.मामा साहेब दांडेकर यांची प्रस्तावना लाभली होती. मठाची देखभाल, नित्याची पूजा व सायंकालीन आरती, दरवर्षीचा पुण्यतिथीचा उत्सव ही कामे आजतागायत चालू आहेत. ग्रंथवाचनाची मुख्य जबाबदारी श्री. गोपीनाथराव माढेकर, वकील यांनी घेतली होती. ती त्यांनी सलग ४५ वर्षे अखंडितपणे अगदी निष्ठेने नियमितपणे चालू ठेवली होती. सन १९८३ मध्ये त्यांचे निधन झाल्यानंतर मात्र हा उपक्रम बंद पडला.

काळाच्या ओघात हंस मंडळाला काही आघातही सोसावे लागले. वरील सदस्यांपैकी नारायणराव हतोळकर, सेठ बन्सीलाल बापूचंद आणि नारायणराव देशमुख हे सदस्य १९५० च्या आसपास काळाच्या पडद्याआड गेले. तेव्हा सेठ बन्सीलाल यांच्या जागी त्यांचे चिरंजीव सेठ रमणलाल बन्सीलाल यांचा मंडळात समावेश करण्यात आला. १९४८ च्या पोलिस कारवाईनंतर श्री.रंगनाथराव यशवंतराव महाजन, वकील हे परंड्यात स्थायिक झाले. त्यावेळी त्यांचाही मंडळात समावेश करण्यात आला.


ग्रंथ प्रकाशनाचे कार्य १९५० नंतर द्रव्याभावी बंद झाल्यासारखेच होते. पण २००६ साली चंद्रपूर येथील हंसभक्त कै.हरिभाऊ धनकर यांच्या चिरंजीवांनी आपल्या वडिलांचा हंसभक्तीचा वारसा पुढे चालू ठेवून हंसराज स्वामींच्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी निरपेक्षपणे द्रव्यसाहाय्य देण्याची तयारी दाखवली. त्यातूनच कथाकल्पलता, आगमसार, प्रस्तुतची संकेत कुबडी या ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाचा योग आला. प्रस्तुतच्या संकेत कुबडीच्या पुनर्मुद्रणासाठी धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेने खर्चाचा अर्धा भार उचलल्यामुळे ही आवृत्ती मोठ्या स्वरूपात काढणे शक्य झाले आहे. हंस मंडळ धनकर कुटुंबीय आणि सत्कार्योत्तेजक सभा, धुळे यांचे शतश: ऋणी आहे.

हंसराज स्वामींच्या मठातील तिन्ही समाध्यांची नित्यपूजा, नैवेद्य आणि दिवाबत्ती यांसाठी प.पू.कै.डोंगरे महाराजांच्या ट्रस्टतर्फे एक लाख रुपयांची कायम स्वरूपाची ठेव ठेवण्यात आली. तिच्या व्याजातून ही कामे व्यवस्थित चालू आहेत. हंस मंडळ ट्रस्टचे आभारी आहे. याखेरीज हंस मंडळाची आणखी बरीच कामे द्रव्याअभावी खोळंबलेली आहेत. त्यामुळे हंस मंडळाची झोळी सदैव उघडलेलीच आहे, एवढे नमूद करून आम्ही थांबतो.

परंडा<br>
दि.१ डिसेंबर २००९<br>
श्रीदत्त जयंती

हंस मंडळ, परंडा<br>
**ॲड.यशवंत रंगनाथराव महाजन**<br>
अध्यक्ष, हंस मंडळ, परंडा<br>
जि.उस्मानाबाद


## ※ श्रीसमर्थ सेवक वृंद ※



(१९५० साली सज्जनगडावर श्रीसमर्थ सेवेत असलेले रामदासी)

सर्वश्रीसमर्थ भक्त दिनकरबुवा बिवलकर, श्रीदत्ताबुवा बेळगांवकर, दत्तोपंत गडणीस, नारायणबुवा जोग, तांबेबुवा, करमळकरबुवा, यशवंतबुवा, कुलकर्णीबुवा, केसकरबुवा, बालाजीबुवा, नारायणबुवा गोडसे, अनंतदास रामदासी, नारायणबुवा मुळे

## श्री सद्गुरु हंसराज स्वामी, परंडा



जन्मशक श्रावण शु.१४ शके १७२७, परभणी, समाधिशक वैशाख शु.८ शके १७७८, परंडा

श्रीमत् परिव्राजकचक्रचूडं ज्ञानोपदेशाय गृहीतमूर्तिम् ।
अनुग्रहं धारयन्तं जेषु नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।

।।श्रीरामसमर्थ ।।

# श्री हंसराजस्वामींचे चरित्र

मराठीतील विचार विग्रही संतांची एक तेजस्वी परंपरा आहे. त्यांच्या लीलांपेक्षा त्यांनी आपल्यामागे पुढील पिढ्यांसाठी जे शाश्वत स्वरूपाचे विचारधन ठेवलेले आहे त्यासाठी ते आज ओळखले जातात. या संतकविपरंपरेतील हंसराजस्वामींनी त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण ग्रंथरचनांमुळे स्वत:चे एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांचे चरित्रही त्यांच्या ग्रंथांइतकेच उद्बोधक आहे.

त्यांचा जन्म मराठवाड्यातील परभणी या गावी सन १८०५ मध्ये झाला. त्यांचे मूळचे नाव नारायण. त्यांचे आजोबा रामचंद्रपंत हे सावकार असून त्यांची आर्थिक स्थिती चांगली होती. त्यांचे वडील गंगाधरपंत हे सावकारी न करता परभणी येथेच पेशकारी करत होते. त्यांच्या आईचे नाव रेणुकाबाई. नारायण हा या दांपत्याचा मधला मुलगा. नारायणाच्या जन्मापासून या कुटुंबाची ग्रहदशा फिरली व गंगाधरपंतांची नोकरी सुटली. त्यांच्यावर उपजीविकेच्या शोधात गावोगाव भटकण्याची पाळी आली. या भ्रमन्तीत असताना हे कुटुंब रेणुकाबाईंच्या माहेरी कोयाळ येथे आले. तेथे त्या काळच्या रीतीप्रमाणे नारायणाचे लग्न बालवयातच तेथील कुलकर्ण्यांच्या मुलीशी लावून देण्यात आले. त्यांच्या पत्नीचे सासरचे नाव लक्ष्मी असे होते. ही लक्ष्मी आपल्या पावलांनी घरात आली. पण त्या अगोदरच लक्ष्मीदेवीने त्या घरातून काढता पाय घेतला होता. त्यातच भर म्हणून की काय, नारायणाचा थोरला भाऊ पत्नीसह वेगळे घर करून राहू लागला. त्याच्या रोजगारीची जी थोडीफार आवक होती, तीही बंद झाली. त्यामुळे गंगाधरपंतांची विवंचना अधिकच वाढली. तेव्हा कुमारवयाच्या नारायणाला स्वत:च्या जबाबदारीची जाणीव झाली आणि म्हणून द्रव्यार्जन करून कुटुंबाला मदतीचा हात देता यावा, म्हणून त्याने घराबाहेर पडून थेट सुरत गाठली. तेथे एका नातेवाईकाने केलेल्या द्रव्यसाहाय्याने थोडासा व्यापार करून काही पैसा मिळवला. तो घेऊन गावाकडे येत असता रस्त्यात चोरांनी त्यास लुबाडले. कर्माने मिळवले होते, दैवाने ते नेले. त्यानंतर पुन्हा प्रयत्न करावा, म्हणून नारायण ग्वाल्हेरला गेला. आईची रक्मा नावाची बालमैत्रीण तेथील राजघराण्यात दिली होती. तिच्या ओळखीने तेथील पागेची नोकरी मिळवायचा त्याने प्रयत्न केला. पण तिच्या दिवाणाच्या आडकाठीमुळे त्या नोकरीचे काही जमू शकले नाही. अखेर निराश होऊन नारायण परतला. ग्वाल्हेरला मिळवलेले थोडेफार द्रव्यही त्याने वाटेत एका गरीब ब्राह्मणाला देऊन टाकले.

परभणीला आल्यानंतर तेथील पागेचे काम त्याला मिळाले. काही दिवसांनंतर हद्रे आणि अर्धापूर तालुक्याच्या सरदेशपांडेगिरीचे कामही त्याला मिळाले. पण तीही नोकरी फार काळ टिकली नाही. पण नारायणाला त्याचे काही वाटले नाही. कारण प्रपंचाविषयी त्याची वृत्ती मुळातच विरक्त होती. द्रव्यलोभ त्याला नव्हताच. त्याचे चित्त परमार्थाकडे जास्त ओढ घेऊ लागले. त्याला गुरुप्राप्तीची तळमळ लागली. मनाच्या या अवस्थेत असतानाच पाथरी येथे त्याची व एका संन्याशाची गाठ पडली. त्याने ''वसमतचे लक्ष्मणराव तुला गुरूपदेश देतील,'' म्हणून सांगितले. ''लक्ष्मणराव हे एक सरकारी नोकरीतले गृहस्थ, ते आपल्याला काय गुरुमंत्र देणार?'' असा एक विकल्प नारायणाच्या मनात येऊन गेला. व त्याने तो त्या संन्याशाला सांगितला. तेव्हा त्याने ''साखर घेणाऱ्याने वाण्याच्या रूपाकडे पाहू नये.'' अशा मार्मिक उत्तराने त्याचे समाधान करून त्यास

लक्ष्मणरावांकडे पाठवले. तेव्हा नारायणाने लक्ष्मणरावांकडे जाऊन गुरुमंत्राची याचना केली. त्यांनी आरंभी चालढकल केली. पण त्याची निष्ठा व तळमळ पाहून त्यास शेवाळे येथे उपदेश दिला. हा गुर्वनुग्रह साधारणपणे १८२७-२८ साली झाला असावा.

लक्ष्मणराव हे श्रीसमर्थ रामदास -- उद्धव -- माधव -- रुद्राम -- नागनाथ -- लक्ष्मण या परंपरेतील समर्थांपासूनचे सहावे पुरुष होत. आदिनारायणाने हंसरूपाने ब्रह्मदेवाला उपदेश केला व त्याचे अज्ञान दूर केले. ब्रह्मदेवाने तेच ज्ञान वसिष्ठांना दिले व वसिष्ठांनी ते प्रभु रामचंद्रास दिले. प्रभु रामचंद्र हे समर्थांचे गुरू होत. अशा तऱ्हेने आदिहंस गुरूपासून सुरू झालेल्या ज्ञानपरंपरेचे समर्थ व उद्धवादी त्यांचे शिष्य प्रशिष्य हे वारसदार ठरतात. ब्रह्मविद्येची ही अखंड परंपरा जोपासणाऱ्या या संप्रदायाला तो हंसापासून सुरू झाला म्हणून 'हंस संप्रदाय' असे नाव हंसपद्धतिकारांनी दिले आहे. कलियुगातले समर्थ हे पहिले हंस असून लक्ष्मणहंस हे सहावे आणि नारायण हंस हे सातवे हंस होत. हंस म्हणजे मूलहंसप्रेरित अद्वैतज्ञानाची अधिकारी अणि गुरुपदवी प्राप्त करुन स्वशिष्यांमध्ये अद्वैतज्ञानाचा प्रसार करणारी थोर विभूती होय. हंसराजस्वामींच्या मूळ नारायण या नावाऐवजी हंसराज हे नाव रूढ होण्यामागचे हे स्पष्टीकरण हंसपद्धतिकारांनी दिले आहे.

पुढे नारायण हंसांना वऱ्हाडात अनसिंग येथे सरदेशपांडेगिरींची नोकरी मिळाली. पण त्यांनी तीनच वर्षे ती नोकरी केली. नोकरीतून त्यांचे मन उडून गेल्यामुळे त्यांनी तिचा राजीनामा दिला व ते थेट शेवाळ्यास लक्ष्मण हंसांकडे आले. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईही त्यांच्याबरोबर आल्या. (सन १८३०). लक्ष्मण हंसांनी नारायण हंसांना तेथील एका दुकानदाराकडे हिशेब लिहिण्याचे काम मिळवून दिले. मिळकत थोडी असली तरी गुरुसांनिध्याचा लाभ झाल्यामुळे ते आनंदात होते. शेवाळ्यात दोन वर्षे मोठ्या आनंदात गेली. या अवधीत लक्ष्मीबाईंना दिवस गेले. पण सातव्या महिन्यातच त्या प्रसूत झाल्या. पुत्र झाला. तो जन्मत:च मृत अवस्थेत होता. लक्ष्मीबाईही पाचव्या दिवशी मृत्यू पावल्या. नारायण हंसांच्या गळ्यात जो काही प्रपंचाचा पाश अडकला होता, तोही तुटून गेला. तेव्हा त्यांनी गुरूंची अनुज्ञा घेऊन संचारास प्रारंभ केला. (सन १८३२).

प्रथम ते माहुरास गेले. तेथे त्यांना श्रीदत्तात्रेयाचा साक्षात्कार झाला. नंतर लक्ष्मण हंसांच्या आजाराचे वृत्त ऐकून ते परत शेवाळ्यास आले. तेथे गुरूंची त्यांनी उत्कृष्ट सेवा केली. याच मुक्कामात गुरूंच्या प्रेरणेने त्यांनी 'गुरुभक्तिसार' नावाच्या ग्रंथाची रचना केली. नंतर गुरूंची संमती घेऊन ते पुन्हा संचारास बाहेर पडले. ते फिरत फिरत डोमगावला आले. तेथून पंढरपूरला आले. तेथे जनार्दन उत्पात, सखारामबाबा डोमगावकर यांच्याशी त्यांचा परिचय झाला. त्याचे दृढ स्नेहात रूपान्तर झाले. तेथून सज्जनगडास जावे असे नारायण हंसांच्या मनात होते. पण समर्थांनीच एके रात्री त्यांना दर्शन दिले. पंढरपूरला असतानाच पूर्णाश्रमस्वामींचा व नारायण हंसांचा परिचय वाढला होता. हे स्वामी उत्तर हिंदुस्थानात जायला निघाले, तेव्हा नारायण हंसांनी त्यांच्याकडून, मनात येईल तेव्हा संन्यास घेता येईल, या हेतूने प्रैषोच्चार लिहून घेतला होता. स्वामी उत्तरेकडे निघून गेल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी संन्यास घेतला व ते 'नारायणतीर्थ' बनले. त्यांच्या या परमहंस दीक्षेमुळे त्यांना हंसराज म्हणू लागले, असे स्पष्टीकरण श्रीरघुनाथशास्त्री गोडबोले यांनी दिले आहे. पण ते पटणारे नाही. कारण स्वत: समर्थ व त्यांचे उद्धवादी शिष्य रामदासी असले तरी त्यांनाही हंसपद्धतिकारांनी 'हंस' म्हणूनच संबोधले आहे.

संन्यासदीक्षेनंतर सखारामबाबा डोमगावकरांच्या आग्रहावरून हंसराजस्वामी डोमगावला गेले. तेथे त्यांचे वास्तव्य सन १८३३ पासून सन १८४० पर्यंत होते. या काळात त्यांना बऱ्यापैकी स्वास्थ्य अनुभवता आले. त्यामुळे त्यांचे संकेत कुबडी, आगमसार, पूर्वारंभ गाथा व सदाचार असे चार ग्रंथ लिहून झाले.

सन १८४० च्या चातुर्मासात सखारामबाबा कीर्तनासाठी म्हणून हैदराबादला गेले आणि तेथेच ते समाधिस्थ झाले. त्यामुळे हंसराजस्वामींनी डोमगाव कायमचे सोडले आणि ते परंड्यास राहू लागले. सन १८४० ते १८५५ ही पंधरा वर्षे त्यांचे वास्तव्य काही अपवाद सोडल्यास परंडा येथेच होते.

परंडा येथे प्रथम त्यांचे वास्तव्य केशवराजाच्या मंदिरात होते. त्यानंतर ते राममंदिरात राहू लागले. त्यानंतर त्यांच्या भक्तांनी त्यांच्यासाठी राममंदिराच्या मागच्या बाजूस मोकळी जागा घेऊन तेथे मठ बांधून त्यांची राहण्याची व्यवस्था केली. तेथे त्यांना ध्यानासाठी गुंफा बांधली. तिच्या पूर्वभागात मारुतीची स्थापना केली. तेथेच ते अखेरपर्यंत राहिले.

केशवराजाच्या मंदिरात राहत असताना त्यांनी मनाबाई रजपूत या निरक्षर स्त्रीला लिहायला, वाचायला शिकवून तिला वेदान्त शिकण्यासाठी आख्याने रचली. तोच कथा कल्पलता हा ग्रंथ होय. राममंदिरात राहत असताना (सन १८४० ते १८४७) त्यांनी चूडालाख्यान, वेद नावाची पदे, शिवगीतेवरील 'वेदेश्वरी' टीका हे ग्रंथ रचले. मठात रहायला आल्यानंतर वाक्यवृत्ति टीका, ईशावास्योनिषदावरील वेदाज्ञा ही टीका, अनुभवामृत, तत्त्वझाडा इ. ग्रंथ त्यांनी रचले.

इ.स.१८५० मध्ये त्यांनी रघुनाथ भास्कर गोडबोले यांना गुरुमंत्र दिला. सन १८५४ मध्ये माघी पौर्णिमेस ते एकाएकी ध्यानस्थ झाले. आणि ध्यान उतरल्यानंतर पुढेही अबोलच राहिले. फाल्गुनी पौर्णिमेस रघुनाथशास्त्री गोडबोले यांना बोलावून घेतले आणि त्यांच्याशी ३६ तास संवाद केला. सन १८५५ मध्ये वैशाख शु.८ ला पहाटे शुचिर्भूत होऊन आपण चौरंगावर बसले, त्यांचे शिष्य बाबाजी जोशींना स्वत:ची पूजा करावयास सांगितले. त्यानंतर

**''ब्राह्मी मुहूर्त उत्तम काळ । मुखासी पाहत असतां सकळ ।**
**तंव एकाएकी अंतराळ । तेजोभरित जाहले ।।''** (हं.प.१३-८-३६)

त्या तेजाने सर्वांचे डोळे दिपले. अर्ध्या घटकेनंतर डोळे उघडून पाहतात तो सद्गुरू हंसराजस्वामी आत्मस्वरूपात विलीन झाल्याचे सर्वांना समजले. असा त्यांच्या निर्वाणाचा क्षण हंसपद्धतिकारांनी शब्दबद्ध करून ठेवला आहे.

हंसराज स्वामींच्या रूपाचे वर्णन श्री रघुनाथशास्त्री गोडबोले यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. ''यांचा बांधा फार उंच किंवा फार ठेंगणा, अतिकृश किंवा अतिस्थूल नसून मध्यम प्रतीचा होता. यांची अंगकांती पिवळट गौर वर्णाची होती. नाक सरळ, डोळे मोठे, पावले लहान व आवाज खणखणीत होता.'' (भरतखंडाचा अर्वाचीन कोश)

हंसराजस्वामींचे वरील चरित्र पाहता त्यांना शास्त्रशुद्ध अध्ययन करायला वेळच मिळाला नाही असे दिसते. परंतु अध्यात्मशास्त्राकडे त्यांचा ओढा लहानपणापासूनच होता. भगवद्गीता, शिवगीता, विष्णुसहस्रनाम हे ग्रंथ

त्यांच्या नित्य पठनात होते. विवेक सिंधू, एकनाथी भागवत, दासबोध, दीपरत्नाकर इ. ग्रंथांचे त्यांनी वाचन केले होते. अशा नित्यनियमाने केलेल्या ग्रंथपठनामुळे स्वामी व्युत्पन्न झाले होते. त्यांची बुद्धीही तीव्र होती. रघुनाथशास्त्री गोडबोले लिहितात,'' यांची बुद्धी इतकी विलक्षण तीव्र होती की, कोणताही विषय असो. एकदा नजरेखालून किंवा कानावरून गेला की पुरे. मग तो जातो कोठे ? ''असे असल्यामुळे

**पहा व्युत्पत्ती काही नसता । वेदशास्त्रे निघती मुखता ।**
**सहा शास्त्र अध्ययन असता । तोही पुढे कुंठित ।।''** (हंसपद्धती ९-८-६७)

असे आश्चर्योद्गार संजीवन कवींनी काढले आहेत. चिमणकवींनीही,

**''नारायण हंसस्वामींनी पहिली । रूपावळीही नाही म्हणितली ।**
**परी संस्कृत व्युत्पत्ती बाणली । आपोआप ।।''** (हंसपद्धती ७-७-१२८)

असे नमूद करून ठेवले आहे.

हंसराज स्वामींची सर्व ग्रंथरचना डोमगाव, परंडा या भागातील वास्तव्याच्या काळात झाली. ते स्वत: मुक्तच होते. पण केवळ लोकानुग्रहाखातरच त्यांनी ग्रंथप्रपंच केला. त्यांच्या नावावर त्यांच्या चरित्रकारांनी जवळ जवळ सोळा ग्रंथांची नोंद केली आहे. त्यातील काही अद्यापी मिळालेलेच नाहीत, काही ग्रंथ अर्धवट अवस्थेत मिळालेले आहेत, काही प्रकाशित झालेले आहेत तर काही अजून प्रकाशनाची वाट पहात आहेत या सर्व ग्रंथांची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

अ) अनुपलब्ध ग्रंथ - १) गुरुभक्तिसार, २) स्वात्मादर्श (संस्कृत) ३) कथाकल्पलता (दहा प्रकरणे) आणि ४) भक्तिज्ञान वैराग्यपर स्फुट अभंग व पदे (संख्या अज्ञात).

आ) अर्धवट अवस्थेत मिळालेले ग्रंथ. १) कथा कल्पलता आठ प्रकरणे. २) भक्तिज्ञान वैराग्यपर स्फुट अभंग व पदे (सुमारे १००)

इ) अप्रकाशित ग्रंथ.- १) गद्यरूप तत्त्वझाडा २) पूर्वारंभगाथा

ई) प्रकाशित ग्रंथ. १) आगमसार २) संकेत कुबडी ३) कथा कल्पलता (उपलब्ध आठ प्रकरणे), ४) सदाचार ५) चूडालाख्यान, ६) वेदेश्वरी ७) वाक्यवृत्ती ८) वेदाज्ञा, ९) वेद नावाची पदे, आणि १०) अमृतानुभव (समसंरव्य - समच्छंदी टीका.) हे सर्व ग्रंथ मिळून स्वामींची एकूण ग्रंथ संख्या (ओवीसंख्या) सुमारे ३७००० भरते. ही संख्या निश्चितच उपेक्षणीय नाही.

यांतील सदाचार आणि लघुवाक्यवृत्ती हे दोन ग्रंथ शंकराचार्यांच्या दोन छोट्या प्रकरणांवरील टीका आहेत. वेदाज्ञा ही ईशावास्योपनिषदावरील टीका आहे. वेदेश्वरी ही शिवगीतेवरील बृहट्टीका आहे. चूडालाख्यान हे योगवासिष्ठातील आख्यानावर आधारित आहे. संकेत कुबडी ही दासबोधावरील तर पूर्वारंभ गाथा ही समर्थांच्या पूर्वारंभ या लघुप्रकरणावरील टीका आहे. सटीक अमृतानुभव ही ज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतानुभवावरील समसंख्य, समच्छंदी टीका आहे. आगमसार, कथाकल्पलता, तत्त्वझाडा, वेद नावाची पदे हे ग्रंथ स्वतंत्र आहेत.

या सर्व ग्रंथांमधून स्वामींनी मराठी वाङ्मयात अपरिचित अशा विषयांवर लिहून नव्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे हे सर्व ग्रंथ वेदान्त याच विषयावरचे आहेत. हंसराजस्वामी

वेदान्ताचे गाढे अभ्यासक आणि प्रवक्ते होते. वेदान्ताखेरीज दुसरे काहीही लिहीत नसल्याची त्यांची प्रतिज्ञाच होती.

**''समुच्चयही जरी असता । मी बोलेन वेदान्तसंमता ।**
**जेथें परोक्षत्वाची वार्ता । लागोंचि नेदी ।।''** (वेदेश्वरी १.४३)

एखाद्या पतिव्रतेच्या निष्ठेने त्यांनी आपली वेदान्तनिष्ठा जपली आहे. वेदान्ताखेरीज दुसऱ्या कोणत्याही विचाराचे वा मार्गाचे समर्थन त्यांच्या ग्रंथात आढळणार नाही. त्यांच्या ग्रंथात नमनादाखल कोणत्याही देवतेची स्तुती आढळणार नाही. एका सद्गुरूखेरीज दुसरे कोणतेही दैवत त्यांनी मानले नाही. सांख्य, योग, भक्ती या सर्व निष्ठा त्यांच्या वेदान्ताच्या भट्टीत एकरूप बनतात. अशा तऱ्हेची जाज्वल्य वेदान्तनिष्ठा मराठीत तरी कोणत्याही संतकवीने दाखवलेली नाही. या निष्ठेमुळेच ते स्वत:च्या ग्रंथकर्तृत्वाबद्दलसुद्धा मौन पाळून आहेत. कोणत्याही ग्रंथात त्यांनी स्वत:चा ग्रंथकर्ता म्हणून उल्लेख केला नाही. त्यांनी आपले बहुतेक सर्व ग्रंथ वेद या टोपणनावाने मुद्रांकित केले आहेत. त्यांच्या वेदेश्वरी, वेदाज्ञा, वेदनावाचे अभंग या ग्रंथनामांमध्ये हेच टोपण नाव अभिप्रेत आहे. चूडालाख्यानातील अभंगांमध्ये हीच नाममुद्रा सामान्य अर्थाने येते.


स्वामींच्या बहुतेक सर्वग्रंथामध्ये वेदान्ताची मांडणी अगदी मुद्देसूद आणि टप्प्याटप्प्याने केलेली असते. त्यांचे ग्रंथलेखन बव्हंशी शिष्य प्रबोधनासाठी असल्यामुळे त्यांच्या लेखनात हा गुण उतरला आहे असे दिसते. स्वामींच्या सर्व ग्रंथात वेदान्त प्रतिपादनाची एक शास्त्रीय पद्धत आढळते बहुतेक सर्व ग्रंथात आरंभी अनुबंधचतुष्टयाची चर्चा असते. त्यानंतर वेदान्तातील ब्रह्म, माया, जीव, ईश्वर, पिंडब्रह्मांडाची रचना, इ. विषयांचे अत्यंत सुबोध आणि सोदाहरण विवेचन आढळतें प्रत्येक ग्रंथामध्ये याप्रमाणे ज्ञानखंड असतोच, नंतर उत्तरार्धात स्वरूपाच्या प्राप्तीसाठी वेगवेगळे अभ्यास सांगितलेले असतात. हा उपासना खंडही बहुतेक ग्रंथात असतोच स्वामींच्या वेदान्ताचा मूलाधार शंकराचार्यप्रणीत वेदान्त हाच असला तरी अधिकारपरत्वे स्वामींनी त्याची मांडणी निरनिराळ्या प्रकारांनी केली आहे. स्वामींनी केलेले अभ्यासनिरूपण ही त्यांनी मराठी वाङ्:मयाला दिलेली देणगी मानावी लागेल. त्यांच्या अभ्यासमीमांसेची बहुतेक सर्वच अभ्यासकांनी एकमुखाने प्रशंसा केली आहे.

आपल्या सर्वच संतांप्रमाणे हंसराजस्वामींनीही आपल्या काळातील परिस्थितीचे भान ठेवून आपली ग्रंथरचना केली आहे. सभोवताच्या परिस्थितीचे अवलोकन करता, अज्ञानामुळे लोकांची कशी हानी होते हे त्यांच्या लक्षात आले होते. त्याबद्दल खंती वाटूनच त्यांनी ग्रंथरचनेचा एवढा मोठा खटाटोप केला. समाजात परमार्थाच्या नावाखाली क्रियाप्रधान मार्गाचे फारच स्तोम माजले होते. स्नानसंध्या, होमहवन, तीर्थयात्रा, वाऱ्या, उपासतापास, व्रते, पारणी, उद्यापने, क्षुद्र देवतांच्या उपासना, नवससायास यातच परमार्थ अडकून पडला होता. कोणालाही परमेश्वराचे खरे स्वरूप कळत नव्हते. चमत्कार, सिद्धी इ. जेथे दिसतील तेथे लोक वेड्यासारखे धावत होते. त्याचा गैरफायदा घेऊन भोंदू गुरू लोकांच्या डोळ्यात धूळ फेकत होते. त्यातल्या त्यात योगाभ्यासाच्या भोवती विशेष तेजोवलय निर्माण झाले होते. अशा या गोंधळाच्या परिस्थितीत हंसराजस्वामींना वेदान्ताची शिकवण यथार्थ स्वरूपात लोकांसमोर मांडण्याची गरज वाटली. वरील सर्व क्रियाप्रधान मार्गांचा स्पष्ट शब्दात निषेध करून 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हा वेदान्ताचा सिद्धान्त त्यांनी ठासून सांगितला एखाद्या धर्मोपदेशकाच्या निष्ठेने आपल्या सर्वग्रंथातून त्यांनी याच सिद्धान्ताचा पाठपुरावा केला.

मोक्ष म्हणजे काही क्रियांच्या द्वारा प्राप्त करण्याजोगी एखादी वस्तू वा पद नसून विचाराच्या, विवेकाच्या साहाय्याने अनुभवास येणारी मनाची समधात अवस्था आहे. ती विवेकाशिवाय अन्य कोणत्याही उपयांनी साध्य होणार नाही. ज्यांना ती सहजासहजी साध्य होणार नाही त्यांच्यासाठी त्यांनी निरनिराळे अभ्यास सांगितले आहेत. त्यांचे हे निरूपण मराठी साहित्यात अपूर्व आहे. आपल्या मताचे प्रतिपादन करताना त्यांनी कशाचीही भीड बाळगली नाही किंवा कोणत्याही प्रकारची तडजोड पत्करली नाही. प्रसंगी लोकगंगेच्या प्रवाहाच्या विरूद्ध जाऊन जे जे सवंग दिसले जे जे दांभिक अथवा अज्ञानमय वाटले. त्या त्या सर्वांचा त्यांनी परखडपणे समाचार घेतला. थोड्याफार फरकाने आजची आपली परिस्थिती त्यांच्या काळातील परिस्थितीसारखीच आहे. तेव्हा त्यांचे मार्गदर्शन कालबाह्य ठरण्याचा प्रश्न येत नाही.

**हंस मंडळ, परंडा**

# संकेत कुबडी : एक अवलोकन



हंसराज स्वामींना त्यांच्या लहानपणापासूनच समर्थांच्याबद्दल आदर होता. त्यांच्या नित्याच्या वाचनात दासबोध होता. त्यांना गुरूपदेश झाला तोही समर्थ सांप्रदायिकाचाच. हंसराजस्वामी हे समर्थांच्या उद्धव परंपरेतले समर्थांपासूनचे सातवे सत्पुरुष होत. गुरूंची अनुज्ञा घेऊन ते संचारार्थ बाहेर पडले आणि फिरत फिरत डोमगावला येऊन पोहोचले. तेथे काही दिवस राहून कोणाचीही भेट न घेता ते पंढरपुरास आले. तेथे त्यांची सखारामबाबा डोमगावकर यांच्याशी ओळख झाली. पंढरपूरला असतानाच त्यांना सज्जनगडला जाण्याची इच्छा झाली, पण त्याच रात्री त्यांना समर्थांचा साक्षात्कार झाला. पुढे सखारामबाबांच्या आग्रहावरून ते डोमगावला गेले तेथे ते ५-६ वर्षे राहिले. त्या काळात सखारामबाबांसमवेत ते सज्जनगडावर गेले होते. तेथेही त्यांना समर्थांचा साक्षात्कार झाला.

डोमगावच्या मुक्कामात त्यांनी संकेत कुबडी या दासबोधाचे सार सांगणाऱ्या ग्रंथाची रचना केली (सन १८३९). त्यानंतर पूर्वारंभ गाथा या समर्थांच्या एका लघुप्रकरणावरही गद्य टीका लिहिली. पुढे परंड्यास आल्यानंतर १८४९ इ.स.मध्ये त्यांचे सद्गुरू लक्ष्मणहंस परंड्यास आले. त्यांच्या सूचनेनुसार त्यांनी आपल्या चिमणकवी आणि संजीवन या कविशिष्यांकडून हंसपद्धती हा आपल्या गुरुपरंपरेचा इतिहास सांगणारा ग्रंथ लिहवून घेतला. त्यात हंस संप्रदायाची माहिती सांगताना संप्रदायातील पूज्य आचार्यांचा उल्लेख करताना हंसपद्धतिकारांनी समर्थांचा अग्रक्रमाने उल्लेख केला आहे. हंसराज स्वामींनीही आपल्या आगमसार, संकेत कुबडी या ग्रंथामध्ये समर्थांचा खूप आदराने उल्लेख केला आहे. खास समर्थांनीच मांडलेल्या समाधानाच्या सात भूमिका, चौदा ब्रह्मे इ. संकल्पना हंसराज स्वामींनी आपल्या ग्रंथात समाविष्ट केल्या आहेत. समर्थांचे अनेक विचार हंसराजस्वामींच्याही विवेचनात येतात. यावरून हंसराज स्वामींना समर्थांचे किती आकर्षण होते हे लक्षात येते. या आदरातूनच त्यांचा संकेत कुबडी हा ग्रंथ निर्माण झाला आहे.

दासबोधातील वेदान्त स्पष्ट करण्याच्या हेतूने हंसराज स्वामींनी हा ग्रंथ डोमगावात असताना लिहिला (१८३९). हंसपद्धतिकार म्हणतात,

**'प्रथम दासबोधाचा संकेत । काढिला भावार्थ वेदान्त संमत ।**
**रामदासाच्या हातीं विराजत । यास्तव नाम संकेत कुबडी ।।'** (हं.प.७-८-२७)

हा ग्रंथ प्रकाशित झाला असून त्याच्या आतापर्यंत तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. पहिल्या दोन आवृत्त्यांमध्ये या ग्रंथाचे कर्तृत्व समर्थांना देण्यात आले होते. नंतर हंसमंडळाच्या वतीने कै.अनंतदास रामदासी यांनी अत्यंत साक्षेपाने तिचे संपादन करून १९५० साली ती प्रकाशित केली आहे. या तिसऱ्या आवृत्तीत ही चूक अर्थातच दुरुस्त केली आहे. त्या आवृत्तीत अनंतदास रामदासी यांनी त्या आवृत्तीचा इतिहास सांगणारी प्रस्तावना, श्रीसंकेत कुबडीच्या साह्याने होणारे श्रीमद्दासबोधाचे स्वरूपदर्शन हा अभ्यासपूर्ण निबंध आणि हंसराज स्वामींचे

संशोधनपूर्वक लिहिलेले चरित्र, हंसराज स्वामींच्या एकूण सर्व लेखनांची माहिती इ. मजकूर असलेले सव्वीस पृष्ठांचे प्रास्ताविक जोडलेले आहे. या ग्रंथाला प.प.स्वामी योगेश्वरानंदतीर्थ शंकराचार्य, जगन्नाथपुरी यांचे आशीर्वाद लाभलेले आहेत. श्री योगेश्वरानंद तीर्थ हे हंसराजस्वामी - रघुनाथशास्त्री गोडबोले - माधव - योगेश्वरानंदतीर्थ या परंपरेतले होते. त्यामुळे त्यांना या ग्रंथाबद्दल आस्था होती. अनंतदास रामदासी यांनी संशोधित केलेल्या हंसराजस्वामींच्या चरित्रात प्रथमच त्यांची ज्योतिर्विदांनी तयार केलेली जन्मकुंडली, हंसराजस्वामींच्या जन्मतिथीचा निवाडा, हंसराजस्वामींच्या चरित्रातील घटनांच्या कालक्रमाची निश्चिती या विषयांची माहिती समाविष्ट केली आहे.

नंतर संकेत कुबडीची ६४७ ओव्यांची संहिता व तिच्याखाली महत्त्वाच्या विषयांवरच्या तळटिपा दिल्या आहेत. शेवटी श्रीहंसराजस्वामींवर कै.रघुनाथ शास्त्री गोडबोले यांनी रचलेले स्तोत्र व हंसराज स्वामींची चिमणकवींनी केलेली आरती देऊन ग्रंथाची समाप्ती केली आहे. ग्रंथाची छपाई निर्दोष असून तळटिपांची माहिती नेमकी आणि विद्वत्तापूर्ण आहे. ही आवृत्ती म्हणजे संपादनाचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल.

श्री दासबोधाच्या एकेका दशकाचा सारांश सांगण्यासाठी संकेत कुबडीमध्ये प्रत्येकी एक प्रकरण दिले आहे. त्या प्रकरणालाही स्वामींनी दशक असेच नाव दिले आहे. या ग्रंथाचे एकूण २० दशक असून त्याची ओवी संख्या ६४७ एवढी आहे. हंसराज स्वामींच्या मते दासबोधाचे दोन भाग असून १ ते ८ दशक हा त्याचा पूर्वार्ध आहे. आणि ९ ते २० दशक हा त्याचा उत्तरार्ध आहे. स्वामींनी दासबोधाच्या ७७५१ ओव्याचा ६४७ ओव्यात म्हणजे १/१२ इतका संक्षेप केला आहे.

दासबोधाबद्दल एक समजूत अशी आहे की, तो अत्यंत सुलभ आहे, त्यामुळे बरेचसे वाचक त्याच्या वरवर दिसणाऱ्या अर्थावर समाधान मानतात, पण त्याच्या अभिप्रेत अर्थाला मुकतात. म्हणून स्वामी म्हणतात.

**''दासबोध स्वल्प वाटे, ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।**
**जेथे अतिसूक्ष्म विचारा । फडके होती ।।** (सं.कु.५-२१)

दासबोधाचा गहन अर्थ स्पष्ट करण्यासाठीच तर ह्या कुबडीचा अवतार आहे.

कुबडी म्हणजे ''रामदासी सांप्रदायिकाजवळ असणारा व योगाभ्यासात विश्रांतीसाठी उपयोगी पडणारा विशिष्ट आकाराचा लाकडी दंड. त्यालाच काहीजण योगदंड असेही म्हणतात. दुय्यम अर्थाने दासबोधाचा अर्थ विशद करून चिंतनिकेस उपयोगी पडणारा, ज्यात प्रत्येक समासातील मर्म थोडक्यात स्पष्ट केले आहे असा ग्रंथ.'' (सं.कु.१-१ वरील टीप) लेखी प्रतीत काही प्रकरणात यास 'संकेत सूचना' असेही नाव दिलेले आढळते. दासबोधाचे मर्म कळण्यास सुलभ पडावे, असाच हा ग्रंथ निर्माण करताना स्वामींचा उद्देश होता. ते म्हणतात,

**''उतरावया चंचळ सागर । दासबोध जहाज थोर ।**
**साधक पावती पैलपार । कुबडी तेथे होडगें ।।''** (सं.कु.२०-४३)

किंवा,

**''दासबोधीचे शब्दांपासी । अर्थभिक्षा मागणें ज्यासी ।**
**तरी हातीं घेऊन कुबडीसी । बुद्धीझोळीसी साठवा ।।''** (सं.कु.९-१)

अशी ही संकेत कुबडी आहे. थोडक्यात सर्व सार सांगावयाचे असल्याने तिच्यात फक्त मुद्दलावर डोळा आहे. काव्यात्मक अलंकरणाला तिच्यात वाव नाही. त्यामुळे कदाचित् ती नीरसही वाटेल. पण तिचे महत्त्व दासबोधाच्या अभ्यासकांना नाकारता येणार नाही. हंसराजस्वामींना तिच्या या नीरसतेची कल्पना आहे. म्हणून प्रत्येक दशकाच्या पुष्पिकेत ते म्हणतात,

**''इति श्री संकेत कुबडी। दासबोधीचे सार निवडी ।**
**वाकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।''**

दासबोधाचे सार सांगणारी ही कुबडी नीरस असली तरी श्रीसमर्थांना ती आवडेल असा त्यांना आत्मविश्वास आहे.

दासबोधात अनेक विषयांची चर्चा असल्याने त्याचे स्वरूप बरेचसे संमिश्र झाले आहे. पण समर्थांच्या म्हणण्याप्रमाणे त्यात प्रामुख्याने 'बहुधा अध्यात्मनिरूपण'च आहे. समर्थांनी दासबोधाचे तात्पर्य म्हणून,

**'भक्तीचेन योगें देव । निश्चयें पावती मानव'** (दास.१-१-४)

असे सांगितले आहे. ते आणखी म्हणतात,

**''ग्रंथाचे पाहता वीस दशक । आणि समास तरी दोन शतक ।**
**परी इतुकीयांचे तात्पर्य एक । जे अनिर्वाच्य अपरोक्ष ।।''** (सं.कु.१-१०).

श्री समर्थांचा भक्तिमार्ग आणि हंसराज स्वामींचा वेदान्त यांमध्ये सकृद्दर्शनी विरोध असतो. पण समर्थांच्या **'भक्त म्हणजे विभक्त नव्हे'** (दास.४-९-६) या व्याख्येवरून आणि आत्मनिवेदनभक्तीच्या त्यांनी सांगितलेल्या स्वरूपावरून या विरोधाचे निराकरण होते. दासबोधाच्या तात्पर्यासंबंधी अनेकांची भिन्न भिन्न मते उद्धृत करून स्वामींनी त्यांना विरोध केला आहे.

**''ग्रंथीचे तात्पर्य न जाणती । कोणी समुच्चयवाद म्हणती ।**
**अथवा त्रिकांडही कल्पिती । कोण्ही व्यवहार ज्ञान ।।''** (सं.कु.१-६)

पण स्वामींच्या मते

**''पाहातां दासबोधींच्या अर्था । विचार नसे वेदान्ता परता ।**
**निषेधिलें योगसांख्यादि मता । मा तर्कव्याकरण कायसे ।।''** (सं.कु.१-३).

दासबोधातील हा वेदान्त इतर कथांसारखा अदृष्ट फळ देणारा नसून 'प्रतीत भोजनासारिखी केवळ' असा आहे. पण तो 'गुरुमुखातून आकलन करून घ्यावा.' असे स्वामींचे म्हणणे आहे.

स्वामींनी दासबोधातील वेदान्ताची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली आहे. त्यांच्या मते पहिल्या पाच दशकात समर्थांनी अनुबंध चतुष्टय सांगितले आहे. अनुबंध चतुष्टय म्हणजे चार अनुबंध. 'ज्याच्या ज्ञानाने मुख्य ग्रंथात प्रवेश होतो त्यास अनुबंध म्हणतात.' ते चार आहेत विषय, संबंध, प्रयोजन आणि अधिकारी.' (सं.कु.१-२५ वी टीप) दासबोधाचा विषय ब्रह्म हा असून 'जीवेश ऐक्य' हा त्यातील संबंध आहे. मोक्ष हे त्याचे प्रयोजन आहे. या तीन अनुबंधांचे वर्णन पहिल्या दशकाच्या पहिल्या समासात केले असून दुसऱ्या समासापासून ते पाचव्या दशकाच्या अखेरपर्यंत चौथा अनुबंध जो अधिकारी त्याचे वर्णन आहे. साधन-

चतुष्टयसंपन्नता हे अधिकाऱ्याचे मुख्य लक्षण आहे. ती साधने म्हणजे (१) नित्यानित्यवस्तुविवेक, (२) इहामुत्र-फलभोग विरक्ती, (३) शमादिषट्क संपत्ती आणि (४) मुमुक्षुत्व. यांपैकी नित्य तत्त्वाची पहिल्या दशकात, अनित्य तत्त्वाची दुसऱ्या दशकात चर्चा करून ऐहिक आणि आमुष्मिक (पारलौकिक) फलभोगाच्या विरक्तीचे स्वरूप तिसऱ्या दशकात स्पष्ट केले आहे. चवथ्या दशकात नवविधा भक्तीचे वर्णन वरवर पाहता जाणवते, पण स्वामींना, 'त्यातून शमादिषट्काचेच वर्णन समर्थांस अभिप्रेत आहे.' असे वाटते. पाचव्या दशकात मुमुक्षुत्वाचे वर्णन आहे, असे स्वामी सांगतात. अशा तऱ्हेने दासबोधाकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी स्वामींनी प्रकट केली आहे. विशेषत: नवविधा भक्तीचे आध्यात्मिक स्वरूप स्पष्ट करून त्यांपैकी प्रत्येक भक्ती ही उत्तरोत्तर श्रेष्ठत्वाचा प्रकार नसून शमादी सहा साधनांच्या पुष्टीसाठी उपयोगी पडणारी साधने आहेत, हे त्यांचे विवेचन लक्षणीय वाटते.

सहाव्या दशकात साधकास ब्रह्मात्म्यैक्याची प्रचीती येऊन पूर्णः न व्हावे म्हणून निरूपण केले आहे. सातवा दशक नि:संदेह ज्ञानाचा दशक आहे. त्यात प्रथम ब्रह्माचे विधिनिषेधमुखाने वर्णन करून त्याच्या प्राप्तीसाठी प्रथम ममत्व बुद्धीचा नाश हा उपाय सुचविला आहे. ब्रह्माच्या अनुभवानंतर अशुद्ध कल्पनांचे निरसन होत असले तरी शुद्ध कल्पनांचे अस्तित्व राहतेच हे स्पष्ट करून नित्यमुक्त, जीवन्मुक्त, विदेहमुक्त यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ''ब्रह्माचा अनुभव घ्यावा पण अनुभविता होऊच नये.' असा शेवटी सिद्धान्त सांगून जीवन्मुक्तीचे सविस्तर वर्णन केले आहे. या सातव्या दशकातच चौदा ब्रह्मांचे निरूपण आहे. स्वामी त्या संदर्भात म्हणतात,

**''स्वरूप बोलिलें नव जाय । आणि अनुभवासीही न ये ।**
**म्हणोनि बहुप्रकारें नाना उपायें । कळावया साधका ।।१२।।**
**पूर्व पक्षें आघवें । नामरूप लागे बोलावें । निर्विकल्पीं कल्पितां स्वभावें ।**
**मोडे कल्पना ।।१३।।** (सं.कु.७-१२-१३)

आठवा दशक हा ज्ञानदशक म्हणून ओळखला जातो. त्यात सृष्टीचा कर्ता कोण, ईश्वर आणि त्याची माया, ईश्वर जगत् संबंध इत्यादींचे निरूपण आले आहे. त्यानंतर पंचीकरणाची माहिती देऊन सृष्ट्युत्पत्तीचे स्पष्टीकरण केले आहे. शेवटी मूळ मायेचा निरास कसा करावा हे सांगून ज्ञात्याच्या अनुभवाचे निरूपण केले आहे.

अशा तऱ्हेने या आठ दशकात दासबोधाचा पूर्वार्ध संपतो. त्यातून व्यतिरेक पद्धतीने ज्ञानाचे निरूपण आले आहे असे हंसराजस्वामींचे मत आहे. यापुढील नऊ ते वीस दशक उत्तरार्धाचे आहेत. या दशकांतच अनेक विषयांची खिचडी जाणवत असली तरी हंसराजस्वामींनी त्यातून केवळ वेदान्ताचेच प्रतिपादन असल्याचे सांगितले आहे.

समर्थांनी दासबोधाच्या चौथ्या दशकाच्या चौथ्या समासात
**''संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिती आणि अलिप्तपण ।**
**सहज स्थिती उन्मनी विज्ञान ।''** (दास.४-४-८)

हे समाधानाचे सात संकेत सांगितले आहेत. नवव्या दशकाच्या पठनाने सहजस्थिती अंगी बाणते, तर दहाव्या दशकाच्या पठनाने उन्मनी स्थिती प्राप्त होते; अकराव्याने निवेदनाची सिद्धी होते, तर बाराव्याने

अलिप्तता येते. तेराव्याच्या पठनाने विदेहस्थिती प्राप्त होते तर चौदाव्या व पंधराव्या दशकांमुळे विज्ञान आणि संगत्याग साध्य होतात, असे त्यांनी सांगितले आहे. अशा प्रकारे ९ ते १५ या दशकांचे एक वेगळेच सार सांगण्याचा हंसराज स्वामींनी प्रयत्न केला आहे. पण त्या दशकांचा समासवार जो सारांश त्यांनी सांगितला आहे, त्यातून वरील सप्त संकेत कसे निष्पन्न होतात हे कळत नाही. त्यातून त्यांनी या सात संकेतांचा जो क्रम लावला आहे तोही यादृच्छिकच दिसतो. तो समर्थांच्या ओवीतील क्रमाप्रमाणे नाही किंवा त्या त्या समासाच्या विषयाप्रमाणेही असल्याचे दिसत नाही. या बाबतीत आपलीच कुठेतरी गल्लत होते आहे असे वाटते. एकतर या समाधानाच्या सात संकेतांमध्ये काही क्रम असण्याची गरज नाही. कारण सर्व अवस्थांची नावे भिन्न असली तरी त्या सर्व एकरूपच आहेत. दुसरे असे की, या अवस्था म्हणजे त्या त्या दशकाचे सार होत. असे स्वामींनी कुठेही म्हटलेले नाही. या अवस्था म्हणजे त्या त्या दशकाच्या पठनाने अथवा चिंतनाने प्राप्त होणाऱ्या फलश्रुतीच्या स्वरूपाच्या होत, असे स्वामी सांगतात. हे लक्षात घेता फलश्रुती आणि आशय यांचा संबंध जुळत नाही, किंवा या अवस्थांमध्ये काही अनुक्रम दिसत नाही, अशा तक्रारी करता येत नाहीत. उलट पहिल्या आठ दशकात ज्ञानाचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर त्याच्या पुढच्या सात दशकातून या ज्ञानोत्तर अवस्थांचे निरूपण असावयास काहीच हरकत नाही, असे म्हणता येते.

समर्थांच्या दासबोधाची एक सुसूत्र मांडणी स्वामी करू पाहत होते. ती पंधराव्या दशकापर्यंत त्यांनी सुसंगतपणे केली, पण १६ ते २० या दशकात त्यांचा हा प्रयत्न यशस्वी झाल्याचे जाणवत नाही. सोळाव्या दशकात 'परिचर्या' या गुणाचे निरूपण आहे. असे स्वामी मानतात, तर सतराव्या दशकात वासनाजय आणि मनोजय यांचे निरूपण आहे, असे ते म्हणंतात. अठराव्या दशकात असंभावना व विपरीत भावना नष्ट करण्याचे उपाय सांगितले असून एकोणिसाव्या दशकात शोकमोक्ष ही अवस्था सांगितली आहे. शेवटी विसाव्यात निरतिशयानंद प्राप्तीचे वर्णन केले आहे, असे स्वामींचे मत आहे. वरील ९ ते १५ या दशकात सांगितलेले समाधानाचे सात संकेत हे त्या दशकातील आशयाची संबंधित नसून त्यांच्या फलश्रुतींशी संबंधित आहेत असे आपण म्हटले, तसेच या पाच दशकांच्या बाबतीतही मानावे असे म्हटले तर चालण्यासारखे आहे. या परिचर्यादी पाच गुणांमध्ये वेदान्तप्रणीत सुसंगत असा क्रमही आढळतो. प्रश्न एवढाच उरतो की, पंधराव्या दशकापर्यंत ज्ञानोत्तर समाधानाच्या सप्त भूमिकांची अवस्था प्राप्त झाल्यानंतर परिचर्या, असंभावना, विपरीत भावना इत्यादींचे वर्णन करण्याची आवश्यकता आहे का ? ज्ञान झाल्यानंतर असंभावनादी अज्ञान प्रकारांचे अस्तित्व तरी राहील का ?

या उत्तरार्धातील विवेचन अन्वय पद्धतीचे आहे. असे स्वामी म्हणतात. पण ते त्यांना स्पष्ट करता आलेले नाही. ग्रंथातील आशय आणि स्वामींना अभिप्रेत असलेला आशय यांची गल्लत झाल्यासारखे वाटते.

या संकेत कुबडीचा सर्व भर दासबोधाचा साररूप आशय देण्याकडे असल्याने मागे म्हटल्याप्रमाणे काव्यालंकरणाकडे स्वामींचे दुर्लक्ष झाले आहे. तथापि स्वामींनी शक्यतो दासबोधाच्या शब्दातच दासबोधाचे सार काढण्याचे धोरण ठेवल्याने समर्थांच्या आर्ष वाणीचा अंगभूत गोडवा या ग्रंथात आपोआप उतरला आहे. कित्येकदा मूळ ग्रंथातील ओव्या स्वामींनी जशाच्या तशा उद्धृत केल्या आहेत. समर्थांच्या शैलीशी स्वामी अगदी एकरूप झालेले दिसतात. त्यामुळे आपण समर्थांचीच कृती वाचत आहोत, असे वाटते.

**''सुख असावें सर्वांसी वाटतें । तरी शब्दें निववावीं समस्त भूतें ।**
**मग जगदांतर वोळतें ।....** '' (सं.कु.१२-३),
**''विषयत्यागेंविण परमार्थ । म्हणे तयाचे जिणें व्यर्थ ।**
**अरे जो समर्थांचा समर्थ । तोही वैराग्य संरक्षी ।''** (सं.कु.१२-१५),
**''संग जडला चंचळाचा । निश्चळ व्हावया अवकाश कैंचा ।**
**परी सविकल्पद्वारा निर्विकल्पाचा । अनुभव घ्यावा ।।''** (सं.कु.२-१६),
**''सागरामध्ये खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य ।**
**मतिसारखा मतिप्रकाश । अंतरीं वाटे ।।''** (सं.कु.९-४५)

अशांसारख्या कितीतरी ओव्या समर्थांच्या नावावर खपून जातील.

दासबोधावरच टीका लिहीत असल्याने समर्थ आणि दासबोध यांबद्दलचे आदराचे उद्‌गार स्वामींनी या ग्रंथात जागोजागी काढले आहेत.

**श्री सज्जनगडनिवासी । जो का सच्चित्सुखाची दासी ।**
**वर्णावें तयाचे स्वरूपासी । तरी अनिर्वाच्य ।।१।।**
**मुमुक्षु साधक चातकजन । तयांचे व्हावें समाधान ।।**
**वोळुनि कृपेचा घन । दासबोध जीवन वर्षला ।।२।।** (सं.कु.१-१-२)

**उतरावया चंचळ सागर । दासबोध जहाज थोर ।।**
**साधक पावती पैलपार । कुबडी तेथें होडगें ।।** (सं.कु.२०-४३)

**दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।।**
**जेथें अतिसूक्ष्म विचारा । फडके होती ।।** सं.कु.५-२१) इ.

असे हे संकेत कुबडीचे स्वरूप आहे. एका वेदान्तनिष्ठाच्या नजरेतून तयार झालेली दासबोधाची ही सविस्तर अवतरणिकाच आहे, असे समजावयास हरकत नाही. दासबोध वाचताना तपशिलात अडकून मुख्यार्थाकडे दुर्लक्ष होऊ नये, पौर्वापर्य संबंध लक्षात राहून सर्व अर्थ मनात ठसावा अशी इच्छा असणारांस हा ग्रंथ उपयुक्त ठरेल.

**प्रा.डॉ.कल्याण काळे**
पुणे.

दि.१-१२-२००९
श्रीदत्त जयंती

।। श्रीरामसमर्थ ।।

# श्री संकेतकुबडी

## पूर्वार्ध

### दशक पहिला

।। श्रीरामसमर्थ ।। अथ श्रीमद्दासबोधींची संकेत[१] सूचना प्रारम्भ।।

श्रीसज्जनगडनिवासी । जो का सच्चित्सुखाची[२] रासी । वर्णावें तयाचे स्वरूपासी । तरी अनिर्वाच्य[३] ।।१।। मुमुक्षु[४] साधक[५] चातकजन । तयांचें व्हावें समाधान । वोळुनि कृपेचा घन । दासबोधजीवन[६] वर्षला ।।२।। पाहातां दासबोधींच्या अर्था । विचार नसे वेदान्तापरता। निषेधिलें योग-सांख्यादि मतां । मा[७] तर्कव्याकरण कायसे ।।३।। असो येथें स्तवनासी। रिगावा[८] नाहीं वाचेसी । साधकें येथींच्या अर्थासी । अनुभऊन पहावें ।।४।। नव्हे इतर कथा[९] अदृष्टफळ[९] । प्रतीत[१०] भोजनासारिखी[११] केवळ । आतां ग्रंथींचें [१२] तात्पर्य सकळ। अल्प संकेतें [१] आकळूं ।।५।। ग्रंथींचें [१२] तात्पर्य न जाणती । कोण्ही समुच्चयवाद [१३] म्हणती । अथवा त्रिकांड[१४] हि कल्पिती । कोण्ही व्यवहारज्ञान [१५]।।६।। ज्ञानहीण जे

---

**श्री संकेत कुबडी भावार्थ-** श्रीमद्दासबोधाचे मर्म उलगडून सांगणाऱ्या या संकेत कुबडी ग्रंथाला आता प्रारंभ होत आहे. सत्, चित् आणि आनंद या ब्रह्मस्वरूपलक्षणांची केवळ रासच असलेल्या, सज्जनगडावर निवास करणाऱ्या श्रीसमर्थांचे वर्णन करावे म्हंटले तर ते अनिर्वाच्य म्हणजे वर्णनाच्या पलीकडे असल्यामुळे त्यांचे वर्णन अशक्यच आहे. (१) मुमुक्षू, साधक या अवस्थांत असणारे परमार्थी लोक हे चातकांप्रमाणे असून त्यांचे समाधान व्हावे म्हणून कृपेचा घन म्हणजे मेघ होऊन समर्थांनी दासबोधरूपी जलाचा वर्षाव केला (२) दासबोधाच्या मुख्य अर्थाचा विचार करू लागले असता असे लक्षात येते की, त्यात वेदान्ताखेरीज अन्य विषय नाही. समर्थांनी योगमार्ग, सांख्यदर्शन यांसारख्या दिग्गजांच्या मतांचा निषेध केला आहे. मग तर्कशास्त्र, व्याकरण हे विषय त्यांपुढे काहीच नव्हेत. (३) ते राहू दे, पण अशा समर्थांचे स्तवन करण्यासाठी मात्र वाणीला प्रवेश मिळत नाही. तेव्हा साधक जनांनी या ग्रंथातील (दासबोधातील) आशय प्रत्यक्ष अनुभवानेच समजून घ्यावा. (४) या ग्रंथात (दासबोधात) व्रतवैकल्याच्या अदृष्ट फल सांगणाऱ्या (स्वर्ग, वैकुंठ इ. च्या प्राप्तीच्या डोळ्यांना न दिसणाऱ्या फलांचे वर्णन करणाऱ्या) कथा नाहीत. पण येथील अनुभव मात्र जेवणानंतर ताबडतोब मिळणाऱ्या तृप्तीच्या अनुभवासारखा आहे. अशा या ग्रंथाचा (दासबोधाचा) सगळा तात्पर्यार्थ अगदी थोडक्यात समजून घेऊ. (५) या ग्रंथाचे तात्पर्य लोकांच्या लक्षात येत नाही. कोणी त्यात समुच्चयवाद आहे असे म्हणतात. कोणी त्यात कर्म, उपासना व ज्ञान असे तीन भाग मानतात, तर कोणी त्यात व्यवहारज्ञान आहे असे मानतात. (६)

**आंधळे ।असता [१६] सूर्य न देखती डोळे । तरी सूर्याचें तेज झांकोळे । माध्यान्हीचें काई[१७]।।७।। असो आतां बहुत । जयासी साधणें आत्महित [१८] । तेणें दासबोधींचा निश्चितार्थ । गुरुमुखें आकळावा [१९]।।८।। येथें अज्ञानाची बोळवण[२०]। ज्ञानाचें होतें विज्ञान[२१] । आणि अनिर्वाच्य समाधान । हे फलश्रुति ये ग्रंथीं ।।९।। ग्रंथाचे[२२] पाहतां वीस दशक। आणि समास तरी दोन शतक । परि इतुकीयांचें तात्पर्य येक । जे अनिर्वाच्य अपरोक्ष[२३] ।।१०।। प्रथमा[२४]पासून विसावरी। संकेत[१] दाविजेला निर्धारीं । अनुबन्ध[२५] चतुष्टयाची परी[२६] । दाविली प्रथम समासीं ।।११।। आतां नित्या[२७]–नित्यविवेक । निरोपिला दोन्ही [२८] दशक । इहामुत्रफळभोगीं वीट नि:शंक । तृतीय दशकीं।।१२।। शमदमादिषट्क[३०] संपत्ति । तें दाविले नवहि भक्ति। आतां मुमुक्षुत्वादि[३१] आकळे[३२] मती। तो दशक पांचवा।।१३।।[३३] साधन[३४] चतुष्टयसंपन्न जाला । तो सहावीयाचा अधिकारी**

---

या लोकांना खरे ज्ञान झालेले नसल्यामुळे ते वास्तविक पाहता आंधळेच होत. आंधळ्या लोकांचे डोळे आकाशात सूर्य असतानाही तो पाहू शकत नाहीत. पण त्यामुळे माध्याह्नीच्या सूर्याचे तेज कधी झाकोळून जाईल काय ? (७) असो, आता जास्त विचार करायला नको. ज्याला स्वत:चे हित साधून घ्यावयाचे असेल त्याने दासबोधाच्या निश्चित अर्थाचे गुरूच्या मुखाने आकलन करून घ्यावे. (८) या दासबोध ग्रंथाच्या अभ्यासामुळे अज्ञानाला निरोप दिला जातो. (अज्ञान नष्ट होते.), ज्ञानाचे (परोक्ष ज्ञानाचे) विज्ञानामध्ये (दृढ अपरोक्ष ज्ञानामध्ये) रूपान्तर होते आणि शब्दांनी जे सांगता येणार नाही असे समाधान प्राप्त होते, अशी या ग्रंथाची फलश्रुती आहे. (९) या ग्रंथाचे वीस दशक आणि एकूण दोनशे समास हे सर्व जर नीट पाहिले तर त्या सर्वांचे शब्दातीत अपरोक्ष ज्ञान हेच एकमेव तात्पर्य आहे. अपरोज्ञ ज्ञान म्हणजेच प्रत्यक्ष अनुभव होय. (१०) या संकेत कुबडी ग्रंथामध्ये दासबोधाच्या पहिल्या दशकापासून ते शेवटच्या विसाव्या दशकापर्यंत प्रत्येक दशकाचे मर्म एकेका समासामध्ये सांगण्यात येईल. पहिल्या दशकाच्या पहिल्या समासामध्ये दासबोधाच्या अनुबंध चतुष्टयाची व्यवस्था स्पष्ट केली आहे. (११) दासबोधाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दशकांमध्ये नित्य आणि अनित्य या पदार्थांचा विचार सांगितला आहे. तिसऱ्या दशकांत नित्यानित्यवस्तुविवेकातून उत्पन्न होणाऱ्या या लोकांतील आणि परलोकांतील भोगांविषयी वैराग्य अथवा किळस यांचे विचारपूर्वक निश्चय करून विवेचन केले आहे. (१२) चौथ्या दशकात शमादि षट्क संपत्ती (शम, दम, उपरम, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान या सहा गुणांचे) चे स्वरूप सांगून नंतर नवविधाभक्तीचे (श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वन्दनं दास्यं सख्य मात्मनिवेदनमम् ।। श्रीमद्भागवत ७.५.२३) निरूपण केले आहे. आणि बुद्धीला ज्यामुळे मुमुक्षुत्व (मोक्षाची इच्छा) म्हणजे काय इत्यादीचे आकलन होते, तो पाचवा दशक होय. (१३)

**भला । अनिर्वाच्य समाधानें बोधला । दशमसमासीं[३५] ।।१४।। दासबोध[३६] आणि ज्ञानदशक[३७]। हे ज्ञानविज्ञानाचे जनक । ऐसा पूर्वार्धीं विवेक। व्यतिरेकेसी[३८] पहावा।।१५।। आतां ग्रंथाचें उत्तरार्ध । नित्य अपरोक्ष स्वत:सिद्ध । जे जे दशकींचा अनुवाद[३९]। ते ते दशकीं बोलिला ।।१६।। आतां श्रोतीं व्हावें सावध । विमळ ज्ञान बाळबोध । या अर्थीं बुद्धि विशद[४०] । करूनि घाला ।।१७।। प्रथम समासीं निरूपण । अनुबंधचतुष्टयाचें लक्षण। विषय[४१] संबंध प्रयोजन । अधिकारी चवथा ।।१८।। ग्रंथगर्भीं जें बोलिलें। तें वेगळें पाहिजे दाविलें । प्रथम विषयाचें रूप केले । ते ओंवी पहिली ।।१९।। शेवटी**

---

अशा तऱ्हेने नित्यानित्यवस्तुविवेक, इहामुत्रफलभोग - वैराग्य, शमादिषट्क संपत्ती आणि मुमुक्षुत्व अशा चार साधनांनी जो समृद्ध असतो तोच सहाव्या दशकातील ज्ञानाचा चांगला अधिकारी होतो. त्या दशकाच्या दहाव्या समासात अनिर्वाच्य समाधानाचे स्वरूप सांगून त्या मुमुक्षूस बोध केला आहे. (१४) दासबोधाचा सातवा दशक दासबोध याच नावाने स्वतंत्रपणे ओळखला जातो. तसेच आठव्या दशकाचे नाव ज्ञानदशक आहे. दासबोध आणि ज्ञानदशक या दोहोंच्याद्वारे ज्ञान (म्हणजे शाब्दिक ज्ञान अथवा अथवा परोक्ष ज्ञान) अथवा परोक्ष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव (म्हणजेच अपरोक्ष ज्ञान अथवा विज्ञान यांची प्राप्ती होते. असा पूर्वार्धातील (दशक एक ते दशक आठ हा दासबोधाचा पूर्वार्ध होय) विचार असून तो व्यतिरेक पद्धतीने मांडण्यात आलेला आहे, हे लक्षात घ्यावे (व्यतिरेक म्हणजे कारणाच्या ठिकाणी कार्याची व्यावृत्ती स्पष्ट करणे. कार्यापेक्षा कारण वेगळे आहे असे दाखवणे. ब्रह्माचे वर्णन करताना सर्व सृष्ट वस्तूंपेक्षा ते निराळे कसे आहे हे दाखवणे म्हणजे व्यतिरेक होय.)(१५) आता ग्रंथाचा उत्तरार्ध सुरू होतो. त्यामध्ये स्वत:सिद्ध ब्रह्मात्मभावाचा प्रत्यक्ष अनुभव कसा येतो हे सांगितले आहे. पुढील बारा दशकांचे स्पष्टीकरण त्या त्या दशकावरील निरूपणामध्ये वेगळेवेगळे केले आहे.(१६) आता श्रोत्यांनी सावध व्हावे. आता शुद्ध ज्ञानाचे अतिशय सुबोध मराठीमध्ये विवेचन करणार आहोत. श्रोत्यांनी आपली बुद्धी स्वच्छ करून त्या विवेचनावर केंद्रित करावी. (१७) या पहिल्या समासामध्ये अनुबंध चतुष्टयाचे लक्षण सांगितले आहे. मुख्य ग्रंथाच्या विषयांत सहज प्रवेश होण्यासाठी अनुबंधचतुष्टयाच्या ज्ञानाची आवश्यकता असते. अनुबंधचतुष्टयामध्ये विषय, संबंध, प्रयोजन व अधिकारी या चार गोष्टींचा समावेश होतो. (१८) ग्रंथाच्या गाभ्यात जे सांगितले आहे. ते स्पष्ट करून वेगळे सांगितले पाहिजे. प्रथम 'विषय' या अनुबंधाचे स्पष्टीकरण केले आहे, ती पहिली ओवी पुढीलप्रमाणे आहे ''श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ । श्रवण केलियानें प्राप्त। काय 'आहे' ।। दास.१.१.१।। (१९)

**'आहे'[४२] ही अक्षरें । तया अस्तित्व सब्रह्म[४३] हे उतरे[४४]। तया सद्ब्रह्मासी श्रोते गजरें । विषय ऐसें ह्मणती।।२०।। अनेक वेदांतग्रंथीं पाहतां । विषय नाही ब्रह्मात्मयापरता । पदार्थमात्र जयाची सत्ता । ह्मणऊनि विषय ।।२१।। आतां संबंधाची खूण । श्रोतीं पहावी मन घालुन । जीवेश–ऐक्य गुरुशिष्यसंवादन । अथवा एकीकरण । सकळ ग्रंथींचें।।२२।। ग्रंथा नाम दासबोध । येथून वोवी सोळावी विशद । संपतां प्रत्यक्ष आतां अनुवाद । संबंधाचा पहावा ।।२३ ।। प्रसंगीं नाना ग्रंथींचें संमत । दाउनि बळाविला निश्चितार्थ । आणि मात्सर्यवादियाचें मन उदित[४५] । केलें सत्ताविसी संपेतों ।।२४।। एवं संबंधहि दाविला । आतां प्रयोजन म्हणिजे मोक्ष आथिला[४६]। तोहि अनुक्रमें दाविला । समास संपे तोंवरी।।२५।। केलें अनिष्ट[४७] निरशन। निरतिशयानंदाची प्राप्ति जाण । ऐसी फलश्रुतिनिरोपण। समास पूर्ण पैं केला ।।२६।। तीन लक्षण अनुबंधाचें । स्पष्ट केलें ग्रंथगर्भींचें। चौथें लक्षण**

---

त्या ओवीच्या शेवटी 'आहे' अशी अक्षरे आहेत. त्या अस्तित्ववाचक शब्दाने शाश्वत ब्रह्माच्या 'सत्' या स्वरूपाची सूचना मिळते. म्हणूनच त्याला 'सद्ब्रह्म' असे म्हणतात. ते 'सद्ब्रह्म' हाच दासबोधाचा विषय आहे. असे श्रोते एकस्वराने गर्जना करून सांगतात.(२०) अनेक वेदान्तग्रंथ पाहिले तर एका ब्रह्मात्म्याखेरीज दुसरा विषय नाही हे लक्षात येते. सर्व सृष्ट पदार्थांना त्यामुळेच अस्तित्व आहे. त्यामुळे दासबोधाचा शाश्वत ब्रह्मात्मा हाच विषय आहे. (२१) आता श्रोत्यांनी नीट लक्ष देऊन 'संबंध' या अनुबंधाची खूण ओळखावी. हा संबंध येथील (संकेत कुबडीच्या) २० ते २७ या ओव्यात स्पष्ट केला आहे. समर्थांनी दासबोधाच्या १.१.२ ते १.१.१६ या ओव्यात तो सांगितला आहे. त्यात जीव आणि ईश यांचे ऐक्य प्रतिपादन करणारा व सर्वग्रंथाचे एकीकरण करणारा गुरुशिष्यसंवाद आहे असे सांगितले आहे. (२२)'ग्रंथा नाम दासबोध' या ओवीपासून ते सोळाव्या 'नाना समती अन्वयें' या ओवीपर्यंत या 'संबंध ' नावाच्या अनुबंधाचे विवरण पहावे. (२३)त्यानंतर १७ व्या ओवीपासून ते २७ व्या ओवीपर्यंत निरनिराळ्या ग्रंथातील समान आधार देऊन अभिप्रेत अर्थाचे समर्थन केले आहे. आणि त्याचबरोबर मत्सरग्रस्त आक्षेपकांच्या मतांची ही दखल घेतली आहे. (२४) अशा प्रकारे 'संबंध' या अनुबंधाचे स्पष्टीकरण केले. आता यापुढील अठ्ठावीस ते अडतीस या ओव्यांमध्ये दासबोधाचे प्रयोजन फलश्रुतीच्या रूपाने सांगितले आहे. ते प्रयोजन म्हणजे सर्वात महत्त्वाची मोक्षप्राप्ती हे असून ते या अकरा ओव्यांमध्ये क्रमश: स्पष्ट केले आहे. हा समास संपेपर्यंत त्याचेच निरूपण आहे. (२५)त्या निरूपणात मोक्षप्राप्तीच्या कार्यात येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अतिशय श्रेष्ठ अशा परम आनंदाची प्राप्ती ही फलश्रुती सांगून समास पूर्ण केला आहे. (२६)

**अधिकारियाचें। ते पांच दशक[४८] पहावें।।२७।। साधनचतुष्टय पूर्ण जालें । तयासी अधिकारी ऐसें श्रुति बोले । परि ते चत्वार निरोपिले । पाहिजे वेगळाले ।।२८।। नित्यानित्यवस्तुविवेक। फळभोगीं विराग इहामुष्मिक [४९]। तिसरें शमदमादि षट्क । चवथें मुमुक्षुत्व ।।२९।। तिन्ही अनुक्रमें निरोपिले। प्रकृत[५०] नित्यानित्य पाहिजे ऐकिलें । त्यांत अनित्य द्वितीय दशकीं बोलिलें । प्रस्तुत[५०] नित्य अवधारा ।।३०।। नित्य म्हणिजे शाश्वत। जें त्रिकाळीं अबाधित। तें स्तवनमिषें गुरुतत्व । चौथे[५१] समासीं निरोपिले ।।३१।। गुरु नित्य गुरु शाश्वत । गुरु सबाह्य अखंडित । सर्वांमध्यें परि अलिप्त । आकाशासरिखें ।।३२।। व्हावी[५२] निजगुरूची वोळखण । म्हणोनि नाना साधनें निरूपण । यदर्थीं गुरुच हे नित्य जाणुन । ग्रंथाचें मनन करावें ।।३३।। तया नित्याचें पूर्वांग[५३]। तें प्रणव[५४] जाणिजे सांग । आणि साधनरूप वाणी सुरंग। ऐसे दोन्ही।।३४।। प्रणवरूप तो गणपति । आणि वाग्देवी ती सरस्वती। उभयतां स्तवुनि समाप्ति । समास दोन्ही केले ।।३५।। ऐसें केलें निरूपण । रूपकेंसहित वर्णिलें**

---

या प्रमाणे दासबोधाला अभिप्रेत असलेल्या तीन अनुबंधांचे स्वरूप येथे स्पष्ट केले आहे. आता चौथा अनुबंध जो अधिकारी त्याचे स्वरूप दासबोधाच्या पाचव्या दशकात पहावे. (२७) आता वेद सांगतो की, जे साधनचतुष्टय संपन्न आहेत त्यांस अधिकारी म्हणावे. पण ती चार साधने वेगवेगळी स्प्ष्ट करून सांगितली पाहिजेत. (२८) ती चार साधने म्हणजे नित्यानित्यवस्तुविवेक, इह (या पृथ्वीवरील) आणि आमुष्मिक (परलोकातील) फलांच्या भोगांबद्दलचे वैराग्य, तिसरे शमादिषट्क (म्हणजे शम, दम, उपरम, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान या सहा गुणांचा समूह) आणि चौथे मुमुक्षुत्व ही होत. (२९) यातील पहिले तीन गुण पुढील भागात अनुक्रमाने सांगितले आहेत. येथे या सध्याच्या विवेचनाच्या ओघात प्रथम पहिल्या नित्यानित्यवस्तु विवेकाचे स्वरूप जाणून घेतले पाहिजे. त्यातील अनित्य पदार्थांचे विवरण दुसऱ्या दशकात केले आहे. प्रस्तुत पहिल्या दशकात नित्य वस्तूंचा विवेक केला आहे, तो जाणून घ्या. (३०) नित्य म्हणजे शाश्वत तत्त्व होय. भूत, भविष्य, वर्तमान या तिन्ही काळात ते अबाधित असते. त्याचे स्तवन करण्याच्या निमित्ताने प्रतीक रूपाने गुरुतत्त्वाचे वर्णन चौथ्या समासात केले आहे. (३१) गुरू हे नित्य, शाश्वत असणारे तत्त्व आहे. ते तत्त्व अंतर्बाह्य अखंडपणे व्यापून राहिले आहे. ते आकाशासारखे सर्व पदार्थात व्यापलेले असूनही त्या सर्वांपासून अलिप्त असते. (३२) आपल्या गुरूंची ओळख पटावी म्हणून निरनिराळ्या उपमानांची योजना करून त्यांचे स्वरूप वर्णन केले आहे. या दृष्टीने गुरूच नित्यतत्त्व आहेत हे ओळखून या समासाचे मनन करावे. (३३) त्या नित्याचे पहिले अंग म्हणजे सांग ॐकार आणि साधनस्वरूप असलेली सुंदर वाणी ही दोन तत्त्वे होत. हे मुळात समजून घ्यावे. (३४) गणपती हाच प्रणवाच्या रूपात असून सरस्वती हीच साक्षात् वाग्देवता आहे. या दोघांची दुसऱ्या आणि तिसऱ्या समासांत स्तुती करून हे दोन्ही समास पूर्ण केले आहेत. (३५)

ध्यान । त्या रूपकाचें लक्षण । योजून पहावे।।३६।। एवं जाले तीन समास । आतां चतुर्थ तो अति सुरस। जेथें परादिकांचा[५५] हव्यास[५६] । पांगुळला[५७] ।।३७।। थेंबुटा सागरीं बुडाला। तो वेगळा नव जाय निवडिला । अंत नाहीं परि जाला । सागररूप।।३८।। तैसिया परादिका वाणी । स्वरूपीं निमाल्या[५८] निर्वाणीं। अर्थ सांगितला न बोलोनी । आपण स्वरूप जाल्या।।३९।। आतां स्वरूपाचें लक्षण[५९]। सच्चिदानंद हे तीन । संत-श्रोते - कविस्तवन। तीन समास पैं केलें ।।४०।। पांचवा सहावा सातवा । हा सच्चित्सुखाचा ठेवा । सभास्तवन जो आठवा । या[६०] विभूतिवर्णन ।।४१।। आतां नवमींचा अर्थ । तो शुद्ध जाणिजे परमार्थ । यावेगळें नाना मत । तें सोंग जाण नटाचें।।४२।। जनाच्या भांबावल्या मती । नाना सिद्धींस परमार्थ ह्मणती । कांही अघटितास[६१] सार कल्पिती । परि तें नव्हे ।।४३।। मुमुक्षुसाधकाचें मन । सर्व दृष्यभास वोलांडून । पावोत निज परमार्थखुण । ह्मणउनि निरूपण। नवमींचें ।।४४।। या परमार्थाची सांठवण । तो हा[६२] नरदेहचि जाण । ह्मणोनि नरदेहवर्णन । दशमीं[६३] केलें ।।४५।। जाला संकेत प्रथमाचा[६४]।

---

या पद्धतीने हे निरूपण केले आहे. या दोन्ही देवतांचे ध्यान रूपकांच्या साहाय्याने केले आहे. त्या रूपकाची लक्षणे प्रत्यक्ष ध्यानप्रक्रियेत वापरून पाहावीत. (३६) अशा प्रकारे हे तीन समास झाले. आता चौथा समास अतिशय रसाळ आहे. त्यात परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी यांचा उत्साह एकदम पांगळून जातो. (मंद पडतो.) (३७) सागरामध्ये पाण्याचा एक थेंब पडला तर तो वेगळा असा निवडून दाखवता येत नाही. तो नष्ट होत नाही, पण तो सागराशी एकरूप होऊन सागरच झालेला असतो. (३८) त्याचप्रमाणे परा, पश्यन्ती इ. चार वाणी शेवटी स्वरूपात विलीन होतात. त्या न बोलून अर्थ सांगतात आणि आपणच स्वत: स्वरूपमय होऊन जातात. (३९) आता परब्रह्माचे स्वरूपलक्षण सत्, चित् आणि आनंद या तीन प्रकारचे आहे. ती तीन लक्षणे संतस्तवन, श्रोतृस्तवन आणि कविस्तवन या तीन समासांमध्ये स्पष्ट केली आहेत. (४०) पाचवा, सहावा आणि सातवा हे तीन समास म्हणजे सत्, चित् आणि सुख यांचा ठेवा होत आणि आठवा जो सभास्तवन नावाचा समास आहे त्यात परमेश्वराच्या विभूतींचे वर्णन केले आहे. (४१) आता नवव्या समासाचा अभिप्राय म्हणजे शुद्ध परमार्थ आहे. परमार्थाखेरीज जी काही भिन्न मते असतील ती नटाच्या सोंगासारखी खोटी समजावीत. (४२) लोकांच्या बुद्धीला भ्रम झाल्यामुळे निरनिराळ्या प्रकारच्या सिद्धींनाच ते परमार्थ मानू लागले आहेत. सिद्धींमुळे घडणाऱ्या अद्भुत चमत्कारांसच ते महत्त्व देऊन परमार्थ मानतात, पण खरा परमार्थ हा नव्हे. (४३) मुमुक्षू, साधक यांचे मन, हा सर्व दृश्याचा भासमान पसारा ओलांडून खऱ्या परमार्थाचे लक्ष्य (मुख्य ठिकाण) गावो, हा नवव्या समासाच्या निरूपणाचा विषय आहे. (४४) या परमार्थाच्या साठवणीचे मुख्य स्थान हा नरदेहच आहे. म्हणून या नरदेहाचे दहाव्या समासात वर्णन केले आहे. (४५)

**ठाव लाधला[६५] नित्याचा। ठेवा मुमुक्षुसाधकाचा । श्रवणद्वारां ।।४६।। इति श्री संकेतकुबडी। दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्रीरामदासा ।।४७।। दशक प्रथम समाप्त।।**

---

अशा तऱ्हेने दासबोधाच्या पहिल्या दशकाचा विचार झाला. त्या निमित्ताने नित्यनित्यविवेकातील नित्य (शाश्वत) स्वरूपाचा शोध लागला त्याच्या श्रवणाद्वारे मुमुक्षू, साधक यांना सापडलेला हा ठेवाच होय. (४६) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (४७) येथे पहिला दशक समाप्त झाला.

**टिपा–**

(१) संकेत– खूण, इशारा, मर्म, विचार, शब्दांची अर्थबोधक शक्ति किंवा बेत; कुबडी – रामदासी सांप्रदायिकाजवळ असणारा व योगाभ्यासांत विश्रांतीस्तव उपयोगी पडणारा विशिष्ट आकाराचा लाकडी दंड, यावरून संकेतकुबडी–श्रीदासबोधाचा अर्थ विशद करून चिंतनिकेस उपयोगी पडणारा, ज्यांत प्रत्येक समासांतील मुख्य मर्माचा विषय थोडक्यात सुचविला आहे, असा हा ग्रंथ. लेखी प्रतींतील कित्येक पोटप्रकरणांत यास 'संकेत सूचना' असेंहि म्हटलें आहे. (२) सत्–अस्तिरूप, नित्य असणारें; चित्–चैतन्यरूप, ज्ञानरूप; व सुख–आनंद. (३) पाठभेद – आनुर्वाच्य; कोणताहि पाठ घेतला तरी अर्थ 'ज्याचें वर्णन वाणीनें करतां येत नाही असा' असाच करावयाचा. (४) मोक्षाची इच्छा करणारा. (५) मोक्ष प्राप्तीस्तव साधन करणारा. (६) दासबोधरूपी पाणी. (७) मग. (८) प्रवेश, शिरकाव. (९) या जन्मी न दिसणारें, परलोकीं किंवा अन्य जन्मीं मिळणारें असें फळ देणाऱ्या व्रतवैकल्यादिकांच्या कथा. (१०) अनुभव. (११) भोजनानें तृप्तीचा अनुभव तत्काळ मिळतो त्याप्रमाणे आत्मतृप्तीचा अनुभव तत्क्षणीं देणारा; 'जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला ।।' दासबोध ८–७–५९. (१२) लेखी प्रतींत कित्येक ठिकाणी 'तात्पर्य' शब्द पुल्लिंगी धरला आहे, त्यांपैकी ही दोन स्थळें आहेत. (१३) उपासनेसह यज्ञयागादि कर्म व ज्ञान या दोहींचा आश्रय एकाच वेळीं मोक्षप्राप्तीस्तव केला पाहिजे असें जें कथन त्यास 'समुच्चयवाद' म्हणतात. (१४) दासबोधांत कर्म, उपासना व ज्ञान या तिहींचे वर्णन आहे. अथवा मोक्ष प्राप्तीच्या कामीं हे तिन्ही मार्ग तुल्यबल असतात असें मानणें. (१५) दासबोधांत व्यवहारज्ञान सागितलें आहे असें कोणी मानतात. (१६) असलेला. (१७) काय. (१८) आपलें कल्याण, आत्मप्राप्ति. (१९) जाणून–समजून घ्यावा. (२०) घालविणें, नाहीसें करणें. पाठभेद – ओळखण. (करमाळे व शाहूनगरप्रत) हा पाठ घेतल्यास 'अज्ञानाच्या खुणा सांगून ओळख करून दिली.' असा अर्थ होईल. (२१) आत्मज्ञानाचा अनुभव. (२२) श्रीदासबोध ग्रंथाचे. (२३) प्रत्यक्ष अनुभव. मी ब्रह्म हा निर्धार जाला । अपरोक्षज्ञान ह्मणावें त्याला ।।५८।। आगम० ५–५.(२४) पहिल्या दशकापासून वीस दशकापर्यंत. (२५) 'ज्याच्या ज्ञानानें मुख्य ग्रंथांत प्रवेश होतो त्यास अनुबंध ह्मणतात.' अशी अनुबंधाची व्याख्या 'विचारसागररहस्य' या ग्रंथामध्यें दिली आहे आणि सर्व लक्षणसंग्रहांत 'स्वविषयकज्ञानद्वारा शास्त्रे प्रवर्तक: ।' 'ग्रंथप्रवृत्तिप्रयोजकज्ञानविषय:' अशा व्याख्या दिल्या आहेत. हे चार आहेत – विषय, संबंध, प्रयोजन व अधिकारी. यांचें विशेष विवरण याच दशकांत पुढें १८–२७ ओव्यांमध्यें केलें आहे. (२६) प्रकार. (२७) या व्यक्ताव्यक्त विश्वांत नित्य – सर्वकाल टिकणारें, शाश्वत व अनित्य–सर्वकाल न टिकणारें अशाश्वत काय काय आहे, ते विचारपूर्वक निश्चित करून

अनित्याचा मोह टाकून देणें. (२८) दासबोधांतील पहिला व दुसरा दशक. (२९) इह-या लोकींचे व अमुत्र-परलोकींचे जे भोग त्याविषयी शिसारी येणें. (३०) शम-मनाचा निग्रह; दम-बाह्येंद्रियनिग्रह; 'शमदमादि हेतु। बुद्धिनिरोध हा एकांतू। पुनः दंडळिना चित्तू। हें कार्य उपरमाचें ॥१६॥ आगमसार १३.१. उपरम-वेदविहित कर्मसाधनांचा विधिपूर्वक त्याग करून व भोगांस विषतुल्य मानून आत्मप्राप्तीच्या तीव्र इच्छेनें गृहादिकांचा त्याग करणें, संन्यास; तिदीक्षा सुखदु:खाति द्वंद्वें मनांत कष्ट न मानतां सहन करणें. श्रद्धा-सद्‌गुरू व वेदान्तशास्त्र यांवर परिपूर्ण विश्वास. समाधान-आत्म्याच्या ठायीं मनाची एकाग्रता. (३१) मोक्षाची इच्छा. (३२) बुद्धीस आकलन होतील - कळतील. (३३) तेरा ते चोविसावे ओवीपर्यंतच्या ओव्या पांगरी प्रतींत गहाळ आहेत. (३४) नित्यानित्यवस्तुविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमादिषट्क संपत्ति व मुमुक्षुत्व या चार साधनांनी युक्त. (३५) सहाव्या दशकांतील दहावा समास. (३६) सातवा दशक. (३७) आठवा दशक. (३८) 'कारणीं कार्याची व्यावृत्ति (अभाव, पृथकत्व) हा व्यतिरेक ॥४८॥ आगमसार १-१ 'यदभावे यदभाव: ।' - सर्वलक्षणसंग्रह:'. (३९) स्पष्टीकरण. (४०) निर्मळ, प्रसन्न. (४१) जाणावें ब्रह्मतत्व निर्गुण । हें मुख्य **विषयाचें** लक्षण ॥९॥ **संबंध**-जाणावी साध्य साधकता ॥४१॥ **प्रयोजन** - हेतु, फलश्रुति: (शोकनिवृत्ति आणि आनंदावाप्ति ॥५०॥ आगमसार १-२) **अधिकारी** - साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षु. (४२) श्रीदासबोधांतील पहिल्या समासाच्या पहिल्या ओवींतील 'आहे' हा शेवटचा शब्द. (४३) ही विसावी ओवी असलेलें पांगरी प्रतींतील पत्र गहाळ झालें असून दुसऱ्या दोन्ही प्रतींत 'सब्रह्म' अशींच अक्षरें आहेत; पण पुढील चरणावरून येथेंहि 'सद्‌ब्रह्म' हा शब्द असावासें वाटतें. (४४) सांपडतें, मिळते. (४५) उदित - (वद-व्यक्त करणें, सांगणें-चें भूतकालवाचक) व्यक्त केलें. उदित याचा प्रसन्न किंवा उन्नत असाहि अर्थ कोशांत आढळतो. पाठभेद - मात्सर्यवादिया चेत। केलें० ॥ चेत केलें - चिडविलें, भडकविलें, किंवा चेत-चीत केलें - पराभूत केलें. चेत - जागृत केलें असाहि अर्थ होऊं शकेल. (४६) थोर, महत्त्वाचा. (४७) संकट किंवा अपाय यांचा परिहार, नाश. (४८) **अधिकाऱ्याचें** लक्षण पांचव्या दशकांत पहावें. **विषय** - पहिल्या ओंवींतील 'आहे' या अस्तित्वार्थक शब्दानें नित्य शाश्वत ब्रह्म हा ग्रंथाचा विषय आहे असें २०-२१ ओव्यांत दर्शविलें. २२-२७ ओव्यांत दासबोधांतील २ ते १६ ओंव्यांत जें श्रीसमर्थांनीं निरूपिलें तेंच अनुबंधांतील 'संबंध' असून त्यांत जीवेशऐक्य-प्रतिपादक व सर्व ग्रंथांचे एकीकरण करणारा गुरुशिष्यसंवाद आहे असें सांगितलें आणि फलश्रुति कथन केलेल्या शेवटच्या ११ ओंव्या हें **'प्रयोजन'** असून **'अधिकारी'** याचें वर्णन पांचव्या दशकांत आहे; अशा प्रकारें अनुबंधचतुष्टय श्री हंसराज स्वामींनी मानिलें आहे. श्रीदासबोधाच्या दुसऱ्या ओवींतील शब्दांवरून 'विशद भक्तिमार्गात्मक बोध' हा विषय 'गुरुशिष्यांचा संवाद' हा **संबंध**, चौथ्या ओवींतील 'भक्तीचेनि योगें देव।', 'निश्चयें पावती मानव ।' हें प्रयोजन आणि 'दासबोध' यातील 'दास' हा **अधिकारी** असें अनुबंधचतुष्टय कोणी कोणी सुचवितात. (४९) या व परलोकचें. (५०) प्रकृत, प्रस्तुत-चालू, सध्या. (५१) पहिल्या दशकाचा चौथा समास. (५२) ही ३३ वी ओंवी जुन्या मुद्रित प्रतींत नाहीं. (५३) पहिला भाग. (५४) ॐकार. (५५) परा. पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणींचा. (५६) छंद, नाद. (५७) कमी झाला, मंद पडला. (५८) लीन किंवा नाहींशा झाल्या. (५९) सत्, चित् व आनंद या ज्या तीन पदांनीं ब्रह्माचें स्वरूपलक्षण शास्त्रकारांनी सांगितलें आहे त्याच तीन पदांचें विवरण संत, श्रोते व कवि यांच्या स्तवनाच्या रूपानें श्रीसमर्थांनी पांच, सहा व सात या समासांत केलें आहे. (६०) ह्यांत. (६१) सिद्धीमुळें होणाऱ्या अद्भुत चमत्कारास भांबावलेले लोक महत्त्व देतात, त्यांसच परमार्थ मानतात, पण तो खरा परमार्थ नव्हे. (६२) पाठभेद - होतो, होते. (६३) पहिल्या दशकाच्या (१०) व्या समासांत. (६४) पहिल्या दशकाचा. (६५) ठाव लाधणें-सांपडणें.

॥ श्रीरामसमर्थ ॥

## दशक दुसरा

॥ श्रीराम ॥ व्हावें अनित्यनिरसन[१] । तरीच नित्याचें[२] अपरोक्ष[२] ज्ञान । अनित्य कळावें हें प्रयोजन[३] । द्वितीय दशकाचें ॥१॥ आपुलें निजवैभव[४] सांडुन । अहंदेह्याचें[५] घेतलें रान । तया मूर्खाचें लक्षण । प्रथम समासीं निवेदिलें ॥२॥ मूर्खपण सांडावें दुरी। उत्तम गुणाची आवडी अंतरीं । म्हणोनि कृपाळूपणें बोले उत्तरीं । श्रीमदाचार्य[६] सिकवण॥३॥ तरी कुबुद्धि न पालटे । कुविद्येचें[७] बळ मोठें । काम क्रोधाचें भरितें[८] दाटे । अनावर ॥४॥ म्हणोनि कुविद्येचें लक्षण । तिसरीयांत निरूपण । करी कुविद्येचें हनन[९] । विश्वासी जरी चौथिया[१०] ॥५॥ जरी सत्संगें ज्ञान जोडे । तरीच हे कुविद्या झडे । हें मुख्य वर्म परी नातुडे[११] । साधनेंविण॥६॥ म्हणोनि अधिकारासारिखें । कर्म उपासना-विधिविधानादिकें[१२]। सांगितलें हृदयशुद्धिकारकें । कांही तरी करावें ॥७॥ कामक्रोधदंभादिक । ययाचा रजोगुण जनक । त्या रजोगुणाचें कौतुक । वर्णिलें पांचवियां ॥८॥ जो सृष्टीसी कारण।

---

अनित्याचा म्ह. दृश्यभासात्मक व नामरूपात्मक असे जे अशाश्वत जग त्याचा निरास (नाश) होईल, तेव्हांच नित्यवस्तूचे म्ह. शाश्वत ब्रह्माचे अनुभवात्मक प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकेल; म्हणून दुसऱ्या दशकाचे , अनित्य अशाश्वत जगाचे स्वरूप कळावे, हेच प्रयोजन आहे. (१) त्याच्या पहिल्या समासात, आत्मस्वरूपाचे वैभव सोडून आपण देहच आहोत अशा बुद्धीने आडमार्गाचा स्वीकार करणाऱ्या मूर्खाचे लक्षण सांगितले आहे. (२) त्याने या मूर्खपणाचा त्याग करावा, त्याच्या अंत:करणात उत्तम गुणांची आवड निर्माण व्हावी या हेतूने मोठ्या कृपाळू बुद्धीने श्रीमत्सद्‌गुरू श्रीसमर्थ दुसऱ्या समासात आपली शिकवण सांगत आहेत. (३) पण दुर्बुद्धी (सहजासहजी) बदलत नाही, प्राण्याला मिळालेल्या वाईट शिकवणुकीचे सामर्थ्य पुष्कळ मोठे आहे, काम क्रोध यांची भरभराट होत असते, त्यांचा वेग अनावर असतो. (४) म्हणून तिसऱ्या समासात कुविद्येचे लक्षण सांगितले आहे. आता चौथ्या समासावर जर विश्वास ठेवला तर कुविद्येचा नाश होईल. ( भक्तिनिरूपण हा चौथ्या समासाचा विषय आहे.) (५) संतांच्या संगतीने जर ज्ञान प्राप्त झाले तरच कुविद्येचा नाश होईल. हे त्याचे रहस्य आहे, परंतु ते साधना केल्याखेरीज हाती लागणार नाही. (६) म्हणून कर्म, उपासना, विहित कर्मांचे आचरण इ. हृदयशुद्धी घडवून आणणारी कर्मे, अधिकारानुसार काही तरी करावीत या हेतूने (दासबोध २-४-६ ते २६ या ओव्यात) विधिनिषेध रूपाने सांगितली आहेत. (७) काम, क्रोध, दंभ हे दुर्गुण रजोगुणापासून निर्माण होतात. त्या रजोगुणाची लक्षणे पाचव्या समासात सांगितली आहेत. (८)

**जो मीतूंपणाचें भाजन[१३] । जो सहपरिवारें आडवें विघ्न । निज परमार्थासी।।९।। षष्ठम समासीं तमोगुण । अति अधम परम हीण । निरोपिलें वर्तणुकीचें चिन्ह । श्रवण करुनि त्यागावें ।।१०।। सत्वगुण बोलिला सातवा[१४] । तो[१५] उभय गुणांच्या पेटे अभावा । परी हाहि बंधनरूप जाणावा । ज्ञानोत्तरकाळीं[१६] ।।११।। गुण म्हणिजे दोरी । हे तों बंधनाची सामोग्री । म्हणोनी गुणासी परोपरी । अनित्य ऐसें म्हणती ।।१२।। आलस्य निद्रा प्रमाद[१७]। हा तमोगुणाचा जाणिजे बंध । कामक्रोधवासनाछंद । तो रजोगुण ।।१३।। मी[१६] सुखाचा सुखभोक्ता । बळेंचि अभिमान घे माथां । ऐसा सस्वरूपीं मागुता। वेगळा पडे।।१४।। गुणाचें बंधन बोलिलें । तें सर्व अनुभवासी आलें । आतां पुढें जें निरोपिलें। तें अवधारा[१८] ।।१५।। संग जडला चंचळाचा । निश्चळ व्हावया अवकाश कैंचा । परी सविकल्पद्वारां[१९] निर्विकल्पाचा[२०] । अनुभव घ्यावा ।।१६।। कुविद्या असे डहुळ[२१]। आणि सद्विद्या असे चंचळ । परी डहुळ तें निवळ । चंचळच[२२] करी ।।१७।। जैसा चरणीं मोडे तोहि कांटा । आणि काढावयाचा तोहि कांटा । तैसी सद्विद्याग्रहणें[२३] कुविद्याकुलटा[२४] । मारुनि सद्विद्या त्यागावी ।।१८।। म्हणोनी सद्विद्येचे लक्षण । आठवे समासीं निरूपण ।**

---

हा रजोगुण सर्व सृष्टीच्या उत्पत्तीचे मूळ कारण आहे, तो मी – तू, अशा स्वरूपाच्या भेदाच्या निर्मितीचे साधन आहे, तो आपल्या परिवारासह असेल तर आपल्या परमार्थाच्या मार्गातील आडवे येणारे विघ्नच आहे. (९) सहाव्या समासात अत्यंत अधम, अतिशय हीन दर्जाचा तमोगुण आणि तमोगुणी माणसाच्या वागण्याची चिन्हे सांगितली आहेत. ती जाणून घेऊन त्यांचा त्याग करावा. (१०) सातव्या समासात सत्त्वगुणाचे विवेचन केले आहे. हा गुण रजोगुण आणि तमोगुण यांच्या अभावी प्रज्वलित होतो. पण हा सत्त्वगुणसुद्धा ज्ञानोत्तर काळात बंधनरूप आहे, हे जाणून घ्यावे. (११) खरे पाहता गुण या शब्दाचा अर्थ दोरी असा आहे. आणि दोरी हे तर बांधून ठेवणारे साधन आहे. म्हणून गुणांना निरनिराळ्या प्रकारांनी अनित्य असेच म्हणतात.(१२) आळस, झोप आणि बेसावधपणा यांनाच तमोगुणाचे बंधन समजावे. काम, क्रोध, वासना आणि (भलते सलते) छंद यांनाच रजोगुण म्हणतात.(१३) आत्मज्ञान झाल्यानंतर मी आत्मसुखाचा भोक्ता आहे, असा अभिमान बळजबरीने जो आपल्या माथ्यावर घेतो आणि त्यामुळे स्वरूपापासून तो पुन्हा वेगळा पडतो, तो सत्त्वगुण होय. तोही बंधनकारकच होय. (१४) ज्याला गुणांचे बंधन म्हटले जाते त्या सर्वांचा अनुभव घेतला. आता यापुढे जे सांगितले जाईल ते लक्षपूर्वक ऐका. (१५) चंचळ अनित्य गोष्टींचाच सहवास घडल्यावर निश्चल परब्रह्मसुखाचा अनुभव कसा येऊ शकेल ? पण सविकल्प समाधीच्या मार्गाने निर्विकल्पाचा अनुभव घ्यावा. (१६) कुविद्या म्हणजे गढूळ पाणी होय. तर सद्विद्या ही चंचल (अस्थिर) आहे. पण ती चंचळ सद्विद्याच गढूळ कुविद्येला निवळ करते.(१७) ज्याप्रमाणे पायात मोडतो तो काटाच आणि तो काटा काढणाराही काटाच असतो, त्याप्रमाणे सद्विद्येचा स्वीकार करून कुलटा कुविद्येला ठार मारून नंतर सद्विद्येचाही त्याग करावा.(१८)

**जे जें केलें ते मनीं धरून । साधकें साधावें।।१९।। अभ्यासितां सद्विद्येसी । कामक्रोधाचीं विघ्नें त्यासी[२५]। विरक्तीवांचून ठाव तयेसी[२६]। कदाकाळीं असेना ।।२०।। विरक्ति बाणे आंगीं । तरी[२७] सद्विद्या दांडुगी । म्हणून नवमाचे प्रसंगीं विरक्तस्थिति बोलिली ।।२१।। लक्षण कुविद्येचें त्यागिलें । सद्विद्या शब्दज्ञान सिकले । वरी वरी विरक्तपण दाविलें । आणि फुगले ज्ञानाभिमानें ।।२२।। तया पढतमूर्खाचें लक्षण । साग्र केलें दशमीं कथन । त्याचा त्याग अवश्यकरण[२८] । साधकजनीं ।।२३।। एवं प्रथम[२९] नित्य द्वितीय[३०] अनित्य । जाला विवेक नित्यानित्य । हें साधनचतुष्टयांत । पहिलें जाले ।।२४।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचें सार निवडी । वांकुडी परि आवडी । रामदासा[३१] ।।२५।। दशक दुसरा समाप्त ।।**

---

म्हणून सद्विद्येच्या लक्षणांचे आठव्या समासात निरूपण केले आहे. ते निरूपण मनात ठेवून साधकाने आत्महित साधावे. (१९) सद्विद्येचा अभ्यास केल्यानंतर कामक्रोधाची विघ्ने त्याला बाधणार नाहीत. पण सद्विद्येला वैराग्याशिवाय कधीही थारा मिळत नाही.(२०) जर अंगात वैराग्य बाणले, तर सद्विद्येला बळ चढते. म्हणून नवव्या समासात विरक्ताच्या स्थितीचे वर्णन केले आहे. (२१) कुविद्येच्या बाह्य लक्षणांचा त्याग केला आणि सद्विद्येचे शाब्दिक ज्ञान प्राप्त केले, आणि वरवरचे वैराग्य दाखवले आणि त्या ज्ञानाच्या अभिमानाने फुगून गेला; (२२) अशा पढतमूर्खाचे लक्षण दहाव्या समासात संपूर्णपणे स्पष्ट केले आहे. साधक लोकांनी त्या लक्षणांचा त्याग अवश्य केला पाहिजे. (२३) अशा प्रकारे पहिल्या दशकात नित्याचे (शाश्वताचे) वर्णन केले, दुसऱ्या दशकात अनित्याचे (अशाश्वताचे) विवेचन केले. अशा तऱ्हेने नित्य आणि अनित्य यांचा विचार झाला. साधनचतुष्टयातील पहिल्या घटकाचे विवरण येथे पूर्ण झाले. (२४) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे, ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२५) येथे दुसरा दशक समाप्त झाला.

**टिपा**

(१) अशाश्वत असें जें दृश्यभासात्मक वा नामरूपात्मक जग त्याचा निरास, नाश. (२) शाश्वत ब्रह्माचें अनुभवात्मक प्रत्यक्ष ज्ञान. (३) हेतु, कार्य. (४) आत्मस्वरूपाचें ऐश्वर्य. (५) मीच देह अशा अभिमानाचें, देहबुद्धीचें. (६) श्रीमत्सद्गुरू रामदास स्वामी. ८ पाठभेद - कुबुद्धीचें. (८) भरभराट, पूर. (९) नाश. (१०) पाठभेद - विश्वासी मन जरी चौथिया ।। चौथिया - चौथ्या समासावर. (११) सांपडत नाहीं. (१२) दासबोध २-४-६ ते २६ मधें विधिनिषेधरूपाने अनेक साधनें सांगितलीं आहेत तीं. (१३) पात्र. (१४) सातव्या समासांत. (१५) तो (सत्त्वगुण) उभय (रज तम) गुणांच्या अभावा (अभावीं) पेटे-वाढतो. (१६) आत्मज्ञान झाल्यावर त्या आत्मसुखाचा भोक्ता मी आहे अशा अभिमानामुळें सत्त्वगुणहि बंधनकारक होतो. (१७)

गैरसावधपणा. (१८) ऐका. (१९) पदार्थांच्या गुणरूपादिकांची जाणीव असते, त्रिपुटीचें भान असते अशी समाधीची अवस्था. (२०) ज्या अवस्थेंत गुणरूपादींची जाणीव नसते व त्रिपुटीचें भान राहत नाहीं अशी समाधि-अवस्था. (२१) गढूळ. (२२) सद्विद्या चंचळ असली तरी तीच गढूळ कुविद्येस निवळ करते. (२३) सद्विद्येचा स्वीकार करून स्वैरिणी कुविद्या नाहींशी करावी व नंतर सद्विद्येचाहि त्याग करावा. (२४) व्यभिचारिणी स्त्री. (२५) (सद्विद्येच्या) अभ्यासाला. (२६) सद्विद्येला. (२७) विरक्ती बाणल्यानें सद्विद्या बळावते. (२८) अवश्य करावा. (२९) पहिला दशक. (३०) दुसरा दशक. (३१) 'इतिश्री सं०' ही समाप्तिदर्शक ओवी सर्वच प्रकरणांचे शेवटी दिलेली नाही आणि दिली आहे तेथें कोठें पूर्ण, कोठें अपूर्ण अशी आहे. 'श्रीरामदासा' ऐवजी कोठें कोठें 'रामदासा' असाही पाठ आहे. ग्रंथाच्या ओवीसंख्येंत ती धरली आहे असेंही सर्वत्र सारखें दिसत नाही.

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक तिसरा

**।। श्रीराम ।। अमृतीमधें[१] आकाश । सगळें साठवितां सायास[२]। तैसें दासबोधींचे सर्व अर्थास । आकळूं हें घडे केंवि ।।१।। सागरींचे जीवन किती । कर जिव्हा काय जाणती । परी तृषाक्रांता[३] वरी[४] सरितापती[५] । हें तों घडेना ।।२।। तैसें तृप्तीसीच कारण । बहुत बोलणें हा सीण । आतां तिसरे दशकींचें निरूपण । सावध ऐका।।३।। चतुष्टयांत साधन पहिलें । तें द्वितीयांत निवेदिलें । इहामुत्रफळीं विटलें[६]। तें साधन तिसरियां ।।४।। इह म्हणिजे या लोकींचें । अमुत्र ह्मणिजे स्वर्गींचें । वर्णन कीजे इहलोकींचें । त्यावरून स्वर्गींचें जाणावें ।।५।। सुख असेल जरि येथें । तरी स्वर्गसुखाचेहि भोक्ते। शाश्वतता[७] उभय भोगांतें । मानूंचि नये ।।६।। ब्रह्मलोकादि तृणान्त। काकविष्ठासम मानी चित्त । तयासी श्रुति असे म्हणत । वैराग्य ऐसें।।७।। ऐसी हे वैराग्याची स्थिती । बाणावी साधकाचे हातीं । या हेतु कृपामूर्ति । विस्तारिती तृतीयातें ।।८।। प्रथमादि पांच समासापर्यंत।**

---

संपूर्ण आकाश तीर्थाच्या गिंडीमध्ये साठवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे केवळ परिश्रमच होत. त्याप्रमाणे दासबोधाच्या संपूर्ण अर्थाचे आकलन हे कसे शक्य होईल ? (१) समुद्रात किती पाणी आहे हे हात आणि जीभ यांना कसे कळेल ? परंतु तहानेने व्याकूळ झालेल्या मुनष्याला समुद्राने प्रतिबंध केला आहे. असे कधी होणार नाही. ('वरी' ऐवजी वारी असा पाठभेद स्वीकारून हा अर्थ केला आहे. तसेच समुद्र या शब्दाचा जलाशय हा अर्थ घ्यावा.) (२) त्याप्रमाणे येथे आपली तृप्ती होते हाच त्या ग्रंथाच्या वाचनाचा हेतू आहे. त्या संदर्भात अधिक भाष्य करून श्रम वाढवण्यात अर्थ नाही. आता तिसऱ्या दशकाचे निरूपण सावध होऊन ऐका. (३) मागे पहिल्या दशकात जे साधन चतुष्टय सांगितले त्यातील नित्यानित्यवस्तुविवेक हे जे पहिले साधन आहे, त्याचे निरूपण दुसऱ्या दशकात झाले. दुसरे साधन जे इहामुत्रफलभोगविराग (विरक्ती) त्याचे निरूपण प्रस्तुत तिसऱ्या दशकात केले आहे. (४) इह म्हणजे या लोकाचे (मृत्यूलोकाचे, पृथ्वीचे) आणि अमुत्र म्हणजे (परलोकाचे, स्वर्गाचे) इहलोकातील सुखोपभोगांचे वर्णन केले जात आहे. त्यावरून स्वर्गलोकातील सुखोपभोगांचे वर्णन समजून घ्यावे. (५) या जगात जर सुख असेल तर स्वर्गलोकातील सुखाचे ही भोक्ते होता येईल, पण दोन्ही लोकांतील सुखांना शाश्वतता (कायम चिरकाल टिकण्याचा गुण) मानूच नये. (६) ब्रह्मलोक इ. पासून क्षुद्र गवतापर्यंत जे जे असेल ते सर्व कावळ्याच्या विष्ठेप्रमाणे मनाला ज्यावेळी वाटायला लागते, त्यावेळी त्याला वेदांनी वैराग्य असे म्हटले आहे. (७) अशी वैराग्याची स्थिती साधकाला प्राप्त व्हावी, त्याच्या ठिकाणी ती मुरावी या हेतूने कृपामूर्ती समर्थांनी तिसऱ्या दशकाचा विस्तार केला आहे. (८)

**कथन केलें दु:ख समस्त । जे गर्भजन्मादि मरणान्त। सुखाचा लेश नाहीं।।९।। जैसें हाडातें चावितां । आपुले दंताचें रक्त श्रवतां[८] । परी त्या श्वानाचे चित्ता । वाटे हाडाचें रक्त।।१०।। तैसें आपुले सुखें सुखी जाला । म्हणजे सुख काय हो विषयाला[९अ] । शेवटीं दु:खा वरपडा[९] जाला । श्वानाचे परी[१०] ।।११।। असो विषयांपासून सुख । मानी तो केवळ मूर्ख । त्या प्रापंचिकाचें कौतुक । पंच[११] समासीं पहावें ।।१२।। आतां अनुतापासी[१२] कारण। उत्तर[१३] पंच समास जाण त्रिविध तापांचें लक्षण । तिहीं समासीं।।१३।। सहावा सातवा आठवियांत । आध्यात्मिक[१४] आणि आधिभूत[१५] । आधिदैविक[१६] तो विख्यात । अनुक्रमें तिन्ही ।।१४।। समास नववा आणि दहावा । हा तरी वैराग्याचा निज ठेवा । जन्मला प्राणी मृत्युपथें जावा । हा निर्धार काळाचा ।।१५।। आणि संसारमहानदीचे पुरीं। रूपकेंसी दाविली परी[१७] । तेथून काढिता[१८] जो निर्धारीं । कास त्याची धरावी ।।१६।। मी**

---

पहिल्या समासापासून ते पाचव्या समासापर्यंत जीवनातील सर्व प्रकारच्या दु:खांचे निरूपण केले आहे. त्यामध्ये गर्भावस्था, जन्मकाळ इ. पासून ते मरणापर्यंत सर्व दु:खमय जीवनाचे वर्णन केले आहे. या संपूर्ण कालावधीमध्ये सुखाचा अल्पांशदेखील नाही. (९) ज्याप्रमाणे कुत्रे हाड चावत असते, त्यावेळी त्याच्याच दाताचे रक्त खाली गळत असते, पण त्या कुत्र्याच्या मनाला मात्र ते त्या हाडाचेच रक्त गळत आहे असे वाटत असते. (१०) त्याप्रमाणे माणूस आपल्या सुखी वृत्तीने सुखी होत असतो, पण तो मात्र म्हणत असतो की, आपण जे विषय भोगतो आहोत त्या विषयांचेच हे सुख आहे. असे म्हणून तो त्या विषयांचेच गोडवे गात असतो. शेवटी मात्र त्या कुत्र्याप्रमाणे तो दु:खाचाच वाटेकरी होतो. (११) असो विषयांपासून सुख मिळते असे जो मानतो तो केवळ मूर्ख असतो. अशा त्या प्रापंचिकाचे कौतुक (येथे दु:ख) या पहिल्या पाच समासात पहावे. (१२) आता या अज्ञानाचा पश्चात्ताप का होतो याचे उत्तर पुढे येणाऱ्या पाच समासात पहावे. त्यापैकी पहिल्या तीन समासांत तीन प्रकारच्या तापांची लक्षणे समजून घ्यावीत. (१३) सहाव्या, सातव्या आणि आठव्या समासांत अनुक्रमे आध्यात्मिक (देह, प्राण यांच्यामुळे अथवा मनाने भाविल्यामुळे होणारी दु:खे), आधिभौतिक (निरनिराळ्या भूतांकडून म्हणजे जीवांकडून होणारी, भौतिक पदार्थांपासून होणारी; पिशाच्चे, जादू टोणा इ. मुळे होणारी) आणि आधिदैविक (निरनिराळ्या देवतांच्या प्रकोपामुळे होणारी, अथवा परलोकात यमदूतांच्या जाचणीमुळे होणारी दु:खे) अशी तीन प्रकारची प्रसिद्ध दु:खे सांगितली आहेत. (१४) नवव्या आणि दहाव्या समासात आपल्याला वैराग्याचा ठेवाच सापडेल. जो जो जन्मला तो तो प्राणी मृत्यूच्याच वाटेने जाणार, हा काळाचाच निश्चय आहे. (१५) आणि संसारावर महानदीच्या पुराचे रूपक करून त्याचा प्रकार (दहाव्या समासात) सांगितला आहे. त्या पुरातून जो बाहेर काढतो त्या (परमेश्वराची कास धरावी त्याला शरण जाऊन त्याचा आश्रय घ्यावा. ) हा दहाव्या समासाचा संदेश आहे. (१६)

**माझें हें वाटतें मनीं। तेणें हा साग्रदशक शोधूनी । जीवीं धरिजे अर्थालागुनी । त्यासी वैराग्य वरील ।।१७।। विवेक आणि वैराग्य । हें ज्ञानाचें सौभाग्य। लाधलें तया पुरुषाचें भाग्य । ब्रह्मादिकां नेणवे ।।१८।। दोनी साधनीं पूर्ण जाला । तो युवराज्यातें पावला । बोधसाम्राज्यीं बैसावयाला । मुहूर्त संतीं पाहिला असे ।।१९।। इति श्री संकेतकुबडी। दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्रीरामदासा ।।२०।। दशक तिसरा समाप्त ।।**

---

ज्याच्या मनात मी, माझे असा भाव असेल त्याने हा संपूर्ण दशक मुळातून वाचावा आणि त्याचा अभिप्राय अंत:करणात ठसवावा. त्याला वैराग्याची प्राप्ती होईल. (विरक्ती त्याला माळ घालील.) (१७) विवेक (सदसद्विवेकबुद्धी) आणि वैराग्य हें ज्ञानाचें श्रेष्ठ वैभव होय. ज्याला तें प्राप्त होईल त्या पुरुषाचे भाग्य ब्रह्मदेवादिकांनाही कळणार नाही. (१८) अशा प्रकारे नित्यानित्यवस्तुविवेक आणि इहामुष्मिकफलभोगविराग या दोन्ही साधनांनी जो पूर्ण झाला त्याला बोधसाम्राज्याच्या युवराजपदाची प्राप्ती झाली असें समजावें. आता या बोधसाम्राज्यावर प्रत्यक्ष केव्हा बसणार याचा मुहूर्त संतांनीच ठरविला आहे. (निश्चित केला आहे.) (१९) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२०) येथे तिसरा दशक समाप्त झाला.

**टिपा**

(१) वैष्णवांचें तीर्थ ठेवण्याचें चंबूसारखें लहान भांडें, गिंडी. (२) फार कष्ट. (३) तहानलेला. (४) पाठभेद - वारी. (५) समुद्र. या चरणाचा अर्थबोध झाला नाहीं. वरणें पसंत करणें, धारण करणें, घेणें, नेमणें; वारी-प्रतिबंध करणें, मागें फिरविणें, रक्षण करणें; असे अर्थ कोशांत आहेत. (६) नकोसे झाले, शिसारी आली. (७) टिकाऊपणा. (८) गळत असतां. ९-अ. म्हणजे त्या विषयामध्ये ते सुख असते काय ? असाही या चरणाचा अर्थ करता येतो. (९) प्राप्त, आधीन. (१०) कुत्र्याप्रमाणें. (११) पहिल्या पांच समासांत. (१२) पश्चात्तापाला. (१३) शेवटचे पुढील. (१४) 'देहप्राणापासून जाले । दु:खी इंद्रियानें केलें । किंवा मनें कल्पिले। नाना आधि ।।१६।। हें आध्यात्मिक।।' आगमसार १.३. (१५) 'नाना भूतें पीडा करिती । अथवा भौतिकें दु:ख देती । जाणावी हे प्रतीति । आधिभौतिकाची ।।१८।। आ.सा. १.३. (१६) या लोकींचें दैवत । अथवा अंतीं यमदूत अत्यंतचि पीडा करित । हा आधिदैविक ।।१९।। आ.सा. १.३. (१७) प्रकार. (१८) काढणारा.

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक चौथा

।। श्रीराम समर्थ ।। जालें वैराग्य इहामुष्मिक[१] । आतां ऐका शमादि[२] षट्क । नवविधा भक्तीचा विवेक । दाविला चौथियांत[३]।।१।। प्रथमापासून समास नव । नवविधा भक्ति अनुक्रमें अपूर्व । श्रवण कीर्तन करावें सर्व । तिसरें स्मरण विष्णूचें ।।२।। पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । ऐसें हें नवविध भजन । नव समासीं भक्तीचें ।।३।। नव मार्ग जया भक्तीचे । बोलतां नये निरूपण तिचें । जेथें अवसान[४] श्रुतीचें । ते मौनेंचि अनुभवावी ।।४।। ऐक्य भक्ति जे विज्ञान । तिचें साधन नवविध भजन । येणें पाविजे समाधान । हेंचि लक्षण अवधारा ।।५।। अद्वैत ग्रंथ सद्गुरुमुखें ऐकावे। जें जें बोलिलें तें अंगे व्हावें । संशय अवघे त्यागावे । या नांव श्रवणभक्ति।।६।। कोण्ही मिळे सज्जन। तरी अनुभवें करावें कथन । अथवा सद्गुरूसी करावा प्रश्न । या नांव कीर्तन बोलिजे।।७।। श्रवण कीर्तन या दोहींचा । पडिला धर्म इंद्रियांचा । मोडला

---

इहामुष्मिक सुखोपभोगाबद्दलच्या वैराग्याचे विवेचन झाले, आता शमादि षट्काचे स्वरूप ऐका चौथ्या दशकात नवविधा भक्तीचा विचार सांगितला आहे. (१) पहिल्या समासापासून नवव्या समासापर्यंत नवविधा भक्तीचा अपूर्व विचार सांगितला आहे. पहिल्या समासात सर्व गोष्टींचे श्रवण करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यात कीर्तनभक्तीचे विवेचन असून तिसऱ्यात विष्णूच्या नामस्मरणाचा विचार आला आहे. (२) नंतरच्या सहा समासांत अनुक्रमे पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या उर्वरित सहा भक्तींचा विचार मांडला आहे. अशा तऱ्हेने नऊ समासात भक्तीच्या नऊ प्रकारांचे अनुक्रमाने विवेचन झाले आहे. (३) ज्या भक्तीचे असे नऊ मार्ग आहेत. तिचे वास्तविक पाहता निरूपणच वाचेने करता येत नाही. त्याबाबतीत वेदांचीही क्षमता संपते, ती भक्ती मौनानेच अनुभवावी लागते. (४) विज्ञान अथवा केवळ अनुभवगम्य ज्ञान म्हणजेच ऐक्य भक्ती होय. त्या भक्तीचे, ही नवविधा भक्ती हे केवळसाधन आहे. या नवविधा भक्तीच्या साधनाने अंतिम समाधान प्राप्त होते. हे तिचे लक्षण समजा. (५) अद्वैताचे निरूपण करणारे ग्रंथ गुरुमुखातून ऐकावेत, ते जे जे सांगतील तसे आपण स्वत: व्हावे, सर्व संशयांचा त्याग करावा, यालाच श्रवणभक्ती असे नाव आहे. (६) कोणी सज्जन माणूस भेटला तर त्याला आपल्या अनुभवाच्या आधाराने सांगावे, किंवा आपल्या सद्गुरूंनाच आपले प्रश्न विचारावेत, याला कीर्तन असे म्हणतात. (७)

**छंद विषयांचा । जाला दमाचा निर्धार ।।८।। विष्णु ह्मणिजे व्यापक[५] । व्याप्य[६] सांडून अनेक । अखंड तेथें मन रहावें आवश्यक । या नांव विष्णुस्मरण ।।९।। विषय चिंतावा मनोधर्म । तो स्मरणें जाला उपशम[७] । अनायासें जाला शम । साधनांग दुसरें ।।१०।। सद्गुरुपदीं अनन्य[८] । काया वाचा आणि मन। या नांव बोलिजे पादसेवन । चौथी भक्ती।।११।। अनुभव ह्मणिजे सुख घेणें । संगत्याग तें सुखरूप होणें । त्रिपुटी असे अनुभव ग्रहणें[९] । अंगे होणें अद्वैत ।।१२।। नित्य-विदेह-जीवन्मुक्त। या तीहीचें सप्त[१०] संकेत । आत्मशास्त्र गुरुप्रचीत[११] । येणें सर्व उमजे।।१३।। अनिर्वाच्य भक्तीचें लक्षण । अल्पसंकेतें दाविलें चिन्ह । हें सद्गुरुपादसेवनें जाण । प्राप्त होय साधका ।।१४।। काया वाचा मन चरणीं । लागलें सद्गुरुभजनीं । हा उपरम ओळखावा विचक्षणीं[१२] । साधनांग तिसरें ।।१५।। सर्वभूतीं समान । या नांव बोलिजे अर्चन । सर्वांहूनि होणें सान[१३] । हेंचि वंदन[१४] बोलिजे।।१६।। सर्वत्र गुरु हे प्रतीति । जाली अर्चन वंदन भक्ति । मग जे जे देहा**

---

इंद्रियांचे इतर व्यापार बंद पडून वरील प्रकारचे श्रवण, कीर्तन हाच त्यांचा धर्म बनला, त्यांचा विषयांचा नाद सुटला, म्हणजे इंद्रियनिग्रह अथवा दम साध्य झाला असे खात्रीपूर्वक समजावे. (८) विष्णू म्हणजे व्यापक तो सर्वांना व्यापून असतो. त्याने व्यापलेली नामरूप अनेकविध दृश्यसृष्टी त्याच्यामध्ये लीन होऊन त्याच्याशी अभिन्न होऊन राहते. त्याच्या ठिकाणी आपले मन स्थिर राहावे, यालाच विष्णुस्मरण म्हणतात. (९) विषयाचे चिंतन करणे हा मनाचा स्वाभाविक धर्म आहे. पण या स्मरणभक्तीने तो मनोधर्म नष्ट होतो, शांत होतो. म्हणजेच विनासायास शम साध्य होतो. शम हे शमादिषट्कातील दुसरे साधन होय. (१०) काया, वाचा आणि मन यांनी सद्गुरूंच्या चरणांची अनन्यभावाने सेवा करणे ही पादसेवन नावाची चौथी भक्ती होय. (११) अनुभव घेणे म्हणजे सुख घेणे होय. आणि संगत्याग म्हणजे सुखरूप होणे होय. अनुभव घेण्यात त्रिपुटी असते. स्वत: होण्यात अद्वैत असते. (१२) नित्यमुक्त, विदेहमुक्त आणि जीवन्मुक्त (या सर्वांमध्ये अखंड समाधानच असते. त्याला लोक आपापल्या इच्छेनुसार निरनिराळ्या नावांनी संबोधतात.) या समाधानाचे सात संकेत आहेत (संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण । सहज स्थिती उन्मनी विज्ञान ।। दास. ४-४-८ आणि आगमसार ११-१-१२ आणि संकेत कुबडी ९ वा दशक पहा) हे सर्व आत्मप्रचीती, शास्त्रप्रचीती आणि गुरुप्रचीती या मार्गांनी कळू शकतात. (१३) अनिर्वचनीय अशा भक्तीचे लक्षण इथे थोडक्यात सांगितले आहे. सद्गुरूंच्या चरणांच्या सेवेने साधकांना ती अनिर्वचनीय भक्ती प्राप्त होऊ शकते. (१४) काया, वाचा, आणि मनाने सद्गुरुभजनात रममाण होणे हा उपरम होय. शहाण्या लोकांनी तो समजून घ्यावा. उपरम हे तिसरे साधनांग होय. (१५) सर्व जीवांना समान लेखणे यालाच अर्चन म्हणतात. आणि त्या सर्व जीवांपेक्षा आपण लहान होणे यालाच वंदन असे म्हणतात. (१६)

**होय विपत्ति । सहन करणें ते तितीक्षा ।।१७।। सेवकधर्म स्थूळाचा। सेव्य सद्गुरु त्याचा । सेवा करितां अहर्निशींचा[१५] । आठऊ[१६] नाहीं हें दास्य[१७] ।।१८।। सर्वांसी वाटे हा असावा। दर्शनें सुख होय जीवा। सज्जनें तरी सांठवावा । हृदयीं या नांव सख्य ।।१९।। दास्य-सख्य-भक्तीमिसें । संतसंगें श्रवण होतसे । अर्था स्वजीवी धरी मानसें । या नांव श्रद्धा।।२०।। संग सोडोनी मीपणाचा । वस्तु[१८] जाला अंगें साचा । विचारें आत्मनिवेदनाचा। प्रकार ऐसा ।।२१।। जे का भक्ति निवेदन । त्यासीच ह्मणावें समाधान । जाले सहाहि साधन[१९]। नवविधा प्रकार।।२२।। शम दम उपरति । तितीक्षा जाणिजे चौथी । श्रद्धा समाधान वेदांती[२०] । सहासी बोलती षट्क ।।२३।। नवसमासींचें निरूपण । सादर परिसोत सज्जन । आतां मुक्तीचें लक्षण । दहावे समासीं ।।२४।। चार देहीं चार मुक्ति। ऐसें बोलती वेदान्ती । सलोकता स्थूळ जागृति । समीपता सूक्ष्मीं।।२५।। स्वरूपता कारणीं वसे । सायुज्य महा कारणीं असे । देहातीतास नसे । मुक्तीचे काज काहीं।।२६।।**

---

सर्वत्र गुरूच्या अस्तित्वाचा प्रत्यय आला की, अर्चनभक्ती आणि वंदनभक्ती साध्य होतात. त्यांमुळे देहाला जे कष्ट होतात ते सहन करणे याला तितिक्षा म्हणतात. (१७) सेव्य जे सद्गुरू त्यांची सेवा करणे म्हणजे स्थूल पातळीवरील सेवकधर्म होय. पण ही सेवा करत असताना दिवस अथवा रात्र यांचे भान नसणे याला दास्य भक्ती म्हणतात. (१८) सर्वांना त्याचा सहवास हवा हवासा वाटावा, त्याला पाहाताच जीवाला सुख वाटावे, सज्जन लोकांनी त्याला आपल्या हृदयात साठवून ठेवावे अशा वाटण्याला सख्य म्हणतात. (१९) दास्यभक्ती अथवा सख्यभक्तीच्या निमित्ताने संतांचा सहवास घडतो. या सहवासातून श्रवणभक्ती घडते. या श्रवणातून ज्या अर्थाचे आकलन होते. तो अर्थ स्वत:च्या अंत:करणात साठवून ठेवणे याला श्रद्धा असे म्हणतात. (२०) मीपणाची संगती सोडून स्वत:च ब्रह्म होणे, या प्रकाराला आत्मनिवेदन म्हणतात. आत्मनिवेदनभक्तीचे असे स्वरूप आहे. (२१) ही जी आत्मनिवेदनभक्ती आहे तिलाच समाधान असे म्हणावे. अशा प्रकारे नवविधा भक्तीच्या अभ्यासाने शमादी सहा साधनेही साध्य होतात. (२२) शम, दम, उपरती, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान यांना वेदान्तात शमादिषट्क म्हणतात. (२३) अशा प्रकारे नऊ समासांचे जे निरूपण केले आहे, ते सज्जनांनी लक्षपूर्वक ऐकावे. त्यानंतर दहाव्या समासात मुक्तीचे लक्षण सांगितले आहे. (२४) स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण असे देहाचे चार प्रकार आहेत. त्या देहांमध्ये चार मुक्ती (सलोकता, समीपता, सरूपता, आणि सायुज्यता) आहेत. असे वेदान्ती सांगत असतात. सलोकता मुक्ती स्थूल देहाची असून त्या देहाची जागृती ही अवस्था आहे. समीपता ही सूक्ष्म देहाची असून त्याची अवस्था स्वप्नाची आहे. (२५) स्वरूपता (सरूपता) ही मुक्ती कारण देहाची असून त्याची अवस्था सुषुप्तीची आहे. सायुज्यता ही महाकारण देहाची असून त्याची अवस्था उन्मनी ही असते. देहातीताला मुक्तीचे काहीच प्रयोजन नसते.(२६)

**साच बंध आत्मयासी । असे तरी पावावें मुक्तींसी । कारण नाहीं गुरुपुत्रासी । बंध-मुक्तीचें।।२७।। नवविध हे भजनप्रकारू । अधिष्ठान[२१] एक श्रीगुरु । सर्व तोचि हा निर्धारू। संपला प्रकारू चौथिया ।।२८।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।२९।। इति श्री संकेत सूचना समास।।४।।**

---

आत्म्याला खरोखरच बंधन असते तरच तो मुक्त होऊ शकला असता ना ? पण गुरुभक्ताला बंधन अथवा मुक्ती यांचे काहीच घेणे देणे नसते. (२७) भक्तीचे हे नऊ प्रकार असून त्या सर्वांचे अधिष्ठान (आधार) श्रीगुरू हेच आहेत. सद्गुरू हे सर्व काही आहेत. येथे चौथ्या दशकातील विचार पूर्ण होतो. (२८) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२९) येथे चौथा दशक समाप्त झाला.

**टिपा**

(१) या लोकचें व परलोकचें. (२) पृ.२७ वरील टीप क्र.३० पहा. (३) चवथ्या दशकांत. (४) शेवट, अखेर. (५) व्यापणारा. (६) व्यापलेलें नामरूपात्मक अनेकविध दृश्य. (७) शांति. (८) 'अन्य नव्हे तो अनन्य', दुजेपण किंचितहि नसणे. (९) अनुभव घेत असतां. (१०) हे मुक्ताचे तीन प्रकार व सात संकेत या विषयींचे स्पष्टीकरणार्थ पुढील ९ वा दशक पहावा. (११) आत्मप्रचीति, शास्त्रप्रचीति व गुरुप्रचीति हे आत्मानुभवाचे तीन प्रकार. (१२) विद्वान, निपुण. (१३) लहान. (१४) पाठभेद - सर्वांहूनि न होणें सान । हेंचि बंधन बोलिजे. (१५) दिवसरात्रीचा. (१६) स्मरण. (१७) 'हें दास्य' - शब्द करमाळे प्रतींत नाहींत. (१८) ब्रह्म. (१९) नवविधा भक्तीच्या योग्य प्रकारच्या अभ्यासानें शमदमादि साधनांचा अभ्यास कसा सहज होतो हें ६ ते २२ पर्यंतचा ओव्यांत श्री हंसराज स्वामींनी फार सुंदर रीतीनें या ठिकाणीं सांगितलें असून अभ्यासकांनी त्यांचें अभ्यासपूर्वक मनन करावें. (२०) वेदान्त शास्त्रांत किंवा वेदान्तशास्त्रज्ञ. (२१) आधार, आश्रयस्थान.

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक पाचवा

**।। श्रीराम ।। पांचवा दशक चिंतामणी । चिंतिल्या अर्थाचा दानी[१]। मुमुक्षूची तो[२] जननी । कृपेसहित लाळीतसे[३] ।।१।। जयासी मोक्षाची अपेक्षा[४] । जेणें पांचवीयांत घेतली दीक्षा । संतजनीं तया मुमुक्षा । नाभि[५] ह्मणोनि आश्वासिलें ।।२।। पुढें कथेचा अनुवाद[६]। गुरुशिष्यांचा संवाद । प्राकृत परि उपनिषद । त्या[७] या भेद असेना।।३।। प्रथम मुमुक्षूसी जाण । व्हावी सद्गुरूची वोळखण[८]। ह्मणोनी केलें निरूपण । दोन समासीं।।४।। प्रसंगें ब्राह्मण मुख्य गुरु । माता पिता तेहि गुरु । परि सद्गुरुवांचुनी साधन विचारू । बोलोंचि नये ।।५।। ध्यान धारणादि साधनांची । सरी[९] न पविजे ज्ञानाची । सद्गुरुवांचुनि ज्ञानाची। वार्ता नसे ।।६।। या निश्चया कारणें । पहिला समास अवलोकणें । आतां सद्गुरूचीं लक्षणें । बरीं शोधावीं ।।७।। समासप्रकाश पुढें करावा । सांगितल्या लक्षणीं शोध घ्यावा। अवलक्षणांचा त्यागचि करावा । युक्त[१०] तरी वरावा[११] आदरें ।।८।। हा संकेत**

---

पाचवा दशक हा जणु चिंतामणीचआहे. तो मनात आणलेला पदार्थ देणारा आहे. मुमुक्षूंची तर तो आईच आहे. ही आई त्यांच्यावर कृपा करून त्यांचे लाड करते. (१) ज्याला मोक्षाची अपेक्षा आहे, ज्याने पाचव्या दशकात दीक्षा प्राप्त केली आहे, अशा मुमुक्षू साधकाला संतजनांनी नाभिकाराने (भिऊ नकोस या शब्दांत) आश्वासन दिले आहे. (२) आता यापुढे कथेच्या निरूपणामध्ये गुरुशिष्यांचा संवाद आहे. तो मराठीत असला तरी प्राचीन काळचे उपनिषद आणि हा दशक यात भेद नाही. (३) मुमुक्षू साधकाला प्रथम सद्गुरूंची ओळख पटावी म्हणून पहिल्या दोन समासात त्या दृष्टीने निरूपण केले आहे. हे समजून घ्या. (४) प्रसंगाने ओघात आले म्हणून प्रथम ब्राह्मण हाच मुख्य गुरू आहे असे सांगितले. माता पिता हे ही गुरूच होत, पण सद्गुरूवाचून साधनांचा विचार बोलता येत नाही. (५) ध्यान, धारणा इ. साधनांची ज्ञानाशी तुलना होऊ शकत नाही. आणि सद्गुरूखेरीज ज्ञानाची गोष्टच काढता येत नाही. तात्पर्य असे की, सद्गुरूंची साधनांसाठीही गरज असते आणि ज्ञानासाठीही त्याहून अधिक असते. (६) हे मनात ठसण्यासाठी या दशकातील पहिल्या समासाचे अवलोकन करावे. त्यानंतर दुसऱ्या समासात सद्गुरूंच्या लक्षणांचा चांगला शोध घ्यावा. (७) त्यासाठी त्या समासाने केलेल्या मार्गदर्शनाची मदत घ्यावी, त्या मार्गदर्शनाच्या प्रकाशात सद्गुरूंच्या लक्षणांचा शोध घ्यावा. अवलक्षणे असतील तर त्यांचा त्यागच करावा. योग्य लक्षणांनी युक्त असतील तर त्या सद्गुरूंचा आदरपूर्वक स्वीकार करावा. (८)

**दाखविला येथें । परी पहावें लागे ग्रंथातें । संपूर्ण अर्थ आणावा येथें । तरी ग्रंथ दुसरा जाला ।।९।। असो जाले समास दोन । आतां मुमुक्षूसि व्हावें सच्छिष्याचें ज्ञान । आणि त्यागावें असच्छिष्यपण । तेंचि लक्षण तिसरियां ।।१०।। नाना मंत्र मुद्रा[१२] नाना । उपदेशाची लक्षणें नाना । मुमुक्षें तया विश्‍वासावेंना । कदाकाळीं ।।११।। चौथा समास या करितां । ज्ञानावीण ज्या ज्या माता[१३]। त्या त्या खंडूनि समस्ता । लावावें पंथा ज्ञानाचें।।१२।। तें ज्ञान तरी कोणतें । जें तें ज्ञानचि वाटतें । खंडिलीं ज्ञानें समस्तें । तो समास पांचवा ।।१३।। आतां मुमुक्षूचा निज ठेवा । तो जाणावा समास सहावा । येथें शुद्ध ज्ञानाचा बरवा। विचार असे ।।१४।। दृश्य दाटी वोसरली[१४] । तुर्येसी[१५] उन्मनी[१६] मावळली । शुद्ध स्वरूप स्थिती उरली । या नांव ज्ञान।।१५।। तें अनुभवेंवीण आपण[१७]। ऐसें जें का मुख्य ज्ञान[१८]। येणेंचि ज्ञानें समाधान । शुक-सनक-ब्रह्मादिकां ।।१६।। या समासींची उणखूण[१९]। साधकें पहावी आळस टाकून । येथें पावे जो निजखूण । तेणें सर्व केलें ।।१७।। येथून जो खुणेसी[२०] चुकला। तो परमार्थी मुकला । अरत्रींपरत्रीं[२१] तयाला ।**

---

हा अभिप्राय या ठिकाणी खुणेसाठी सांगितला आहे. त्यासाठी मूळ ग्रंथच (दासबोधच) संपूर्णपणे पहावा. संपूर्ण अर्थ येथे सांगितला तर त्याचा दुसराच ग्रंथ होईल. (९) अशा रीतीने दोन समास झाले. आता मुमुक्षूला सच्छिष्याचे ज्ञान व्हावे, त्याने वाईट शिष्याच्या लक्षणांचा त्याग करावा हेच तिसऱ्या अध्यायाचे लक्षण (ओळखीची खूण) आहे. (१०) निरनिराळे मंत्र, निरनिराळ्या मुद्रा, (योग मार्गातील अथवा धार्मिक विधीत कराव्या लागणाऱ्या मुख, हात इ.चे आकृतिबंध) उपदेशाचे निरनिराळे विधी सांगितले जातात, पण मुमुक्षूने त्यांच्यावर कधीही विश्वास ठेवू नये. (११) चौथा समास हेच सांगण्यासाठी आहे. ज्ञानाव्यतिरिक्त ज्या ज्या गोष्टी असतील त्यांचे त्यांचे खंडन करून त्यांना ज्ञानाच्या मार्गाने न्यावे. (१२) पण ते ज्ञान कोणते ? आपल्याला प्रत्येक शिकण्याची गोष्ट म्हणजे ज्ञानच वाटते. त्यासाठी इतर भौतिक आणि भ्रामक खोट्या ज्ञानांचे खंडन करावे लागते. तसे खंडन पाचव्या समासात केले आहे. (१३) आता मुमुक्षूच्या आत्मसुखाचा ठेवा म्हणजे सहावा समास आहे, हे जाणून घ्यावे. त्या समासात शुद्ध ज्ञानाचा चांगला विचार मांडलेला आहे. (१४) दृश्याची सर्व गर्दी कमी झाली, सर्वसाक्षिणी तुर्या अवस्था आणि मनोरहित उन्मनी अवस्था नाहीशा झाल्यानंतर जी शुद्ध स्वरूपाची स्थिती प्राप्त होते, तिचे नाव ज्ञान होय. (१५) अनुभवरहित (म्हणजे त्रिपुटीरहित) केवळ आत्मरूपाची अवस्था तेच मुख्य ज्ञान होय. याच ज्ञानाने शुकसनकादी, ब्रह्मदेव इत्यादींना (शाश्वतचे) समाधान प्राप्त झाले. (१६) या समासाचे रहस्य साधकाने आपला आळस झटकून टाकून शोधावे. या समासात ज्याला आत्मतत्त्वाची ओळख पटेल, त्याने सर्व काही प्राप्त केले, त्याने सर्व काही केले (त्याला आता काही करायचे उरले नाही.) असे समजावे. (१७)

**ठाव नाहीं।।१८।। अनंत जन्मींचा निज ठेवा । आणि सद्गुरुकृपा लाधली दैवा । तरी येथींच्या वैभवा । पावे अवीट[२२]।।१९।। येथीचिया अर्थातें जिंकून[२३]। बाहेरी रिघूं न शके मन । अर्थसागरी बुडालें जाऊन । काढिता कवणू ।।२०।। दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा । जेथें अति सूक्ष्म विचारा । फडके[२४] होती ।।२१।। आतां असो येथींचा विचार । पाहिलाचि पहावा. साचार । तयासी गुरुराज पैलपार । पाववी सुखें ।।२२।। खुण मौनेंचि पावला । तरि अनुसंधानचि साधन त्याला । श्रवण मनन निदिध्यासाला । सोडूंचि नये ।।२३।। सागरांमाजी क्षीरसागर । तैसा हा समास सुंदर । श्रोतया असे येथींचा आदर । सांगणें काय ।।२४।। सर्व लक्षण जया ठावें । तयासीच ज्ञाता ह्मणावें । ज्ञानाचे दृष्टीस न यावे । ऐसे पदार्थचि नसती ।।२५।। आधी बद्धलक्षणें जाणावी । ते सप्तम समासीं आघवी[२५]। जातां मुमुक्षुता प्राप्त व्हावी । ते पहावी अष्टमीं।।२६।। जाला साधनचतुष्टयसंपन्न । ज्ञानविज्ञानेंसीं करी मनन । स्वयें सच्चिदानंद**

---

हे रहस्य ज्याच्या हातून सुटले, तो परमार्थास मुकला म्हणून समजावे, त्याला इहलोक अथवा परलोक यांमध्ये जागा नाही.(१८) अनंत जन्मांचा आत्मसुखाचा ठेवा गाठी असेल, त्यावर सद्गुरूंच्या कृपेचा लाभ ज्याच्या दैवात असेल त्यालाच या समासातील अवीट (कंटाळा न येणाऱ्या) अशा वैभवाची प्राप्ती होईल. (१९) या समासाच्या अर्थाचे आकलन झाल्यानंतर मन त्यातच बुडून राहील. ते तेथून बाहेरही पडू शकणार नाही. ते अर्थाच्या गहन सागरात एकदा बुडून गेल्यानंतर त्याला तेथून काढणार कोण ? (२०) (दासबोध हा काही सोपा ग्रंथ नव्हे) ज्या माणसाला तो सोपा वाटेल, तो आत्महत्यारा समजावा. (सोपेपणाच्या नावावर चुकीचा अर्थ मनात धरून मुख्य अर्थापासून दूर जाणे ही आत्महत्याच नव्हे का?) दासबोधामध्ये अतिशय सूक्ष्म विचारांच्या सुद्धा चिंध्या करून टाकलेल्या आहेत. (२१) आता येथला हा विचार राहू द्या. दासबोधाचा अर्थ काढण्यासाठी एकवेळ पाहिलेलाच विचार पुन्हा पुन्हा पहावा. अशा जिज्ञासू व्यक्तीला मग सद्गुरू सुखाने पैलतीरी पोचवतील. (२२) केवळ मौनानेच त्याला दासबोधाचे मर्म कळले तरी सुद्धा त्या अर्थाचे अनुसंधान राखणे हेच त्यासाठी साधन आहे. म्हणून श्रवण, मनन, निदिध्यास या साधनांना कधी सोडू नये. (२३) निरनिराळ्या समुद्रांमध्ये क्षीरसागर (दुधाचा समुद्र) हा सुंदर आहे. त्याप्रमाणे दासबोधातील प्रस्तुतचा सहावा समास होय. श्रोत्यांना त्या समासाबद्दल अतिशय आदर असतो, हे काय सांगायला पाहिजे? (२४) ज्याला सर्व लक्षणे माहीत असतात त्यासच ज्ञाता म्हणतात. ज्ञानाच्या दृष्टीच्या टप्प्यात येणार नाहीत असे पदार्थच नाहीत. (२५) आधी बद्ध कोणाला म्हणावे, त्याची लक्षणे कशी असतात, ती सर्व सातव्या समासात समजून घ्यावीत. ती बद्धाची लक्षणे आपल्यामधून गेली म्हणजे मुमुक्षुदशा प्राप्त होते. तिची लक्षणे आठव्या समासात पहावीत. (२६)

**आपण । नामरूप विसर्जुनी[२६]।।२७।। तयासी बोलिजे साधक । जो सकळबोधसाम्राज्यनायक। तयाचे पदरज वांछिती ब्रह्मादिक । त्याचें लक्षण नवमीं असे।।२८।। नवमींचे अर्थीं रिघून। जो करी श्रवण मनन । त्यासी बोधलक्ष्मी येऊन । माळ आपण स्वयें घाली ।।२९।। विषयत्यागेंवीण । साधकता आंगीं नये जाण । तरी त्यागबुद्धीचें लक्षण । दशमीं असे ।।३०।। नामरूपाचा त्याग । अस्ति–भाति–प्रिय–अत्याग[२७] । या नांव बोलिजे त्यागात्याग । जो श्रुतिसंमत ।।३१।। पुढें सिद्धाची लक्षणें। संशयरहित निश्चयाचें ठाणें । तें श्रवणमननाचेनि खुणे । आंगीं बाणती ।।३२।। जाला पांचवा निरूपण । जो मुमुक्षुचातकाचें जीवन । येथींच्या अर्थांचे दृढीकरण। होईल सहावीया ।।३३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी। श्री रामदासा ।।३४।। समास५.**

---

मनुष्य साधनचतुष्टयसंपन्न झाला (पृष्ठ २७ वरील टीप क्र.३४ पहा) आणि ज्ञान आणि विज्ञान (पृष्ठ २६ वरील टीप क्र.२१पहा. आणखी पहा ''काहीच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान । जाणीव राहातां विज्ञान । स्वयेंचि आत्मा ।। दास. ९.७.५१) यांच्याबरोबर मनन करू लागला की तो आपण स्वत:च नामरूपांचा त्याग करून सत्, चित्, आनंद स्वरूप होतो. (२७) त्याला साधक म्हणून जाणावे, जो सर्व ज्ञानसाम्राज्याचा अधिपती होतो, ज्याच्या चरणकमलांच्या धुळीची ब्रह्मदेव इत्यादीही इच्छा धरतात त्याची लक्षणे नवव्या समासाच्या सांगितली आहेत. (२८) नवव्या समासाच्या अर्थात प्रवेश करून जो त्याचे श्रवण, मनन करतो त्याच्या गळ्यात ज्ञानरूप लक्ष्मी स्वत: येऊन माळ घालते. (२९) विषयांचा त्याग झाल्याखेरीज अंगात साधकता बाणणार नाही. म्हणून त्या त्यागबुद्धीची लक्षणे दहाव्या समासात सांगितली आहेत. (३०) नामरूपांचा त्याग आणि अस्ति (आहे), भाति (चैतन्यरूप असणे), प्रिय (आनंदरूप असणे) यां स्वरूपलक्षणांचा त्याग न करणे याला अत्याग असे म्हणतात. या दोहोंना मिळून त्याग–अत्याग म्हणतात. तो वेदांनी संमत केलेला आहे. (३१) यापुढे सिद्धपुरुषाची लक्षणे सांगितली आहेत. ती लक्षणे म्हणजे संशयरहित निश्चयाची स्थानेच होत. ती श्रवणमननांच्या अभ्यासाने अंगात बाणतील. (३२) पाचव्या दशकाचे निरूपण झाले. हे निरूपण म्हणजे मुमुक्षुरूप चातकांचे पाणीच आहे. यातील अर्थ सहाव्या दशकात दृढ (पक्का होईल.) (३३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (३४) इथे पाचवा दशक समाप्त झाला.

**टिपा**

(१) दाता. (२) पाठभेद-मुमुक्षुचातकाची. (३) लाड करते. (४) आवश्यकता. (५). भिऊं नकोस. (६) स्पष्टीकरण. (७) त्या उपनिषदास व या दासबोधास. (८) ओळख, ओळख पटण्याची चिन्हे. (९) बरोबरी. (१०) (सांगितलेल्या लक्षणांनी) संपन्न. (११) पसंत करावा, स्वीकारावा. (१२) योगविद्येंत किंवा धार्मिक विधींत करावीं लागणारी मुख, हस्त आदि अवयवांची विशिष्ट ठेवण. (१३) गोष्टी. पाठभेद - मंता, ममता, मता. (१४) कमी झाली. (१५) 'जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया । ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणीं ।।४९।। दा.७.४. (१६) कल्पनेची लहरीं नाहीं । मन निमग्न चैतन्यडोहीं । स्वरूपावांचूनी नाठवे कांहीं । तेचि उन्मनी ।। - निगमसार ८.२६. (१७) पाठभेद - ज्ञान. (१८) पाठभेद - विज्ञान. (१९) वर्म, रहस्य, वाटाघाट. (२०) मर्म. (२१) इहपरलोकीं. (२२) ज्याचा कधी कंटाळा येत नाहीं असें (वैभव). (२३) या (सहाव्या) समासाचा अर्थ परिपूर्ण समजला असें वाटून मन कधींच बाहेर जाऊं शकत नाहीं. जों जों सखोल अर्थ पहावा तों तों त्या अर्थरूप अथांग समुद्रांत मन अधिकच बुडून जातें. (२४) चिंध्या. श्रीग्रंथराज दासबोधाविषयींचा श्रीहंसराज स्वामी. सारख्या 'शाब्दे परेच निष्णात' अशा ब्रह्मनिष्ठांचा हा अभिप्राय 'दासबोधांत काय सांगितलें आहे तें कळतच नाहीं अथवा दासबोध अगदीच सोपा वा प्राकृत आहे.' असें मानणारांनीं नीट ध्यानीं घ्यावा. (२५) सर्व. (२६) टाकून देऊन. (२७) अस्ति (आहे) भाति (भासते, प्रकाशते) व प्रिय हीं ज्याचीं लक्षणें ते आत्मरूप टाकावयाचे नाहीं.

॥ श्रीरामसमर्थ ॥

## दशक सहावा

॥ श्रीराम ॥ चित्त सुचित करावें । आपणातें ओळखावें । देव कोणास म्हणावें । हें आधी पहा ॥१॥ सर्वांसी ज्याची सत्ता । तोचि देव तत्वता[१] । हे प्रथम समासीं निरोपिली वार्ता । वास्तविक देव ॥२॥ एकासी एक धनी असती । त्या धन्यास कोण निर्मिती। निर्माणकर्त्या ज्या तिन्ही[२] मूर्ती । त्यांसी निर्मिता तो देव ॥३॥ तो ठाईं न[३] पडे साधुविण । साधु म्हणिजे जो ज्ञानसंपन्न । मुख्य देवाचें जया ज्ञान । तोचि साधु ॥४॥ त्या साधूचे अनुग्रहेंवीण[४] । कदापि नव्हे देवाचें ज्ञान । मग पाविजे समाधान । हें निरूपण पहिलिया॥५॥ साधु काय उपदेशिती । ते दुसरीयांत आत्मप्रतीति[५] । जयातें तत्वंपदार्थशोधन[६] म्हणती । जहदजहल्लक्षणीं[७] ॥६॥ पंचभूतातीत देव । हा तत्पदींचा

---

चित्त प्रसन्न करावे. आपण कोण आहोत हे ओळखावे. त्यानंतर देव कोणास म्हणावे याचा आधी विचार करावा. (१) सृष्टीतील सर्व पदार्थांना ज्याच्यामुळे अस्तित्व प्राप्त होते, तोच खरा देव होय. ही गोष्ट पहिल्या समासात सांगितली आहे. (सर्व निर्माण झालेले पदार्थ मिथ्या असून) देवच तेवढा वास्तव म्हणजे खरा आहे. या खऱ्या देवाचे स्वरूप तेथे सांगितले आहे.(२) एखाद्या व्यक्तीचा जो स्वामी असतो, त्या स्वामीला कोण निर्माण करतो ? ब्रह्मा, विष्णू आणि महेश या निर्माण करणाऱ्या (उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीन गोष्टींशी संबंधित) तीन देवता आहेत. त्यांनाही जो निर्माण करणारा आहे, तोच देव होय. (३) तो देव सत्पुरुषाच्या कृपेवाचून भेटत नाही. साधू कोणाला म्हणावे ? सत्पुरुष अथवा साधू हा ज्ञानसंपन्न असला पाहिजे. त्याला मुख्य देवाचे ज्ञान झाले असले पाहिजे. तोच खरा साधू समजावा. (४) त्या साधूच्या कृपेवाचून त्या देवाचे ज्ञान कदापि होणार नाही. देवाचे ज्ञान झाल्यानंतर समाधान प्राप्त होते हे पहिल्या समासात सांगितले आहे. (५) साधू जो काही उपदेश करतील, त्याची स्वत: प्रचीती कशी घ्यावी, हे दुसऱ्या समासात सांगितले आहे. या आत्मप्रचीतीच्या शोधाला तत्त्वंपदार्थशोधन असे म्हणतात. ते जहदजहल्लक्षणेने होते. ('तत्त्वमसि' या महावाक्यातील तत् + त्वम् + असि या पदांचा अर्थ शोधणे म्हणजे तत्त्वंपदार्थशोधन होय. यातील 'तत्' हे पद ब्रह्मवाचक आहे अणि 'त्वम्' हे पद आत्मा, कूटस्थ याचे वाचक आहे. ब्रह्माचे ईश्वर हे शबल रूप असून जीव हे आत्म्याचे शबल रूप आहे. ईश्वर आणि जीव या स्वरूपात त्या दोहोतील भेद जाणवतो. पण ते शबल अंश काढून टाकल्यावर ब्रह्म आणि आत्मा यांच्यातील अभेद स्पष्ट होतो. ईश्वर आणि जीव या तत्त्वांतील शबल अंशांचा फक्त त्याग करावा लागतो. मूळ रूपात ते एकच आहेत. हीच जहदजहल्लक्षणा अथवा भागत्यागलक्षणा होय.) (६)

**असे भाव । मनबुद्ध्यातीत आत्मराव । हें त्वंपदशोधन ।।७।। भूतें भौतिकें वेगळें केलें । आणि शुद्धस्वरूप जें राहिलें । दोहींचे ऐक्यतेस[८] श्रुति बोले । जहदजहल्लक्षणा ।।८।। जालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक । सद्गुरुप्रसादें पापपुण्यादिक । जन्ममरणभय चुकलें ।।९।। हें निरूपण दुसरा। आतां तिसरा अवधारा । जे दृष्य नाशिवंत आत्मा खरा । परी दिसेना ।।१०।। न दिसें न नासे देव । आणि दृश्य मायेचा नाशक स्वभाव । दोन्ही एकवटले तया अपूर्व । निवडी तो धन्य ।।११।। सर्व जेथें उत्पन्न जालें। तेथेंचि सर्व नासोन जें उरलें । तेंचि आपण हें बोलिलें । मीतूंपणारहित ।।१२।। यासी आत्मनिवेदन म्हणावें । तें तत्वता जाणोनि सर्व त्यागावें । हेंचि वर्णिले स्वभावें । तृतीय समासीं ।।१३।। नाना देव पृथ्वीवरी । यांत थोर कोण असे निर्धारीं। ऐसिये आशंकेची परी । ते निर्धारिली[९] चौथिया ।।१४।। युगसंख्या वर्णिली । येकाहून येक स्थिति दाविली। परी ते अवघीची नासिली। आत्म्यामध्यें ।।१५।। तस्मात् अंतरात्मा थोर । हाचि दाविला निर्धार। यामध्यें हरिहर । होऊनि जाती ।।१६।। मायाब्रह्म येकवटलें । तें निवडुनि सांगा**

---

तत् पदाने पंचभूतातील देव सूचित होतो आणि मनबुद्ध्यतीत आत्मराव (आत्मा) हा त्वंपदाने सूचित होतो. (७) भूते आणि भौतिके यांना या दोहोंपासून वेगळे काढले म्हणजे नंतर जे शुद्ध स्वरूप दोन्हीकडे उरते त्या दोन्ही तत्त्वांतील ऐक्याच्या निर्धारण प्रक्रियेला जहदजहल्लक्षणा असे श्रुतीने (वेदाने) म्हटले आहे. (८) निर्गुण, आत्मा आपणच आहोत हे कळणे हेच ज्ञान होय. हे होताच जन्माचे सार्थक झाले असे समजावे. सद्गुरूंच्या कृपेने पापपुण्य इ. आणि जन्म, मृत्यू यांची भीतीही टळली. (९) हे निरूपण दुसऱ्या समासात झाले. आता तिसऱ्या समासाचे निरूपण ऐका. जे जे दृष्टीस पडते ते ते नाशिवंत असून आत्मा हाच खरा शाश्वत आहे. पण तो दृष्टीस पडत नाही.(१०) हा आत्मदेव दिसत नाही, नाश पावत नाही. याउलट मायेचा जो दृश्य आविष्कार, त्याचा नष्ट होणे हाच स्वभाव आहे. माया आणि ब्रह्म हे परस्परात मिसळले असून त्यांना जो वेगळे काढतो, तो पुरुष धन्य होय. (११) हे सर्व दृश्य विश्व जेथून उत्पन्न झाले, शेवटी ते ज्यामध्ये लयाला गेले, या उत्पत्तिलयानंतर मागे जे शिल्लक उरते, तेच ब्रह्म, तेच आपले खरे स्वरूप होय. या स्वरूपांत मी तू असा वेगळेपणाचा भाव नसतो. (१२) यालाच आत्मनिवेदन म्हणावे, ते खऱ्या अर्थाने जाणून घेऊन बाकी सगळ्या गोष्टींचा त्याग करावा. हे तिसऱ्या समासात वर्णन केले आहे.(१३) या पृथ्वीतलावर अनेक प्रकारचे देव आहेत. त्यांमध्ये श्रेष्ठ देव कोणता, अशी आशंका काढल्यानंतर त्या आशंकेचे निरसन चौथ्या समासात केले आहे. (१४) तेथेच युगांची कालगणनाही सांगितली आहे. एकाहून एक वेगळे असे कालगणनेचेही मापक प्रकार निर्धारपूर्वक सांगितले आहेत. पण हे सगळेच एका आत्म्यामध्ये नष्ट होतात. (१५) म्हणून अंतरात्मा हाच सर्वात श्रेष्ठ आहे, हाच निर्णय तेथे प्रकट केला आहे. त्यांमध्येच हरी आणि हर हेही समाविष्ट होऊन जातात. (१६)

**वहिले[१०]। या आशंकेचें उत्तर ऐकिलें । पाहिजे पांचवियां ।।१७।। माया नाशिवंत दृश्य । ब्रह्म अदृश्य अविनाश । बहुधा[११] केलें दोन्ही रूपास । तें पांचवा अवलोका ।।१८।। आतां जें जें दृश्य दिसतें । तें तें सत्यचि वाटतें । उभवूनि ऐसे आशंकेतें। दे समाधानातें साहवा ।।१९।। बहुधापरी[१२] बोलिलें । तितुकें नवचे वर्णिलें । अष्ट[१३] सृष्टीस दाऊन आणिलें । मिथ्या प्रतीतीस ।।२०।। मृत्तिकापाषाणाचे ठाई । देवपण नसे कदाही । हेंहि दावून प्रसंगसमईं। समास पूर्ण केला ।।२१।। सगुण तितुकें नाशिवंत । तरी उपासनेचा काय अर्थ । या आशंकेचें उत्तर देत । असे सातवा ।।२२।। सकळ समासीं पहावें हेंचि बोलिलें असें बरवें । नाशिवंत जाणोनि वाढवावें। भजनमार्गासी ।।२३।। देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना । ऐसी खूण सांगोनि अवसाना[१४] । पावला[१४] समास।।२४।। सर्व मिथ्या हें प्रमाण । तरी न दिसावें हा प्रश्न । ये विषयींचें अनुसंधान[१५] । तें आठविया निरोपिलें ।।२५।। मृगजलादि नाना पदार्थ । दिसती परी अवघे व्यर्थ । तथापि दिसे तरी जनित[१६]। अविद्या[१६] मायेचें ।।२६।। अविद्येनें अविद्या देखिली । तरी काया काय तुझी तूंच वाटली । येथें गोष्टी फार चुकली । हे तों भुली ज्ञान कैंचें ।।२७।। दृश्यभासातीत[१७]**

---

माया आणि ब्रह्म ही एकत्र मिसळली आहेत त्यांचा निवाडा करून सांगा अशी विनंती श्रोत्याने केली. त्या विनंतीला वक्त्याने जे उत्तर दिले ते पाचव्या समासात ऐकले पाहिजे. (१७) माया दृश्य असून नाशिवंत आहे. ब्रह्म अदृश्य असून अविनाशी आहे. इ.अनेक प्रकारांनी त्या दोहोंच्या स्वरूपातील भेद तेथे स्पष्ट केला आहे. त्यासाठी पाचव्या समासाचे अवलोकन करा. (१८) आता जे जे दृश्य दृष्टीस पडते ते ते सर्व सत्यच वाटते, अशी शंका श्रोत्याने व्यक्त करताच त्या शंकेचे उत्तर सहाव्या समासात देण्यात आले आहे. (१९) वक्त्याने अनेक प्रकारांनी वर्णन केले, ते सर्व इथे सांगता येणार नाही. त्याने आठ प्रकारच्या सृष्टीचे स्वरूप दाखवून त्यांच्या मिथ्यात्वाची प्रचिती आणून दिली. (२०) शेवटी मृत्तिका, पाषाण यांच्यात केव्हाही देवपण येऊ शकत नाही. हे दाखवून तो समास पूर्ण केला आहे. (२१) सगुण तेवढे नाशवंत असताना त्याच्या उपासनेला काय अर्थ उरला ? या आशंकेचे उत्तर सातव्या समासात दिले आहे.(२२) त्या संपूर्ण समासात हेच चांगल्या प्रकारे सांगितले आहे. सर्व सगुण नाशवंत जाणून भजनपूजनाचा मार्ग वाढवावा. असे समर्थ सांगतात. (२३) उपासना ही देहाला लावून दिली आहे. विचाराअंती 'आपण' या पदार्थाला अस्तित्व नाही. अशी त्या उपासनेची व्यवस्था सांगून हा समास संपविला आहे. (२४) सर्व मिथ्या हे मान्य केले. पण मग ते का दिसते? याचा उलगडा आठव्या समासात सांगितला आहे. (२५) मृगजळ इ. निरनिराळे पदार्थ असले तरी ते सगळे व्यर्थ होत. जरी ते दिसत असले तरी ते अविद्यारूप मायेनेच निर्माण केलेले असतात. (२६) अविद्येने अविद्या पाहिली. तरी आपले शरीर आपल्याला आपलेच कसे वाटते ? तेही देहबुद्धीनेच तसे वाटत असते. तेही मिथ्याच आहे ना? हे वाटणे ही फार मोठी चूक आहे. ही चूक, हा भ्रम याला ज्ञान कसे म्हणावे ?(२७)

**आपण । हें ज्ञानाचें लक्षण । दृश्य दिसो न दिसो संग[१८] त्यागून । मोकळें असावें ।।२८।। आतां जीवन्मुक्ताची[१९] स्थिती । वर्णिजेल नवमाचे अंतीं । परी भाग्यवंता प्रत्यय येरा[२०] अवगति[२१] । समासार्धीं[२२] कथियेलें ।।२९। प्रपंच असतचि[२३] नाहीं केला । करण्या न करण्यातीत जाला । तरी जन्म मरण कोणाला । दृश्य तरी आपण नसे ।।३०।। देही असोन देहावेगळा । करून न करी हा बोध जाला । संशयरहित जीवन्मुक्तीला[२४] । नवमीं पहा ।।३१।। आतां संगत्याग कैसा असे। अनिर्वाच्य तें समाधान कैसें । न बोलून बोलणें अपैसें[२५] । हें निरूपण असे दहावा ।।३२।। मुमुक्षुसाधकां विनवणी । दहाविषयासी अति तत्पर होउनि । प्रवर्तावें श्रवण मननीं । नातरी हानि थोर होय ।।३३।। विचारवंत आणि अनन्य । त्यासी श्रवणमात्रें होय ज्ञान । बहुत नलगे अवलोकन । कारण येक निश्चयासी[२६]।।३४।। आतां सहावियामध्यें दहावा । सावधपणें पहावा । नलगे साधनाचा गोवा[२७] विचारें अपरोक्ष[२८] ।।३५।। शुद्ध वेदान्त रीती । अनुभवातीत प्रतीति । जेथ श्रुति**

---

आपण दृश्य आणि भास यांच्या पलीकडचे आहोत. तेव्हा दृश्य दिसो अथवा न दिसो. आपण त्याबद्दलची आसक्ती सोडून मोकळे रहावे. (२८) आता नवव्या समासाच्या अखेरीस जीवन्मुक्ताची लक्षणे वर्णन केली आहेत. पण त्या अगोदर त्या समासाच्या आरंभीच्या अर्ध्या भागात भाग्यवंतांना ब्रह्मात्मैक्याचा अनुभव येतो, आणि इतरांना दुर्गती मिळते हे सांगितले आहे. (२९) प्रपंच खोटा असताना प्रापंचिकांना तो खरा वाटतो. तो त्यांचा भ्रम ज्ञानाने नाहीसा केला. ज्ञानी मनुष्य काही करण्याच्या किंवा न करण्याच्या पलीकडे गेलेला असतो. मग जन्ममरण कोणाला असते ? आत्मा (आपण) तर दृश्य नसतो. (३०) तेव्हा ज्ञानी देहधारी असूनही देहापेक्षा निराळा असतो, तो करूनही काही करत नसतो, हे ज्ञान झाले आणि मग संशयरहित होऊन जीवन्मुक्त झालेल्याच्या स्थितीचे वर्णन नवव्या समासात केले आहे. ते पहा. (३१) आता संगत्याग (आसक्तीचा त्याग) कसा असतो. अनिर्वाच्य (वर्णन करता येत नाही असे) समाधान म्हणजे काय ? काही न बोलता बोलणे कसे घडते, इ. निरूपण दहाव्या समासात केले आहे. (३२) मुमुक्षू आणि साधक यांना विनंती आहे की, त्यांनी तत्परतेने दहाव्या समासाचे श्रवण आणि मनन करण्यास तयार व्हावे, नाहीतर त्यांचे फार मोठे नुकसान होईल.(३३) विचारवंत आणि अनन्य (एकनिष्ठ) अशा साधकाला केवळ श्रवण केल्यानेच ज्ञान प्राप्त होणार आहे. त्याला अनेक ग्रंथ पाहण्याची गरज नाही. केवळ अध्यात्मश्रवणाने आत्मप्राप्तीचा एक निर्धार केलेला असला की पुरे. (३४) आता सहाव्या दशकाचा दहावा समास सावधपणाने पहा. साधनांच्या बाबतीत काहीही घोटाळा न करता केवळ विचाराच्या साहाय्याने ब्रह्मात्मैक्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यामुळे घेता येईल. (३५)

**पावल्या विश्रांति । विधिनिषेधमुखें[२९] ।।३६।। जागृति[३०] स्वप्न सुषुप्ति । तिन्ही अज्ञान-सुषुप्ति । तुर्या जे का जाणीव म्हणती । ते स्वप्नासारिखी ।।३७।। सुषुप्ति म्हणजे न जाणणें । आणि स्वप्न तें त्रिपुटीसी[३१] ब्रह्म पहाणें । जागृति ते स्वयें होणें । ध्येय-ध्यानातीत ।।३८।। ऐसी निर्विकल्प स्थिति । शुद्ध अनुभव हे प्रतीति । त्यातें ग्रासोन[३२] उरे जे रिती । तेचि तें स्वरूप ।।३९।। तेंचि तें प्रतीतीस आलें । तरी तें जागृतीकडे आलें । अनिर्वाच्य तें बोलिलें । नवचे कदा ।।४०।। या नांव संगत्याग । मीपणेंवीण निजांग । हेचि निरूपण सांग । सहाविया दहावा ।।४१।। या सहावीयाचें निरूपण । अज्ञानेंसी[३३] मावळलें ज्ञान । जाले जें का समाधान । तें मनासी अगम्य[३४] ।।४२।। विदेहमुक्त जीवन्मुक्तता। तिसरी नित्यमुक्त हे वार्ता । निमाली[३५] सिद्धसाधकता । बद्धमुमुक्षुसहित।।४३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।४४।। समास सहावा.**

---

शुद्ध वेदान्ताच्या पद्धतीनुसार अनुभवाच्याही पलीकडचा अनुभव त्याला घेता येईल. ब्रह्म असे नाही, तसे नाही अशा निषेधाच्याद्वारे अथवा असे आहे. तसे आहे अशा विधिमुखाने बोलणारे वेद त्या ब्रह्मसुखाच्या बाबतीत शांत होतात. (३६) जागृती, स्वप्न अथवा सुषुप्ती या तीन्ही अवस्थांमध्ये अज्ञानरूपी सुषुप्तीच असते. आणि तुर्यावस्थेला जाणीव म्हणतात खरे, पण तीही स्वप्नासारखीच असते. (३७) सुषुप्ती म्हणजे ब्रह्माचे अज्ञानच होय, आणि स्वप्न म्हणजे, ब्रह्म समजते पण त्यात ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान अशी त्रिपुटी असते. त्रिपुटी असेपर्यंत त्या ज्ञानाला खरे ज्ञान म्हणता येत नाही. त्रिपुटीत द्वैत शिल्लक राहिलेले असते. पण ज्ञान म्हणजे खरी जागृती, त्या जागृतीमध्ये ब्रह्म पहायचे नसते. स्वतःच ब्रह्म व्हायचे असते. त्या अवस्थेत ध्याता, ध्येय, ध्यान अशी त्रिपुटी नसते. (३८) अशी अवस्था म्हणजे पूर्ण निर्विकल्प स्थिती. अनुभव होणे म्हणजे प्रचीती येणे, त्या अनुभवाला नष्ट करून (ग्रासून) जी केवळ ब्रह्माशी एकरूप झालेली स्थिती म्हणजेच स्वरूपावस्था होय. (३९) तीच अवस्था प्राप्त होणे ही खरी जागृती होय, ती अनिर्वाच्य म्हणजे बोलून सांगता न येणारी आहे. (४०) यालाच संगत्याग असे म्हणतात. त्यात मीपणा नसतो, आपण स्वतःच ब्रह्मरूप झालेला असतो. हेच सहाव्या दशकाच्या दहाव्या समासात आलेले आहे. (४१) या सहाव्या दशकाच्या निरूपणात अज्ञानाबरोबरच ज्ञानही मावळते आणि जे समाधान प्राप्त होते ते मनालाही न कळणारे आहे. (यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह) (४२) मग त्या पूर्ण समाधानाच्या अवस्थेत विदेहमुक्ती, जीवन्मुक्ती, नित्यमुक्ती आणि बद्ध, मुमुक्षू, साधक, सिद्ध इ. सर्व प्रकार निमालेले असतात. (४३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (४४) इथे सहावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) खरोखर. (२) ब्रह्मा, विष्णु व महेश. (३) ठाईं न पडे – प्राप्त होत नाहीं, सांपडत नाहीं. (४) कृपेवांचून. (५) स्वत:चा अनुभव. (६) 'तत्त्वमसि' या महावाक्यांतील तत् + त्वम् + असि या तीन पदांपैकीं तत् व त्वम् या दोन पदांच्या अर्थांचा विचार. यांतील 'तत्' पद वाच्यार्थानें ईश्वराचें व लक्ष्यार्थानें कूटस्थाचें बोधक आहे. या दोन पदांच्या लक्ष्यार्थांमधील एकत्व 'असि' पदानें दर्शविलें आहे. या पैकी 'तत्' व 'त्वम्' या दोन पदांच्या अर्थाचा विचार श्रीहंसराज स्वामींनी पुढील दोन ओव्यांत सांगितला आहे. (७) लक्षणा – शब्दश: होणाऱ्या शब्दाच्या अर्थापलिकडचा गर्भित अर्थ बोधित होतो ती वृत्ति (शब्दाची अर्थबोधक शक्ति). हा गर्भित अर्थ कित्येकदां वाच्यार्थाहून निराळा पण तत्संबंधित असतो. हा अर्थ करण्याच्या भिन्न भिन्न पद्धतींवरून लक्षणेचे तीन प्रकार शास्त्रकारांनी मानिले आहेत. ते असे–जहल्लक्षणा, अजहल्लक्षणा व जहदजहल्लक्षणा. (जहत् ह्मणजे त्याग । अजहत् तेची अत्याग । तिसरी ते त्यागात्याग । जहदजहल्लक्षणा ।।११।। आगमसार ७–२) जहल्लक्षणा – जेथें शब्दश: किंवा वास्तविक अर्थ न घेतां केवळ लक्षणेनें अर्थ लावावयाचा असतो, तेथें जहल्लक्षणा मानितात. जसें नदीवरचा ह्मणजे नदीकांठावरचा गांव. येथें नदी म्हणजे नदीचा प्रवाह, यावर गांव असू शकत नाहीं; म्हणून येथें नदी ह्मणजे नदीचा प्रवाह या अर्थाचा त्याग करून नदीचा कांठ असा अर्थ घ्यावा लागतो. अजहल्लक्षणा – पदाचा जो शक्य अर्थ त्याचा त्याग न करतां त्याहून कांही विशेष अर्थ घ्यावा लागतो ती अजहल्लक्षणा. जसे – दोनशें भाले (– भाले धारण करणारे लोक) आले; कावळ्यांपासून (कावळा व दह्याचा नाश करणारे इतर प्राणी) यांपासून दह्याचे रक्षण कर. जहदजहल्लक्षणा – जेथें शब्दार्थाचा कांही अंश घेऊन व कांहीं टाकून देऊन अर्थ करावा लागतो ती जहदजहल्लक्षणा. उदा. तो हा देवदत्त. तो (पूर्वकाळीं, अन्यस्थळीं, अन्यवेषांत वा अन्य अवस्थेत पाहिलेला) हा (आतां जवळ व अन्य वेषादिकांत असणारा) दोहोंच्या स्थळकालादिकांत भिन्नत्व असलें तरी देवदत्त एकच. (पूर्वीच्या देवदत्ताहून आतांचा देवदत्त वेगळा नाहीं.) येथें तो व हा या सर्वनामांनीं दर्शित भिन्न भिन्न स्थलकालादि उपाधींचा त्याग करून देवदत्त या पदाच्या अर्थाचें ग्रहण केलें, उपाधि दोनी टाकणें । अधिष्ठान दोहींचें उरवणें । हीस म्हणती शास्त्रनिपुण । जहदजहल्लक्षणा । निगमसार ७–७९ देश काल वय अवस्था । ह्या त्यागाव्या समस्ता । विरोध नसे पुरुष लक्षितां । तो हा देवदत्त ।।२६।। हे त्यागात्याग लक्षणा। ओळखावी विवंचना ।।२९।। – आगमसार ७–२. (८) जहदजहल्लक्षणा 'तत्त्वमसि' (तें तूं आहेस) या छांदोग्य उपनिषदांतील महावाक्याचा विचार करतांना कशी लावितात तें ७ ते ८ या दोन ओव्यांत सांगितलें आहे. तत् (तें – सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्वेश्वर, स्वयंज्योति असें शबल चैतन्य अथवा ईश्वर), 'त्वम् (तूं – मनादि उपाधियुक्त, अल्पज्ञ, अल्पशक्ति, परिच्छिन्न, कर्माधीन, विद्यामोहित किंचिज्ज्ञ इ. असा जीवात्मा) हे उपाधिभेदानें भिन्न भासलें तरी दोघांच्या उपाधि बाजूस सारून दोहींकडे सामान्य असणारें जें शुद्ध स्वरूप असंग चैतन्य तें एकच आहे. (९) निश्चितपणें निर्णय करून सांगितली. पाठभेद – निवारिली. (१०) लवकर. (११) माया व ब्रह्म यांमध्यें असलेली भिन्नता अनेक प्रकारें सिद्ध केली. (१२) अनेक प्रकारें. (१३) दा. ६–६–५० ते ५३ मधें सांगितलेले सृष्टीचे आठ प्रकार. (१४) शेवटास गेला. (१५) योग्य संबंध. (१६) अविद्यारूप मायेनें उत्पन्न केलेले. (१७) दृश्यभासात्मक मिथ्या मायेहून निराळा. (१८) मी देह आहे, अशा कल्पनेचा म्हणजे मीपणाचा संग. (१९) आत्मज्ञानाच्या योगानें जिवंत असतांच देहाभिमानापासून मुक्त झालेला, पण व्यवहार करीत असलेला, 'सचेतन तो जीवन्मुक्त।' दा.७–६–४६. (२०) इतरांस. (२१) दुर्गति, अध:पात. (२२) अर्ध्या समासांत. (२३) असतचि – असतांनाच किंवा असत् चि–खोटाच (पण खरा वाटत होता तो ज्ञानानें) नाहींसा केला. (२४) सत्यासत्य जाणोनि ज्ञानें । जीवसृष्टीतें त्यागणे । जीवन्मुक्तीचें लक्षण । बोलिलें

असे ।।६०।। आगमसार ३-५. (२५) सहज. (२६) अध्यात्मश्रवणानें आत्मस्वरूपाचा एक दृढ निश्चय केला म्हणजे पुरे, अनेक ग्रंथ पाहण्याचें कारण नाहीं. (२७) घोंटाळा, गुंतागुंत. (२८) मी ब्रह्म हा निर्धार जाला । अपरोक्ष ज्ञान ह्मणावें त्याला ।।५८।। आगमसार ५-५. (२९) पुढील दशकाची ८ वीं ओवी पहा. (३०) अंत:करण - इंद्रियें । घेणें पडे जो जो विषय । तयासी नांव होय । जागृति ऐसीं ।।६३।। इंद्रिय - विषयेंविण । संस्कारें कल्पी मन । घडे सुखदु:ख भोगेंविण । ते स्वप्नावस्था ।।६४।। मन जेथें लया जाय । परि सुखाचा प्रत्यय होय । अज्ञान नाश न होय । ते सुषुप्ति ।।६५।। जीवदशेच्या या तिन्ही अवस्था आत्मजागृतीच्या दृष्टीनें अज्ञानात्मक सुषुप्तिच होत; तुर्याही स्वप्नासारखी आहे. (३१) द्रष्टा, दृश्य व दर्शन या त्रिपुटीचें भान राहून. (३२) शुद्ध अनुभव आला असें वाटणें संपल्या नंतर जें उरतें तेंच स्वरूप. (३३) अज्ञानासह. (३४) समजण्यास कठिण. (३५) या ओंवींत सांगितलेल्या सर्व अवस्थांचें नांवहि उरलें नाही.

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक सातवा

**।।श्रीराम समर्थ ।। श्रोतीं व्हावें सावध । आतां सातवा असे बाळबोध । दाहीहि समासींचा अनुवाद । वेगळाला परिसिजे [१]।।१।। श्रुतीचे [२] बोल गीर्वाण [३] । आणि संस्कृत व्याकरण । तेथें कायसें प्राकृत [४], पाहोन । काय होतें ।।२।। ऐसिये आशंकेचें खंडण । पहिले समासीं केले जाण । अर्थ पाहतां शब्द वोसरून [५] । दोहींचा [६] जातो ।।३।। देशभेदशब्द [७] वेगळाले । तेणें पदार्थ काय भेदावले। तैसें ब्रह्मज्ञानाचें जें जें बोलिलें । संस्कृत अथवा प्राकृत ।।४।। तेणें शब्द फोल होती । अर्थग्रहणें समान फलप्राप्ति । मायायोगें भ्रमल्या मति । अध्यात्मश्रवण कळे काय ।।५।। जे अत्यंत विचारवान भाविक। जे रहस्यामृताचे [८] ग्राहक । नेणोनियां उणें अधिक । श्रवण करिती भावार्थे ।।६।। आतां दुसरीयांत ब्रह्मज्ञान । जें स्वरूप मनबुद्धिहीण [९] । वोळखी त्याची विधि–निषेधमुखानें [१०]। तेचि आधीं अवधारा ।।७।। दिसें भासे तें तें नव्हें । 'तन्न [११] तन्न' हें निषेध मुख पाहे ।**

---

श्रोत्यांनी आता सावध असावे आता सातवा दशक हा बाल सुबोध दशक सुरू होत आहे. त्याच्या दहाही समासांचा अनुवाद वेगवेगळा सांगण्यात येईल. तो ऐकावा. (१) वेदांचे म्हणजे उपनिषदांचे बोल संस्कृत भाषेत आहेत. ती संस्कृत भाषा आणि तिचे व्याकरण ही कठीण आहेत. तेथे मराठी भाषेचा कितीसा टिकाव लागणार ? त्या मराठी भाषेतले हे निरूपण पाहून हाती काय लागणार ? (२) अशी जी शंका वाटते तिचे खंडन पहिल्या समासात केले आहे. आपण जर या ग्रंथातील अर्थ पाहिला तर संस्कृत काय आणि मराठी काय दोन्ही भाषांतील शब्द गळून पडतात. अर्थाच्या दृष्टीने दोन्हीतील भेद नाहीसा होतो. (३) देशभेदपरत्वे त्या त्या पदार्थासाठी वेगळेवेगळे शब्द भाषाभेदाने वापरले जात असले तरी त्यांमुळे पदार्थात काय फरक पडतो ? त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाच्या संदर्भात संस्कृतात आणि प्राकृतात (मराठीत) जे जे सांगितले जाते; (४) तेथील शब्दभेद व्यर्थ ठरतो. अर्थाच्या प्राप्तीच्या दृष्टीने मिळणारे फळ सारखेच असते. पण मायेच्या प्रभावाने बुद्धीत भ्रम निर्माण झाल्यावर अध्यात्मश्रवण कसे कळेल ? (५) जे अतिशय विचारी भाविक आहेत. जे गूढार्थरूप अमृताचा स्वीकार करणारे आहेत, ते मात्र या भिन्न भाषांमधील उणे अधिक न पाहता भावार्थावर लक्ष देऊन श्रवण करतात. (६) आता दुसऱ्या समासात ब्रह्मज्ञान हा विषय आहे. ब्रह्म म्हणजे स्वरूप, त्याचे ज्ञान होण्यासाठी मन, बुद्धी यांची मदत उपयोगी पडत नाही. त्याची ओळख विधिमुखाने (ते असे आहे, तसे आहे इ. सकारात्मक विधानांनी) सांगता येते, तशीच निषेधमुखानेही (ते कसे नाही, कोठे नाही) सांगता येते. ते कसे ते प्रथम लक्ष देऊन ऐका. (७)

**अस्ति-भाति [१२]– प्रियरूप आहे । यासी विधिमुख बोलिजे ।।८।। हें उभय प्रकारें नामाभिधान । बहुधा केलें निरूपण। परि तें ब्रह्म मीपण त्यागिल्यावीण । प्राप्त नव्हे सर्वथा ।।९।। मीपण ह्मणिजे काय । नाना देहबुद्धीचा निश्चय । यासी सत्संगति-निरूपण उपाय । हें निरूपण दुसरियां ।।१०।। आतां ब्रह्मस्वरूपाचे निश्चयासी । केलेंचि करावें सावकाशी । ह्मणोनी चवदा ब्रह्में तिसरीयासी । निरूपिलीं असती ।।११।। स्वरूप बोलिलें नवजाय। आणि अनुभवासीहि नये । ह्मणोनी बहुप्रकारें नाना उपाये । कळावया साधका ।।१२।। पूर्वपक्षें [१३] आघवें । नामरूप लागे बोलावें । निर्विकल्पीं कल्पितां स्वभावें । मोडे कल्पना ।।१३।। कल्पना जेथें मोडोन जाय । तेंचि सिद्धान्तस्वरूप होये। तें हातीं देतां नये । मौनेंचि समजावें ।।१४।। ब्रह्मस्वरूपाचा निर्धार । केलाचि करावा विचार । प्रतीत यावया वारंवार । चवथे समासीं निरूपिलें [१४]।।१५।। येकदेशी [१५] स्वरूप**

---

जे दिसते, जे भासते ते ब्रह्म नाही. अशा तऱ्हेने ते अमुक नव्हे, ते अमुक नव्हे असे सांगणे म्हणजे निषेधमुख होय. आणि ते अस्ति (सत्), भाति (चित्) आणि आनंद अशा लक्षणांनी युक्त आहे असे सांगणे म्हणजे विधिमुख होय.(८) अशा तऱ्हेने या दोन्ही प्रकारांनी ब्रह्माचे या समासात वर्णन केले आहे. ते खूप वैविध्यपूर्ण आहे. पण असे हे ब्रह्म मीपणाचा (अहंकाराचा) त्याग केल्यावाचून कोणत्याही प्रकारांनी प्राप्त होणार नाही. (९) तर मग मीपण म्हणजे काय ? हे सांगताना निरनिराळ्या स्वरूपातील देहबुद्धीचा (मी देहच आहे या समजुतींचा) ऊहापोह या समासात केला असून ती नाहीशी करण्यासाठी संतांचा सहवास, त्यांनी केलेला उपदेश हाच उपाय असल्याचे दुसऱ्या समासात स्पष्ट केले आहे. (१०) आता ब्रह्मरूपाचा निश्चय होण्यासाठी जे केले आहे तेच सावकाश करावे लागते. त्याची वारंवार आवृत्ती करावी लागते. म्हणजे ते मनामध्ये ठसते म्हणून या तिसऱ्या समासात चौदा ब्रह्मांचे निरूपण केले आहे. (११) स्वरूपाचे वर्णन करता येत नाही. त्याचा अनुभवही (त्रिपुटी राखून) घेता येत नाही. यास्तव साधकाला ते चांगले कळावे म्हणून वेगवेगळ्या प्रकारांनी, वेगवेगळ्या उपायांनी त्याचे निरूपण करावे लागते. (१२) ते कळण्यासाठी नामरूपांचा आश्रय करावा लागतो पण ती नामरूपे ब्रह्मज्ञानाच्या संदर्भात पूर्वपक्षच (खंडनास योग्य) ठरतात. निर्विकल्प अशा ब्रह्माचे वर्णन करण्यासाठी कल्पनेचाही आश्रय घ्यावा लागतो. पण निर्विकल्प अशा ब्रह्माच्या संदर्भात कल्पना गळूनच पडते.(१३) जेथे कल्पना मोडून पडते तेच आपल्याला अभिप्रेत असलेल्या सिद्धान्ताचे (पूर्व पक्षाचे खंडन करून साधावयाच्या ब्रह्माचे) स्वरूप होय. ते ब्रह्म कोणाच्या हातात देता येत नाही, ते मौनानेच समजून घ्यावे लागते. (१४) ब्रह्मस्वरूपाचा निश्चय पक्का होण्यासाठी केलेल्याच विचाराची पुनरावृत्ती करावी लागते. त्याची वारंवार प्रचीती येण्यासाठी चौथ्या समासात तेच निरूपण केले आहे.(१५)

**नसे । पदार्थमात्रास व्यापून असे । सर्व नासे परी ते न नासे । असतचि असे सर्वदा ।।१६।। रूप वर्ण कांहीच नाहीं । परी कोंदाटलें ठाईं ठाईं । न दिसे परी डोळां पाहीं । अंतर्बाह्य असे ।।१७।। तें पाहूं जातां न दिसे । न दिसे तेंचि तेथें असे । विवेकी हो समजा कैसें शब्देंवीण आकाश ।।१८।। प्रतीतीस[१६] आलें केवळ । जें का ब्रह्म निश्चळ । परी मनादि कल्पनेचें आभाळ। वितळेना कीं ।।१९।। उत्तम विचाराची आशंका । याचें समाधान ऐका । बोलिलें पांचविया विवेका । बरें पहा ।।२०।। कल्पनेसी कल्पावया छंद । न कल्पी तरी कल्पना व्यर्थता शब्द[१७] । तथापि तुज वाटे खेद । तरी बोलेन ऐक ।।२१।। जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या । स्वरूपीं तुर्यारूप मनोधर्मा या । ठाव नाहीं।।२२।। तरी कल्पनेचे दोन भेद । येक शुद्ध येक अबद्ध । अबद्ध[१८] ते संशय खेद । शुद्ध ते निश्चळ ब्रह्म कल्पी ।।२३।। कल्पनेनें[१९] कल्पना सरे । सरतां आपणचि उरे । येतां जातां आपण काय रे । अधिक उणा ।।२४।। गगनीं आभाळ आलें गेलें । आकाश काय त्यासवें उपजलें मेलें । अथवा निश्चळत्व बुडालें । वायुचेनि ।।२५।। पांचवा जाला**

---

ब्रह्म अथवा स्वरूप एकदेशी (एखाद्या स्थळापुरते मर्यादित) नसते, ते सर्व पदार्थांस व्यापून आहे. सर्व दृष्य विश्व नष्ट झाले तरी ते नष्ट होत नाही. ते सर्वकाळ असणारेच असते. (१६) त्याला रूप नाही, रंग नाही, तरी ते सर्व ठिकाणी दाटून राहिले आहे. ते दिसत नाही पण त्याच्या योगाने डोळ्यांनी पाहता येते. ते अंतर्बाह्य सर्वत्र असते.(१७) ते पाहू गेले तर दिसणार नाही. जे दिसत नाही तेच ते असते आणि तेथेच ते असते. विचारी श्रोत्यांनो, आकाशाच्या बाबतीत शब्द निरुपयोगी ठरतात, पण तरी ते आहेच ना ? हे समजून घ्या. (१८) यावर श्रोत्याची शंका अशी की, केवळ निश्चल ब्रह्माचा अनुभव आला तरी मनातले कल्पनेचे आभाळ (ढग) नाहीसे होत नाही, याला काय करावे ?(१९) चांगला विचार करून ही उत्तम शंका विचारलेली आहे. तिचे समाधान करण्यासाठी पाचव्या समासात चांगला विचार केला आहे. तो नीट पहा.(२०) कल्पना करणे हाच कल्पनेचा स्वभाव, कल्पिता आले नाही तर कल्पना हा शब्दच व्यर्थ होईल. तरीसुद्धा तुला वाईट वाटत असले तरी मी बोलणार आहे. तू ऐक. (२१) ब्रह्म जाणते, माया जाणते, अशा जाणत्या अवस्थेला तुर्या असे म्हणतात. परंतु या प्रकारच्या तुर्यारूप मनोधर्माला स्वरूपानुभवामध्ये जागा नाही.(२२) कल्पनेचे दोन प्रकार असतात. एक शुद्ध कल्पना. आणि दुसरी अशुद्ध कल्पना. संशय, खेद व्यक्त करणारी ती अशुद्ध कल्पना होय आणि निश्चळ ब्रह्माची जी कल्पना करते ती शुद्ध कल्पना होय. (२३) शुद्ध कल्पनेने अशुद्ध कल्पना संपते, आणि ती संपली की केवळ निश्चळ ब्रह्माची शुद्ध कल्पनाच उरते म्हणजे शुद्ध आत्मतत्त्वच शिल्लक राहते. तेव्हा ही शुद्ध कल्पना आली काय आणि गेली काय, तिच्यामुळे आत्मतत्त्वात काही अधिक उणे होत नाही. (२४) आकाशात आभाळ (मेघपटल) आले आणि गेले. पण त्याच्याबरोबर आकाश निर्माण झाले आणि नष्ट झाले असे होत नाही. त्याचे निश्चलत्व वायूमुळे बुडाले (संपले) असेही होत नाही. (२५)

**पूर्ण। आतां सहावीयाचे निरूपण। श्रोती आशंका घेतली दारुण [२०] । सोळावे वोंवी पावेतों ।।२६।। निर्विकल्प ह्मणवावें । आणि कल्पनेसवें भरंगळावें [२१] । हें मानेना स्वभावें। आमुचे चित्तीं।।२७।। आतां याचें प्रतिवचन । समासांती होईल कथन । तें अव्यग्र [२२] पाहोन । समाधान पावावें ।।२८।। निचेष्टित [२३] तेचि मुक्त । तरी ज्ञानें पावन होती हें व्यर्थ । येथें वेदादिकांचें सामर्थ्य । तें हि बुडालें ।।२९।। आधार घेतला शुकादिकांचा। ते निचेष्टित कीं [२४] बोलिले वाचा । केली भागवतींची चर्चा । म्हणून बद्धपण लावूं नये ।।३०।। स्थावर[२५] अथवा सुषुप्तींत। प्राणी होती सहज मुक्त । मग ज्ञानसाधन कासया व्यर्थ । सद्गुरु सच्छास्त्रें कासया ।।३१।। तरी ऐसें न करावें ।। सद्गुरुवचन जीवीं धरावें । सर्व असतांचि मुक्त [२६] असावें । सद्गुरुप्रसादें ।।३२।। बद्धता आणि मुक्तता । कल्पनाचि कल्पितसे द्वैता । निश्चळ ब्रह्म आपण तत्वता । तेथें ही वार्ता बोलोंचि नये ।।३३।। नित्यमुक्त जीवन्मुक्त तिसरा तो विदेहमुक्त । यांचीं रूपें केलीं समस्त । येचि समासीं।।३४।। निर्विकल्प ते विदेहमुक्त । सविकल्प ते जीवन्मुक्त।**

---

पाचवा समास संपला. आता सहाव्या समासाचे निरूपण करावयाचे आहे. तेथे पहिल्या सोळा ओव्यांमध्ये श्रोत्यांनी एक कठीण अशी शंका घेतली आहे.(२६) श्रोते म्हणतात तुम्ही ब्रह्माला निर्विकल्प म्हणता आणि ध्यानामध्ये शुद्ध कल्पनेबरोबर घरंगळण्यास हरकत नाही असे म्हणता. कशीही असली तरी ती कल्पनाच ना ! तेव्हा ही सूचना आमच्या मनाला पटत नाही.(२७) आता या शंकेचे उत्तर समासाच्या शेवटी देण्यात येईल. ते एकाग्र चित्ताने ऐकल्यानंतर श्रोत्यांचे समाधान होईल. (२८) जे चलनवलनादी व्यापाररहित आहेत तेच मुक्त असे म्हटल्याने ज्ञानाने मनुष्ये पावन होतात, (मुक्त होतात) हे वचन व्यर्थ ठरते. या पक्षी वेद, उपनिषदे इ. चे सामर्थ्यही बुडाल्यासारखे (नष्ट झाल्यासारखे) होते. (२९) श्रोत्यांनी आपले म्हणणे मांडताना शुकादिकांचाही आधार घेतला आहे. पण ते निचेष्टित होते की वाणीने बोलत होते ? त्यांनी तर भागवताची चर्चा केली ! या कारणास्तव त्यांना बद्धपणा चिकटवू नये. (३०) निश्चल राहिल्याने (स्थावर) अथवा झोपण्याने प्राणी जर सहजपणे मुक्त होत असतील तर मग ज्ञानसाधना व्यर्थ का करावी ? सद्गुरू अथवा सच्छास्त्रे यांची तरी आवश्यकता काय ? (३१) तरी असे करू नये. सद्गुरुवचनांवर विश्वास ठेवावा आणि ते अंतःकरणात जपून ठेवावे. सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाने सर्व यथास्थित असतानाच मुक्त व्हावे.(३२) बद्धता अथवा मुक्तता या द्वैताची कल्पना कल्पनेनेच केलेली असते. निश्चल ब्रह्म स्वरूपाने या द्वैतापासून अलिप्त असते. तेथे या द्वैताची गोष्टच काढू नये. (३३) याच समासामध्ये नित्यमुक्त, जीवन्मुक्त आणि तिसरा जो विदेहमुक्त यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. (३४)

**सहजस्थिति ते नित्यमुक्त। परि हा देहसंबंध [२७] ।।३५।। स्वरूपीं पाहता काय असे । अनुभवी हो समजाना कैसे । मुका [२८] बोलका आंधळा पाहतसे । हें सत्य कीं मिथ्या।।३६।। आतां सातवा समास । संशयछेदक सुरस । निरोपिला अति सारांश । जे परिसतां नि:संदेह ।।३७।। ब्रह्म अनुभवितां द्वैत उपजे। सांडी करितां कांहीच नुमजे । कैसें करावें जी उमजे । ऐसें सांगा ।।३८।। बहुत आशंका उभी केली । त्यांतील सारांश सांगितली । याचे समाधानाची किल्ली । सावध ऐका ।।३९।। ब्रह्म तरी कल्पावें । परी कल्पितें आपण न व्हावें । तेथें कल्पनेच्या नावें। शून्याकार ।।४०।। कल्पना कल्पी ध्येय ध्यान । ते त्रिपुटी नव्हे आपण । या तिहींसी जो अधिष्ठान । हा व्यतिरेकपक्ष [२९] ।।४१।। आठवितां त्रिपुटी दिसे । अधिष्ठानीं अनुभव होतसे । तें सर्व ऐक्यरूप भासे । हा पक्ष अन्वयाचा[२९]।।४२।। ऐसें साधन करीत असतां। साध्यरूप आपण तत्वतां । येविषयीं**

---

जे निर्विकल्प झाले आहेत ते विदेहमुक्त होत. जे सविकल्प अवस्थेत असतात, ते जीवन्मुक्त होत आणि जे सहजस्थितीत असतात ते नित्यमुक्त होत. पण ही सर्व विशेषणे मुक्तांना लावली जातात, ती सर्व त्यांच्या देहावस्थेच्या अनुषंगाने लावली जातात. त्यांची मुक्तस्थिती लक्षात घेता त्यांना कोणतेच विशेषण लावता येत नाही. (३५) स्वरूपाच्या दृष्टीने पाहता तिथे त्यापैकी काय असते ? आपण श्रोते अनुभवी आहांत तेव्हा हे समजून घ्या ना ! मुका बोलतो, आंधळा पाहातो, ही विधाने सत्य की मिथ्या ? स्वरूपाच्या दृष्टीने त्या विधानांतील कर्ता आणि क्रिया ही दोन्हीही मिथ्याच होत.(३६) आता सातवा समास पाहू. तो संशयाचा परिहार करणारा असून अतिशय सुंदर आहे. त्याचे विवेचन येथे संक्षेपपूर्वक सारांशाने केले आहे. तो श्रवण केल्याने श्रोते नि:सन्देह (संदेहमुक्त) होतील. (३७) तेव्हा श्रोते विचारतात, ब्रह्माचा अनुभव घ्यायला गेलो की द्वैत निर्माण होते. (कारण अनुभव घेणे म्हणजे त्रिपुटी असणे) त्या अनुभवाचा त्याग करायला गेलो की काहीच समजत नाही. तेव्हा काय करावे ? आम्हांला समजेल अशा प्रकारे सांगा. (३८) श्रोत्यांनी आपली शंका खूप विस्ताराने सांगितलेली आहे. इथे ती सारांशाने सांगितली आहे. आता या शंकेच्या समाधानाचा मार्ग सांगतो, तो सावध होऊन ऐका. (३९) ब्रह्माची कल्पना करावीच लागते. पण ती करण्याची हातोटी अशी, की ती कल्पना करत असताना ती आपण करत आहोत अशी भूमिका घेऊ नये. तेव्हा ती कल्पना शून्यवत् होते. (४०) कल्पना ध्याता ध्येय, ध्यान असे ध्यानाचे तीन घटक निर्माण करते पण ती त्रिपुटी आपण म्हणजे आत्मतत्त्व) नव्हे. या तीन्ही घटकांचे जे अधिष्ठान तेच आत्मतत्त्व होय. हा निषेधरूप व्यतिरेक पक्ष होय. (४१) आत्मतत्त्वाचे स्मरण करताच प्रथम वरील प्रकारची त्रिपुटी दिसते. परंतु आपण तिच्या अधिष्ठानावर लक्ष केंद्रित केले असता तिथे सर्व ऐक्यरूप दिसते हा सकारात्मक अन्वयपक्ष होय. (४२)

**संशयाची वार्ता । साधका न हो ।।४३।। जालें समाधान केवळ । गेली अवघी तळमळ। आतां उरला जो ऊर्वरित[३०] काळ । तो क्रमावा [३१] कैसा ।।४४।। परमार्थाचें साधन । ज्ञान पावून कीजे श्रवण । ये विषयीचें निरूपण । आठवे समासीं।।४५।। नववीयांत श्रवण मनन । अद्वैतग्रंथाचें निरूपण । त्या वेगळें संशयकथन । उपेगा नये सर्वथा ।।४६।। एवं जाले समास नव । आतां दाहावा अति अपूर्व । अवधारा आशंकेचा भाव । मग समाधान होईल ।।४७।। ज्ञानियाचा देह चांगला। उत्तम काळीं पावे अवसानाला [३२] । दिवा [३३] उत्तरायणीं स्मरण करीत गेला । तरिच मुक्त ।।४८।। या उत्तराचें निरूपण । बहुधा समासीं असे जाण । इतुकें न लगे ज्ञानियालागुन । तो मरणापूर्वींच मेला ।।४९।। जैसी पुरुषाची साउली । उकरडां कीं पालखीं पडली । तैसी स्थिति ज्ञानिया जाली । बुद्धि विसरली देहासी ।।५०।। आतां कल्पपर्यंत राहो । अथवा आजचि जावो । कीं वृक [३४] – व्याघ्र–सिंव्हाचें होवो। उदरभरण।।५१।। अथवा कासावीस जाला । की मूर्च्छा येऊन पडिला । किंवा हासेला [३५] ना कीं रडला । तरी तो मुक्त।।५२।। मुक्तता अथवा बद्धता।**

---

अशा तऱ्हेने साधन करत असता साध्य जे आपणच (म्हणजे आत्मतत्त्वच) आहोत याविषयी साधकाच्या मनात संशयाला थारा मिळता कामा नये. (४३) अशा रीतीने पूर्ण समाधान प्राप्त झाले, सर्व तळमळ नाहीशी झाली. आता उरलेला जो काळ आहे तो कसा घालवावा ? (४४) परमार्थाचे साधन म्हणून जे अंगीकारले होते ते श्रवणभक्तीचे साधन ज्ञान प्राप्त झाल्यानंतरही करावे ह्या संबंधीचे निरूपण आठव्या समासात केले आहे.(४५) नवव्या समासात श्रवण, मनन, अद्वैतग्रंथांचे निरूपण या साधनांची चर्चा केली आहे. ही साधने न पहाता आपल्याला आलेले संशय मांडत बसणे उपयोगाचे नाही. (४६) अशा प्रकारे नऊ समास झाले, त्यानंतरचा दहावा समास अत्यंत अपूर्व असा आहे. त्यात उपस्थित केलेली आशंका प्रथम समजून घ्या. तिचे समाधान नंतर होईलच. (४७) ज्ञान्याचा देह चांगला असून तो उत्तम अशा काळातच मृत्यू पावतो; तो उत्तरायणात दिवसाच्या वेळी परमेश्वराचे स्मरण करत गेला तरच मुक्त होतो.(४८) याच समजुतीचे विवेचन या दहाव्या समासात मोठ्या प्रमाणात झाले आहे. ज्ञानी माणसाला या स्थळकाळाविषयींच्या अटींची गरज नाही. कारण तो मरणापूर्वीच मरण पावलेला असतो (म्हणजे जगाच्या व्यवहारातून मोकळा झालेला असतो.)(४९) ज्याप्रमाणे पुरुषाची सावली उकिरड्यावर पडली, वा पालखीत पडली तरी त्याच्यावर काही परिणाम होत नाही, त्याप्रमाणे ज्ञानी माणसाची स्थिती होते. कारण तो देहात्मबुद्धी (आपण म्हणजे देह आहोत अशी भावनाच) विसरलेला असतो. (५०) त्यामुळे तो कल्पान्तापर्यंत जिवंत राहो किंवा आजच निधन पावो; किंवा लांडगे, वाघ सिंह यांचे भक्ष्य होऊन त्यांच्या पोटात जावो; (५१) किंवा कासावीस झाला, मूर्च्छित होऊन पडला, हसला किंवा रडला या कोणत्याही अवस्थेत तो मुक्तच असतो. (५२)

**जरी खंती असावी चित्ता । तरी देहाची व्यवस्था । पाहेल तो ।।५३।। जाला पूर्ण दशक। नि:संदेह ज्ञानाचा अर्क । श्रवणमननीं जो प्रवर्तक । त्यासी हे प्राप्ति ।।५४।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।५५।। दशक सप्तम समाप्त ।।**

---

मुक्त दशा अथवा बद्ध दशा यांची त्यांच्या मनात काही खंत वाटत असेल तरच तो त्या देहाच्या अवस्थेची काळजी करील ना ? तशी कसलीच खंत वा खेद त्याला वाटत नसल्याने आपला देह तीर्थक्षेत्रात पडतो की मुहूर्तावर मरतो याची काळजी त्याला नसते. (५३) असा हा सातवा दशक पूर्ण झाला. त्यात नि:संशय (संशय-रहित) ज्ञानाचा अर्क भरलेला आहे. त्याच्या श्रवणमननाकडे ज्याची प्रवृत्ती होईल त्याला ते ज्ञान प्राप्त होईल. (५४) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (५५) इथे सातवा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) ऐकावा. (२) वेदाचे ह्मणजे उपनिषदांचे. (३) संस्कृत. (४) संस्कृतोत्पन्न अशा मराठी वगैरे भाषा. (५) नाहींसा होऊन. (६) संस्कृत व प्राकृत यांचा. (७) देशभेदानुरूप वेगवेगळीं होणारीं एकाच पदार्थांचीं नांवें. (८) गूढार्थरूप अमृताचा स्वीकार करणारे. (९) मन व बुद्धी यांच्या पलिकडचें. (१०) अणु नव्हे म्हणोनी गुरु। पार नव्हे म्हणोनी अपारू । विकार नव्हे निर्विकारू । हें निषेधमुख ।।१४।। सद्रूप आणि ज्ञानघन । आनंद अनंत पूर्ण । विधिमुखें श्रुतीचें वचन । अवधिशेष ।।१५।। आगमसार १-१. (११) तें नव्हे. (१२) मागील द.५-३१ पृ.४२ पहा. (१३) नामरूपात्मक जगत् सत्य आहे अशा विचाराची मांडणी करणें. (१४) **पाठभेद**- बोलिलें. (१५) मर्यादित, एकांगी. (१६) निश्चळ ब्रह्माच्या अनुभवानंतर मनांतलें कल्पनेचें अभ्र कां नाहीसें होत नाहीं - ही आशंका आहे. (१७) कल्पना करणें हाच कल्पनेचा स्वभाव; कल्पना न येईल तर 'कल्पना' शब्दच व्यर्थ. (१८) संशय, खेद करणारी ती अशुद्ध कल्पना आणि निश्चळ ब्रह्म कल्पिणारी ती शुद्ध कल्पना. (१९) निश्चळ ब्रह्माच्या कल्पनेनें अशुद्ध कल्पना संपते आणि ती गेली की, आपणच राहतो. तो जो शुद्ध 'आपण', तो कल्पना आली गेली तरी - उणा अधिक होत नाहीं. (२०) कठिण (२१) घोंटाळावें, गोंधळून जावें. (२२) शांतपणें, तत्परतेनें. (२३) चलनवलनादि व्यापार रहित. (२४) किंवा; हा चरण प्रश्नार्थक आहे. (२५) निश्चल राहण्यानें किंवा झोपण्यानें प्राणी मुक्त होतात असें मानिलें तर ज्ञानादि - साधनें कशाला ?. (२६) पाठभेद - 'चि मुक्त' बद्दल वियुक्त. (२७) निर्विकल्प, सविकल्प किंवा सहज हे विशषण मुक्तास लावितात तें देहावस्थेच्या दृष्टीनें लावतात. मुक्तस्थिति लक्षांत घेतां कोणतेंच विशेषण लावतां येत नाहीं. (२८) मुका बोलतो, आंधळा पाहतो हें खरें कीं खोटे ?. (२९) कार्यामाजीं अनुवृत्ती (व्याप्ति) । कारणाची त्या अन्वय ह्मणती । कारणीं कार्याची व्यावृत्ती (वेगळेंपणें) । हा व्यतिरेक ।। आगमसार १-१-४८. अन्वय:- यत्सत्वे यत्सत्वम् । व्यतिरेक: - यदभावे यदभाव: - सर्वलक्षणसंग्रह: ।. (३०) उरलेला. (३१) कंठावा, घालवावा. (३२) मृत्यूला. (३३) दिवसा. (३४) लांडगा. (३५) **पाठभेद** - हासेना कीं चिरडला (पांगरी); हासेना कीं रडला (शाहूनगर)

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## दशक आठवा

**।।श्रीराम ।। सादर मुमुक्षु साधक । जे सूक्ष्म विचारग्राहक । अतिगहन [१] ज्ञानदशक। तो हा परिसा आठवा ।।१।। सर्वांसी वाटे देव पहावा । नाना तीर्थीं धांडोळावा । ना तरी लोकांतरींचिया[२] देवा । व्रततपदानें पाविजे ।।२।। ऐसे मतिमंद जन । मुमुक्षें त्यागावें अवलक्षण । ठाईं पाडावें देवपण । तरी पहिला समास अवधारा ।।३।। तीर्थ व्रतें करितां। आयुष्य पुरेना सर्वथा । कांहीं पुण्य जोडलें म्हणतां । परि तें दिसेना ।।४।। नाना मूर्ति लोक पूजिती । देव ह्मणती परी ते माती । असो सर्व निर्माण केली जगती [३] । तो कोण आहे विचारा ।।५।। पंचभूतें कैसीं जाली । सर्व व्यवस्था लाविली । ह्मणावें सगुणें केली। तरी त्यासी कर्ता कोण ।।६।। कर्ता तो देव खरा । परी तो सगुण कीं निर्गुण विचारा । द्वितीय समासीं याचिया उत्तरा । बोलिजेल ।।७।। देवापासून सर्व जालें । तरी तें कर्तृत्व कोठें आलें । सगुणीं म्हणावें केलें । तरी तें [४] केल्यांत सर्व ।।८।। निर्गुणीं**

---

सूक्ष्म विचार ग्रहण करू शकणाऱ्या मुमुक्षू व साधकांनी अतिशय सखोल अशा या आठव्या दशकाचे श्रवण करावे. (१) देव पहाण्याची इच्छा सर्वांनाच असते. त्याचा निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांमध्ये शोध घ्यावा किंवा या लोकात तो प्राप्त होण्यासारखा नसेल तर परलोकातील देवाची व्रते, तपे यांच्या साहाय्याने प्राप्ती करून घ्यावी, असे त्यांना वाटत असते. (२) असा विचार करणाऱ्या मतिमंद लोकांचा मुमुक्षूंनी त्याग करावा. देवपण जर प्राप्त करून घ्यायचे असेल तर त्यांनी पहिला समास लक्षपूर्वक पहावा. (३) तीर्थे, व्रते करिता करिता आयुष्य खरोखर पुरत नाही. त्यातून काही पुण्य जोडले असे म्हणावे तर मग ते दिसत कसे नाही ? (४) लोक निरनिराळ्या मूर्तींची पूजा करतात. त्या मूर्तींना ते देव म्हणत असले तरी अखेर ती मातीच असते. तेव्हा ही सर्व पृथ्वी ज्याने निर्माण केली तो कोण आहे, याचा विचार करा.(५) पंचभूते कशी निर्माण झाली ? त्यांची व्यवस्था कोणी लाविली ? सगुण ईश्वराने हे सर्व केले, असे म्हटले तरी त्या सगुणाचा कर्ता कोण? (६) कर्ता तो देवच आहे. पण तो निर्गुण परमेश्वर की सगुण हे विचारले पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर दुसऱ्या समासात सांगितले जाईल. (७) देवापासून सर्व झाले, हे मान्य केले तरी त्याच्या कर्तृत्वाचे श्रेय कोणाला जाते ? सगुणाने हे सर्व केले असे म्हणावे तर तो सगुणसुद्धा उत्पन्न झालेल्या जगातच जमा होतो ना ? (मग त्या सगुणाने हे जग केले असे कसे म्हणता येईल ?)(८)

**म्हणावें केलें । तरी तें [४] सगुणत्वांत आलें । आतां मायेनें विरचिलें । तरी स्वतंत्र जाली।।९।। ऐसी आशंका उद्भवली । प्रसंगें मायेची अनिर्वचनीयता दाविली । येथे कलहवृत्ति [६] उठिली । ते अवधारा ।।१०।। येक म्हणती जालीच नाहीं । दुसरा म्हणे दिसे पाहीं । ऐसें बोलती सर्वहि । परी आशंका राहिली ।।११।। कर्ता ठाईंचा अरूप । केलें तेंहि मिथ्यारूप । तथापि फेडूं आक्षेप । तृतीय समासीं ।।१२।। श्रुति-युक्ति-अनुभव। त्रिप्रकारें बोलिजे सर्व । या निरूपणाचा अभिभाव । बोलिजे तृतीयीं ।।१३।। आरंभ [७] - परिणाम- विवर्तवाद । त्यांत दोन्ही टाकुनी तिजा [८] अनुवाद । विवर्तवादाचे दृष्टान्त विशद । बहु प्रकारें केलें ।।१४।। रज्जुसर्पादि [९] बहुत । परि अर्थ सुचविला यांत । न विकारतां स्वरूप संत । आणि भास तरी जाला ।।१५।। परि हा कोणें केला । येथें ग्रहण असे सांख्य [१०] मताला । सर्वज्ञ सर्वशक्तिमान तयाला । करणें काय अशक्य ।।१६।। सर्वज्ञ सर्व शक्तिमान ते माया । प्रकृतिपुरुष म्हणती तया । परी तें न [११] मनें साधकराया। चमत्कारून बोलत ।।१७।। जी जी कर्तेपण आलें मायेसी । परि हे माया नासेल कैसी ।**

---

निर्गुण परमेश्वराने हे सर्व केले म्हणावे तर त्याच्या कर्तृत्वामुळे त्याला कर्तृत्वाचे गुण चिकटतात. म्हणजे तोही सगुण ठरतो. मग मायेनेच हे सर्व निर्माण केले असे म्हणावे, तर ती परमेश्वरनिरपेक्ष आणि स्वतंत्र ठरेल. (९) अशी शंका उत्पन्न होते. त्या ओघात मायेची अनिर्वचनीयता स्पष्ट केली. तेव्हा यावर वादविवादाचा प्रसंग निर्माण झाला तो ऐका. (१०) एक आक्षेपक म्हणतो की, माया झालीच नाही. दुसरा म्हणतो की, ती दृश्य आहे. अशा प्रकारे सगळेच बोलू लागले. पण शंका तशीच राहिली.(११) कर्ता हा मुळात रूपहीन आहे. जे त्याने केले असे आपण म्हणतो तेही त्याचे करणे मिथ्यारूपच आहे. तथापि ह्याही आक्षेपाचे निरसन तिसऱ्या समासात करू. (१२) श्रुती, युक्ती आणि अनुभव या तीन्ही प्रमाणांच्या साहाय्याने या तिसऱ्या समासात निरूपण केले जाईल. (१३) आरंभवाद, परिणामवाद आणि विवर्तवाद यांच्या साहाय्याने सृष्टीच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण केले जाते. त्यातील अद्वैत मताच्या दृष्टीने पहिल्या दोन वादांचा त्याग करून तिसरा जो विवर्तवाद त्याचा स्वीकार केलेला असतो. या समासात विवर्ताचे अनेक दृष्टान्त सांगितले आहेत. (१४) रज्जूच्या जागी सर्प दिसणे हे त्यातील नेहमी दिले जाणारे उदाहरण आहे. असे अनेक दृष्टान्त आहेत पण त्या सर्वांचे तात्पर्य हे की, नित्य सदोदित असणाऱ्या (सत्) स्वरूपात काहीही विकार होत नाहीत तथापि त्याच्या जागी वेगळाच भास होतो.(१५) पण हा भास कोणी केला ? याचे उत्तर देतांना सांख्य मताचा स्वीकार करावा लागतो (पहा दासबोध ८.३.१२-१४) सर्वज्ञ सर्वशक्तिमान जो असतो त्याला काय करणे अशक्य आहे ? (१६) येथे माया ही अशी सर्वज्ञ सर्वशक्तिमान आहे. तिलाच प्रकृतिपुरुष असे म्हटले आहे. पण हे मत साधकाला पसंत पडत नाही. सद्गुरूंचे मायेबद्दलचे विधान ऐकताच तो आश्चर्यचकित होऊन म्हणतो. (१७)

**आम्हां भक्तां सोडवावयासी । कोणी नाहीं।।१८।। याचें उत्तर जें अबोलणें । तेंचि आतां आलें देणे । अरे स्वरूपाचीं नामाभिधानें । ते ते माया ।।१९।। मायेनेंचि माया निवारे [१२]। हे आत्मारामाचीं [१३] उत्तरें । कल्पनेनें कल्पना सरे । हें उघड असे ।।२०।। येथें भीड जरि धरावी । तरी उगवेना [१४] हे गथागोवी [१५] । नामरूप हे माया देवी । यांत वांकडें काय।।२१।। मुळीं आकाश निश्चळ । तेथें वायो जाला चंचळ । परि निश्चळत्व गेलें सकळ । हें तों घडेना [१६] ।।२२।। तैसी मूळमाया जाली । आणि निर्गुणता संचली । भूतें गुणांची वळली। ते हे माया।।२३।। एवं तिसरा जाला पूर्ण । जो मायोद्भवासी कारण । मागील आशंकेचें समाधान । येथें जालें ।।२४।। चवथे समासीं निरूपण । गुणमाया जाली मूळमायेपासून। गुण भूतें मेळवून । अष्टधा बोलिली ।।२५।। मुळी सूक्ष्म होतें । स्पष्ट गुणापासून जालीं भूतें । पुढें एक भूतांत पांच भूतें । कर्दमरूप [१७] निवेदिलीं ।।२६।। ऐसें रचिलें ब्रम्हांड सकळ । यासी अध्यारोप [१८] म्हणती समुळ । हें मूळमायेचें थोतांड केवळ । त्या मायेस वोळखावें ।।२७।। माया जेथें विराली । तेचि स्वरूपाची स्थिति संचली । म्हणोनि**

---

महाराज, मायेकडे कर्तेपण आले खरे, पण ती नष्ट कशी होणार ? आम्हां भक्तांना सोडविण्यासाठी कोणीच वाली नाही काय ? (१८) या प्रश्नाचे उत्तर न बोलणे (मौन) हेच आहे. तेच आता येथे देणे योग्य ठरेल. अरे, स्वरूप जे ब्रह्म त्याची जी निरनिराळी नावे आहेत तीच माया होत. माया म्हणजे काही नवीन पदार्थ नाही. (१९) समर्थांच्या आत्माराम या ग्रंथात 'मायेनेच मायेचे निवारण (आत्माराम ३.२७) होते. असे सांगितले आहे. कल्पनेनेच कल्पनेचा नाश होतो, हे तर स्पष्टच आहे.(२०) येथे भीड धरून जर गप्प बसलो तर ही गुंतागुंत उलगडणार नाही. म्हणून बोललेच पाहिजे. नामरूपालाच मायादेवी असे म्हटले तर त्यात वावगे काय आहे ? (२१) मुळात आकाश हे निश्चल आहे त्या आकाशात चंचल वायू (वारा) निर्माण होतो. त्या योगाने आकाशाचे निश्चलत्व नाहीसे झाले, असे काही होत नाही.(२२) त्या प्रमाणे स्वरूपाच्या ठिकाणी मूळमाया उद्भवली. त्यामुळे स्वरूपाची निर्गुणता नष्ट होत नाही. ती स्वरूपाच्या ठिकाणी आहे, तशीच आहे. पण मायेपासून निर्माण झालेली भूते (पंच महाभूते) मात्र गुणांचीच झाली आहेत. भूते म्हणजे मायाच होत. (२३) येथे तिसरा समास पूर्ण झाला. त्यात मायेच्या उत्पत्तीचे कारण सांगून श्रोत्यांच्या मागील आशंकेचे निराकरण केले आहे. (२४) चवथ्या समासात, गुणमाया ही मूळमायेपासून निर्माण झाली, गुण आणि भूते मिळून तो आठ प्रकारची झाली. म्हणून तिला अष्टधा असे म्हटले आहे.(२५) मुळात हे सर्व सूक्ष्म होते. स्पष्ट गुणांपासून नंतर भूते निर्माण झाली. त्यानंतर प्रत्येक भूतात पाची भूतांचे अंश एकत्रित होऊन त्यांपासून भूतकर्दम निर्माण झाला. त्याचे निवेदन या समासात केले आहे.(२६) असे सर्व ब्रह्मांड निर्माण झाले. स्वरूपाच्या ठिकाणी झालेल्या मूळमायेसह ब्रह्मांडाच्या निर्मितीस अध्यारोप अथवा अध्यास असे म्हटले आहे. हे सर्व त्या मूळमायेचे थोतांड (मायाजाल) आहे. त्या मायेची ओळख करून घ्यावी.(२७)

**महाद्वाररूपें [19] वर्णिली । ग्रंथांतरी [20] ।।२८।। समास पाहतां पांचवा । येथें पांच भूतांचा विस्तार जाणावा । वेगळालीं रूपें अनुभवा । जड चंचळ पैं आलीं।।२९।। पुढें आकाश आणि स्वरूप । दोन्ही दिसती एकरूप। भेद दाखवून आक्षेप । श्रोतयांचा फेडिला।।३०।। वेगळेंपणें पहावें। तयासी आकाश ह्मणावें । अभिन्न होतां स्वभावें । आकाश ब्रह्म।।३१।। सहावियांत प्रश्न हाचि । सत्संगें वेळ किती मोक्षाची। प्रसंगें दुश्चित श्रोतयांची । निंदा आळसाची पैं केली ।।३२।। प्रज्ञा–भावार्थी शिरोमणि । त्यासी मोक्ष तत्क्षणीं । या निरुपणाचा विचक्षणीं । विस्तार सहावियां पहावा ।।३३।। आतां सातवा अपवाद [21] बोले। परी आधीं बद्धत्व बोलिलें । कल्पनेंने बांधून घेतलें । ह्मणे पुण्य पाप केलें भोगीन।।३४।। ऐसें कल्पनेचें बंधन। संतसंगें तुटे जाण । ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल।।३५।। 'तत्वमसि' महावाक्याचा । शबल [22] त्याग उभयतांचा । चारी [23] चारी**

---

ही माया विरली की स्वरूपच सर्वत्र भरून राहिलेले आहे. हे लक्षात येते. म्हणून दासबोधात तिचे वर्णन महाद्वाराच्या रूपकाने केले आहे. महाद्वारात पोचले की तेथून देवदर्शन होते. त्याप्रमाणे माया विरली की स्वरूपस्थितीचे ज्ञान होते.(२८) पाचव्या समासात पाच भूतांचा विस्तार आढळतो. त्यात पंच महाभूतांच्या वेगवेगळ्या जड, चंचळ रूपांची ओळख पटते. (२९) त्यानंतर आकाश आणि स्वरूप (ब्रह्म) या दोहोंची लक्षणे एकरूपच आहेत, त्यामुळे दोहोंमध्ये काय फरक आहे, असा प्रश्न श्रोत्याने उपस्थित केला. तेव्हा वक्त्याने त्यांच्यातील भेद स्पष्ट करून श्रोत्याच्या आक्षेपाचे निरसन केले. (३०) ज्याच्याकडे वेगळेपणाने पाहता येते, त्याला आकाश म्हणावे आणि जे आपल्या स्वभावधर्मानुसार अभिन्न वाटते ते ब्रह्म होय. आकाश अभिन्न वाटेल तर ते ब्रह्मच असेल. (३१) सहाव्या समासात श्रोत्याने प्रश्न केला आहे की, संतांचा सहवास झाल्यानंतर किती काळानंतर मोक्ष प्राप्त होतो ? त्या अनुषंगाने प्रथम दुर्लक्ष करणाऱ्या श्रोत्याची आणि आळसाची निंदा केली आहे. (३२) जे प्रज्ञावान आहेत आणि ज्यांची मुख्य आशय समजून घेण्याची इच्छा आहे, अशा श्रोत्यांमध्ये जो श्रेष्ठ असेल त्यास श्रवण झाल्याबरोबर त्याच क्षणी मोक्ष प्राप्त होतो असे जे निरूपण केले आहे. त्याचा विस्तार या सहाव्या समासात पहावा. (३३) सातव्या समासात बाधक आणि विरुद्ध गोष्टी सांगितल्या आहेत. प्रथम बद्धत्वाचे निरूपण केले आहे. आपल्या मनाच्याच कल्पनेने मनुष्य स्वत:ला बांधून घेतो आणि म्हणतो की, मी या जन्मी जे पाप अथवा पुण्य केले असेल ते पुढच्या जन्मात भोगीन. (३४) असे कल्पनेने लादून घेतलेले बंधन संतसहवासाने तुटते. त्याचे लक्षण पुढे सांगितले जाईल. (३५)

**एकेकाचा। पंचभूतांचा विस्तार ।।३६।। जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । उत्पत्ति स्थिति लया। चवथी सर्वसाक्षिणी ययां । स्वानुभवें निरसावें।।३७।। वाच्यांश [२४] निरसून गेला । पुढें शुद्धांश जो उरला। ऐक्य करणें उभयताला [२५] । घटमठभंगें आकाश जेवी ।।३८।। आकाश चारी आत्मे चारी । उपाधिभेदें उंचनीच परी । एकचि असती शोधा अंतरीं । सूक्ष्म विचारें ।।३९।। ऐसें शुद्ध तेंचि आपण। हाचि मोक्ष हेंचि ज्ञान । संतसंगें पावन । येणें रीती जालें ।।४०।। आतां आठवियांत [२६] आठवा । सावधपणें अंतरीं सांठवा । केला निश्चय आठवा [२७] । संशयरहित ।।४१।। परमात्मा ब्रह्म आपण । ऐसें जालें निरुपण । तयाचें दृढीकरण । या समासीं ।।४२।। देव भक्त एक जाले । हें भक्तीचें रूप केलें । अभिन्नपण होऊनि गेलें। तें मागुतें निवडेना ।।४३।। वेद जयाचे बंदीजन [२८] । देहबुद्धि**

---

'तत्त्वमसि' या महावाक्यात तत् हे पद ब्रह्मवाचक आहे 'त्वम्' हे पद जीववाचक आहे. या दोन्हीच्या लक्षणांत जे शबल अंश शिरलेले आहेत, त्यांचा त्याग करावा लागतो. त्यांचा त्याग केल्यानंतर ही दोन्ही पदे एकरूपच आहेत. तसेच हे शरीर पंच भूतांचे बनलेले आहे. पिंडाचे चार देह आहेत, तसेच ब्रह्मांडाचेही चार देह आहेत. पिंडाच्या प्रत्येक देहाच्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या या चार अवस्था आहेत, चार अभिमानी जीव आहेत, त्या प्रत्येकाचे स्थान, भोग, मात्रा, आणि गुण यांनुसार भेद होतात. पिंडाच्या प्रत्येक देहाचे आठ प्रकार होतात. तितकेच ब्रह्मांडाच्या देहाचेही होतात. हे सर्व भेद हे पंचभूतांचेच विस्तार होत. (३६) जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या या पिंडाच्या अवस्था; उत्पत्ती, स्थिती, लय, आणि सर्वसाक्षिणी या ब्रह्मांडाच्या अवस्था यांचा स्वत:च्या अनुभवाने निरास करावा. (३७) 'तत्त्वमसि'या वाक्यातील 'तत्' आणि 'त्वम्' या पदांच्या वाच्यांशांचा निरास झाला. पुढे दोन्हीमध्ये जो शुद्धांश (लक्ष्यांश) उरला, त्यांमध्ये घटभंगाने आणि मठभंगाने दोहोतील आकाशांचे ऐक्य होते, तसे ऐक्य करावे.(३८) ब्रह्मांडाचे (आकाशाचे) चार देह आणि पिंडाचे (आत्मा) चार देह यांच्यामध्ये उपाधी भिन्न असल्यामुळे उच्च नीच असे भेद होतात. पण ते सर्व एकच आहेत. हे आपल्या अंत:करणात सूक्ष्म विचाराच्या साहाय्याने शोधून पाहावे.(३९) अशा प्रकारे जे शुद्ध (शुद्धांश) तेच आपण आहोत, हा अनुभव हाच मोक्ष, हेच ज्ञान होय. संतांच्या सहवासाने अशा प्रकारे पावन होता येते. (४०) आता आठव्या दशकाच्या आठव्या समासातील निरूपण सावध होऊन मनात साठवा. त्यातील निश्चित केलेल्या मार्गदर्शनाचे, संशयरहित होऊन स्मरण ठेवा.(४१) आपण स्वत:च परमात्मा म्हणजेच ब्रह्म आहोत, यासंबंधीचे निरूपण झाले. या समासात ते निरूपण दृढ करण्यात आले आहे. (४२) देव आणि भक्त एकरूप होणे या अभेदभक्तीचे स्वरूप सांगितले. आता दोन्ही अभिन्न झाल्यानंतर ते वेगळे करता येणार नाहीत.(४३)

**जातां पावला आपण । ऐश्वर्याची बाणली खूण । साधका आंगीं ।।४४।। ऐसें हें दृश्य[२९] असतां । समाधान पावला तत्वतां । जैसें सैन्य अवघें असतां । राजा राज्यपदीं ।।४५।। सद्गुरुबोध जेव्हां जाला । चौदेहांस अंत आला । अजन्म्याचा चुकविला । जन्म-मृत्यु।।४६।। जालें साधनाचें फळ । भयचि उडालें सकळ । ऐसा आठवा प्रांजळ। विवरून पहा ।।४७।। आतां नववे समासीं । सादर ऐका साधुलक्षणांसी । अंतरीं बाणले स्वरूपस्थितीसी । बाह्य काया स्वप्नापरी ।।४८।। साधु न कळे साधुविण । चिन्ह कांहीं नसे भिन्न। तथापि समासीं असे निरुपण । साकल्य[३०] पहावें ।।४९।। सांगितली जे स्वरूपस्थिति । साधकें बळकावितां[३१] निश्चिती । मग लक्षणें आंगीं बाणतीं । आपोआप।।५०।। आतां समास दहावा । मतखंडणीं शूर जाणावा । कलहरूपें[३२] खंडिलें सर्वा । अज्ञानाचें[३३] ।।५१।। पुढें ज्ञात्याचें अनुभव । तीन प्रकारें अपूर्व । एक द्रष्टा साक्षीभाव । सर्व ब्रह्म दुसरा ।।५२।। द्रष्टा साक्षी सर्व ब्रह्म। ऐसें उभयतांचें वर्म । कांहीं नाहीं तयासीच ब्रह्म । तिजा अनुभव ।।५३।। ऐसें नानापरी बोलती । परी आपुली शुद्धि**

---

वेद ज्याचें स्तुतिपाठक भाट आहेत, तो परमात्मा आपणच होऊ शकतो. त्यासाठी आपली देहबुद्धी (मी देह आहे ही धारणा) मात्र तेवढी गेली पाहिजे. ती जाताच साधकाच्या अंगी ऐश्वर्याची चिन्हे बाणतात. (येथे ऐश्वर्य म्हणजे ईश्वरी भाव) (४४) बाकीची सर्व दृष्यसृष्टी जशीच्या तशी सभोवती असताना, राजाने सर्व सैन्याच्या उपस्थितीत राज्यपदावर बसावे त्याप्रमाणे, तो संपूर्ण समाधानाचा वाटेकरी होतो. (४५) सद्गुरूंचा उपदेश झाल्यानंतर त्याच्या चारी देहांचा अंत होतो. जो मुळात अजन्मा आहे त्याचा जन्ममृत्युविषयक भ्रम नाहीसा होतो. (४६) आतापर्यंत केलेल्या साधनांचे फळ प्राप्त झाले. सर्व भीती लोप पावली अशा तऱ्हेचा हा आठवा समास स्पष्ट झाला. त्याचा विचार करा. (४७) आता नवव्या समासात साधुलक्षणे सांगितली आहेत. ती आदरपूर्वक ऐका. एकदा अंत:करणात स्वरूपस्थिती बाणली की बाह्य शरीर हे स्वप्नासारखे वाटू लागते.(४८) साधूच्या मदतीशिवाय साधूची ओळख पटत नाही. साधुत्वाची चिन्हे काही वेगळी असत नाहीत. पण या नवव्या समासात त्या चिन्हांचे निरूपण केले आहे. ती चिन्हे समग्र पाहावीत. (४९) स्वरूपस्थितीचे जे वर्णन केले आहे, ते साधकाने सायासपूर्वक अंगी बाणवून घेतल्यानंतर साधुत्वाची या समासात सांगितलेली लक्षणे अंगात आपोआप बाणतात.(५०) आता दहावा समास म्हणजे निरनिराळ्या मतांचे खंडन करण्यात प्रभावी समजावा. निरनिराळ्या मतवाद्यांमधील कलह मिटवतांना सर्व अज्ञानाचे त्यात खंडन केले आहे. (५१) यानंतर पुढे ज्ञानाचे तीन प्रकारचे अनुभव सांगितले आहेत. त्यापैकी एक प्रकार म्हणजे ज्ञाता स्वत:ला द्रष्टा (पहाणारा), साक्षिभावाने असणारा मानतो. दुसऱ्या प्रकारात सर्वच विश्व ब्रह्मरूप दिसू लागते. (५२) द्रष्टा अथवा साक्षी होणे, सर्व ब्रह्मस्वरूप अनुभवणे हे दोन्ही प्रकार लोप पावतात. त्याचवेळी त्याला स्वत:ला ब्रह्मरूप होता येते हा अनुभवाचा तिसरा प्रकार होय. (५३)

**नेणती। शून्यवादिया ब्रह्मप्राप्ति । कालत्रयीं नसे ।।५४।। आधीं दृश्य सोडिलें। मग शून्यत्व वोलांडिलें । मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ।।५५।। येणें रीतीं आठवा जाला । ज्ञानदशक हातां आला । व्यतिरेकेंसि बोलिला । प्रथमापासून आठ ।।५६।। जाला ग्रंथाचा [३४] पूर्वार्ध । अवघा ज्ञानाचा संवाद ।। साधक पावती आनंद । श्रवणद्वारां।।५७।। दासबोधीं जें जें बोलिलें । तेणें सर्व सिद्धान्तांसि उणें आणिलें । कां जे अनिर्वाच्य संचलें। अबोलणें बोल ।।५८।। इति श्री संकेतकुबडी । दासबोधींचें सार निवडी । वांकुडी परि आवडी । रामदासा ।।५९।। दशक आठ पूर्वार्ध संपूर्णमस्तु ।।**

---

अशा प्रकारे निरनिराळी मते लोक सांगतात, पण स्वत:चा शोध मात्र ते घेत नाहीत. सगळे काही शून्यच आहे, असे सांगणाऱ्यास मात्र कालत्रयीही ब्रह्मप्राप्ती होणे शक्य नाही. (५४) ब्रह्मप्राप्तीसाठी आधी दृष्याचा त्याग करावा लागतो. त्यानंतर शून्यत्वाच्या अनुभवाची भीती असते. ते शून्यत्व ओलांडल्यानंतर मूळमायेच्याही (मूल स्फुरणाच्याही) पलीकडे असणाऱ्या परब्रह्माचा साक्षात्कार होतो. (५५) अशा प्रकारे आठवा दशक समाप्त झाला. तो ज्ञानदशक आहे. पहिल्या दशकापासून ते आठव्या दशकापर्यंत ज्ञानाचे हे व्यतिरेक पद्धतीने निरूपण झाले. (५६) इथे ग्रंथाचा पूर्वार्ध संपला. त्यामध्ये सर्व ज्ञानाचाच विचार आहे. त्याचे श्रवण केल्यानंतर साधकांना आनंदाची प्राप्ती होईल.(५७) दासबोधात जे जे सांगितले आहे, त्याने बाकीच्या सर्व सिद्धांताना उणेपण आणले आहे. कारण दासबोधाच्या या भागात, जे सर्वत्र व्यापून राहिले आहे, जे वर्णनातीत आहे, जे बोलून सांगता येत नाही. अशा त्या ब्रह्माचेच शब्दांच्या साहाय्याने निरूपण केले आहे. (५८) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (५९) इथे आठवा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) दुर्बोध, खोल. (२) अन्य किंवा परलोकांतील. (३) पृथिवी, जग. (४) सगुणाचा समावेश केल्यांत म्हणजे उत्पन्न झालेल्या जगांतच होतो; त्या सगुणानें हें जग केलें असें कसें ह्मणता येईल ? ह्या निर्गुणानें जग केले ह्मणावें तर कर्तृत्वाचा गुण निर्गुणाचे ठायी मानावा लागतो. (५) (ब्रह्माहून) माया स्वतंत्र मानावी लागते. (६) वादविवादाची वृत्ति. (७) सृष्टीचे उत्पत्तीविषयीं भिन्न भिन्न दर्शनशास्त्रांचीं जी भिन्न मतें त्यांपैकी येथें तीन मतांचा उल्लेख केला आहे. **आरम्भवाद** – 'अनेककारणसंयोगवर्ति कार्यजनकत्वस्य कथनम् ।' अनेक कारणांच्या समुच्चयानें कार्य घडतें, नित्य व सूक्ष्म परमाणूंच्या संयोगानें जगदुत्पत्ति होते असें मानणें हा आरंभवाद होय. 'कारणें जया उदंड । तो आरंभवाद ।।१३।।' आगमसार ४.१ **परिणामवाद** – 'उपादान समसत्तावर्ति अन्यथाभावत्वस्य कथनम् ।' 'उपादानाच्या समान स्वभाववान् पण अन्यथारूप' कार्य होणें' (उपादान कारण–कार्यात ज्याचा प्रवेश असतो व ज्याच्यावांचून कार्यास अस्तित्व नाहीं त्यास उपादान कारण म्हणतात. माती हें

घटाचें, सुवर्ण हें अलंकाराचें उपादान कारण होय.) 'सत्यत्वें कारणा पालट होय । अथवा कारणासम असावें कार्य । उभय लक्षणांचा अभिप्राय । परिणाम ऐसा ।।१४।।'' आगमसार ४.१. दुधाचें दहीं होणें हा विकृत परिणामवाद आणि तंतूचें वस्त्र, सुवर्णाचे अलंकार हा अविकृत परिणामवाद होय. **विवर्तवाद** - 'अधिष्ठानस्वरूपमपरित्यज्य दोष वशाद्रूपान्तरेण प्रतीतस्य कथनम् । 'अधिष्ठानाहून विपरीत स्वभाववान् आणि अन्यथारूप तो विवर्तवाद. शिंपीवर रुप्याचा किंवा दोरीवर सर्पाचा भास होणें हा विवर्त किंवा अध्यासवाद होय. 'अन्यथाभाव सत्यत्वें नसे । ते नसतां परी ते भासे । अथवा कारणासमानही नसे । कार्य जें का ।।१६।। या उभयांसी बोलिजे विवर्त ।।' आगमसार ४.१.(८) तिसरा. (९) रज्जुसर्पादि दृष्टान्तानुसार हें सिद्ध होतें कीं, सर्प दिसला तरी तो पाहणाऱ्याचा दृष्टिदोष होय, रज्जूच्या रज्जुत्वांत विकार होत नाही, त्याचप्रमारें संत - स्थिर अशा स्वस्वरूपांत कांही ही विकार नसता जीवाच्या अज्ञानदोषामुळें मायेचा भास झाला, तो मिथ्या आहे. (१०) ''प्रकृतिपुरुष विवेक करितां । सत्वपुरुषाचें ज्ञान होतां । प्रवृत्ति नव्हे भोगार्था । निरोध त्रिविध दुःखाचा ।।२०।। परि उपास्यउपासक भेद । हेंचि श्रेय नव्हे अभेद । हा जाणिजे मोक्षवाद । सांख्यशास्त्रींचा'' ।।२१।। आगमसार ४.२. श्री दासबोध ८-३-१२ ते १४ ओव्यांत जें निरूपण आहे तें शिष्याच्या समजुतीसाठीं सांख्यशास्त्रास अनुसरून सांगितलें आहे. प्रकृति स्वतंत्र जगत्कारण असून ती पुरुषाला ह्मणजे आत्म्याला भोग मोक्ष देण्यास प्रवृत्त होते असें सांख्य मत आहे. (११) पटत नाही. (१२) निवारण होते. (१३) श्री समर्थकृत आत्माराम ग्रंथातील वचन. 'ते मायेनेंच वारिली । पाहिजे माया' ।।२७।। स.३. (१४) उलगडत नाहीं. (१५) गुंतागुंत. (१६) ही २२ वी ओंवी पूर्वीच्या मुद्रित प्रतींत नाहीं. (१७) कर्दम - चिखल. चिखलाप्रमारें सर्व भूतें एकमेकांत मिसळलीं. (१८) अध्यारोप तो अध्यस्त । तें न दिसतां तें दिसत । त्यासी ह्मणती विवर्त । वेदान्त शास्त्रीं ।।८।। आगमसार ४-१. (१९) महाद्वारांत पोंचलें कीं तेथून देवदर्शन होतें, तसेंच माया विरली कीं तीच स्वरूपस्थिति. (२०) श्रीदासबोधांत. (२१) बाधक व विरुद्ध गोष्टी. (२२) **पाठभेद** - शब्दत्याग. शबल - मिश्रित, अशुद्ध. (२३) ईश्वर व जीवात्मा या प्रत्येकाचे देह, अवस्था, अभिमान इत्यादि उपाधींचे चार चार प्रकार, हा सर्व पंचभूतांचा विस्तार आहे. (२४) शब्दशः होणारा अर्थ. (२५) तत् (ईश्वर) व त्वम् (जीव) या दोहोंतील वाच्यार्थनिरसनानंतर उरलेल्या लक्ष्यार्थाचें ऐक्य करावें. (२६) आठव्या दशकाचा आठवा समास. (२७) स्मरण करा. (२८) स्तुतिपाठक. (२९) पाठभेद - देह. (३०) साग्र, समग्र. (३१) दृढतेनें अंगी बाणल्यावर. (३२) वादविवादरूपानें. (३३) 'अज्ञानातें' पाठ असावा काय ? (३४) श्रीदासबोधाचा.

।। श्रीरामसमर्थ ।।

# उत्तरार्ध

## दशक नववा

**।।श्रीराम ।। दासबोधींचे शब्दापासीं । अर्थभिक्षा मागणें ज्यासी । तरी हातीं घेउन कुबडीसी । बुद्धिझोळीसी सांठवा ।।१।। आठ दशक पूर्वार्ध । जो सिंधूपरिस अगाध । आतां जाणिजे उत्तरार्ध । दशक बारा ।।२।। अन्वय अथवा व्यतिरेक । हे पूर्वपक्ष माइक। सिद्धान्त [१] बोलिला येक । दुजा नाही ।।३।। शब्दवाच्यांश सांडावा । अर्थलक्ष्यांश [२] वोलांडावा । अलक्ष [३] येईल अनुभवा । तेंहि विवरितां तेंचि तें ।।४।। आतां दशकांचें [४] वेगळालें लक्षण । श्रोतीं अनुभवावें येकाग्र होऊन । सहजस्थिति साधका बाणे । नववा जाण परिसतां ।।५।। दहावे दशकीं जाण । उन्मनी पावे समाधान । तिसरें जें का अलिप्तपण । तें येकादशीं ।।६।। निवेदनाची जे किल्ली । ते द्वादशीं प्राप्त जाली ।**

---

दासबोधातील शब्दांकडे ज्याला अर्थाची भिक्षा मागायची असेल त्याने या कुबडी ग्रंथाला हाताशी धरून आपल्या बुद्धिरूपी झोळीत तो साठवून ठेवावा. (दासबोधाच्या शब्दांचे अर्थ या कुबडी ग्रंथात सापडतील. ते आपल्या बुद्धीत धारण करून ठेवावेत.) (१) दासबोधाचे पहिले आठ दशक हा दासबोधाचा पूर्वार्ध आहे. तो समुद्राप्रमाणे सखोल आहे. आता उत्तरार्ध बाकीच्या बारा दशकात समजून घ्यावा. (२) अन्वय असो वा व्यतिरेक हे दोन्ही पूर्वपक्षाचीच मांडणी करणारे आहेत. त्यामुळे ते मायिक म्हणजे खोटे समजावेत. या दोहोंच्याद्वारे एकच सिद्धान्त सांगितला आहे. त्याबद्दल दुमत नाही. (३) शब्दाचा वाच्यार्थ सोडावा. लक्ष्यार्थही ओलांडावा. तो पार केल्यानंतर जे अलक्ष्य परब्रह्म ते अनुभवाला येईल. मात्र त्याचे विवरण करू गेले की लगेच ते विवरण पूर्वपक्षातच समाविष्ट होईल. ते परब्रह्म शब्दातीतच आहे. (४) आता या उत्तरार्धातील दशकांचे स्वरूप वेगवेगळे सांगायचे आहे. श्रोत्यांनी एकाग्रचित्ताने त्याचा अनुभव घ्यावा. (येथून पुढे स्वामींनी नऊ ते पंधरा या दशकांच्या फलश्रुतिस्वरूप समाधानाचे सात संकेत सांगितले आहेत. जीवन्मुक्त दशेत साधकाला जे श्रेष्ठ समाधान प्राप्त होते ते वास्तविक पाहता एकच असते. ते अखंड असते. पण त्याचाच लोक विवक्षेनुसार (आपल्याला इच्छेनुसार) वेगवेगळ्या सात नावांनी निर्देश करतात. समर्थांनी दासबोधाच्या चवथ्या दशकात हे सात संकेत पुढील प्रमाणे नोंदवले आहेत. "संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिती आणि अलिप्तपण । सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तहि येकरूप ।। दास. ४.४.८") हंसराजस्वामींच्या मते नववा दशक श्रवण केल्यानंतर साधकाच्या अंगी सहजस्थिती बाणते. (५) दहावा दशक ऐकल्यानंतर त्याला उन्मनी अवस्था प्राप्त होते. अकराव्या दशकाच्या श्रवणाने अलिप्तपण प्राप्त होते. (६)

**विदेहस्थिति बोलिली । ते त्रयोदशीं ।।७।। आतां जें का विज्ञान । तें चवदावे दशकीं केलें पूर्ण । तो ठेवा संगत्यागें जाण । तो दशक पंधरावा ।।८।। नवापासुन पंधरा । सात दशक विचारा । सप्त लक्षण अवधारा । पृथक पृथक।।९।। सहजस्थिति उन्मनी जाण । अलिप्तपण निवेदन । विदेहस्थिति विज्ञान । संगत्याग सातवा[५] ।।१०।। उन्मनी विदेहस्थिति संगत्याग । विदेहमुक्ताचे तिन्ही अंग । निवेदन विज्ञान भाग । जीवन्मुक्ताचे ।।११।। सहजस्थिति अलिप्तपण । हें नित्यमुक्ताचें लक्षण । विभागिलें[६] परि संपूर्ण । येकरूप असती ।।१५।। दशक पांच राहिले । सोळावा परिचर्य[७] बोले । वासनाक्षय[८] मनोजय[८] बोलिले । दोन्ही सत्राविया ।।१३।। असंभावना[९] विपरीतभावना[१०]। अठरावे दशकीं नासती नाना । येकुणिसावे दशकीं शोकमोक्ष[११] जाणा । विसावा निरतिशयानंद ।।१४।। हीं सर्व लक्षणें सर्वीं असतीं। उगीच वेगळाली फलश्रुति । उत्तरार्ध[१२] जे श्रवण करिती । अनायासें प्राप्ति सर्वांची ।।१५।। आरंभीं असे नववा । हा सहजस्थितीस बरवा । श्रवणमननें नित्य नवा । सद्गुरुप्रसाद ।।१६।। प्रथमीं शब्दाची खटपट[१३] । स्वरूप निर्मळ निघोट[१४] ।**

---

बाराव्या दशकाच्या श्रवणाने निवेदनाचे म्ह. आत्मनिवेदनाचे रहस्य त्याच्या हाती येते. आणि जिला विदेहस्थिती असे म्हणतात ती तेराव्या दशकाच्या श्रवणाने प्राप्त होते. (७) विज्ञान (ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव) नावाचे जे समाधान आहे. ते चौदाव्या दशकाच्या परिशीलनाने प्राप्त होते आणि आसक्तित्यागाने जो समाधानाचा ठेवा प्राप्त होतो तो पंधराव्या दशकात आहे. (८) अशा तऱ्हेने नवव्यापासून ते पंधराव्या दशकापर्यंत या सात दशकांचा विचार करा. त्यातून या सात संकेतांची वेगवेगळी प्राप्ती होईल.(९) समाधानाची सात नावे म्हणजे सहजस्थिती, उन्मनी, अलिप्तपण, आत्मनिवेदन, विदेहस्थिती, विज्ञान आणि संगत्याग ही होत.(१०) त्यापैकी विदेहस्थिती, उन्मनी आणि संगत्याग ही तीन विदेहमुक्ताची लक्षणे होत. आत्मनिवेदन आणि विज्ञान ही जीवन्मुक्ताची लक्षणे होत. (११) सहजस्थिती आणि अलिप्तपण ही नित्यमुक्ताची लक्षणे होत. ही लक्षणे वेगवेगळी सांगितली असली तरी ती सर्व एकरूपच आहेत.(१२) आता बाकी राहिले पाच दशक. त्यापैकी सोळाव्या दशकात परिचर्या (सेवा,उपासना) यांचे स्वरूप सांगितले आहे आणि वासनाक्षय आणि मनोजय या दोहोंचे विवेचन सतराव्या दशकात केले आहे. (१३) अठराव्या दशकात असंभावना आणि विपरीत भावना या दोषांचे निरसन सांगितले आहे. एकोणिसाव्या दशकात जीवन्मुक्त दशेतील शोकमोक्ष या अवस्थेचे वर्णन आहे आणि विसाव्या दशकात निरतिशयानंद या अवस्थेचे वर्णन आहे. (१४) वास्तविक पाहता ही सर्व लक्षणे सर्वच दशकांत आहेत. पण प्रत्येकाची वेगवेगळी फलश्रुती सांगायची म्हणून सांगितली आहे. जे या सर्व उत्तरार्धाचे श्रवण करतील त्यांना या सर्व लक्षणांची विनासायास प्राप्ती होणार आहे. (१५) या उत्तरार्धाचा प्रारंभ नवव्या दशकापासून होतो तो सहज स्थितीच्या दृष्टीने चांगला आहे. त्याचे श्रवण मनन करण्याने प्रत्येक वेळी नित्य नव्या अशा सद्गुरुकृपेची प्राप्ती होते. (१६)

कळावया श्रुतीचा बोभाट[१५]। येऱ्हवीं शब्द कैंचा ।।१७।। दुसरा [१६] तो अति सुरस । जें परब्रह्म निराभास । पाहूं जातां दृष्टीस । न पडे ठाईं ।।१८।। पाहूं जातां दिसे दृश्य । वोळखूं जातां भासे भास । स्वानुभवें पाहतां निःशेष । दृश्य-भासा सबाह्य ।।१९।। जें असतचि असे सर्वदा । तें अनन्यपणें येतसे बोधा । तेथें अहंता वाढवी भेदा । अनुभवमिसें।।२०।। मी स्वरूप ऐसें वाटे । कल्पितांचि कल्पना उठे । ते कल्पनेचें मूळ तुटे। वृत्तीविण अनन्यत्वें ।।२१।। स्वरूप तरी शब्दातीत । तेथें सर्व विमळ हा हेत [१७] । अनुभवीं नाहीं सदोदित । लक्ष्यांशें वोळखावा।।२२।। हें न बोलतांचि विवरिजे । विवरोन विवरोन [१८] राहिजे । मग अबोलणें साजे । महापुरुषीं ।।२३।। तिसरा [१९] म्हणे भोगून अभोक्ता योगी । तरी जन्म तैसेचि तयालागीं । वक्ता ह्मणे रे वाउगी । कल्पना करितां।।२४।। जैसा जयाचा अंतरभाव । तैसेंचि दिसत असे सर्व । ज्ञानियाचा अभिप्राव।

---

नवव्या दशकाच्या पहिल्या समासात अद्वैत वेदान्तातील निरनिराळ्या पारिभाषिक शब्दांचे अर्थ सांगण्याचा खटाटोप आहे. ब्रह्म हे निर्मळ आणि परिपूर्ण असते. पण त्याच्या स्वरूपाविषयी कल्पना यावी म्हणून श्रुतीने त्यास निरनिराळी नावे दिली.(अर्थात अशी नावे देणे ही श्रुतीची केवळ व्यर्थ धडपडच ठरते.) तसे पाहिले तर स्वरूपापर्यंत शब्द कसा पोहोचू शकेल ? (१७) दुसरा समास अतिशय सुंदर आहे. त्यामध्ये असे सांगितले आहे की, ब्रह्म हे निराभास म्हणजे अदृश्य आहे. ते पाहण्याचा प्रयत्न करताच ते दृष्टीस पडत नाही. (१८) आपण पाहू लागलो तर ते दृश्य आहे. असे वाटते, त्याची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करताच ते भासाप्रमाणे भासते. प्रत्यक्ष अनुभव घेताच ते या दृश्य आणि भास यांना अंतर्बाह्य व्यापून असल्याचे लक्षात येते.(१९) जे सर्वकाळ असते ते एकमेव असून त्यासारखे दुसरे काहीही नाही. असे प्रत्ययाला येते. पण अनुभव घेण्याच्या प्रसंगी ते अहंकारामुळे भिन्न भिन्न प्रकारचे वाटते. (२०) आपणच स्वरूप (ब्रह्म) आहोत अशी मनात कल्पना उठते. ती कल्पना देखील, स्वरूप हे वृत्तीच्या पलीकडे असल्यामुळे आणि एकमेवाद्वितीय असल्यामुळे निराधार ठरते.(२१) स्वरूप तर शब्दांच्या पलीकडचे आहे. तेव्हा दृश्याचा सर्व पसारा हाच ब्रह्म आहे. अशी कल्पना मनात येते. तसेच ब्रह्म हे विशुद्ध असून ते विमल (निर्मल) आहे. असेही लक्षात येते. पण सर्व ब्रह्म आणि विमल ब्रह्म हे दोन्हीही अनुभवाला येतात असे म्हणण्याची सोय नाही. (कारण तसे म्हणताच त्रिपुटी निर्माण होते.) ब्रह्म नित्य असणारे अखंड दंडायमान असे आहे. त्याच्या बाबतीत वरील प्रकारचे शब्दही वाच्यार्थ ठरतात. म्हणून ते त्याज्यच ठरतात. त्यांचा लक्ष्यार्थच ओळखला पाहिजे. (२२) हा सर्व गूढ आशय भाषेचा आश्रय न करताच सांगावा लागतो. त्याचे शब्दांनी विवरण करून करून थकल्यानंतरच त्या परमात्म्याच्या बाबतीत निःशब्द होणेच शोभून दिसते. (२३) तिसऱ्या समासात श्रोत्याने एक प्रश्न विचारला आहे. योगी जर भोगूनही अभोक्ता ठरत असेल तर तीच गोष्ट त्याच्या जन्मालाही लागू करता येईल. (म्हणजे त्याचे जन्म, मरण, स्वर्ग-नरक भोग हे कायमच राहणार तर ?) यावर वक्ता म्हणतो की, तुमची ही कल्पना व्यर्थ आहे ती खरी नाही. (२४)

**अज्ञानां न कळे।।२५।। ज्ञानी वोळखावा ज्ञानियानें । अलिप्तपण अलिप्तानें । निजला जागा सम समजणें । तरी युक्त कैसा ।।२६।। ज्ञानें जीवन्मुक्त भला । तो स्वरूपीं स्वरूपचि जाला । तो कैसा येईल प्रत्ययाला । अज्ञानदृष्टीं ।।२७।। त्यासीं शोधूं जातां तेंचि होईजे । जें वेगळेपणें कांहींच नेणिजे । निर्विकार जन्ममृत्यु पाविजे । तरिच ज्ञानियासी जन्म ।।२८।। मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें ओळखिली। दोघांची अवेस्था देखिली सारखीच केंवी ।।२९।। चवथा[२०] म्हणे दुर्बळ संपन्न । ऐसे उंच नीच कां असती जन । तरी ते न सिकती उत्तम गुण । म्हणोनि प्राणी करंटे ।।३०।। जाणणें हा स्वभाव । जाणतां कळे अभिप्राव । स्मरणें विस्मरण नासून सर्व । अनिर्वाच्य उरे ।।३१।। पांचवा पिंडब्रम्हांडरचना। येक प्रतीत कैसी येते मना । पंचभूतें ब्रम्हांडीं जाणा । तेचि पिंडीं ।।३२।। सहावा त्रिगुणाचें रूप केलें । मूळमायेपासून उद्भवलें ।**

---

ज्याची अंतरंगातील भावना जशी असेल त्याला सर्व गोष्टी तशाच दिसतात. ज्ञानी माणसाच्या म्हणण्याचा आशय अज्ञानी माणसाला कसा कळेल ? (त्याला तो कळणार नाही.) (२५) ज्ञानी माणसाची ओळख ज्ञानी माणसालाच कळेल. अलिप्तपण कसे असते हे अलिप्त असलेल्याच कळते. झोपलेल्या आणि जागा असलेल्या अशा दोन्ही माणसांना सारखेच समजणे योग्य ठरेल काय ? (२६) ज्ञानाच्या योगाने जो भला गृहस्थ जीवन्मुक्त होतो, तो ब्रह्माशी एकरूप झाल्याने ब्रह्मच झालेला असतो. अज्ञान दृष्टीच्या माणसाला हे कसे कळणार ? (२७) त्याचा शोध घ्यायला गेलो तर तेच व्हावे लागते. म्हणजे त्याच्यापासून वेगळे राहून काहीच कळणार नाही. निर्विकारी ब्रह्माला जन्म, मृत्यू या अवस्था प्राप्त होणार असतील तरच ज्ञानी माणसालाही जन्म प्राप्त होतो, असे म्हणता येईल. (२८) झाडाची वाकडी तिकडी सर्पाच्या आकाराची मुळी पाहिल्यावर एकजण भ्याला, एकाने ती ओळखली. अशा प्रसंगी दोघांची अवस्था सारखीच दिसली असे म्हणता येईल काय ? (२९)चवथ्या समासात आणखी एक प्रश्न उपस्थित केला आहे. या जगात कोणी दुबळे, कोणी श्रीमंत, कोणी उच्च, कोणी नीच असे लोकांचे भेद का निर्माण होतात ? त्याचे उत्तर हे की, काही लोक उत्तम गुण शिकत नाहीत, त्यामुळे ते लोक करंटे होतात. (३०) जाणणे म्हणजे ज्ञान प्राप्त करून घेणे हा प्राणिमात्राचा स्वभाव आहे. अशा ज्ञानामुळे अनेक गोष्टींचा उलगडा होतो. तसेच स्मरणामुळे सर्व विस्मरण नष्ट होते. (आवरण विक्षेपादी अडथळे दूर होऊन स्वत:चे सत्य स्वरूप कळते.) आणि केवळ अनिर्वाच्य असे ब्रह्म उरते. (३१) पाचव्या समासात पिंडब्रह्मांडरचनेसंबंधीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. 'जे पिंडीं ते ब्रह्मांडीं' असे म्हणण्याचा प्रघात आहे. पण खरोखरच पिंडात जे असते तसेच तंतोतंत ब्रह्मांडात आढळते काय, हा तो प्रश्न आहे. त्याबाबतीत एवढेच सत्य आहे की, पिंडाची रचना पंचभूतांपासून झाली, त्याप्रमाणे ब्रह्मांडाचीही रचना पंचभूतांपासूनच झाली. इतर बाबतीत असे साम्य दिसत नाही.(३२)

**पंचभूतांत जाणिवेनें वेष्टिलें । आणि मूळमायेंत पंचभूतें ।।३३।। ऐसा कर्दमु बोलिला । परि जन्म नाहीं आकाशाला । गुणाकरितां शब्दाला । आकाश म्हणावें ।।३४।। शून्य शब्द आणि भास । भासे तयासि नाम आकाश । निश्चळ असंभाव्य नि:शेष । परब्रह्म जाणावें ।।३५।। सातवा स्थूळ कीं सूक्ष्म । आधीं कोण हें कळावें वर्म । आधी किडे कीं किड्यांचें धाम [२१] । इतुकेन फिटली आशंका ।।३६।। आणि मडकें जैसें फुटलें । तें फुटोनीच गेलें । तैसें देह त्यागितां जन्मा आलें । नाहींच पुन्हा मनुष्य ।।३७।। येथें सगट सारिखें जालें । सर्वहि मुक्तचि भाविलें । हें ज्ञात्याचें पाहणें परी आणिलें । पाहिजे प्रत्ययासी।।३८।। स्वयें आपण जेविला । त्यासी वाटे लोक धाला [२२] । परंतु हें समस्तांला। घडेल कैंवी ।।३९।। तैसें जयास ज्ञान जालें । तेचि तितुके तरले । बीज भाजलें [२३] ते**

---

सहाव्या समासामध्ये त्रिगुणांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. मूळमायेपासून सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ती कशी झाली, पंचभूतांमध्ये जाणीव कशी व्यापून आहे, आणि मूळमायेतच पंचभूते कशी सामावलेली आहेत, या मुद्द्यांचे विवरण आढळते. (३३) मुळात पंचभूते मूळमायेत सूक्ष्म स्वरूपात होती. मूळमायेतून गुणमाया अस्तित्वात आली तेव्हा ती भूते स्पष्ट दशेला आली. त्याच वेळी ती एकमेकांत कालवली गेली. त्यालाच भूतकर्दम असे म्हणतात. मूळमायेपासून गुणमाया झाली. गुणमायेपासून सत्त्व, रज, तम हे गुण निर्माण झाले. गुणांपासून पंचभूते निर्माण झाली असे सांगण्याचा प्रघात आहे. पण आकाशाला मात्र जन्म नाही. आकाश वास्तविक पाहता ब्रह्मच आहे. पण ते भासमान होते म्हणून ते ब्रह्मापासून वेगळे पडते. त्याचा गुण म्हणून शब्द हा गुण सांगितला जातो. शब्दाला अधिष्ठान हवे म्हणून आकाशाची योजना आहे. (३४) शून्य, शब्द आणि भास यांच्यामुळे जे भासते त्याला आकाश असे म्हटले जाते. ते निश्चळ आहे, जन्मरहित आहे, ते एकही स्थळ न सोडता सर्वत्र भरून राहिलेले आहे. या वैशिष्ट्यांमुळे खरे तर त्याला परब्रह्मच म्हंटले पाहिजे. (३५) सातव्या समासात श्रोत्याने प्रथम प्रश्न विचारला आहे. सूक्ष्म आणि स्थूळ यांमध्ये प्रथम कोण जन्मास येते? त्यावर समर्थ म्हणतात की आधी किडा जन्मतो की, त्याचे घर असा प्रश्न केल्यास काय उत्तर येईल ? त्याप्रमाणे आधी सूक्ष्म जन्मास येते आणि नंतर स्थूळ जन्म घेते. अशा तऱ्हेने त्या आशंकेचे निरसन झाले. (३६) श्रोत्याचा पुढचा प्रश्न असा – मडके फुटल्यानंतर त्यापासून दुसरे मडके जन्म घेत नाही, त्याप्रमाणे प्राण देहातून निघून गेल्यानंतर तो माणूस पुन्हा जन्माला येत नाही. श्रोत्याचा अभिप्राय असा की, मेल्यानंतर जर कोणीच जन्माला येत नाहीत, तर सगळेच जग मुक्तच होते असे म्हंटले पाहिजे. तेव्हा सगळेच जीव समान होतात. (३७) या दृष्टिकोनातून सगळेच जीव समान ठरतात. कारण सगळेच मुक्त होतात. हा खरा ज्ञात्याचा दृष्टिकोन आहे. पण प्रत्ययास आणता आला पाहिजे. (३८) एखादा माणूस जेवून तृप्त झाला की, त्याला वाटते की बाकीचे सर्व लोक आपल्याप्रमाणेच तृप्त झाले आहेत. पण सगळ्याच लोकांना असा तृप्तीचा अनुभव कसा येईल? (३९)

**बुडाले । येर फुटती ।।४०।। आठवा ज्ञानें मुक्त जाला । परि जन्म कैसा बद्धाला । वासनेनें पुन्हा आला । जन्म घेऊनी ।।४१।। मरणकाळीं वासना उरे । तैसीं तैसीं पावती शरीरें । वायुरूप वासना चतुरें । वोळखावी ।।४२।। वायुयोगें कित्येक । परकायाप्रवेशादिक[२४]। प्राण गेले उठती कितेक । वासनागुणें ।।४३।। नववा म्हणे ब्रह्मास। ब्रह्मांडें भेदिलें सावकास । अरे आकाशीं लाविलें दीपास । तरी काय तेणें भेदिलें।।४४।। सागरामध्यें खसखस । तैसें परब्रम्हीं दृश्य । मतीसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाटे।।४५।। वृत्ति करितां विशाळ। पाहतां ब्रह्मांड बदरीफळ । ब्रह्माकार होतां केवळ । कांहीं नाहीं।।४६।। आपण अविवेकें लाहनाळला[२५] । वेगळा देहधारी जाला । मग हें ब्रह्मांड तयाला । कवळेल कैसें ।।४७।। तरी वृत्ति ऐसी वाढवावी। पसरून नाहींच करावी । परब्रह्मास पुरवावी चहुंकडे ।।४८।। दहावा अपरोक्ष बोले । निर्गुणीं अनन्य पाहिजे जालें । तेंचि**

---

त्याप्रमाणे ज्यांना ज्ञान झाले, तेवढेच लोक तरून जातात. बीज भाजल्यानंतर ते पेरले असता पुन्हा उगवत नाही. त्याप्रमाणे ज्ञानाने ज्यांची कर्मे जळून गेली. ती कर्मे पुन्हा उद्भवत नसल्याने ते ज्ञानी मुक्त होतात. पण जी बीजे भाजली नाहीत त्यांना पुन्हा अंकुर फुटणारच त्याप्रमाणे ज्ञान न झालेले लोक मृत्यूनंतर पुन्हा जन्म घेणारच. (४०) आठव्या समासात श्रोत्याने पुढील प्रश्न विचारला आहे. ज्ञानामुळेच मनुष्य मुक्त होतो हे मान्य आहे. पण बद्धाला पुनर्जन्म कशाने मिळतो? याचे उत्तर 'वासनेमुळे' हे आहे. वासनेमुळेच मनुष्य पुन्हा जन्म घेतो.(४१) मरतेवेळी माणसाची वासना शिल्लक राहाते. त्यानुसार त्यांना दुसरी शरीरे प्राप्त होतात. वासना ही वायुरूप असते, हे शहाण्या माणसाने ओळखावे. (४२) वायूच्या साहाय्याने किंत्येक योगी परकाया प्रवेश (दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश) करतात. कित्येक प्राण गेलेले जीव वासनेमुळे जिवंत होतात. (४३) नवव्या समासात श्रोत्याने ब्रह्माचा ब्रह्मांडाने भेद केला असे विधान केले. त्यावर ते कसे चूक आहे, ते वक्त्याने स्पष्ट केले आहे. वक्ता त्याला विचारतो, आकाशात दिवा लावला तर त्याने आकाशाचा भेद केला असे होते काय ? तद्वतच ब्रह्मामध्ये ब्रह्मांड राहात असते. (४४) सागरामध्ये खसखस ज्या प्रमाणात दिसते, त्याप्रमाणे ब्रह्मामध्ये दृश्याचे स्थान असते. आपली बुद्धी ज्या प्रमाणात असते, त्याच प्रमाणात तिच्यामध्ये ज्ञानाच प्रकाश पडतो. (४५) वृत्ती व्यापक करताच ब्रह्मांड बोराएवढे दिसायला लागते. त्याहूनही व्यापक म्हणजे ब्रह्माकार वृत्ती केली तर ब्रह्मांड नावाची चीजच दिसेनाशी होते. (४६) पण आपण जर अविवेकाने लहान झालो तर आपण देहाच्या आकाराचे होतो. आणि मग या ब्रह्मांडाला तो कशी गवसणी घालणार ? (ब्रह्मांडाला तो कसा कवळू शकेल ?) (४७) तेव्हा वृत्ती एवढी वाढवत न्यावी की तिचे प्रसरण करता करता ती एकदम नाहीशीच करावी. आणि चारी दिशांनी ती परब्रह्माएवढी करावी, म्हणजे परब्रह्मास सर्व बाजूंनी पुरेल एवढी ती व्यापक करावी. म्हणजे ती अखेर नाहीशीच होईल. (४८)

**आपण प्रतीतीस आलें । करणें ते जालें सर्वहि ।।४९।। साधनें जें कांहीं साधावें । तें तों आपण स्वभावें । तेथें साधनाच्या नांवें । शून्याकार।।५०।। दशक नववा अति गहन । अपरोक्षें होय एकदां श्रवण । सहजस्थितीची बाणे खूण । साधका आंगीं ।।५१।। इंति श्री संकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्रीरामदासा।।५२।। दशक नववा समाप्त ।**

---

दहाव्या समासात अपरोक्ष ज्ञान सांगितले आहे. अपरोक्ष ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष अनुभवच होण्याचे ज्ञान. निर्गुण ब्रह्माशी एकरूप झाले पाहिजे. म्हणजे आपण तेच आहोत असा अनुभव आला पाहिजे. जे केल्याने जे काही मिळते ती वस्तू आपणच व्हावे असे सर्वच साधनांच्या आणि क्रियांच्या बाबतीत व्हावे. (४९) साधनांच्या साहाय्याने जे काही साध्य करावयाचे ते स्वाभाविकपणे आपणच असतो. तेव्हा साधनांच्या नावाने शून्य पडते (म्हणजे साधने करावी लागत नाहीत.) (५०) नववा दशक खूप खोल आहे. एकदा त्याचे अनुभवयुक्त श्रवण झाले की, साधकाच्या अंगी सहजस्थितीची खूण बाणते.(५१) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्री रामदासांना ती आवडणारी आहे.(५२) इथे नववा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) परम तत्त्व, प्रमाणानुरोधानें ठरलेला निर्णय. (२) वाच्यांशाचा त्याग झाल्यानंतर शेष राहिलेला अधिष्ठान - ब्रह्मात्मा (हंसकोश). (३) परब्रह्म. (४) **पाठभेद** - दशकांचें वेचे वेगळालें. (५) या सातहि संकेतांच्या व्याख्या आगमसारांत पुढीलप्रमाणे दिल्या आहेत. ''संग म्हणिजे मीपण । जें मुक्तपणाचें बंधन । तेंचि सांडिल्या वांचुन । संगत्याग कैचा ।।१४।। अहं ब्रह्म हे प्रतीति । तेचि त्रिपुटीतें दाविती । ते त्रिपुटी जेथें लया जाती । अधिष्ठान शेषत्वें (अधिष्ठान राहून) ।।१५।। दीपकापुरा मिळणी । कापुर जातां जळुनी । ज्योति काजळी दोन्ही । किमपि उरेना ।।१६।। तैंसें अज्ञान स्वानुभवज्ञानें । जाळुन आपण लया जाणें । अनुभवेंवीण जें का असणें । हाचि संगत्याग ।।१७।। मीपणासहित तूंपण गेलें । मी ब्रह्म हेंहि विरालें । उपरी जें नि:संग भरलें । हेंचि विज्ञान ।।१८।। मी देह कीं मी ब्रह्म । वृत्तीनें सांडिला हा भ्रम । केवळ ब्रह्मीं उपरम । हे विदेह-स्थिती।।१९।। जळीं जैसें कमळ भिजेना । आकाश वायूनें हलेना । वृत्तीविण तैसें आपणां । सदृढ केलें ।।२०।। संपूर्ण उपाधि असतां । परिपूर्ण असे अलिप्तता । हें चवथें लक्षण तत्वतां । समाधानाचें ।।२१।। जेसैं प्रारब्धें देह व्यापारे । तैसें वर्तेना का बा रे । होय नव्हे करणें सरे । हे सहजस्थिति ।।२२।। मन सांडून एकीकडे । आपण ओतप्रोत चहूंकडे । वृत्तिसहित मन बुडे । हेचि उन्मनी गा ।।२३।। ज्ञान नि:शेष हरपलें । अखंड परिपूर्णचि उरलें। यासींच विज्ञान बोलिलें । लक्षण सातवें ।।२४।। वृत्तिरहित जें समाधान । निवडुनियां ज्ञानाज्ञान । संकेत जे का भिन्नभिन्न । परी ते एकरूप ।।२५।। ११-१ आगम० (६) नित्यमुक्त जीवन्मुक्त । तिसरा तो विदेहमुक्त । स्वस्वरूप बद्ध ना मुक्त । मायायोगें बोलावें ।।१।। स्वइच्छेनें देह धरिले । ज्ञानसंपन्नचि प्रगटले । शिवादि नित्यमुक्त बोलिले । व्यापारा अलिप्त ।।२।। गुरुमुखें ज्ञानसंपन्न । तयांचीं दोन लक्षणें । एक ते जीवन्मुक्त जाण।

एक विदेहमुक्त ।।३।। वासनाक्षय दोहींपरी । स्वरूप अरूप निर्धारीं । सरूपें जीवन्मुक्ति वरी । विदेहमुक्ति अरूप ।।४।। सरूप तेंचि सविकल्प । तेंचि जीवन्मुक्ताचें रूप । विदेहमुक्त निर्विकल्प । अरूप जें का ।।५।। आगमसार १०-१. (७) सेवा, उपासना. **पाठभेद**-धैर्य. (८) विषयचिंतन मात्र सांडावें । चिदचित्तादात्म्य न व्हावें । मग दिसेना का स्वभावें । मृगजलापरि ।।४९।। हा सरूप वासनाक्षय । हाचि बापा मनोजय । सविकल्प समाधि होय । हाचि स्मृतिरूप ।।५०।। आगमसार १०-१. (९) महावाक्यांत सांगितलेल्या जीवब्रह्मैक्याविषयीं जो संशय त्यास 'असंभावना म्हणतात. तिचे दोन प्रकार-एक, प्रमाणासंभावना (जीवब्रह्मैक्यास प्रमाणभूत वेदवचनें जीवब्रह्मैक्यप्रतिपादक आहेत किंवा कर्मोपासनाप्रतिपादक, असा प्रमाणाविषयीं संशय); दुसरी, प्रमेयासंभावना (वेदान्तशास्त्राचें मुख्य प्रमेय जें जीवब्रह्मैक्य, त्याविषयी संशय) 'तूं ब्रह्म हें श्रुति बोले । बहुधा गुरुमुखें ऐकिलें । प्रतिबंधें असत्य वाटलें । हे असंभावना ।।३४।। आगमसार २-१. (१०) देहादिक सत्य आहेत, तसेंच जीवब्रह्माचा भेदहि सत्य आहे असें जें वाटतें, या सत्यत्वनिश्चयास 'विपरीतभावना' म्हणतात. या दोन्ही भावना परमानंद प्राप्तिरूप फलास प्रतिबंधक आहेत. 'मी किंचिज्ज्ञ मज कर्तेपण । ब्रह्म कैसा परिपूर्ण । हा विपर्यय याचें हनन । विचारचि करी ।।३५।। आगमसार २-१. (११) देहबुद्धीचा संबंध । तुटला अवघाचि खेद । जन्ममरण भवबंध । एकसरां गेले ।।९६।। ऐसा जाला शोकभंग ।। आगमसार ५-५. (१२) **पाठभेद**-उत्तरार्धीं (१३) उलाढाल (१४) परिपूर्ण. (१५) घोष, गर्जना, (स्वस्वरूपाविषयीं कल्पना यावी म्हणून श्रुतींनें त्यास नामें दिलीं) (१६) दुसरा समास. (१७) कल्पना. (१८) जुन्या तिन्हीं लेखी प्रतींत 'विवरोन' च पाठ आहे. तथापि दासबोध ९-२-३४ व २०-३-१ आणि कुबडी ८-२८ व १५-३० हीं स्थळें पाहतां येथें 'विरोन' असावेंसें वाटतें. (१९) तिसरा समास.(२०) चवथा समास. (२१) घर. (२२) तृप्त झाला. (२३) भाजलेल्या बीजास अंकुर येत नाहींत. इतरांस (न भाजलेल्यास) येतात, त्याप्रमाणें ज्ञानाग्नीनें ज्यांच्या वासना किंवा संकल्प नाश पावले ते ज्ञाते जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत सांपडत नाहींत. (२४) दुसऱ्याच्या शरीरांत प्रवेश करणें. (२५) संकुचित किंवा लहान झाला.

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक दहावा

**।। श्रीराम ।। आतां दहावा दशक । श्रवण करोत साधक । श्रवणद्वारां पाविजे येक। उन्मनी पद ।।१।। सर्व भूतीं आत्मा येकला । तरी भेद कां दिसून आला । त्या वचनाचे समाधानाला। प्रथमीं असे ।।२।। जाणीवरूप अंत:करण । एकचि असे संपूर्ण । बरें वाईट कल्पनागुणें । परि तें कल्पनेसी न कळे ।।३।। जाणीवरूपें पालन । जाणिव नेणिवेनें जन्म । सर्व नेणतां पावे मरण । हे तिन्ही देव येथेंचि ।।४।। ब्रह्मा विष्णु हर यांचा। महिमा अत्यंत पुराणींचा। आशय पाहतां स्वामीचा [१] । अभाव दिसे ।।५।। तरी माया कैसी जाली । वेदवाणी कोठोन आली । तिन्ही देवें स्थिति कैशी चालविली। हे आशंका केली दुसरियां ।।६।। शास्त्रीं जो पूर्वपक्ष [२] केला । पूर्वपक्ष म्हणावें लटक्याला। तथापि फेडूं आशंकेला । तृतीय समासीं ।।७।। स्वरूपीं माया कैसी जाली । हें तों पूर्वार्धी [३] बोलिली । येथेंहि बोलूं ऐकिली । पाहिजे श्रोतीं ।।८।। स्वरूपीं निश्चळ अवकाश । तेथें चळण वायोस । चळण जाणीव तयास । प्रकृति पुरुष म्हणती ।।९।।**

---

आता दहावा दशक साधकांनी श्रवण करावा. त्या श्रवणाने उन्मनी अवस्था प्राप्त होईल. (१) पहिल्या समासात असा प्रश्न उपस्थित केला आहे की, सर्व प्राणिमात्रांमध्ये जर एकच आत्मा असेल तर त्या प्राणिमात्रांमध्ये भेद का दिसून येतो ? त्यानंतर या प्रश्नाचे समाधान याच समासात केले आहे. (२) जाणीवरूप अंत:करण सर्व प्राणिमात्रांचे एकच आहे. त्यात बरे वाईट असा जो भेद दिसतो तो कल्पनेमुळे, पण कल्पनेला तो कळत नाही. (३) सर्व प्राणिमात्रांमध्ये जाणीवरूपाने पालन करणारा विष्णू, जाणीव आणि नेणीव यांच्या मिश्रणाच्या रूपाने जन्म देणारा ब्रह्मदेव आणि नेणिवेच्या रूपात संहार करणारा शंकर असे तीन देव असतात. (४) ब्रह्मा, विष्णू आणि हर यांचा महिमा पुराणांपासून चालत आला आहे. परंतु त्यांचा कर्ता कोण याचा विचार करता त्या कर्त्याचा अभावच दिसतो. (५) मग माया कशी निर्माण झाली, वेदवाणी कुठून आली, तिन्ही देवांची व्यवस्था कशी सुरू झाली, अशी आशंका श्रोत्याने दुसऱ्या समासात व्यक्त केली आहे. (६) शास्त्रांनी हा सर्व तपशील पूर्वपक्षात टाकला आहे. पूर्वपक्ष म्हणजे ज्याचे खंडन केले जाते असा खोटा पक्ष. असे असले तरी श्रोत्यांनी उभ्या केलेल्या आशंकांचे समाधान नंतर तिसऱ्या समासात केले आहे. (७) स्वरूपाच्या (ब्रह्माच्या) ठिकाणी माया कशी निर्माण झाली. याचे विवेचन दासबोधाच्या पूर्वार्धात, विशेषत: आठव्या दशकात करण्यात आले आहे. याही समासात त्या मायेचे निरूपण करू. श्रोत्यांनी ते ऐकावे. (८) स्वरूप हे निश्चळ आकाशासारखे आहे. तेथे वायूचे चलन होते. त्या वायूमध्येच चलन आणि जाणीव उत्पन्न होते. त्यालाच प्रकृति पुरुष असे नाव आहे. (९)

**तिन्ही गुण तेथें असती । महत्तत्व सांख्यवादी ह्मणती । तो प्रणवरूप वेद हे प्रतीति । मात्रासहित[४] जाणावी ।।१०।। पृथिवी आप तेज । द्विधाहि केलें सहज । देवता कैशा जाल्या हें गुज । चवथे समासीं ।।११।। जाणीवरूप जगज्ज्योती। तीमध्यें दैवतें असती । इच्छारूपें प्रगट होती । चतुर्भुजादिक ।।१२।। मग ब्रह्मदेवें प्रजा केल्या । चैतन्यें तों आधींच व्यापिल्या । ते चि विष्णूनें पाळण केल्या । संहारिल्या रुद्रानें ।।१३।। तया संहाराचें लक्षण । पांचविया निरूपण । दोन पिंडीं निद्रा मरण । आणि ब्रह्मांडीं दोन।।१४।। नित्य प्रळय ब्रह्मयाचा । तो संहार भौतिकाचा। भूतांसहित अंत प्रकृतीचा । या नांव महाप्रळय ।।१५।। असतां कल्पना सरे । त्यासी विवेक प्रळयहि उतरे[५] । तोचि साधून ज्ञानद्वारें। परब्रम्ह पावावें ।।१६।। आतां समास सहावा जाण । अति गहन निरूपण । संचलें ब्रम्ह परिपूर्ण । तेथें भ्रमरूप लयोद्भव ।।१७।। भ्रमेंवीण जे उमजले । ते पुरुष धन्य**

---

त्याच ठिकाणी सत्त्व, रज आणि तम असे तीन गुण असतात. सांख्यवादी त्यालाच महत्तत्त्व असे म्हणतात. तोच अ, उ, म आणि अर्धमात्रा यांनी बनलेला प्रणव म्हणजे ॐकार होय. वेद हा प्रणवरूपच आहे. (१०) चौथ्या समासात पृथ्वी, आप, तेज या तत्त्वांचे दोन दोन प्रकार कसे होतात हे स्पष्ट केले आहे. तेथेच देवतांच्या उत्पत्तीचे रहस्य स्पष्ट केले आहे. (११) सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी सामान्यरूपाने असणाऱ्या जाणिवेला जगज्ज्योती असे नाव आहे. तिच्यामध्ये सर्व देवता सूक्ष्मरूपाने असतात. त्यांना इच्छा होते तेव्हा त्या देवता चतुर्भुज, चतुर्मुख इ. रूपे धारण करून प्रगट होतात. (१२) मग ब्रह्मदेवाने सर्व प्रजा निर्माण केल्या, त्या प्रजा त्याआधीच चैतन्याने व्यापिलेल्या होत्या. त्या प्रजांचे विष्णू प्रतिपालन करतो आणि रुद्र त्यांचा संहार करतो. (१३) त्या संहाराचे पंचप्रलयाच्या स्वरूपात पाचव्या समासात वर्णन केले आहे. त्यातील दोन प्रलय निद्रा आणि मरण या स्वरूपात प्रत्येक पिंडात आढळतात. आणि नित्यप्रलय आणि महाप्रलय या दोन स्वरूपात ब्रह्मांडामध्ये होत असतात. (१४) नित्यप्रलय ब्रह्मदेव करत असतो. (ब्रह्मदेवाचा दिवस संपतो आणि रात्र होते तेव्हा सर्व सृष्टीचा संहार होतो. त्याचा दिवस सुरू होताच तो पुन्हा सृष्टी निर्माण करतो. सृष्टी आणि प्रलय यांचे चक्र सतत चालू असते.) या प्रलयात सर्व भौतिक सृष्टीचा संहार होतो. आता चौथा प्रलय म्हणजे महाप्रलय होय. त्या प्रलयात भूतांसहित प्रकृतीचाही अंत होत असतो. (१५) आता प्रकृतीचे अस्तित्व असतानाही कल्पनेचा नाश विचाराने केला जातो. त्याला विवेकप्रलय असे म्हणतात. हा विवेकप्रलय करून ज्ञानमार्गाने परब्रह्म प्राप्त करावे. (१६) आता सहावा समास समजून घेऊ. त्यामधील निरूपण अतिशय गहन आहे. ब्रह्म परिपूर्ण असून ते सर्वत्र व्यापून राहिले आहे. त्या ब्रह्मामध्ये उत्पन्न होणारे आणि नष्ट होणारे जे लयोद्भवरूप विश्व आहे. ते सर्व भ्रमरूप आहे. (१७)

**जाले । आतां भ्रमासि विस्तारिलें। बहुधा[६] समासीं ।।१८।। अवघें हें चराचर । तिन्ही लोक देव समग्र। कर्म उपासना मी तूं हें साचार[७] । वाटे या नांव भ्रम ।।१९।। सातवे समासीं निवेदिलें । ज्ञानियाच्या मागें[८] सामर्थ्य चाले । तें लोकीं भावार्थीं कल्पिलें । त्यासी[९] जन्म कैंचा ।।२०।। प्रसंगीं सद्गुरुभजन । सगुणीं असावें अनन्य । समुदायाचें संरक्षण । परमार्थ शोभे ।।२१।। आतां आठवे समासीं बोलिलें । निरूपण प्रतीतीनें पाहिजे घेतलें । प्रतीतीविण ठकविले । बहुतीं बहुत ।।२२।। पापाची खंडणा जाली । जन्मयातना चुकली । ऐसी प्रतीत स्वयें आली । म्हणिजे बरें ।।२३।। लटिकें बोले तो अधम । लटिकें मानी तो अधमोधम । प्रतीत पाहणें हा नेम । येथें केला ।।२४।। आतां बोलिजे नवविया । चळण जाणीव सांगितली माया[१०] । या दोन्हीनें व्यापिल्या सर्व काया । सुरनरपन्नगादि[११] ।।२५।। कर्मे पाविजे उंच नीच योनी । परि ज्ञानेंचि होय कर्माची हानि । ज्ञान होय सद्गुरुवचनीं। हा विचार हे समासीं ।।२६।। दहावे समासीं**

---

ज्या पुरुषांना या भ्रमाच्या पलीकडील ते ब्रह्मस्वरूप कळले ते पुरुष धन्य होत. इतरांना होणाऱ्या विविध भ्रमांचे विवरण या समासाच्या उर्वरित भागात केले आहे. (१८) हे संपूर्ण चराचर विश्व, यातील उत्पत्ती, परिपालन आणि संहार करणारे ते तीन देव; कर्म, उपासना, मी-तू असा भेद हे सर्व खरे वाटणे यालाच भ्रम म्हणतात. (१९) सातव्या समासात असे सांगितले आहे की, ज्ञानी माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या सामर्थ्याची सत्ता चालते. म्हणजे त्याच्या दैवी सामर्थ्याचा प्रत्यय येत राहतो. ते लोकांनी खरे मानले आहे, पण ज्ञानी माणसाला मृत्यूनंतर पुन्हा जन्म येणे कसे शक्य आहे ? (२०) त्या अनुषंगाने सद्गुरुभजन, सगुणोपासनेवरील अनन्य निष्ठा, संप्रदायाचे संरक्षण याद्वारें परमार्थ कसा पोसला जातो, हे सांगितले आहे. (२१) आठव्या समासात कोणतेही निरूपण हे प्रतीती आल्याखेरीज स्वीकारू नये असे सांगितले आहे. कारण आजपर्यंत विनाप्रतीतीचे प्रतिपादन करून पुष्कळांनी पुष्कळांना फसवले आहे. (२२) आपल्या पापाचे निरसन झाले आहे, आता आपल्या जन्मयातना संपल्या आहेत, अशी अंत:करणपूर्वक प्रचिती आली तर ते प्रतिपादन स्वीकारार्ह ठरेल. (२३) खोटे सांगणारा मनुष्य अधम असतो, आणि सत्याला खोटे मानील तो अधमाहूनही अधम समजावा. मुख्यत: प्रतिपादनाच्या खरेपणाची प्रचीती आली पाहिजे असा येथे दंडक घातला आहे. (२४) आता नवव्या समासाचा विषय सांगू. परब्रह्म निश्चल असून त्याच्या ठिकाणी अहंजाणिवेचे जे चंचल स्फुरण होते, ते माया असे समजावे. या दोहोंनी देव, मनुष्ये, सर्प इ. ची शरीरे व्यापलेली आहेत, असे तेथे सांगितले आहे. (२५) कर्माच्या (कर्मकांडाने) योगाने उच्च अथवा नीच योनीत जन्म मिळतो. पण ज्ञानानेच कर्माचा नाश होतो. आणि ते ज्ञान सद्गुरूंच्या उपदेशातूनच मिळते असा विचार त्या समासात सांगितला आहे. (२६)

**केवळ । परब्रह्म जें का निश्चळ । तेथें स्फुरणरूप जालें चंचळ । नाना प्रकारीं बोलिलें।।२७।। स्त्री पुरुष नपुंसक । नामें ठेविलीं अनेक । तनुचतुष्टयाचें [१२] कौतुक। आरंभी केलें ईश्वराचे ।।२८।। तो अंतरात्मा व्यापला । चालतो बोलतो जाणतो स्पर्शाला । सर्वां ठाईं पुरवला । परि तो अलिप्त।।२९।। क्षराक्षरासी [१३] सांडिलें । उत्तम पुरुषासी धुंडिलें । चंचळ सांडुनियां आलें । प्रत्यया निश्चळ ।।३०।। ऐसें प्रत्ययाचें बोलिलें । प्रत्ययेंवीण जें जें केलें । तें तें स्वप्नावारी गेलें । निरार्थक ।।३१।। दहावा [१४] दहाविया अति गहन । दृश्यपापाचें जालें खंडण । उरलें अखंडैकरसपूर्ण । त्यासी काय ह्मणावें ।।३२।। जाला दशक दहावा । केवळ अद्वैताचा ठेवा । मुमुक्षुसाधकीं सांठवावा । अंतरयामीं ।।३३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा।।३४।। दशक दहावा समाप्त ।।**

---

दहाव्या समासात निश्चळ अशा परब्रह्माच्या ठिकाणी जे स्फुरणरूप चंचल स्फुरण होते, त्याचे निरनिराळ्या प्रकारांनी वर्णन केले आहे. (२७) त्या स्फुरणाला स्त्रीवाचक, पुरुषवाचक अथवा तृतीय पुरुष वाचक (नपुंसकलिंगी) अशी अनेक नांवे दिली जातात. त्याच्या अगोदर याच समासाच्या १३ ते १५ या ओव्यांमध्ये ईश्वराच्या (म्हणजेच ब्रह्मांडाच्या) चार देहांचे कौतुक केले आहे. (त्यातील स्थूल देह विराट या नावाने ओळखला जातो. सूक्ष्म देह हिरण्यगर्भ या नावाने ओळखला जातो, कारण देह हा अव्याकृत या नावाने ओळखला जातो आणि महाकारण देह हा मूल प्रकृती या नावाने ओळखला जातो.) (२८) हा जो वैश्विक जाणीव, विश्वाचा अंतरात्मा, जगज्ज्योती या नावांनी ओळखला जातो. – तो सर्वत्र व्यापलेला असून तो विश्वाचे सर्व व्यवहार करतो. तो चालतो, बोलतो, स्पर्श जाणतो, सर्व काही करतो. पण तरी तो त्यातून अलिप्त असतो. (२९) गीतेच्या पंधराव्या अध्यायात सांगितलेल्या तीन पुरुषांपैकी क्षर (विनाशी सर्व भूते), अक्षर (जीवचैतन्य), या पुरुषांचा त्याग करून तिसऱ्या उत्तम पुरुषाचा (परब्रह्माचा) शोध घेतल्यावर चंचलाचा त्याग घडून निश्चल परब्रह्माचा प्रत्यय येतो. (३०) अशा प्रकारे अनुभवाच्या आधाराने हे सर्व सांगितले आहे. कारण अनुभवरहित असे जे काही आपण करू ते सर्व स्वप्नासारखे निरर्थक ठरते. (३१) दहाव्या दशकाचा हा दहावा समास अतिशय गहन असून त्यामध्ये दृश्यरूप पापाचे खंडन केलेले आहे. त्यानंतर जे काही अखंड, एकरस, पूर्ण असे तत्त्व शिल्लक राहते, त्याविषयी काय बोलावे ? त्याबाबतीत बोलणेच अशक्य होऊन जाते. (३२) असा हा दहावा दशक संपला. हा दशक म्हणजे अद्वैताचा ठेवाच आहे. मुमुक्षू आणि साधकांनी तो आपल्या अंत:करणात साठवून ठेवावा. (३३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (३४) इथे दहावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) कर्ता किंवा धणी त्याचा. (२) वादविवादांत एका पक्षानें केलेली आपल्या पक्षाची मांडणी. (३) मागील दशक आठवा पहा. (४) ॐ काराच्या अ,उ,म् या तीन व अर्धमात्रात्मक बिन्दु मिळून साडेतीन मात्रा. (५) प्रकृति असतांच ज्याची कल्पना मावळली त्याला विवेकप्रळयाचा अनुभव येतो. उतरे-सांपडतो, मिळतो (शेरभर लोण्याचें शेरभर तूप उतरलें.) (६) अनेक प्रकारें. (७) खरें. (८) मृत्यूनंतर. (९) ज्ञान्यास. (१०) **पाठभेद –** तया (११) देव, मनुष्य, सर्प वगैरे. (१२) विराट्, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूलप्रकृति हे ईश्वराचे चार देह दा. १०-१०-१३ ते १५ पहा. (१३) क्षर-विनाशी, सर्वभूतें; अक्षर-अविनाशी, कूटस्थ, जीवचैतन्य; उत्तम पुरुष-निर्विकार परमात्मा. (१४) दहाव्या दशकाचा दहावा समास.

### ।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक अकरावा

।। श्रीराम ।। येकादशाचा[१] निर्धार । येकादशां[२] करी एकाग्र। येका दशे[३] ये समग्र। श्रवणमननीं ।।१।। येथें अलिप्तपण बोलिलें। चंचळ निश्चळ निवडिलें । चंचळ जेणें जाणितलें । तो निश्चळ होय ।।२।। प्रथम समासीं मूळ संकल्पासी । चंचळ माइक येकदेशी। उत्पत्ति नाश सहभूतेंसी । अल्पमात्र दाविला ।।३।। कर्ता भोक्ता अंतरात्मा नाना विकारी जीवात्मा वाढवी मोडी महिमा । तो हा चंचळ ।।४।। प्राण अज्ञान वासना ऐक्य । ऐसें[४] चत्वारी जीवांचें कौतुक । अवघीयांसी जाणतें येक । जाणीव शोधितां निश्चळें[५]।।५।। श्रवण मनन केलेंचि करावें । चंचळ चक्र निघोन जावें । निश्चळ वस्तुरूप व्हावें । सारासार विचारें ।।६।। दुसरे समासीं उदंड[६] । नाना शास्त्रदेवांचे बंड । बळावलें बेचाड[७] । अनावर ।।७।। येक नाना प्रतिमा । अवतार आणि अंतरात्मा । चौथा

---

अकराव्या दशकाचा अभिप्राय जाणून घ्यायचा निर्धार असेल तर प्रथम दहा इंद्रिये आणि अकरावे मन यांना एकाग्र कर. म्हणजे या दशकाच्या श्रवण मनन यांमुळे तुझ्या शरीरातील सर्व तत्त्वे निश्चळ अशा एका स्थितीत येतील. (१) या दशकात अलिप्तपणाचे वर्णन केले आहे. चंचल आणि निश्चल या दोहोंतील भेद स्पष्ट केला आहे. ज्याला चंचल सृष्टीचे ज्ञान झाले तोच निश्चल अशा अवस्थेस प्राप्त करून घेऊ शकेल. (२) पहिल्या समासात मूळ संकल्प (अहं ब्रह्माऽस्मि किंवा सोऽहम्), येक देशी (विशिष्ट देश, काल यांशी निगडित) आणि मायिक अशी चंचल सृष्टी या सहजात तत्त्वांना जशी उत्पत्ती आहे तसाच नाशही आहे, हे थोडक्यात सांगितले. (३) करणारा आणि भोग घेणारा तो अंतरात्मा होय. जीवात्म्याला अनेक विकार असतात. तो कधी मोठेपणा वाढवितो, तर कधी त्याला उणेपणा आणतो. हा अंतरात्मा चंचलच (अस्थिर) असतो. (४) त्या जीवाचे प्राण, अज्ञान, वासना आणि ऐक्य असे चार भेद होतात. (जातो जीव तो प्राण । नेणे जीव तें अज्ञान । जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ।।दास.११.१.३४ ।। ऐक्य जीव तो ब्रह्मांश। जेथें पिंड ब्रह्मांडनिरास । येथें सांगतसे विशेष । चत्वार जीव ।। दास.११.१.३५ ।।) या सर्वांमध्ये एकच जाणते तत्त्व असते त्या जाणतेपणाचा शोध घेऊन त्याचा निरास करताच तेच तत्त्व निश्चळ ब्रह्म होते. (५) या ज्ञानाचे श्रवण मनन करावे. एकदा करून समजले नाही तर पुनःपुन्हा करावे. त्यायोगाने मनातील चंचल तत्त्वाचे चक्र नाहीसे होते. आणि आपण निश्चळ आत्मतत्त्वच होतो. यासाठी सारासार विचार (सदसद्विवेक) पाहिजे. (६) दुसऱ्या समासामध्ये निरनिराळी शास्त्रे आणि निरनिराळ्या देवता यांचा प्रचंड बुजबुजाट झाला आहे. तो अनावर झाला आहे. (७)

**निर्विकारी आत्मारामा । चौ[८] जीवांस चारी ।।८।। पंचीकर्ण[९] आणि सुवर्ण । परमार्थप्रपंचाचें साधन । दोन्ही विचारा सावधान । हें निरूपण तिसरा ।।९।। चंचळ अवलक्षण जाणावें। जातां निश्चळ स्थिरावें । सारासार निवडावें । चवथे समासीं ।।१०।। चंचळामध्यें ही वर्तणुक । सकळ कळा कौतुक । विचारें राजिक दैविक । करणें हा पांचवा ।।११।। महंतें[१०] शुद्ध वर्तावें । लोकांसी ही शिकवावें । परि अलिप्तपणें असावें । हें अवघें षष्ठमीं।।१२।। सातवे समासीं केवळ । नदीरूपें वर्णिलें चंचळ । परि निश्चळचि नदीचें मूळ । योजना समासीं पहा ।।१३।। चंचळ कदापि निश्चळेना । निश्चळ कदा चळेना । चंचळें चंचळ वोळखावें जाणा । निश्चळ होणें आठवा ।।१४।। जाणीव चंचळ देवाचें रूप । कळलें पाहिजे सर्व अल्प । अनन्यें निश्चळ आपेआप । होय हें नववे समासीं।।१५।।**

---

त्यांमध्ये निरनिराळ्या प्रतिमा, निरनिराळे अवतार, सर्व सृष्टीच्या अंतरंगात राहून सर्वांना जाणतो तो अंतरात्मा आणि चौथा निर्विकारी आत्माराम अशा चार प्रकारच्या उपास्य दैवतांचे चार प्रकार होतात. असे एकूण चार प्रकारचे जीव आणि चार प्रकारची दैवते होतात. (८) पंचीकरण आणि सुवर्ण ही अनुक्रमे परमार्थ आणि प्रपंच यांची साधने होत. या दोन्ही क्षेत्रात कसे साक्षेपाने आणि सावधानपणे वागावे याचे मार्गदर्शन तिसऱ्या समासात केले आहे. (९) चंचलप्रधान जीवन हे एक अवलक्षण समजावे. त्याचा त्याग करावा. चंचल जाताच निश्चळ ब्रह्मात्मैक्यबुद्धी स्थिरावते. या दोन्हीतील सार (ब्रह्म) आणि असार (चंचल अंतरात्मा) यांची निवड विचारपूर्वक कशी करावी हे चवथ्या समासात सांगितले आहे. (१०) चंचळ प्रपंचातही कसे वागावे, सर्व क्षेत्रातही कौतुकास्पद कामगिरी कशी करावी, राजकीय आणि पारमार्थिक क्षेत्रात विचाराने कसे वागावे हे पाचव्या समासात सांगितले आहे. (११) महंत म्हणजे समर्थांच्या दृष्टीने प्रापंचिक आणि पारमार्थिक या दोन्ही क्षेत्रात विचारपूर्वक कार्य करणारा कार्यकर्ता कसा असावा, त्याची वागणूक कशी असावी. त्याने लोकांस मार्गदर्शन कसे करावे आणि स्वत: मात्र अलिप्तपणे कसे वागावे, हे सर्व सहाव्या समासात आले आहे. (१२) सातव्या समासात चंचल अशा मायेचे नदीरूपाने वर्णन केले आहे. पण या मायानदीचा उगम निश्चळ अशा ब्रह्मापासूनच होतो. हे स्पष्ट केले आहे. हे सर्व या समासात पहावे. (१३) चंचळ हे कधीही ब्रह्मरूप होत नाही. तसेच निश्चळ परब्रह्म कधीही चंचलरूप (मायिक) होत नाही. चंचळाच्याच साहाय्याने चंचळाचे स्वरूप ओळखावे आणि आपण निश्चळ (परब्रह्मस्वरूप) व्हावे, हे आठव्या समासात स्पष्ट केले आहे. (१४) सर्वांच्या अंत:करणात वास्तव्य करणारा असा जो अंतरात्मा म्हणजेच चंचल देव आहे, त्याचे स्वरूप समजून घ्यावे. त्याची अनन्यभावाने सेवा करण्यानेच आपोआप निश्चळ अशा परब्रह्माची प्राप्ती होते. हे नवव्या समासात सांगितले आहे. (१५)

**अंतरात्मा न कळे आत्म्याविण । तैसेंचि महंतें असावें जाण । जनाच्या कर्तृत्वा विलक्षण[११]। होऊन शिकवण जनासी ।।१६।। दाही समासीं चंचळ । जीव शिव ब्रह्मांड सकळ । साधन साधक चंचळ । जातां समाधान ।।१७।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।१८।। ।। दशक ११ संपूर्ण ।।**

---

अंतरात्म्याचे अधिष्ठान आत्मा हेच असते. आत्म्यावाचून अंतरात्म्याचे आकलन होत नाही. पण आत्मा जसा अलिप्त असतो, तसेच महंताने असावे. सर्व जगाच्या व्यवहारातून तो अलिप्त राहून लोकांना शिकवत असतो. (हे दहाव्या समासात सांगितले आहे.) (१६) या दहाही समासात चंचल (माया) जीव, शिव आणि ब्रह्मांड यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यामध्ये साधक, त्याची साधना हे सर्व चंचळात जमा होते. हा सर्व भेद नष्ट होताच परम समाधान, ब्रह्मात्मैक्य प्राप्त होते. असे निरूपण आहे. (१७) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (१८) इथे अकरावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) अकराव्या दशकाचा. (२) दहा इंद्रियें व ११ वें मन यांस. (३) निश्चळ अशी एक अवस्था. (४) दास. ११-१-३४, ३५ पहा. (५) निश्चळ होतें, निवळतें. (६) पुष्कळ.(७) जुंबाड. (८) चार. (९) पिंडब्रह्मांडांतील प्रत्येक देहांत पंचभूतें कसकशीं असतात, यांचें ज्यांत विवरण असतें तें पंचीकरण. (१०) 'हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण । वर्तायाचें लक्षण' । ज्याचे आंगी आहे असा कार्यकर्ता. (११) लोकांच्या कार्याहून वेगळा. ' जो जनांमधें वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे ।' असा.

## ।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक बारावा

**।। श्रीराम ।। आतां बारावा ऐकिजे । सार तेंचि मानसीं धरिजे । निवेदन [1] येथें वोळखिजे । विचारवंतीं ।।१।। अंतरीं समाधान पावला । बाह्य प्रपंचीं [2] दिसे भला । प्रपंचीं [2] परमार्थ पाहिजे केला । पहावा पहिला समास ।।२।। सुख असावें सर्वांसी वाटतें। तरी शब्दें निववावीं समस्त भूतें । मग जगदांतर वोळतें । तें द्वितीय समासीं ।।३।। तिसरे समासीं भाविक अज्ञान । तेणें सद्गुरूसी दोन्ही गोष्टी पुसाव्या जाण । देव भक्त आपण शोधून । विवेकें पहावें ।।४।। दृश्य जड माया चंचळ । जड नासे वितुळे चंचळ। या दोहींचें अधिष्ठान निश्चळ । तोचि देव ।।५।। देहप्राणमनादि तत्वें । अहंपणें आपणचि वाटतें । शोधितां मावळतीं समस्तें । उरे जें का आपण ।।६।। उपाधि दोहींची निरसली। प्रतीत निरखून पाहिली । देवभक्तां मूस [3] जाली । तेचि निवृत्ति समाधान ।।७।। विवेकवैराग्य मिळालें । तरी महद्भाग्य हातां आलें। येकेविण एक आंधळे । तें बोलिलें चवथिया।।८।।**

---

आता बाराव्या दशकाचे श्रवण करा. त्यातील सार मनात धारण करा. आत्मनिवेदन हे बाराव्या दशकाचे सार आहे. हे विचारवंतांनी जाणावे. (१) आदर्श प्रापंचिक गृहस्थाला अंत:करणात समाधान प्राप्त झालेले असते. बाह्य प्रपंचातही तो भला म्हणून ओळखला जातो. प्रापंचिकाने प्रपंचात राहूनही परमार्थ केला पाहिजे. हा सर्व या दशकाच्या पहिल्या समासाचा विषय आहे. (२) सुख असावे असे सर्वांनाच वाटत असते. त्यासाठी गोड बोलून आजूबाजूच्या सर्व जीवांना प्रसन्न करावे. त्यामुळे भोवतालच्या सर्व जगाचे अंत:करण प्रसन्न होते. असे दुसऱ्या समासात सांगितले आहे. (३) तिसऱ्या समासात जो कोणी अज्ञानी असेल आणि भाविक असेल त्याने आपल्या सद्गुरूंना दोन गोष्टी विचाराव्यात – देव कोण आहे ? मी कोण आहे? या त्या दोन गोष्टी होत. आणि स्वत:ही देव आणि भक्त यांचा शोध घेऊन (त्यांचे स्वरूप जाणून घेऊन) विवेकाने पहावे. (४) दृश्य सृष्टी जड आहे. माया चंचल आहे. जडाचा नाश होतो. चंचळ वितळून जाते. पण या दोन्ही गोष्टी जेथून निर्माण झाल्या ते त्यांचे अधिष्ठान असलेले ब्रह्मतत्त्व मात्र निश्चल असून अविनाशी आहे, तोच देव आहे. (५) आपल्याला देह, प्राण, मन इ. तत्त्वे अहंकारामुळे आपणच आहोत असे वाटते. नीट शोध घेतल्यानंतर वरील सर्व तत्त्वे नष्ट होणारी असून जे शिल्लक राहते तेच आपण होत हे जाणावे. (६) देव आणि आपण या दोन्ही तत्त्वांना ज्या उपाधी चिकटल्या आहेत, त्या जर वेगळ्या केल्या, स्वत:चा अनुभव निरखून पाहिला तर देव आणि भक्त हे दोन्ही एकच आहेत, हे लक्षात येते. हे ज्ञान होणे हीच निवृत्ती आणि तेच समाधान होय. (७) विवेक आणि वैराग्य यांची जेव्हा एके ठिकाणी गाठ पडते, तेव्हा मोठे भाग्यच हाताशी येते. पण वैराग्यावाचून विवेक आणि विवेकावाचून वैराग्य अशी एकमेकावाचून निराळी असतील तर ती दोन्हीही आंधळी होत, असे चवथ्या समासात सांगितले आहे. (८)

**पांचवें समासीं सूक्ष्म विचार । प्रणव ब्रह्म येकाक्षर । जेथून बावन मातृकांचा [४] विस्तार । औट [५] मातृका जया ठाईं ।।९।। अष्ट [६] शरीर निरसावे । चंचळ वारे सारावे । निश्चळ परब्रह्म पावावें । आत्मनिवेदनें ।।१०।। पदार्थ अवघे देवाचे । चंचळ करणें हि देवाचें । मीपणेंवीण निश्चळाचे । निवेदनाचे प्रकार तीन ।।११।। सहावा निश्चळाचे ठाईं । उत्पत्तीची दाविली नवाई [७] । येणें रीतीं संहारहि । मूळमायेसहित।।१२।। आणि निरूपण प्रसंगें केलें । पुस्तकज्ञानें ज्ञान नाहीं जालें । गुरुमुखें प्रतीतीनें घेतलें । तरीच समाधान।।१३।। सातवे समासीं ज्ञान पावून । भ्रष्टाकारें यथेष्टाचरण । इच्छेसारिखें करिती जाण । त्याचें खंडण वैराग्यमिषें ।।१४।। विषयत्यागेंविण परमार्थ । ह्मणे तयाचें जिणें व्यर्थ । अरे जो समर्थांचा समर्थ । तोहि वैराग्य संरक्षी ।।१५।। ज्ञाता ह्मणे नागवा [८] काय । नागवा ह्मणे प्रापंचिका ज्ञान काय । परस्परें निंदिती अपाय । परी ते दोन्ही खोटे ।।१६।। त्यागात्याग**

---

पाचव्या समासात सूक्ष्म विचार सांगितला आहे. ॐकार हे एकाक्षर ब्रह्म आहे. त्यापासून बावन्न मुळाक्षरांचा विस्तार झाला. प्रणवाच्या अ, उ, म आणि बिंदू अशा साडेतीन मात्रा आहेत. (९) पिंडाची चार आणि ब्रह्मांडाची चार अशी आठ शरीरे सांगितली जातात. (स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण ही पिंडाची चार शरीरे आणि विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत आणि मूलप्रकृति ही ब्रह्मांडाची शरीरे होत.) त्यांचे निरसन करावे. माया म्हणजे चंचल वारा, त्यास दूर सारावे. आणि आत्मनिवेदनाच्या द्वारे (आपण ब्रह्माशी एकरूप आहोत अशा अनुभवाच्या द्वारे) निश्चल परब्रह्माची प्राप्ती करून घ्यावी. (१०) सर्व जड पदार्थ देवाचेच आहेत. चंचल म्हणजे माया. तिची निर्मितीही देवाचीच कृती, मीपणारहित ब्रह्माच्या आत्मनिवेदनाचे जड, चंचल आणि निश्चल असे तीन प्रकार होत. या तिहीतही मीपणाचा त्याग घडावा लागतो. (११) सहाव्या समासात निश्चल अशा ब्रह्मापासून सृष्टीची उत्पत्ती कशी होते याचे नवल स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर मूळमायेसहित या सर्व सृष्टीचा संहारही कसा होतो हे ही सांगितले आहे. (१२) आणि निरूपणाच्या ओघात हे ही स्पष्ट केले की, पुस्तके वाचून ज्ञान होत नसते, ते गुरुमुखाने श्रवण केले, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला तरच ते श्रेष्ठ समाधान प्राप्त होते. (१३) सातव्या समासात ज्ञान प्राप्त झाल्यानंतरही भ्रष्ट, स्वैर, मनाला येईल तसे आचरण काहीजण करू लागतात. अशांचे खंडन करून वैराग्याचे महत्त्व तेथे सांगितले आहे. (१४) विषयत्यागावाचून परमार्थ करता येतो, असे जो म्हणतो त्याचे जिणे व्यर्थ होय. अरे, जो सर्व समर्थांचा समर्थ आहे, असा महादेवसुद्धा वैराग्याचे पालन करतो. (१५) ज्ञाता म्हणवणाराने नंग्या गोसाव्याची निंदा करावी, आणि नंग्या गोसाव्याने प्रापंचिक ज्ञानाची हेटाळणी करावी, असे ते एकमेकांची निंदा करतात, परंतु ते दोघेही खोटे होत. (१६)

**जाणितले । वादवेवादरहित जाले । मग नागवे अथवा नेसले । वेगळे जाले विचारें।।१७।। आठवे समासीं काळ वर्णिला । परि तो चंचळाकडे लागला । ऐसा जेणें विचार केला । तो पावला स्थितीतें[९] ।।१८।। मग प्रारब्ध भोगवी देहातें । प्रपंचीं अथवा फिरो काननातें[१०]। नाशिवंत जाणोनि चंचळातें । मनें पदार्थातें त्यागिले ।।१९।। हीनबुद्धि जे करंटे जन । त्यासी सत्संग आणि प्रयत्न । बुद्धि विशदे[११] पावे समाधान । हेंचि लक्षण नवविंयां।।२०।। आतां समास दहावा । ज्ञात्याचे शिकवणीस बरवा । तृप्ति पावूनि जनां सर्वां । ज्ञान शिकवावें ।।२१।। मग प्रसंग पडे जैसा । आचरून उपदेश तैसा । जन लावावे बहुवसा[१२]। परमार्थासी ।।२२।। प्रबोधशक्ति[१३] उत्तम क्रिया । हे असे पासीं जया । शोधित येती पुरुषा तया । समुदाईलोक ।।२३।। असो बारावा जाला संपूर्ण । विवेकवैराग्ययुक्त गहन। श्रवणमननें समाधान। साधकजन पावती ।।२४।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।२५।। दशक १२ समाप्त ।।**

---

त्याग म्हणजे काय, अत्याग म्हणजे काय हे ज्यांना समजले आहे, आणि जे वादविवादापासून अलिप्त राहिले, असे खरे ज्ञानी लोक नंग्या साधूच्या वेषात असोत की, वस्त्रे परिधान केलेले असोत, ते विवेकाच्या बळावरच भिन्न ठरतात. (१७) आठव्या समासात काळाचे वर्णन केले आहे. परंतु काळ हा फक्त चंचळाला लागू आहे. (निश्चळाला तो लागू नाही.) असा विचार ज्याने केला तोच आत्मस्थितीला पोहोचतो. (१८) प्रारब्धामुळे देहाला बरेवाईट भोग भोगावे लागतात. मग तो माणूस प्रपंचात असो की, अरण्यवासी असो. जे जे चंचल आहे ते नाशवंतच आहे हे जाणून तो मनानेच पदार्थांचा त्याग करतो. (१९) परंतु जे अल्पबुद्धी आणि करंटे असतील त्यांना संतसंग आणि प्रयत्न हीच साधने सांगितली आहेत. त्यायोगे बुद्धी स्वच्छ होऊन त्यांना समाधान प्राप्त करता येते. हेच नवव्या समासात सांगितले आहे. (२०) आता दहावा समास ज्ञात्यांनी शिकवायला चांगला आहे. त्यांनी आपण स्वत: तृप्ती मिळवून बाकीच्या लोकांना ज्ञान शिकवावे. (२१) मग प्रसंग येईल त्याप्रमाणे स्वत: आचरण करून लोकांस उपदेश करावा आणि पुष्कळ प्रकारांनी लोकांस परमार्थमार्गास लावावे. (२२) प्रबोधशक्ती म्हणजे उपदेश करण्याचे सामर्थ्य आणि उत्तम आचरण हे ज्याच्यापाशी आहे, त्या पुरुषाचा शोध करीत गटागटाने लोक येत राहतात. (२३) अशा प्रकारे बारावा दशक पूर्ण झाला. विवेक आणि कडक वैराग्य, श्रवण आणि मनन यांच्या साहाय्याने साधक समाधान प्राप्त करून घेतात. (२४) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२५) इथे बारावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) आत्मनिवेदन हें बाराव्या दशकाचें सार आहे हें विचारवंतांनीं जाणावें. (२) प्रापंचिकाने प्रपंचांत बाह्यत: राहून परमार्थ केला पाहिजे. (३) मुशींत आटल्याप्रमाणें एकरूप झाले. (४) मूळाक्षरें. (५) साडेतीन मात्रा (प्रणवाच्या). (६) पिंडांतील चार व ब्रह्मांडांतील चार असे आठ देह. (७) नवल, चमत्कार. (८) नंगा गोसावी. (९) आत्मस्थितीप्रत. (१०) अरण्यांत. (११) स्पष्टपणें. (१२) पुष्कळ प्रकारें. (१३) जेणेंकरून बहुतांस भक्ति घडेल व अनेकांचें मनोगत हातीं येईल असा उपदेश करण्याचें सामर्थ्य.

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## दशक तेरावा

**।। श्री ।। आतां तेरावा अति सुंदर । जो का साधकाचें माहेर। विदेहस्थिति तत्पर। होऊन ऐका ।।१।। प्रथम समासीं सविस्तर । आत्मानात्मविचार [१] । देहात्मयोगें व्यवहार। सर्व करी।।२।। जड तितुकें नाशिवंत । चंचळ तें जाणावें नित्य । अष्ट काया ओलांडुनि हेत [२] । स्फूर्तिरूपें राहिला ।।३।। त्यासी पाहिजे सारासार । दुसरे समासीं हा विचार । हेत[२] तो जाणिजे विकार । कीं नाश आहे ।।४।। त्या हेतुसीच ह्मणिजे ज्ञान । तया नांव उपासन । हें कर्तृत्वलक्षण [३] । बोलती वेदान्ती ।।५।। स्फुरणरूपें हेतु [२] असार । जाऊन उरे तेचि सार । वस्तुतंत्र [३] निर्विकार । विचारवंत जाणती ।।६।। सद्रूप चिद्रूप तद्रूप । स्वस्वरूप ह्मणिजे आपुलें रूप । आपुलें रूप तें अरूप । तत्वनिरसनाउपरी ।।७।। आतां**

---

आता तेराव्या दशकाला आरंभ होत आहे. तेरावा दशक अतिशय सुंदर आहे. तो साधकांसाठी माहेरघरच आहे. विदेहस्थिती प्राप्त करू इच्छिणाऱ्यांनी तत्परतेने त्याचे श्रवण करावे. (१) पहिल्या समासात आत्मा आणि अनात्मा यांचा सविस्तर विचार केला आहे. देह जड असून आत्मा चंचल आहे. देह आणि आत्मा हे दोघे परस्परावलंबी असून ते दोघे एकमेकांच्या सहकार्याने सर्व व्यापार करतात. (२) जड जेवढे म्हणून आहे ते सर्व नाशिवंत आहे. म्हणून पृथ्वीवरील सर्व प्रकारचे देह नाशिवंत आहेत. देहाच्या तुलनेने त्यामध्ये वावरणारे चंचल आत्मतत्त्व हे नित्य समजावे. ते पिंडाचे चार देह आणि ब्रह्मांडाचे चार देह ओलांडून पलीकडे जाणारे आहे. देहात जे चंचलत्व भासते तीच स्फूर्तिरूप जाणीव होय. हाच चंचलात्मा होय. देह आणि हा जाणीवरूप चंचलात्मा यांचा परस्पर संबंध पाहणे हाच नित्यानित्यविवेक होय. (३) त्यातील नित्य ते सार आणि अनित्य ते असार ओळखणे हा सारासार विचार होय. मूळमायेच्या ठिकाणी जी जाणीवरूप चंचलवृत्ती आहे तीही जाणारी म्हणजे विकार पावणारी आहे. म्हणजे तिला नाश आहे. जे विकार पावते त्याला नाश आहे, हे त्यातील सूत्र आहे. (४) ही जी जाणीव आहे तिलाच ज्ञान म्हणतात. हीच उपासना होय. ती कर्तृतंत्र असते. असे वेदान्ती लोक सांगतात. कर्तृतंत्र म्हणजे त्रिपुटी राखून प्राप्त केलेले ज्ञान. ते शुद्ध ज्ञान नसते. वस्तुतंत्र ज्ञानामध्ये त्रिपुटीचा अभाव असून उपासक आणि उपास्य यांच्यात पूर्ण अद्वैतभाव असतो. तेच खरे शुद्ध ज्ञान होय. (५) मूलस्फुरणातील चंचल जाणीव ही असार असून ती नष्ट झाल्यानंतर जे निखळ ब्रह्मतत्त्व उरते तेच खरे सारतत्त्व होय. ते वस्तुतंत्र असते. ते निर्विकार असते. विचारवंतांना या सारअसारांचे ज्ञान असते. (६) त्यालाच सद्रूप, चिद्रूप, तद्रूप असे म्हणतात. तेच आपले खरे रूप आहे. म्हणूनच त्याला स्वरूप असेही म्हणतात. आपले रूप म्हणजे शरीरातील सर्व तत्त्वांचा निरास झाल्यानंतर जे आपले रूप उरते ते होय. ते अरूप असते. (७)

**तृतीय समासीं पूर्ण । दाविला आदिनारायण । निश्चळीं संकल्पाचें चळण । त्यासींच बोलिजे ।।८।। त्यापासून गुण भूतें । स्थावर जंगम भौतिकें समस्तें । संकल्पजीवनीं[४] उत्पन्न होतें । अनुभवीं पहावें ।।९।। चवथे समासीं सर्व संहार । मूळमायेसी लय साचार। उरलें जें का निर्विकार । केवळ ब्रह्म ।।१०।। उत्पत्तिस्थितिसंहारलक्षण । केलें काहाणीचे रूपकानें । जे प्रकृतिपुरुषापासोन । सत्वगुण तो पुत्र ।।११।। रज नातू तम पणतू। वंश विस्तारला बहुतु । शेवटीं सर्वांचा अंतु । हें निरूपण पांचविया।।१२।। पंचभूतें नाशिवंत। सार जाणिजे शाश्वत । अनित्य देहादि समस्त । नित्य आत्मा सहाविया ।।१३।। सातवे समासीं केवळ । जड कर्पूर आत्मा अनळ[५] । उपाधीयोगें हा चंचळ। तैसाचि होतो।।१४।। जो जो पदार्थ आठवावा । तदाकार आत्मा व्हावा । निश्चळ आठवितां भावा[६] । निश्चळचि होतो ।।१५।। आठवे समासीं कोण कर्ता । लटिका त्याची लटिकी वार्ता । साचपण वंध्यासुता । तेणें मत्स्य मृगजळीं केले ।।१६।। नववीया देहात्मयोग ।। तेणें**

---

आता तिसऱ्या समासात मूलसंकल्परूपी आदिनारायणाचे दर्शन घडविले आहे. निश्चल ब्रह्माच्या ठिकाणी जो आद्य संकल्प निर्माण झाला त्यालाच आदिनारायण म्हटले आहे. (८) त्यापासून गुण आणि पंचभूते निर्माण होतात. त्यांच्यापासून स्थावर आणि जंगम अशी सर्व प्रकारची सृष्टी निर्माण होते. ही सर्व सृष्टी त्या आद्यसंकल्परूपी जलातून निर्माण होते. हे सर्व अनुभवाने पहावे. (९) चवथ्या समासात या सृष्टीचा शेवट (म्ह. संहार) कसा होतो ते सांगितले आहे. त्यात त्या मूळमायेचाही लय होतो, हे सत्य आहे. ह्या संहारानंतर जे निर्विकारी केवल तत्त्व उरते तेच ब्रह्म होय. (१०) पाचव्या समासात सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती आणि संहार यांचे कहाणीच्या रूपकाच्या साहाय्याने वर्णन केले आहे. त्यामध्ये प्रकृतिपुरुषापासून सत्त्वगुण हा पुत्र, रजोगुण हा नातू आणि तमोगुण हा पणतू हे कसे निर्माण झाले, त्यांचा वंश कसा वाढला, आणि शेवटी त्या सर्वांचा अंत कसा झाला इ. निरूपण केले आहे. (११) आणि (१२) पंचभूते नाशिवंत आहेत. सारभूत तत्त्व हे शाश्वत असते. देह इ. सर्व सृष्ट पदार्थ अनित्य असून आत्मा तेवढा नित्य आहे. इ. निरूपण सहाव्या समासात केले आहे. (१३) सातव्या समासात जड तत्त्वाला कापूर म्हटले आहे. आणि आत्म्याला अग्नी म्हटले आहे. उपाधीच्या योगाने हा चंचल आत्मा (जीवात्मा) ही उपाधीसारखाच होतो. अग्नीही कापराप्रमाणे जळून नष्ट होतो. (१४) जो जो पदार्थ आपण आठवतो त्यासारखाच हा चंचल आत्मा होतो. त्याने कल्पनेने निश्चलाचे (ब्रह्माचे) स्मरण केले तर तोही निश्चल (ब्रह्मरूप) होतो. (१५) आठव्या समासात सृष्टी आणि ब्रह्मांडाचा कर्ता कोण असा प्रश्न उपस्थित केला आहे. अनेकांनी आपापल्या उपास्याची कर्ता म्हणून कल्पना केली आहे. पण ही उपास्येही खोटी आणि त्यांचे कर्तृत्वही खोटेच होय. वंध्यापुत्राला जेवढे खरेपण असते तेवढेच खरेपण या कल्पनांना असते. वंध्यापुत्राने मृगजळात मासे निर्माण केले असे सांगण्यासारखे ते आहे. (१६)

**व्यापार होय सांग [७] । होतां एकमेकां वियोग । दोन्हीहि आटती ।।१७।। दाहावीया समासीं । एक जीवन [८] सर्वांसी । सेवितां अमृत-विषासी । दोन कार्यें भिन्न होती ।।१८।। तैसी येकात्मता आघवी । परि उंच नीच परी जाणावी । आपण स्वयें अभ्यासावी । आणि शिकवावी जनातें ।।१९।। आधीं जड सांडावें। मग चंचळ वोलांडावें [९]। मग आपेंआप स्वभावें । निरंजन[१०]।।२०।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।२१।। दशक तेरावा समाप्त.**

---

नवव्या समासात देह अणि आत्मा यांच्या संयोगाने व्यापार पूर्ण होतो असे सांगितले आहे. या दोघांची फारकत करताच दोघेही नष्ट होतात. असे सांगितले आहे. (१७) दहाव्या समासात एकच पाणी अमृताबरोबर घेतले आणि विषाबरोबर घेतले तर ही दोन्ही कार्ये भिन्न भिन्न होतात, असे सांगितले आहे. (१८)त्याप्रमाणे सर्व जीव एकसारखेच आहेत. असे मानले तरी त्या जीवांजीवांमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ भेद असतोच. तो ओळखावा. देहांत राहणारा आत्मा, देह हा अनात्मा, त्या दोहोंहून निराळा श्रेष्ठ असा परमात्मा, या सर्वांमध्ये आत्मा असला तरी त्या सर्वांमध्ये सारखेपणा आहे असे कसे म्हणता येईल ? राजापासून रंकापर्यंत सर्वच माणसेच आहेत. पण त्या साऱ्यांची एकच पदवी कशी मानता येईल? (१९) त्याप्रमाणे सर्वांमध्ये एकात्मता आहे हे मान्य पण त्यांच्यामध्ये श्रेष्ठ, कनिष्ठ प्रकार आहेतच. तो भेद आपण जाणून घ्यावा आणि इतरांसही शिकवावा. (१९) प्रथम जडाचा त्याग करावा. मग चंचलाचा त्याग करावा (चंचल ओलांडून पलीकडे जावे.) म्हणजे आपोआपच निरंजन अशा परब्रह्माची प्राप्ती होईल. (२०) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२१) इथे तेरावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) श्रीदासबोध द. १३ स. १ व २ यांचें तात्पर्य येथें २ तें ७ ओवी पर्यंत सांगितलें आहे. दृश्य जड व अनित्य असून त्यांत जें चंचलत्व भासतें तीच स्फूर्तिरूप जाणीव. हें ओळखणें-अनुभवानें पटवून घेणें हा आत्मानात्म विवेक होय. या नंतर सारासार विचार; जडाच्या सापेक्षतेनें स्फूर्ति नित्य वाटली तरी चंचळ भासते; चंचलत्व नाशिवंत आहे. त्याचें अधिष्ठान जी सत्यवस्तु तेंच अविनाशी प्ररब्रह्म. (२) कल्पना. (३) भेद जरी त्रिपुटीचा । उरे साध्यसाधकाचा । तैसाचि ज्ञेयज्ञात्याचा । साधन ज्ञानें होय ।।५।। हें **कर्तृतंत्रलक्षण** । जों काल राहे अनुसंधान । तों काल राहे समाधान । सुस्वानुभवीं ।।६।। जया समाधि उत्थान । तें ह्मणूं नये शुद्ध ज्ञान । विचारें होय जो अभिन्न । तें ज्ञान **वस्तुतंत्र** ।।८।। आगमसार ७-१. (४) जीवन - पाणी, अस्तित्वाचें साधन. (५) अग्नि. (६) कल्पना. (७) पूर्ण. (८) पाणी. (९) पाठभेद-वोळखावें. (१०) परब्रह्म (जनचि नाहीं । तें निरंजन).

।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक चवदावा

**।। श्रीराम ।। चवदा विषय[१] चवदाकरणें[१] । भिन्न भिन्न चवदांचे करणें[२] । श्रवणें पावती विज्ञान । चवदावे दशकीं ।।१।। पहिला समास अति सुरस । नाना शिकवण साधकास । निरोपिलें त्यागात्यागास । शिकतां स्थिति बाणे ।।२।। सर्व उपाधी सांडावी। येक भिक्षा अंगिकारावी । स्वतंत्र स्थिति असावी । दुसरे समासीं।।३।। आतां कवित्व जरी करणें । तरी प्रास्ताविक वर्णनें । धीट पाठ त्यागणें । हें लक्षण तिसरीया ।।४।। चवथे समासीं मातृकांस[३] । वर्णिल्या असती चवतीस[४] । सोळा अकारादि वर्णांस। अंतर्भूत केलें ।।५।। दोनी[५] तरी गुप्त असती । ऐशी बावन्नांची गणती । शोधावया शब्दप्रतीति । रूपकें केलीं ।।६।। हरिकथा कैसी करावी । पंचम समासीं आघवीं । सकळ इंद्रियें लावावीं। येका पंथें ।।७।। जैसा देह आपुला । तैसेंचि मानावें सर्व भूतांला। उत्तम गुणें शृंगारला । अंतरापासून ।।८।। बाह्य देहास शृंगारिलें । तें कोणाचे उपेगा**

---

चौदा प्रकारची इंद्रिये (पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, आणि चार अंत:करणचतुष्टय) आणि त्यांचे चौदा प्रकारचे विषय या सर्वांचे कार्यही भिन्न भिन्न प्रकारचे आहे. या सर्वांच्या चवदाव्या दशकातील निरूपणाचे श्रवण केल्याने विज्ञान (अनुभवाधिष्ठित अपरोक्ष ज्ञान) प्राप्त होते. (१) त्यातील पहिला समास अतिशय गोड असून त्यात साधकासाठी वैविध्यपूर्ण शिकवण सांगितली आहे. त्यात त्याग अणि अत्याग यांचे स्वरूप सांगितले आहे. ते शिकल्याने (आत्मसात् केल्याने) ब्रह्मात्मैक्याची स्थिती अंगी बाणते. (२) दुसऱ्या समासात सर्व उपाधींचा त्याग करावा, भिक्षावृत्तीचा स्वीकार करावा, आणि स्वतंत्र स्थितीत रहावे, असे प्रतिपादन केले आहे. (३) कवित्व करावयाचे असेल, तर प्रास्ताविक वर्णने, धीट (मारुन मुटकून बळेच केलेले) कवित्व, पाठ (दुसऱ्यांचे अनुकरण करून केलेले) कवित्व यांचा त्याग करावा आणि प्रासादिक (देवाच्या प्रसन्नतेने भरलेले सर्वांनी नावाजण्याजोगे) कवित्व करावे. हे तिसऱ्या समासात सांगितले आहे. (४) चौथ्या समासात चौतीस मातृकांचे (मूळाक्षरांचे) वर्णन केले आहे. (पण या समासात प्रत्यक्षात एकूण पस्तीस मातृकांचा उपयोग केला आहे.) त्याचबरोबर त्यांच्यामध्ये सोळा अकारादी स्वरांचाही समावेश केला आहे. (अशा एकूण एक्कावन्न मातृका होतात.) (या ओवीतील माहितीत काहीतरी घोटाळा झाला आहे. चौतीस + सोळा मिळून पन्नास मातृका होतात. आणखी दोन मातृका गुप्त आहेत. त्या मातृका म्हणजे सोऽ हं या मातृका होत. असे हंसराजस्वामींचे मत दिसते.) (५) दोन मातृका गुप्त आहेत. अशी एकूण मातृकांची संख्या बावन्न होते. त्यांतून शब्दांचा अनुभव यावा म्हणून कीर्तनाच्या रूपकाची योजना केली आहे. (६) पाचव्या समासात हरिकथा कशी करावी हे सांगितले आहे. एका हरिकथेमध्येच सगळी इंद्रिये गुंतवावी लागतात. (७) आपला देह ज्याप्रमाणे आपल्याला प्रिय वाटतो, त्याचप्रमाणे सर्व प्राणिमात्रही प्रिय वाटले पाहिजेत. आणि उत्तम गुणांनी आपला देह अंतर्बाह्य सजवला पाहिजे. (केवळ दृश्यदेहच सजवू नये.) (८)

**आलें। अंतर जेणें शृंगारिलें । तेणें रक्षिलें बहुतां।।९।। जाला समास साहवा । अति सुरस सातवा । प्रपंचीं पावे ज्ञानवैभवा । तरी तो गृहस्थ धन्य जाला ।।१०।। ज्ञान पावोन प्रपंच त्यागिला । तरी तोहि धन्य जाला । ज्ञान नसतां निघून गेला। तो निंदिला परोपरी ।।११।। पुढें गुरुत्व ब्राह्मणाचें । गेलें राज्य हातींचें । म्हणूनियां खेदाचें । निरूपण केलें ।।१२।। आठवे समासीं ध्यान वर्णिलें । तें प्रतीतीस पाहिजे आलें । दृश्य सांडून मन राहिलें। आत्मत्वीं नेमस्त ।।१३।। ऐसें न करितां मूर्ति । आठवितां होय फजिती । तेथें लटक्याच बोंबा घालिती । लोकिकार्थे ६।।१४।। ध्येय आत्मा ध्यान आत्मा । ध्यानीं धरी तोहि आत्मा । सहजीं अनयासें या वर्मा । कळलें पाहिजे ।।१५।। नववे समासीं विज्ञान। तेंचि ऐका सावधान । पंचभूतें जालीं निर्माण । तेथेंचि नासती।।१६।। दृश्यचि सत्य वाटलें । तें ज्ञान विपरीत बोलिलें । कांहीच नोळखितां पावलें । अज्ञान ऐसें ।।१७।। जडास जो चेतविता । सगुण अंतरात्मा तत्वता । ओळखी तयाची होता । त्या नांव ज्ञान ।।१८।।**

---

बाहेरच्या देहास सजविले तर तो देह कोणाच्या उपयोगी पडेल ? पण ज्याने आपले अंतरंग उत्तम गुणांनी सजवलेले असते, तो अनेकांचे रक्षण करू शकतो. (९) असा हा सहावा समास झाला. आता सातवा समास अतिशय सुंदर आहे. प्रपंचात राहूनही ज्ञानाचे वैभव ज्याला भोगायला मिळते तो गृहस्थ धन्य होय. (१०) ज्ञान प्राप्त झाल्यानंतर ज्याने प्रपंचाचा त्याग केला तो मनुष्य धन्य झाला असेच म्हणावे लागेल. पण ज्ञान झाले नसतानाच संसार टाकून जो निघून जातो, त्याची पुष्कळ निंदा होते. (११) त्यापुढे ब्राह्मणांकडे गुरुत्व आले असताना सुद्धा त्यांच्या हातचे राज्य निघून गेले, त्याबद्दल वाटत असलेल्या खेदाचे वर्णन आले आहे. (१२) आठव्या समासात ध्यानाचे वर्णन आले आहे. त्याचा अनुभवाने प्रत्यय आला पाहिजे. ध्यानामध्ये सर्व दृश्याचा त्याग करून मन आत्म्यावर स्थिर केले पाहिजे. (१३) असे न करता केवळ मूर्तीचेच ध्यान करावयाचे ठरविले तर फजिती होते. आणि लोकांमध्ये प्रसिद्धी मिळावी म्हणून ध्यानाच्या खोट्या गप्पाच मारल्या जातात. (१४) वास्तविक पाहता ध्यानाचे मुख्य केंद्र आत्मा हेच असले पाहिजे. ध्यानही आत्म्याचेच घडले पाहिजे. अणि ध्यान करणाराही आत्माच व्हायला हवा. ध्येय, ध्याता आणि ध्यान ही सर्व त्रिपुटी आत्ममयच झाली पाहिजे. हे ध्यानाचे स्वाभाविक रहस्य कळले पाहिजे. (१५) नवव्या समासात विज्ञानाचे वर्णन आहे ते लक्षपूर्वक ऐका. पंचभूते जेथून निर्माण होतात ती पुन्हा तेथेच आपल्या उत्पत्तिस्थळातच नष्ट होतात. (१६) ज्या ज्ञानाने दृश्य विश्व सत्य वाटू लागते, त्याला विपरीत ज्ञान म्हणावे. त्या ज्ञानाने सत्याची ओळख न होताच अज्ञानच पदरात पडते. (१७) जड देहांस जो चैतन्य देतो, त्यांच्याकडून क्रिया करवितो, तो खरे पाहता सगुण अंतरात्मा आहे. त्याची ओळख होणे त्याला ज्ञान म्हणतात. (१८) पण त्या ज्ञानाचे विज्ञानात रूपान्तर करायचे असेल तर आपण निर्गुणाच्या ध्यानावर एकनिष्ठ राहिले पाहिजे. याबाबतीत भीड धरली तर आपल्याच परमार्थाची हानी होते. (१९)

**परि तें ज्ञान व्हावया विज्ञान । पाहिजे निर्गुणीं अनन्य । येथे भिडेनें होय हनन [७] । निज परमार्थाचें ।।१९।। भीड मायेची सांडावी । वृत्ति निवृत्ति करावी । तरी ते साध्यरूपा पावावी । विज्ञान भक्ति।।२०।। शेवटीं दशम समासीं । वंध्या कुमारी मायेसी । वर्णिली नाना दृष्टान्तेसी । ते मृगजळमीनाची [८] साऊली ।।२१।। छाया पडिली अंधारांत ।। जन्मांध तियेतें पाहत । मुका कथा असे सांगत । बहिरा तेथें श्रवणार्थी ।।२२।। असें जाले समास दहा । चवदाव्याचे अर्थ पहा । इंद्रियसमुदाय येथें हा । एकाग्र जाला ।।२३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा।।२४।। दशक १४ समाप्त.**

---

म्हणून माया आणि मायिकाची भीड टाकावी. वृत्तीचे रूपांतर निवृत्तीमध्ये करावे. तरच आपले साध्य असलेली विज्ञान भक्ती प्राप्त होते. (२०) शेवटच्या दहाव्या समासात निरनिराळ्या दृष्टान्तांच्या साहाय्याने भ्रमरूप, खोट्या असंभवनीय अशा मायेचे वर्णन केले आहे. ती वंध्याकुमारी आहे. मृगजळातील माशाच्या अंधारात पडलेल्या सावलीप्रमाणे आहे. (२१) अंधारात पडलेली सावली जन्मांध पहातो, मुका माणूस ही कथा सांगत आहे. आणि बहिरा माणूस श्रोता होऊन ती कथा ऐकत आहे. या सर्व असंभवनीय गोष्टी होत. माया ही तशीच असंभवनीय आहे. (२२) असे हे चौदाव्या दशकातील दहा समास आहेत. त्यांचा अर्थ लक्षात घ्या. सर्व इंद्रियांचा समूह येथे एकाग्र झाला पाहिजे. (२३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेत कुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२४) इथे चौदावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें आणि मन, बुद्धि, चित्त, अहंकार हे अंतःकरणचतुष्टय मिळून १४ करणें-इंद्रियें, त्यांचे १४ विषय. श्रोत्र (शब्द), त्वचा (स्पर्श), नेत्र (रूप), रसना (रस),नाक (गंध), गुद (विसर्जन), उपस्थ (आनंद), हस्त (आदान), पाय (गमन), वाक् (भाषण), मन (संकल्पविकल्प), बुद्धि (निश्चय), चित्त (चिंतन), अहंकार (अहंकर्तृत्व). ही चौदा इंद्रियें व त्यांचे १४ विषय होत. (२) कार्य. (३). मूळाक्षरांस. (४) सध्यांच्या उपलब्ध व अधिकृत अशा दासबोधाच्या प्रतींत या चौथ्या समासाच्या ३५ ओंव्या असून क पासून क्ष पर्यंत ३५ वर्ण आहेत. ज्ञ तेवढा नाहीं. कुबडीच्या जुन्या तिन्ही प्रतींत 'चवतीस' च आहे.(५) शके १८२९ च्या मुद्रित प्रतींत 'चवतीस' बद्दल 'छत्तीस' आहे. ३६ व्यंजनें +१६ स्वर मिळून ५२ अक्षरें, त्यांत चौतीस व्यंजनांत सोळा स्वर अंतर्भूत धरल्यास ५० अक्षरें होतात. दोन अक्षरें राहतात, तीं 'सो' व 'हं' होत असें श्रीहंसराज स्वामींनीं मानल्याचें या स्थळावरून व पुढील द. १७.११ वरून दिसतें; त्यांचा उच्चार वैखरीनें न होतां श्वासोच्छ्वासांत होतो म्हणून त्यांस गुप्त म्हटलेंसे दिसतें. पण दा. १४.४ मध्यें ३५ मूळाक्षरांच्या ३५ ओव्या आहेत. श्रीहंसराज स्वामींचे पोथींत दा. १४.४ च्या चवतीसच ओंव्या होत्या असें मानल्याखेरीज या ठिकाणचें शंकानिरसन होत नाही. (६) श. १७८० चे शाहूनगर प्रतींत १५ वी ओंवी १४ चे जागीं व १४ वी १५ चे जागीं आहे. (७) घात, नाश. (८) मृगजळांतील माशाची अंधारांत पडलेली सावली जन्मांधानें पाहिली, मुका तिचें वर्णन करतो व बहिरा ऐकतो हें सर्वच जसें असंभवनीय, तशीच मायाहि अत्यंत असंभवनीय होय.

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## दशक पंधरावा

**श्रीराम समर्थ ।। दशक तरी पंधरावा । पंधरा[१] पैलिकडे ठेवा। संग[२] त्यागितां आघवा । जुना ठेवा सांपडे ।।१।। पहिले समासींचा अनुवाद । अहंपणाचा जावा भेद । आपण शाहणा हा मद । सर्वांसी वाटे ।।२।। असत्याचा साभिमान । धरी तो नव्हे कां अज्ञान । त्यासी हा जनींजनार्दन । वशीकर्णे वोळे कैसा ।।३।। तरी सत्य तें शोधून घ्यावें। असत्य जाणून त्यागावें । इहपर सुखी असावें । आणि सुखी करावे विश्वजन[३] ।।४।। ऐका समास दुसरा। जो प्रस्तावी[४] श्रोत्याचे अंतरा । ब्रह्मज्ञानाचे अधिकारा । नरतनु निर्मिली ।।५।। कितेक कितेका ठाईं आटले[५] । कांही राजकारणीं गेले । कित्येक मता वरपडे[६] जाले । तें बोलावेना।।६।। कितेक कर्मी[७] आणि उपासनीं[८] । कथाश्रवणीं दांभिक भजनी । कितेक अभिमानज्ञानीं । गुंतोनि राहिले ।।७।। इतुकें सांडून प्रत्ययज्ञाता। विरळा निघे तत्वतां । त्यासी देखों न शके आतां । कर्मी उपासक शब्दज्ञानी ।।८।। असो**

---

आता पंधरावा दशक सुरू होत आहे. तेव्हा पाच ज्ञानेन्द्रिये, पाच कर्मेन्द्रिये आणि पाच विषय या तत्त्वांना दूर ठेवा. त्यांचा सहवास पूर्णपणे टाळा. म्हणजे मग ब्रह्मात्मैक्याचा जुना ठेवा तुम्हाला सापडेल. (१) पहिल्या समासाचा विषय असा आहे की, प्रथम अहंकारामुळे जो भेद निर्माण होतो. तो प्रथम गेला पाहिजे. आपण शहाणे आहोत असा गर्व सर्वांनाच वाटत असतो. (२) असत्याचा जो अभिमान धरतो तो अज्ञानी नव्हे का ? त्या माणसावर जनताजनार्दन वशीकरणासारख्या कृत्रिम उपायांनी कसा प्रसन्न होईल ? (३) तेव्हा सत्य काय ते शोधून त्याचा स्वीकार करावा, असत्याचा त्याग करावा आणि इहलोकांत आणि परलोकांत दोन्हीकडे सुखी व्हावे आणि विश्वातील सर्व लोकांना सुखी करावे. (४) आता दुसरा समास ऐका. तो श्रोत्यांच्या अंत:करणात पश्चात्ताप उत्पन्न करतो. माणसाचे हे शरीर त्याने ब्रह्मज्ञानासाठी योग्य अधिकारी व्हावे म्हणून निर्माण केले आहे. (५) पृथ्वीवरील कित्येक माणसे निरनिराळ्या कामात गुंतून पडलेली आहेत, काही राजकारणात गुंतलेली आहेत, काहीजण आपापल्या मतांमध्ये गुरफटून गेली आहेत. ... हे सर्व प्रकार सांगता येणार नाहीत. (६) कित्येक कर्ममार्गाने जाणारे आहेत. काही उपासना मार्गाचा अवलंब करणारे आहेत, काही कथा श्रवणात तर काहीजण दांभिक भजनात अडकून पडले आहेत. तर काही ज्ञानाच्या अभिमान धरून बसले आहेत. (७) या सगळ्या मार्गांचा त्याग करून ज्ञानाचा आत्मप्रतीतीने अनुभव घेणारा अपवादानेच निर्माण होतो. कर्ममार्गी, उपासक (भक्तिमार्गी), शब्दज्ञानी असे लोक त्याला पाहूसुद्धा शकत नाहीत. (८)

**तया महापुरुषाचें लक्षण । समासान्त[९] केलें कथन । प्रत्यय बोलोन करी समाधान । कोठें अटक ठेविना ।।९।। सर्व लोक राजी राखिले । कितेक भजनीं लाविले । कितेक ज्ञानें पावन केले । प्रस्तावले[१०] कितेक ।।१०।। ऐसी कीर्ति करून जावें । तरीच जन्मालागिं यावें । जालें निरूपण आघवें । दुसरे समासींचें ।।११।। तिसरे समासीं रूपक । करूनि दाविला विवेक । पंचीकरण भूतभौतिक । ह्या दुरस्त[११] फौजा ।।१२।। येक सिंहासनीं राजा । साक्षित्व[१२] प्रधानत्व हे समजा । राजाज्ञेनें चालती वोजा[१३] । भूत भौतिकें ।।१३।। जेथें जाणिव अधिक । तेथें चेतला[१४] आत्मविवेक । तेचि वडील ज्ञानी लोक । येर[१५] अभाविक करंटे ।।१४।। आतां समास चवथीयातें । पदार्थमात्र पृथिवीस मिळतें । आपतेजादि महाभूतें । गुणादि समस्तें लया जाति ।।१५।। जड आटोन चंचळ विरालें । पूर्वपक्षी[१६] जालें सिद्धान्तीं बुडालें । पक्षातीत जें संचलें । परब्रह्म तें ।।१६।। पांचवे समासीं निरूपण । पांच भूतें तीन गुण । वर्तती दोघांचे[१७] आज्ञेनें । परी ते येकरूप।।१७।।**

---

अशा त्या महापुरुषाचे वर्णन या समासाच्या शेवटी केले आहे. तो माणूस आपल्या अनुभवाच्या बळावर सर्वांचे समाधान करतो. आणि स्वत:मात्र कुठेच अडकून पडत नाही. (९) तो सर्व लोकांना संतुष्ट ठेवतो. कित्येकांना आपल्या भजनी लावतो, कित्येकांना ज्ञान सांगून पावन करतो. कित्येकांना त्याच्यामुळे कृतकर्मांचा पश्चाताप होतो. (१०)अशी कीर्ती करून जाता आले पाहिजे. तरच जन्माला यावे असे हे दुसऱ्या समासातील निरूपणाचे स्वरूप आहे. (११) तिसऱ्या समासात रूपकाच्या साहाय्याने विचार मांडला आहे. पंचीकरण, पंचभूते, भौतिक जग ही सर्व दोन्ही बाजूच्या फौजा होत. (१२) त्यांच्या मधोमध एका उंच सिंहासनावर राजा बसला आहे. साक्षी अंतरात्मा हा त्याचा प्रधान आहे. ही सर्व भूते आणि भौतिके राजाज्ञेत चांगल्या प्रकारे वागत आहेत. (१३) जेथे सर्वांत जास्त जाणीव आहे तेथेच ज्वलंत आत्मविवेक असतो. जे जाणीवसंपन्न असतील तेच ज्ञानसंपन्न वडीलधारे लोक होत. बाकीचे सामान्य करंटे लोक होत. (१४) चवथ्या समासात सर्व सृष्ट पदार्थ शेवटी पृथ्वीला येऊन मिळतात. आप (जल), तेज (अग्नी), आदि सर्व महाभूते, गुण (सत्त्व, रज, तम) इ. सर्व काही पृथ्वीमध्येच लय पावतात असा विचार मांडला आहे. (१५) जड आटून गेले, चंचल विरून गेले हे सर्व पूर्वपक्षात (म्हणजे मिथ्यारूप पक्षात) जमा होते. म्हणजे जे दिसते ते सत्य आहे हा झाला पूर्वपक्ष आणि दिसते ते सर्व मिथ्या आहे. हा झाला सिद्धान्त पक्ष. पूर्वपक्ष सिद्धान्त पक्षात बुडून जातो आणि या दोन्ही पक्षांच्या पलीकडे असून जे सर्वत्र घनदाट भरलेले आहे ते परब्रह्म होय. (१६) पाचव्या समासात असे निरूपण केले आहे की, पंच महाभूते, तीन गुण हे प्रकृतिपुरुषांच्या आज्ञेत वागतात. ते (प्रकृती आणि पुरुष) दोन असले तरी एकच आहेत. (१७)

**येक असतां फुटी पडिली । फुटी असून स्थिति येकली । नाना झाडांची रूपकें केलीं । नाना योनी ।।१८।। या इतुकियांत आत्मा चंचळ । चंचळद्वारां व्हावें निश्चळ । चंचळ येकदेशी सकळ । वितळोन जातें ।।१९।। सहावा चातुर्यलक्षणें [१८] । मूर्खांआंगीं बाणतीं जाण । लेहूं वाचूं शिकणें । अर्थासहित।।२०।। चारी [१९] रेखेसी ओलांडावें । मुख्य निश्चयासी पावावें । आणि धूर्तपणें असावें । जेथें तेथें ।।२१।। सातविया प्रपंच वाढला। तो वेलीरूपकें वर्णिला । अचंचळीं निर्माण जाला । चंचळ तें मूळ त्याचें।।२२।। पुढें उदंड विस्तारला । कोठें हिरवा कोठें वाळला । कोणे काळीं आघवा बुडाला । पुन्हा जाला उत्पन्न ।।२३।। त्यांत स्मरण आणि विस्मरण । ते स्मरणेंचि हरपती [२०] जाण । स्मरणें वेलाचें मूळ खंडोन । टाकी तो ज्ञाता ।।२४।। आठवे समासीं आघवे । नाना योनी नाना जीवे । तितुकें कैसें विवरावें । अंतरांतील न कळे ।।२५।। म्हणोनी ज्ञानाभिमान सांडावा । विवेकें देव धुंडावा। माइक [२१] स्वभाव आघवा । ज्ञातृत्वाचा [२२] ।।२६।।**

---

एक असूनही त्यांच्यात भेद आहे. आणि भेद असूनही त्यांची स्थिती एकरूपच आहे. अनेक झाडांची रूपके करून सर्व जीवसृष्टीचे वर्णन केले आहे. जीवसृष्टीतील अनेक योनींचे स्वरूप स्पष्ट केले आहे. (१८) या सर्वांमध्ये एकच चंचळ तत्त्व आहे ते म्हणजे अंतरात्मा होय. या चंचल तत्त्वाच्या मार्गाने निश्चलाकडे जावे. संपूर्ण चंचल तत्त्व कितीही व्यापक असले तरी ते एकदेशी (मर्यादित व्याप्तीचे) असते. ते शेवटी वितळून जाते म्हणजे नष्ट होते. (१९) सहाव्या समासात अर्थासहित लिहायला, वाचायला शिकल्याने मूर्खांच्या अंगीसुद्धा चातुर्यलक्षणे कशी बाणतात हे सांगितले आहे. (२०) भाग्याच्या चार रेखा आहेत. उत्तम, मध्यम, कनिष्ठ आणि अदृष्टाची गुप्त रेखा या त्या रेखा होत. त्या रेखा ओलांडाव्यात आणि मुख्य ध्येय गाठावे. आणि आपण सर्वत्र धूर्तपणाने रहावे. (२१) सातव्या समासात वेलाच्या रूपकाने वाढत गेलेल्या सृष्टीच्या प्रपंचाचे वर्णन केले आहे. हा वेल निश्चल अशा परब्रह्मापासून निर्माण झाला असून चंचल माया हे त्याचे मूळ होय. (२२) ह्या वेलाचा नंतर पुढे खूप विस्तार झाला. तो कोठे हिरवा झाला, कोठे वाळून गेला, कधी काळी तर तो संपूर्ण नष्ट झाला. पण नंतर पुन्हा उत्पन्न झाला. (२३) त्यातही स्मरण विस्मरणाचा प्रकार आहे. स्मरण म्हणजे आपल्या ब्रह्मरूपाचे स्मरण अथवा ज्ञान, विस्मरण म्हणजे अज्ञान, स्मरणरूप ज्ञानाने जीव जन्ममरण हरवून बसतात. त्या ज्ञानाच्या साहाय्याने त्या वेलाचे मूळ जो तोडून टाकतो तोच ज्ञाता होय. (२४) आठव्या समासात जीवसृष्टीचा वैविध्यपूर्ण विस्तार सांगितला आहे. जेवढ्या योनी आहेत तेवढे जीव आहेत. त्यांचेही अनेक प्रकार आहेत. त्या सर्वांचे वर्णन करणे अशक्य आहे. पुन्हा अंतराळातही जीवसृष्टी आहे. त्या सर्वांचे वर्णन कसे करावे, हे कळत नाही. (२५) म्हणून ज्ञानाचा अभिमान टाकून द्यावा, आणि विचाराने देवाचा शोध घ्यावा. सर्व ज्ञातेपणाचा स्वभावच मायिक आहे. ज्ञान म्हणजे जाणीव, ती मायिक म्हणजे मिथ्या आहे. (२६)

**नवव्यात जे जे प्राणिया उत्पत्ति । ते ते उदका पासून होती । भौतिकां वडील जगती [२३] । तिसी वडील आप ।।२७।। जेथें तेज वायु आकाश । अंतरात्मा वडील सर्वांस । तेचि [२४] उपासना हव्यास । धरितां अष्टधा निरसे ।।२८।। दहावे समासीं बोलिलें । आकाशी जें जें निर्माण जालें । तें आकाशासवें तगले [२५] । हें तों घडेना ।।२९।। उदक वायु पसरे । अंतरात्मा अधिक पसरे । पसरूनि निश्चळीं विरे। त्या नांव शक्तिपात[२६] ।।३०।। अलक्ष लक्षासहित आटला । आटले पणाचा हेत गेला । विकार सांडून मिळाला । निर्विकारीं।।३१।। या नांव बीज भाजलें । उगवेना ऐसें जालें । यावरी भजनमार्गासी वाढविलें [२७] । उत्तीर्णते[२८] कारणें ।।३२।। एवं जाला पंधरावा दशक । जो निरंजनाचा पाइक [२९] । श्रवणमननें पावे येक । जुनें ठेवणें ।।३३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।३४।। दशक १५ समाप्त ।।**

---

नवव्या समासात जे जे प्राणी उत्पन्न होतात, ते सर्व उदकापासूनच उत्पन्न होतात असे सांगितले आहे. सर्व भौतिकांपेक्षा पृथ्वी मोठी आहे. तिच्याहीपेक्षा आपाचा विस्तार अधिक मोठा आहे. (२७) अशाच क्रमाने तेज, वायू, आकाश ही उत्तरोत्तर मोठी आहेत. पण या सर्वांपेक्षा अंतरात्मा मोठा आहे. त्याची उपासना हीच खरी उपासना, तिचा हव्यास घेतला असता अष्टधा प्रकृतीचा निरास होतो. (२८) दहाव्या समासात असे म्हटले आहे की, आकाशापासून जे जे निर्माण झाले ते ते आकाशाबरोबर टिकून राहिले असे होत नाही. (२९) उदक व्यापक आहे. त्याहून वायू व्यापक आहे. पण त्याहूनही अंतरात्मा अधिक व्यापक आहे. या सर्व शक्ती पसरत जातात आणि आपणाहून वरिष्ठ अशा तत्त्वात विलीन होतात. तशा त्या विलीन होता होता शेवटी परब्रह्मात लय पावतात त्याला शक्तिपात असे म्हणतात. (३०) अलक्ष्य असा परमात्मा त्याचे चिंतन करणाऱ्या चित्तासहित जेव्हा आटतो, तेव्हा आटलेपणाची कल्पनाही मावळते. ती सर्व विकार सोडून निर्विकारी ब्रह्मामध्ये विलीन हाते. (३१) यालाच बीज भाजले असे म्हणतात. ते भाजल्यानंतर पुन्हा उगवत नाही. हे सर्व ज्ञान उपासनेच्या योगाने प्राप्त झाले. म्हणून उपासनेचे उपकार फेडले पाहिजेत. त्या उपकारांचे उतराई होण्यासाठी उपासना वाढवावी. ही ज्ञानोत्तर उपासना यासाठी आवश्यक आहे. (३२) अशा प्रकारे हा पंधरावा दशक पूर्ण झाला. तो निरंजन अशा ब्रह्माची वाट दाखवणारा सेवकच आहे. त्याच्या श्रवणमननाने आपले जुने ठेवणे (ठेवा) प्राप्त होते. (३३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (३४) इथे पंधरावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) कर्मेंद्रिये ५ + ज्ञानेंद्रिये ५ + विषय ५ ही पंधरा बाजूस ठेवा. दुसरा अर्थ-पंधरें-उत्तम सोनें, त्यापेक्षाहि पंधरावा दशक हा महत्त्वाचा ठेवा आहे. (२) मी पणा व पूर्व चरणांतील इंद्रियादि पंधरा या सर्वांचा. (३) सर्व लोक. (४) प्रस्तावी-उत्पन्न करतो. (५) गुंतून पडले. (६) सांपडले, प्राप्त झाले. (७) कर्म मार्गांत. (८) उपासना मार्गांत. (९) समासाच्या शेवटापर्यंत. (१०) पश्चात्ताप पावले. (११) दोन्ही बाजूंना, दुतर्फा. (१२) एक-मूळपुरुष हा राजा व साक्षित्व हा प्रधान असा येथील आशय दिसतो आणि दास.१५-३-२ यांवरील टिपेंत श्री समर्थभक्त नानासाहेब देव यांनी 'साक्षी हा राजा' ह्मटलें आहे. (१३) चांगल्या प्रकारें (१४) **पाठभेद**-घेतला. (१५) इतर. (१६) पूर्वपक्ष - जग दिसतें तें सत्य आणि सिद्धान्त - दिसतें तें मिथ्या. या दोन्ही पक्षांत न अडकलेलें परब्रह्म सर्वत्र घनदाट भरलेलें आहे. (१७) प्रकृतिपुरुषांचे. (१८) या सहाव्या समासांतील पहिल्या चार ओव्यासंबंधींचा कुबडीकार व श्री दासविश्रामधामकार या दोघांचा अभिप्राय एकच दिसतो. तथापि गूढार्थदीपिकाकारांनीं सुचविलेला अध्यात्मपर अर्थ व्यापक व गूढ अशा श्रीसमर्थवचनांत नसेलच असें ह्मणतां येणार नाही. (१९) दा.१५-६-७ यांतील अदृष्टींच्या गुप्त रेखेचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे तीन प्रकार येथें न मानतां कुबडीकारांनीं या तीन व चवथी अदृष्टींची गुप्त रेषा अशा चार रेषा मानिलेल्या दिसतात. (२०) हरवतात, नाहीसे होतात. (२१) मिथ्या. (२२) ज्ञातेपणाचा. (२३) पृथिवी. (२४) सर्वांस वडील अंतरात्मा देव त्याची उपासना हीच खरी उपासना, तिचा हव्यास (उत्कट इच्छा, छंद) घेतला असतां अष्टधा प्रकृतीचा निरास होतो. (२५) टिकलें. (२६) आप, वायु, अंतरात्मा या शक्ती पसरत पसरत आपणाहून वरिष्ठ अशा तत्त्वांत लीन होतां होतां शेवटीं निश्चळ परब्रह्मात लय पावतात, त्याचें नांव शक्तिपात. (२७) पाठभेद - बोलिलें. (२८) उतराई होण्यासाठीं. (२९) सेवक.

**।। श्रीरामसमर्थ ।।**

## दशक सोळावा

**।।श्रीराम ।। सोळावा चंद्र सोळा कळा । म्हणिजे आल्हादकारक सकळां । श्रवणमननीं वोळा[1] । अधिष्ठानीं मनाचे।।१।। येथें साधका स्थिति बाणे । स्तवनमिषें[2] गुण घेणें । तैसा तैसा अभ्यास करणें । धैर्यबळें साधकीं ।।२।। प्रथम समासीं वाल्मिक वर्णिला । धैर्यबळें बहुयुग बैसला । तैसें धैर्य असो साधकाला । कल्पकोटी ।।३।। सूर्य म्हणिजे ज्ञान । उदय अस्तु सूर्यालागुन । नसे तैसेंचि साधकाचें समाधान । राहो हे द्वितीयीं।।४।। तिसरा पृथिवी वर्णिली । जे परम शांत सदा पिकली । तैसीच शांति साधका स्थिरावली । पाहिजे स्थिती ।।५।। आप म्हणिजे गोड शीतळ । तैसेंचि साधकें असावें निर्मळ । वचन गोड शीतळ । वर्णिलें चौथियां ।।६।। सर्वभक्षक प्रकाशक । तेज तैसा असावा साधक । सर्व ग्रासून उरला एक । हें पांचवे समासीं ।।७।। सर्वत्रीं गमन परि अडकला । वायु कोठें नाहीं देखिला । तैसा सर्वीं असोन वेगळा जाला । साधकहि तैसा।।८।। प्रसंगें वर्णिला मारुती । तो साह्य असो साधकाप्रती । मागें पुढें आदि अंतीं।**

---

आता सोळावा दशक पाहू. चंद्राच्या कला सुद्धा सोळाच असतात. त्या जशा सर्वांना आल्हाद देणाऱ्या असतात, त्याप्रमाणे हा सोळावा दशक देखील आल्हादकारक आहे. त्यामुळे आता मनाच्या अधिष्ठानावर त्याचे श्रवण, मनन, करण्याकडे वळा. (१) या दशकाच्या श्रवण, मननामुळे साधकाला समाधि स्थितीची प्राप्ती होते. त्याची स्तुती करण्याच्या निमित्ताने साधकांनी त्यातील गुण स्वीकारावेत, त्यानुसार अंगी धैर्य धरून त्यांचा सराव करावा. (२) पहिल्या समासात वाल्मीकी ऋषींचे वर्णन केले आहे. अंगी धैर्य धरून तो कित्येक युगे नामस्मरण करीत बसला. तसे साधकाच्या अंगीदेखील कोट्यवधी कल्पांपर्यंतचे धैर्य असो. (३) सूर्य म्हणजे ज्ञान, सूर्याला उदय अस्त नसतात. तसे साधकाचे समाधान देखील उदयास्तविरहित असो, असे दुसऱ्या समासात म्हटले आहे. (४) तिसऱ्या समासात पृथ्वीचे वर्णन केले आहे. पृथ्वी अतिशय शांत स्वभावाची असून नेहमी सुफलित असते. तशीच साधकांच्या अंगीही शांत वृत्ती स्थिरावली राहो, तशी स्थिती साधकालाही प्राप्त होवो. (५) पाणी गोड आणि थंड असते. त्याप्रमाणेच साधकानेही निर्मळ असावे. त्याचे बोलणेही गोड आणि शीतल म्हणजे शांती देणारे असावे, असे चौथ्या समासात म्हटले आहे. (६) तेज म्हणजे अग्नी जसा सर्वभक्षक आणि प्रकाशक असतो, त्याप्रमाणेच साधकही सर्व मायिक गिळंकृत करून एकटा एक उरलेला असावा. हे पाचव्या समासात व्यक्त केले आहे. (७) वायूचे सगळीकडे जाणे असते. पण तो कोठेही अडकलेला दिसत नाही. तसा साधकही सर्वांच्यामध्ये असून अलिप्त असावा. (८)

**हें निगुती[३] साहवा ।।९।। आकाश म्हणिजे अंतरात्मा । ज्याचा न कळे महिमा। सर्व व्यापून अलिप्त[४] वर्मा । कळलें पाहिजे ।।१०।। साधकें तयासी वोळखावें । त्यावीण दृश्यासी त्यागावें । व्यापकपणें असावें । हें आघवें सातवा।।११।। आठवे समासीं उपासना । आत्मारामचि सर्व जाणा[५]। कर्ता भोक्ता ज्ञाता ज्ञाना । द्रष्टा साक्षी तोचि तो।।१२।। नवमे समासीं निरूपण । श्रोतीं आशंका केली जाण । सर्व देवांसी म्हणती निर्गुण । उपासक ज्या देवाचे ।।१३।। आपुले आपणासी थोर । परी पाहिला पाहिजे विचार । नाना लोकांचा प्रकार । बुद्धिभेद न करावा ।।१४।। कोणीं कोठेंहि ठेविला भाव। तेथें असें आत्मा देव । आत्म्याविण रिता ठाव । कोठेंचि नाहीं ।।१५।। दहावे समासीं निरूपण । पंचभूतें आणि त्रिगुण । यांची व्यवस्था करून । विल्हेनें[६] लाविली।।१६।। तयांमध्यें तिन्ही काळ । पृथ्वी पिके सर्वकाळ । तरीच वांचती सकळ । प्राणीमात्र।।१७।। सर्वांसी आत्मा चालवी । तेचि उपासना जाणावी । सहज परी करावी । आश्रयासाठीं।।१८।।**

---

प्रसंगाने ओघात आले म्हणून मारुतीचेही वर्णन केले आहे. तो साधकाला साहाय्य देणारा असावा, तो त्याच्या पुढे मागे, आरंभी, अंती सदैव असावा असे सहाव्या समासात खास करून म्हटले आहे. (९) आकाश म्हणजेच अंतरात्मा होय. त्याचा मोठेपणा कोणालाही कळत नाही. तो सर्वांना व्यापून अलिप्त असतो. हे त्याचे रहस्य कळले पाहिजे. (१०) साधकाने त्याचे हे वर्म ओळखावे, तो सोडून सर्व दृश्य सृष्टीचा त्याग करावा आणि त्याच्याप्रमाणेच व्यापक होऊन असावे, हे सर्व सातव्या समासात सांगितले आहे. (११) आठव्या समासात उपासनेचे माहात्म्य सांगितले आहे. आत्माराम सर्व विश्वात भरून राहिलेला आहे. तोच सर्व काही आहे. तोच कर्ता, भोक्ता आहे, ज्ञाता आणि ज्ञानही तोच आहे; आणि द्रष्टा, साक्षीही तोच आहे. साधकाने हे सर्व जाणून घ्यावे, असेही तेथे सांगितले आहे. (१२) आता नवव्या समासातील निरूपण ऐका, श्रोत्याने आशंका व्यक्त केली की, त्या त्या देवाचे सर्वच उपासक आपापला देव निर्गुण म्हणून सांगतात. (१३) प्रत्येकाला आपापला देव थोरच वाटणार हे स्वाभाविक आहे, पण त्यामागचा विचार मात्र कळला पाहिजे. निरनिराळ्या लोकांची ही भूमिका समजून घ्यावी, पण दुसऱ्याचा बुद्धिभेद मात्र करू नये. (१४) कोणी कोठेही आपला भाव ठेवावा. तेथे सर्व ठिकाणी देव आत्मरूपाने असतोच. आत्म्यावाचून रिकामी जागा कोठेही नाही.(१५) दहाव्या समासाचे निरूपण पुढीलप्रमाणे आहे. त्यामध्ये प्रथम पंचभूते आणि त्रिगुण यांची व्यवस्था करून ती क्रमानुसार लावून दिली आहे. (१६) पंचभूतांपैकी पृथ्वी ही सर्वकाळ पिकली तरच सगळे प्राणी वाचतील. (१७) सर्वांचा योगक्षेम आत्माच चालवत असतो. म्हणून त्याची उपासना हीच उपासना जाणावी. ती सहजसाध्य आहे. तिचा आश्रय करावा. (१८)

**दहाही जाले समास । हे गुणग्रहणीं सुरस । हे साधी जो अभ्यास । त्यासी स्थिती बाणतां वेळ नाहीं ।।१९।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी। श्री रामदासा ।।२०।। दशक १६ समाप्त ।।**

---

दहाही समासांचे विवरण झाले. हे गुण ग्रहणासाठी सुंदर आहेत. यांचा अभ्यास जो करील, त्याला समाधिस्थिती अंगी बाणायला वेळ लागणार नाही. (१९) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२०) इथे सोळावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) वळा. (२) ज्याचें स्तवन करावयाचें त्याचे गुण अभ्यासानें आंगीं बाणवून घ्यावे, हाच स्तवनांतील मुख्य हेतु. (३) स्पष्ट, खास. (४) अलिप्तपणानें वागण्याचें वर्म. (५) **पाठभेद** – सर्व जना, सर्वां जाणा. (६) अनुक्रमानें.

॥ श्रीरामसमर्थ ॥

## दशक सतरावा

॥ श्रीराम ॥ दशक सत्रावा विजय । मनोनाश वासनाक्षय। श्रवण–मनन उपाय । साधका होतो ॥१॥ बोलिलें प्रथम समासीं। आत्माराम उपासना सकलांसी । लोक भजती अनयासीं[१] । विषयद्वारां॥२॥ अवतार आणि तिन्ही मूर्ति । बळें जे जे लोक जया भजती ॥ तें तें देउळें स्थानें वसती[२] । आत्मारामाचीं ॥३॥ असो जे का मननसीळ । ते हें जाणती सकळ । आत्मत्वीं ज्यांचें मन निश्चळ । तेचि योगी ॥४॥ आतां समास जो दुसरा । निर्मळ निर्गुण निर्विकारा– । पासून शिवशक्तीचा उभारा[३] । प्रकृतिपुरुषरूपें॥५॥ प्रपंचवृक्षासी पहावें । त्यावरून बीज समजावें। मुळीं होतें तें आघवें । आतां[४] स्त्री–पुरुष॥६॥ तिसरा ह्मणे थांबा ऐका । तत्वांचे गांठोडें टाका । सावधपणें ऐका । तदनंतर॥७॥ मूळसंकल्प उपासना । ते विवरून आणितां मना । त्याचे पैलिकडे पवाडतां[५] जाणा । तें निश्चळ ब्रह्म ॥८॥ चवथ्या समासीं कथिलें। कर्तयाचें रूप केलें । प्रतीति बिंबऊन जें बोलिलें । तें ऐकिलें पाहिजे श्रोतां ॥९॥ पांचवा सांगे अजपा[६] । अक्षरें तरी

---

दशक सतरावा साधकासाठी विजयाचा दशक आहे. त्याच्या श्रवण–मननाच्या योगाने साधकच मनोरहित होतो, त्याच्या वासनांचा क्षय होतो. (१) पहिल्या समासात सांगितले आहे की, सर्व साधकांनी आत्मारामाची उपासना करावी. विषयांचे सेवन करत असतानाही सर्व लोक सहजगत्या त्याची सेवा करू शकतात. (२) लोक अवतारांची पूजा करतात. ब्रह्मा, विष्णू आणि महादेव या तिहींची भक्ती करतात. ते अवतार, त्या तिन्ही देवांच्या मूर्ती यांपैकी ज्या कोणाची भक्ती करतील, ते अवतार अथवा मूर्ती ही त्या आत्मारामाची वसतिस्थानेंच होत. (३) जे मनन करणारे लोक आहेत, त्यांना हे सर्व माहीत आहे. ज्यांचे मन आत्मरूपावर अविचलपणे स्थिर झाले आहे. तेच खरे योगी होत. (४) दुसऱ्या समासात हे सांगितले आहे की, निश्चळ, निर्मळ, निर्गुण, ब्रह्मापासून शिवशक्ती (अथवा प्रकृतिपुरुष) ची उत्पत्ती होते. शिवशक्तीलाच प्रकृतिपुरुष असे म्हणतात. (५) प्रपंचवृक्षाकडे पाहिले असता त्याच्या बीजाच्या स्वरूपाची कल्पना येते. मुळात जे अव्यक्त स्वरूपात होते तेच प्रपंचात स्त्रीपुरुषरूपाने प्रगट झाले आहे. (६) तिसऱ्या समासात एक सूचना केली आहे. हा जो हा तत्त्वांचा पसारा आहे त्याचे ओझे अगोदर टाकून द्या आणि मग सावध होऊन श्रवण करा. (७) मूळ संकल्प म्हणजेच मूळ माया अथवा तीच उपासना होय. तिचे स्वरूप विचार करून मनात आणा. तिच्या पलीकडे जाताच सर्वत्र निश्चल ब्रह्मच भरलेले दिसेल. (८) चौथ्या समासात कर्त्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. जे अनुभवाच्या आधाराने सांगितले जात आहे. ते श्रोत्यांनी लक्षपूर्वक ऐकावे. (९)

**अजपा[७] । विचार करा सहज सोपा । मार्ग असे निर्गुणाचा ।।१०।। षट्चक्र[८] भेदून चाले वारा[९] । तेथें चहुं वाचेसी थारा । बावन मातृकेंत दो अक्षरा । हंसरूपें ओळखावें ।।।११।। अर्थ पाहतां तो मी ऐसा । सहज होतसे अपैसा । वोळखून सांडितां सहसा । पुढें निर्विकार।।१२।। सहावा म्हणे जी ऐका । चंचळास[१०] ब्रह्म ह्मणूं नका । देहात्मयोगें चंचळ दायका [११] । अति दुःखासी ।।१३।। दुःखदायक अवलक्षण । त्याचें बहुत केलें कथन । सांडुन चंचळ, निरंजन । सुखरूप पावावें ।।१४।। सातवा बोले देहाचे संगतीं । आत्मा पावे सुखदुःखाप्रती । जैसें आप मिळतां नाना पदार्थीं । कडू तीक्ष्ण होतसे ।।१५।। जळ त्यासवें नासोन जातें । असोन आत्मा[१२] अलिप्त त्यातें । विवेकें दुःख अवघें जातें । जडाचें जडीं।।१६।। आत्मा सुखरूपचि आहे । सत्संगें विचार शोधोन पाहे। गुण जातां आपण आहे । निर्गुण ब्रह्म ।।१७।। आठवा नववा समास । पंचीकरण चहुं देहांस ।**

---

पाचव्या समासात अजपा जपाचे स्वरूप उलगडून सांगितले आहे. (श्वासोच्छ्वासाच्या क्रियेत 'सोऽहं' या मंत्राचा जो सहज जप होतो, त्यास अजपा म्हणतात.) ही अजपा सर्वांना सहजसाध्य असली तरी तिचे मर्म ज्ञात्यासच (कळते). या प्रकारात अक्षरांचा जप करायचा नसतो. अजपाचा हा विचार सहज आणि सोपा आहे. तोच निर्गुण ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग होय. (१०) योगाभ्यासात प्राणवायूच्या साहाय्याने षटचक्रे भेदण्याचा अभ्यास सांगितला आहे. प्राणवायूच्या साहाय्यानेच चारी वाचा उत्पन्न होतात, वाचेच्या बावन्न मातृकांमध्ये दोन अक्षरे हंसरूपाने आहेत. ती अक्षरे ओळखावीत. (११) ती दोन अक्षरे म्हणजे अहं सः अथवा सो ऽ हम् ही होत. त्यांचा अर्थ तोच 'मी आहे' असा होतो. श्वासोच्छ्वासागणिक त्या अक्षरांचा जप होत असतो. तो अगदी आपोआप सहजपणे होत असतो. या अर्थाचे मनन करून तो वाच्यांशाने त्यागावा आणि लक्ष्यांशाने त्याचा अनुभव घ्यावा. म्हणजे पुढे निर्विकार ब्रह्मच भेटते. (१२) सहाव्या अध्यायात पुन्हा एक सावधगिरीची सूचना दिली आहे. चंचळ-जाणीवरूप आत्मा हा ब्रह्म नाही. त्याला ब्रह्म मानू नका. जाणिवेचा देहाशी संयोग झाल्याने तो सहवास अतिशय दुःखकारक ठरतो. (१३) दुःखदायक, अवलक्षणी पदार्थांचे या समासात विस्ताराने वर्णन आले आहे. तेव्हा अशा चंचळाचा त्याग करावा आणि सुखरूप निरंजनाची प्राप्ती करून घ्यावी. (१४) सातव्या समासात असे सांगितले आहे की, देहाच्या संगतीने आत्मा सुखदुःखांचा भोक्ता होतो. पाण्यात निरनिराळे पदार्थ मिसळले की ते कडू, तिखट होते त्याप्रमाणे हा प्रकार आहे. (१५) ते पदार्थ तर नष्ट होतातच पण त्याबरोबर पाणीही नासून जाते - नाश पावते. पण आत्मा देहापासून अलिप्त असल्यामुळे विवेकाच्या योगाने सर्व दुःख निघून जाते. ते जडाचे दुःख जडाकडे जाते. आत्मा सुखादुःखाच्या पलिकडचा आहे. (१६) आत्मा तर सुखरूप आहे. संतजनांच्या संगतीने हा विचार पहावा. आत्म्याच्या ठिकाणी कल्पिलेले गुण जाताच आत्मा निर्गुण ब्रह्मच असतो. (१७)

**निरसूनपिंडब्रह्मांडास । निजरूप पावे ।।१८।। स्थूळीं पंचवीस पंचभूतांचे । गुण असती तयाचे । तैसेचि जाणा सूक्ष्माचे । एकेकांचे पांच पांच ।।१९।। अंत:करण-प्राण-ज्ञानेंद्रिय । विषय आणि कर्मेंद्रिय । पांच पंचकें समुदाय । लिंग देहाचे ।।२०।। या तत्वांचा कोठा करावा । एकमेकांचा आधार सर्वां । आतां चारी देहांचा गोवा । कळला पाहिजे ।।२१।। देह अवस्था अभिमान । स्थानें मात्रा भोग गुण । वाचा इच्छा आदिकरून। चौपुटी तत्वांचे ।।२२।। जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं असे। हा दृश्यभास मिथ्या दिसे । साक्षीचें[13] मूळ शोधितां अपैसें । निश्चळ तेंचि समाधान ।।२३।। निश्चळ हाटकेश्वर । आवरणोदक तें चंचळ समग्र । विचारें कळे सारासार । नेमस्त बोलिल्या ।।२४।। जड चंचळ निश्चळ । एकचि करिती बाष्कळ । तया मूर्खांसी निंदिलें सकळ । समास संपेतोंवरी ।।२५।। शब्दाच्या अर्थें लक्षांश । निर्गुण ब्रह्म ये अनुभवास । तो गुण त्यासी असे नाश । अविनाश तें निर्गुण ।।२६।। जाला सत्रावा दशक । जे निर्गुण परब्रह्म आपण**

---

आठव्या आणि नवव्या समासात पिंड आणि ब्रह्मांड यांच्या प्रत्येकी चार अशा आठही देहांचे पंचीकरण सांगितले आहे. या पंचीकरणाचे स्वरूप सर्व मायिक आहे. त्याचे ज्ञानपूर्वक निरसन केले की, साधक निजरूप प्राप्त करतो. म्हणजेच तो ब्रह्मरूप होतो. (१८) स्थूल देहात पंचभूतांचे पंचवीस गुण सांगितले आहेत. तसेच सूक्ष्म देहातही एकेका भूताचे पाच पाच असे पंचवीसच गुण सांगितले आहेत. (१९) लिंगदेहाची अंत:करण पंचक, ज्ञानेंद्रिय पंचक, कर्मेन्द्रिय पंचक, विषय पंचक आणि प्राण पंचक अशी पाच पंचकांची नोंद केली आहे. (२०) या तत्त्वांची विशिष्ट प्रकारे सरमिसळ करावी. एकमेकांच्या आधाराने असा जो समुदाय होतो त्यास तेथे कोठा असे म्हटले आहे. याच पद्धतीने सर्व चारी देहातील गुंतागुंत समजली पाहिजे. (२१) त्यांमध्ये प्रत्येक देहातील देह, अवस्था, अभिमान, स्थान, मात्रा, भोग, गुण, वाचा, इच्छा यांनुसार चार चार तत्त्वांचे गटही तेथे सांगितले आहेत. (२२) ही जी पिंडाची रचना सांगितली तशीच ब्रह्मांडाचीही रचना सांगितली आहे. पण हा सर्व दृश्याचा पसारा भासमान असून तो मिथ्या आहे. पिंडातील त्या दृष्यांचा साक्षी आणि ब्रह्मांडातील साक्षी यांचे मूळ शोधल्यानंतर तद्रूप होणे हेच आत्मदर्शन आणि सर्वश्रेष्ठ समाधान होय. (२३) पाताळात हाटकेश्वर नावाचे शिवलिंग आहे. त्याच्या दर्शनाचा महिमा अगाध असला तरी शरीराने तेथे जाता येत नाही. कारण त्याच्या सर्व बाजूंनी आवरणोदक दाट भरले आहे. ते दर्शन मनानेच घ्यावे लागते. त्याप्रमाणे परब्रह्माचे दर्शनही विचारानेच घेता येते, असे नेमकेपणाने आणि नेटकेपणाने दहाव्या समासात सांगितले आहे. (२४) पण बाष्कळ लोक मात्र जड, चंचल आणि निश्चल अशा भिन्न भिन्न तत्त्वांना एकच मानून गोंधळ करतात. त्या मूर्खांना समासाच्या अखेरपर्यंत दूषणे दिली आहेत. (२५) शब्दाच्या वाच्य अर्थातून लक्ष्यांश कळतो त्या योगाने निर्गुण ब्रह्माचा अनुभव घेता येतो. जे जे गुण म्हणून सांगितले आहेत. त्यांना नाश आहे, पण निर्गुण ब्रह्म मात्र अविनाशी आहे. (२६)

**एक । अनुभवेंवीण निश्चळ विवेक । श्रवणमात्रें करी ।।२७।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।२८।। दशक १७ समाप्त.**

---

असा हा सतरावा दशक पूर्ण झाला. निर्गुण ब्रह्म हे आपण स्वतःच आहोत. त्याचे श्रवण होताक्षणीच केवळ विचाराच्या सहाय्याने अनुभवातीत त्रिपुटीरहित निश्चल ब्रह्माची प्राप्त करून देणारा हा दशक आहे. (२७) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (२८) इथे सतरावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) श्रम न करितां, सहज. (२) वसतिस्थानें-राहण्याची ठिकाणें. (३) मांडणी (४) मूळमायेच्या ठिकाणी प्रकृतिपुरुष किंवा शिवशक्तिरूपानें जें सूक्ष्म तत्त्व होतें, तेंच वृक्षाचें बीज फलरूपानें प्रगट व्हावें, त्याप्रमाणें प्रपंचांत स्त्रीपुरुषरूपानें प्रगट झालें. (५) घुसल्यावर, टिकाव धरल्यावर. (६) श्वासोच्छ्वासाच्या क्रियेंत 'सोऽहं' या मंत्राचा जो सहज जप होतो, त्यास अजपा म्हणतात. (७) अजपा-जप करूं नका. (८) योगाचे अभ्यासांत अनुभवास येणारी शरिरांतील सहा चक्रे १. गुदस्थानीं चतुर्दलात्मक आधारचक्र. २. लिंगस्थानीं षड् दलात्मक स्वाधिष्ठानचक्र. ३. नाभिस्थानीं दश दलात्मक मणिपूरचक्र, ४. हृदयस्थानीं द्वादशदलात्मक अनाहत चक्र, ५. कंठस्थानीं षोडश दलात्मक विशुद्धि चक्र, आणि ६. भ्रूमध्यभागीं द्विदलात्मक आज्ञाचक्र. (९) प्राण वायु. (१०) चंचळ जाणीवरूप अंतरात्मा, तो ब्रह्म नाहीं. (११) देह व आत्मा यांच्या संयोगामुळें जाणीव अतिदुःखदायक होते. (१२) पदार्थांच्या नाशाबरोबरच त्यांत एकरूप झालेलें पाणीहि नाश पावतें, पण आत्मा पदार्थाशीं तद्रूपसा दिसला तरी पदार्थाच्या नाशाबरोबर आत्म्याचा नाश होत नाही. (१३) पिडांतील साक्षी व ब्रह्मांडाचा साक्षी या दोहींचें मूळ शोधून तेथें तद्रूप व्हावें; तेच आत्मदर्शन-तेंच समाधान. (१४) हाटकेश्वराच्या दृष्टान्तानें असें सुचविलें कीं, त्या पाताळलिंगाच्या दर्शनाचा महिमा अपार असला तरी शरिरानें तेथें जातां येत नसल्यामुळे तें दर्शन मनानेंच घ्यावें लागतें, त्याच प्रमाणे परब्रह्माचें दर्शनहि विवेकानेंच घ्यावें लागते.

॥ श्रीरामसमर्थ ॥

## दशक अठरावा

॥ श्रीराम ॥ अष्टादशीं अष्टादशींचा [१] । सारांश असे तयाचा। श्रवणद्वारें साधका साचा । मोक्ष होये ॥१॥ पहिलिया देव सर्व वर्णिले । परि तें अंतरात्म्यास पावलें । तयासीं विवेकें ओळखिलें। तो महापुरुष ॥२॥ दुसरा बोले जाणत्यापासीं । सर्व शिकावें अभ्यासीं । जाणता अंतरात्मा त्यासी । ध्यानीं धरावें ॥३॥ तिसरा ह्मणे मूर्ख आळसी । तेणें अभ्यासावें गुणांसी । कथाकीर्तनश्रवणासी। येकांतासी [२] सेवावें ॥४॥ चवथा म्हणे देहाकरितां [३] । सर्व लागली व्यवस्था । देह आत्मा चालविता । ह्मणोनी सर्व तोषवावीं॥५॥ पांचवा सांगे श्रोते वाचक । प्रतीतीं [४] ऐकावें बोलावें नेमक । पूर्वपक्ष सांडून आवश्यक। सिद्धान्त लक्षावा ॥६॥ शिकविलें सहावे समासीं । अभ्यासावें उत्तम गुणांसी । धर्मस्थापना जयापासीं। ते ईश्वरी पुरुष ॥७॥ सातवा ह्मणे पुण्यठेवा । संग्रहाचा [५] न वेंचावा [६] । विचारें परलोक साधावा । नाना प्रयत्नें ॥८॥ आठवा ह्मणे नाना प्रतिमा । त्यांचें मूळ

---

अठरावा दशक म्हणजे अठरा पुराणांचा सारांश असून त्याचे श्रवण केल्याने साधकाला मोक्ष प्राप्त होईल. (१) पहिल्या समासात सर्व देवांचे वर्णन केले आहे. त्यांपैकी कोणत्याही देवाची उपासना केली तरी अंतरात्म्यालाच पोहोचते, त्या अंतरात्म्याला विवेकाने ओळखतो, तो महापुरुष समजावा. (२) दुसऱ्या समासात उत्तम गुणांचा अभ्यास त्या जाणत्याला म्हणजेच अंतरात्म्याला साक्ष ठेवून करावा असे सांगितले आहे. अंतरात्मा हा जाणणारा आहे आणि तोच देवही आहे. या देवाची उपासना म्हणजेच उत्तम गुणांचा अभ्यास होय. (३) तिसऱ्या समासात असे सांगितले आहे की, जो मूर्ख असेल आणि आळशी असेल त्याने उत्तम गुणांचा अभ्यास अवश्य करावा. त्याने कीर्तन इ. चे श्रवण करावे, एकान्तात राहून भक्ती करावी. (४) चवथ्या समासात देह आहे म्हणून सर्व कार्ये होतात असे सांगितले आहे. पण देहाचा चालक आत्मा (अंतरात्माच) आहे, म्हणून सर्व कार्यांमध्ये त्याचा संतोष पहावा. त्यासाठी सर्व प्राण्यांना संतोष द्यावा. (५) श्रोते किंवा वाचक यांनी अनुभवपूर्वक सर्व श्रवण अथवा वाचन करावे आणि आवश्यक तेवढे नेमकेपणाने बोलावे. पूर्वपक्षात येणाऱ्या (त्याज्य) सर्व गोष्टींचा त्याग करावा आणि मुख्य सिद्धान्ताकडे लक्ष द्यावे, असे पाचव्या समासात सांगितले आहे. (६) सहाव्या समासात अशी शिकवण आहे की, उत्तम पुरुषाने सर्व उत्तम गुणांचा अभ्यास करावा, आणि धर्माला प्रतिष्ठा मिळवून द्यावी. असे करणारे हेच खरे ईश्वरी पुरुष होत. (७) सातव्या समासात असे सांगितले आहे की, आपल्या संग्रही असलेला पुण्याचा खर्च करून ते संपवून टाकू नये. विचारपूर्वक नाना प्रयत्न करून परलोक प्राप्त करून घ्यावा. (८)

**अवतार महिमा । तिन्ही [७] देवांसी अंतरात्मा । चालवी तो देव ।।९।। चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम । संतसंगें कळे वर्म । तरीच कर्म नासे ।।१०।। नवविया निद्रा वर्णिली । जग क्रिया सुषुप्ति भुली । तुर्या वोलांडून जागृति आली । तोचि ज्ञाता ।।११।। दहावा बोले श्रवणासी । विघ्नें बहुत जनासी । ह्मणोनियां विवेकासी । अभ्यासी तो धन्य।।१२।। अष्टादशाचा प्रसंग जाला । श्रवणें देव हातां आला । आत्मनिवेदनें पावला। समाधान साधक ।।१३।। इति श्रीसंकेत कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।। ।।१४।। दशक अठरा समाप्त.**

---

आठव्या समासात निरनिराळ्या प्रतिमांचे पूजन देव भावनेने केले जाते. त्याच्या मुळाशी अवतार आहेत असे लक्षात आल्यावर अवतारांची पूजा केली जाते. पण अवतार तर होऊन गेलेले असतात म्हणून त्या अवतारधारी मूळ देवांकडे लक्ष जाते. ते देव म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव होत, पण या तीन्ही देवांच्या मुळाशी अंतरात्मा आहे. तोच त्यांच्याकडून सर्व कार्ये करून घेतो. हे ओळखून त्याची पूजा करावी असे सांगितले आहे. (९) पण सर्व देव चंचल तत्त्वात मोडतात. त्यांची पूजा भ्रमात गणली जाते. त्यांनाच ब्रह्म मानले जाते. हाच भ्रम. पण या चंचलाच्या पलीकडे असलेल्या निश्चल ब्रह्माच्या बाबतीत मात्र असा भ्रम नाही. संतांच्या सहवासात त्याचे रहस्य कळते. ते कळल्यानंतरच आपल्या कर्मांचा क्षय होतो. असे आठव्या समासातच सांगितले आहे. (१०) नवव्या समासात निद्रेचे वर्णन केले आहे. जगात चालणाऱ्या व्यवहारातील सर्व क्रिया या सर्व सुषुप्तीतल्या क्रिया होत. त्या भ्रमात्मक आहेत. चारी देहांच्या सर्व अवस्था ओलांडल्यावरच खरी जागृतीची अवस्था ज्याला प्राप्त होते. तोच ज्ञाता होय. (११) दहाव्या समासात श्रवणाचे महत्त्व सांगितले आहे. पण श्रवणामध्ये अनेक अडचणी येतात. तेव्हा विवेकाने जो अभ्यास करतो तोच धन्य होय. असे म्हटले आहे. (१२) असा हा अठराव्या दशकाचा विषय झाला. श्रवणाच्या साहाय्याने देवाचे स्वरूप समजून घेऊन त्याला आत्मनिवेदन घडले (त्याशी तादात्म्य पावले) की साधकाला अंतिम समाधान प्राप्त होते. (१३) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (१४) इथे अठरावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) अठरा पुराणांतील. कुबडीकारांच्या मतें अठराच्या दशकांत अठरा पुराणांचें सार असें दर्शविलें आहे कीं, निरनिराळ्या पुराणांत निरनिराळ्या देवतांची-अवतारांची चरित्रें असलीं तरी ते सर्व देव एका अंतरात्म्याचेच अंश होत. कोणाहि देवाचें भजन केलें तरी तें 'एका अंतरात्म्यासी पावले' आणि देवांचें भजन म्हणजे उत्तम गुणांचा अभ्यास व प्राणिमात्राचा संतोष. (२) एकान्तांत. (३) देहा करितां-देह आहे म्हणून सर्व कार्ये होत असलीं, तरी देहाचा चालक जो आत्मा त्याचा संतोष व्हावा म्हणून सर्व प्राण्यांना संतोष द्यावा. (४) प्रतीतीनें, अनुभवानें.(५) संग्रही असलेला.(६) खर्चावा.(७) तिन्ही देवांस (जो) चालवी तो अंतरात्मा देव असा अन्वय.

### ।। श्रीरामसमर्थ ।।

## दशक एकोणिसावा

**।। श्रीराम ।। एकोणिसावा अतिगहन । जे करिती श्रवण मनन । चंचल चक्र वोलांडुन । पैलाड [१] जाती ।।१।। चंचळ जाणावया कारणें । अभ्यासावीं उत्तम गुणें । गुणेंविण न पालटती दुर्गुणें । ह्मणोनी येकोणिसावा ।।२।। परमार्थाचें मुख्य साधन । तें जाणावें श्रवण मनन । निजध्यासें समाधान । अपैसें होतें ।।३।। प्रथम लिहिणें कैसे ल्याहावें । तें प्रथमीं सर्व पहावें । अर्थभेद जाणावे । दुसरे समासीं ।।४।। लेहू वाचूं जाणे। तोचि अर्थाचें करी ग्रहण । अर्थ घेतां श्रवण मननें । अपैसा होतो ।।५।। तिसरा ह्मणे करंट लक्षण । न जातां कैसे लागती गुण । करंटा मुख्य कल्पनेचें रान । ज्याचें त्यास आवरेना ।।६।। उत्तम गुण चवथा शिकवी । तेचि साधकें अभ्यासावी । अध्यात्मविद्या समजावी । श्रवणमननें ।।७।। पांचवीया देहात्मयोगें पूजन । देहाविण कैंचें उपासन । देव कळे कर्त्याहून [२] भिन्न । नोळखितां धातुपूजन तें व्यर्थ।।८।। त्यासी [३] ज्ञानदृष्टीनें पहावें । ज्ञान सोडून ध्येयीं रहावें । संग त्यागून असावें । समाधान ।।९।। षष्ठमीं उपदेशाचीं**

---

एकोणिसावा दशक अतिशय कठीण आहे. जे त्याचे श्रवण-मनन करतील ते चंचळ मायेचे चक्र ओलांडून पलिकडे जातील. (१) चंचळ जाणून घ्यायचे असेल तर प्रथम उत्तम गुणांचा अभ्यास केला पाहिजे. गुण असल्याखेरीज दुर्गुण बदलणार नाहीत. त्यासाठी हा एकोणिसावा दशक आहे. (२) परमार्थाचे मुख्य साधन म्हणजे श्रवण आणि मनन हे होय. स्वरूपाच्या (ब्रह्माच्या) ध्यासाने आपोआपच समाधान प्राप्त होते. (३) प्रथम लेखन कसे करावे ते पहिल्या समासात पहायला मिळेल. श्रवण-मनन वाचन इत्यादी करताना त्यातील सूक्ष्म अर्थ कसे जाणावेत याचे मार्गदर्शन दुसऱ्या समासात केले आहे. (४) ज्याला लिहिता वाचता येते, तोच अर्थाचे ग्रहण करू शकतो. अर्थाचे ग्रहण, श्रवण, मनन केल्याने आपोआप होते. (५) तिसऱ्या समासात करंटेपणाची लक्षणे सांगितली आहेत. ती गेल्याखेरीज चांगले गुण अंगी कसे बाणतील ? करंटा माणूस कल्पनेच्या रानात एकदा घुसला की त्यातून स्वत:ला आवरू शकत नाही. (६) चवथ्या समासात उत्तम गुण शिकवले आहेत. साधकाने त्यांचा अभ्यास करावा. आणि श्रवणमननाच्या साहाय्याने अध्यात्मविद्या समजून घ्यावी. (७) पाचव्या अध्यायात देह आणि चंचल आत्मा यांच्या साहाय्याने पूजन करता येते, हे सांगितले आहे. देहाच्या अभावी उपासना कशी करता येईल? देव मुख्य कर्ता जे ब्रह्म त्यापेक्षा वेगळा आहे, हे जर कळले नाही तर केवळ धातूची पूजा व्यर्थ होय. (८) त्या मुख्य कर्त्याला ज्ञानदृष्टीने पहावे. त्या पहाण्यातील ज्ञानाचा त्याग करावा (म्हणजे त्रिपुटीचा त्याग करावा.) आणि आपण ध्येय जे ब्रह्म त्यामध्ये मग्न रहावे. संग त्याग करून (आसक्ती सोडून) आपण श्रेष्ठ समाधान प्राप्त करून घ्यावे. (९)

**लक्षणें। गुरु शिष्य पाहून[४] करणें । इच्छेवांचून अध्यात्मश्रवण । निर्फळ होय ।।१०।। उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । विचारवंत प्रतीत बोलणें। कांहीयेक उत्कटेंविण । सत्कीर्ति नव्हे ।।११।। सप्तमीं अभ्यास नसतां उत्कट । परमार्थ करूं नये प्रगट । राजी राखावे लोक सगट। परिभ्रमण[५] करावें ।।१२।। अष्टमीं चंचळ जे उपाधि । समाधानें निश्चळ शोधीं । आल्या गेल्याचे हर्षविषादीं । न पडे विवेकी।।१३।। ऐसें न करितां उपाधीसी । वाढवितां कष्ट सर्वांसी । याकरितां समाधानेंसी । उगेंचि असावें ।।१४।। नवमीं उदास ज्ञानी । समुदायीं[६] हव्यास मनीं । प्रतीतीनें निरूपणीं । साधक वोळखती[७] ।।१५।। परी आपण कोणासी न सांपडावें । जैशाचि तैसेचि योजावे । परस्परें आणावे । ज्याचे त्यास प्रतीत।।१६।। दहावा उपाधीयोगें जनासी । शिकवितां लागती परमार्थासी । विवेकी आचरून सर्वांसी। हळु हळु सिकवावें ।।१७।। ऐसा ज्ञानीयाचे सिकवणीचा । दशक जाला समाधानाचा । जैसा तैसा उपाधीचा । शेवट पावावा ।।१८।। इति श्रीसंकेत**

---

सहाव्या समासात उपदेशाची लक्षणे सांगितली आहेत. त्यांचा विचार करून गुरूने शिष्य किंवा शिष्याने गुरू करावा. शिष्याची उत्कट इच्छा असल्याशिवाय त्याला उपदेश करणे व्यर्थ ठरते. (१०) भक्ती उत्कट असावी, ज्ञानही उत्कट असावे. सद्गुरु विचारवंत असावेत आणि त्यांचे बोलणे अनुभवाचे असावे. मुळात काहीतरी उत्कट असल्याशिवाय सत्कीर्ती मिळत नसते. (११) सातव्या समासात असे सांगितले आहे की, आपला अभ्यास जर उत्कट नसेल तर परमार्थ प्रगट करू नये. सर्व लोकांना प्रसन्न ठेवावे. देशाटन करावे. (१२) आठव्या समासात सर्व उपाधी चंचल असून त्यांचा त्याग करून एका निश्चलाचा शोध घ्यावा आणि समाधान प्राप्त करावे. असे सांगितले आहे. विवेकी साधक आल्या गेल्या इतरांच्या हर्ष आणि विषाद यांच्या उचापती करत नाही. (१३) असे न करून केवळ उपाधी वाढवीत गेल्याने सर्वांनाच कष्ट पडतील. यासाठी आपल्या ठिकाणी निवांत राहून समाधान मानावे. (१४) नवव्या समासात असे सांगितले आहे की, उदास ज्ञानी साधकाला समुदाय करण्याची इच्छा झाली तर त्याच्या अनुभवयुक्त निरूपणानेच साधकांना त्याची ओळख पटेल. (१५) परंतु आपण मात्र कोणाच्या आहारी जाऊ नये. आपल्या वर्तनाचे स्वरूप जशास तसे या धोरणाचे असावे, प्रत्येकाला आपल्या कृत्याची प्रचीती आपोआपच येईल. (१६) दहाव्या समासात ज्ञानी माणसाला, इतरांना शिकवण्याची उपाधी करण्याची इच्छा झाली तर त्याने लोकांना शिकवावे. म्हणजे ते परमार्थमार्गाला लागतील. विवेकी माणसाने आपल्या आचरणाचा आदर्श लोकांच्या समोर ठेवून त्यांना हळूहळू शिकवावे, असे सांगितले आहे. (१७) ज्ञानी माणसाच्या शिकवणुकीचा हा दशक चांगला समाधानकारक झाला आहे. केवळ उपाधीत गुंतून न पडता जसे जमेल तसा उपाधींचा त्याग करावा. (१८)

**कुबडी । दासबोधींचे सार निवडी । वांकुडी परी आवडी । श्री रामदासा ।।१९।। दशक १९ समाप्त ।।**

---

अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (१९) इथे एकोणिसावा दशक पूर्ण झाला.

**टिपा**

(१) पलीकडे. (२) दा० १९-५-२४ पाहतां येथें कर्तृत्व किंवा कार्य हा शब्द असावासें वाटते. (३) त्या देवास. (४) दा. १९-६ मधें जीं उपदेशलक्षणें सांगितली आहेत, त्यांचा विचार करूनच गुरूनें शिष्य किंवा शिष्यानें गुरू करावा. (५) देशाटन. (६) समुदाय करण्याची उकट इच्छा. (७) **पाठभेद** – वोळति.

॥ श्रीरामसमर्थ ॥

## दशक विसावा

॥ श्रीरामसमर्थ ॥ आनंद [1] एकापरिस एक । थोर असती पारमेष्ठ्यादिक । अतिशय ज्याहून नसे अधिक । त्यासी निरतिशय ह्मणावें ॥१॥ तो साधका प्राप्त व्हावा। ह्मणोनि निरोपिला विसावा । सरतां चंचळाचा गोवा । स्वयेंचि आनंद ॥२॥ निश्चळ-चंचळाचा निवाडा । प्रथम समासीं उघडा । परी व्यापकपण निवडा [२] । अंतर्यामीं ॥३॥ मन आत्मा पंचभूत । अवघेंच व्यापक भासत । पाहतां भूम्यादि पंचभूत । एक सरतां एक असती ॥४॥ मन चपळ परी येकदेशी । आत्मा [३] हि तैसाचि पूर्णत्वासी । निश्चळपणें आकाशासी । ब्रह्मीं साम्य घडे ॥५॥ आत्मा मन एकरूप । ऐसा जाणावा साक्षेप [४] । ज्ञान जें महाकारणरूप । तेंहि येकदेशी ॥६॥ स्वरूपाचे व्यापकपणापुढें । मनादि व्यापक केवढे । चंचळ सांडून निश्चळीं पवाडे [५] । तेचि जाणत असती ॥७॥ दुसरिया ब्रह्म निश्चल । जेथें नाही कल्पनामळ । कल्पनेपासुनि जाले सकळ । ते त्रिप्रकारें [६] ॥८॥

---

आनंदाचे एकापेक्षा एक वरचढ असे पारमेष्ठ्यादी अनेक प्रकार आहेत. ज्या आनंदापेक्षा वरचढ असा आनंद नाही त्याला निरतिशयानंद म्हणावे. (१) तो आनंद साधकांना प्राप्त व्हावा म्हणून विसाव्या दशकाचे निरूपण केले आहे. चंचल पदार्थांची गुंतागुंत संपल्यानंतर मग सगळाच आनंद आहे. (२) पहिल्या समासात निश्चल आणि चंचल यांच्यातील भेद स्पष्ट केला आहे. पण त्यांच्यातील व्यापक कोण याचा विचार अंतःकरणात पूर्ण करावा. (३) मन, आत्मा, पंचभूते ही सर्वच व्यापक भासतात. पण भूम्यादी पंचभूतांचा विचार करता असे दिसते की, एक भूत बाजूला सरल्यानंतर त्याची जागा दुसरे भूत घेऊ शकते. याचा अर्थ भूते ही मर्यादित आहेत. पूर्ण पणे व्यापक नाहीत. (४) मन चपळ खरे, पण ते एकदेशी आहे. आत्मा देखील पूर्णत्वाच्या बाबतीत तसाच आहे म्हणजे तोही चंचळ आहे. त्यामुळे एकदेशी आहे. निश्चलत्वाच्या बाबतीत आकाशाचे ब्रह्माबरोबर साम्य होऊ शकते. (५) आत्मा आणि मन दोन्हीही चंचल आहेत त्यामुळे ती एकरूप आहेत, असे थोडक्यात समजावे. महाकारणदेहाची तुर्यावस्था असते. ही अवस्था ज्ञानरूप अवस्था आहे. पण हे ज्ञान सुद्धा एकदेशीच आहे. (६) स्वरूपाच्या (ब्रह्माच्या) व्यापकपणाच्या तुलनेने मनाचे व्यापकपण काहीच नव्हे. ज्यांनी चंचळाचा त्याग करून निश्चळामध्ये प्रवेश केला आहे. त्यांनाच हे कळेल. (७) दुसऱ्या समासात निश्चल ब्रह्माचे निरूपण केले आहे. तेथे कल्पनारूपी मळाचा लवलेशही नसतो. कल्पनेपासून जे निर्माण होते, त्याचे तीन प्रकार आहेत. (८)

**मायागुण मानस । चंचळाचा होतसे भास । दुसरें पंचभूतादि दृश्य । तिसरें खाणी चत्वार।।९।। हे तिन्ही कल्पनागुण । स्वानुभवें कल्पनेचें निरसन । होय तेंचि सत् चित् घन । परब्रह्म जाणावें ।।१०।। तिसरा ह्मणे जें जें जालें । तें तें उलटें पाहिजे ओळखिलें। येकोणिस[7] येकोणिस बोलिले । चौदा चारी तेवीस ।।११।। सप्तांग मुख एकोनविंशति । दो देहांत ह्मणे मांडुक्य श्रुति । चारी खाणी उघड असती । प्रकृति तेवीस तत्वें ।।१२।। येथें संकेतानें घ्यावें । विवक्षेसारिखें[8] लागे बोलावें । असो चवदा संकेत समजावे । मुख्यत्वें आधीं ।।१३।। ते पुढें[9] असे बोलिले । हें चंचळ पाहिजे उमजलें । सज्जनसंगतीनें वहिलें[10] । मूळमायेसी वोलांडावें ।।१४।। लटिके मायेनें दडपावें । सत्य परब्रह्म सांडावें। ऐसिये भिडेस काय करावें । घातक लक्षण ।।१५।। चौथा म्हणे सर्व चालवी । ते द्रष्टा साक्षीची उठाठेवी । उपासना नेहटून[11] पहावी । तरी तेंचि ज्ञान ।।१६।। मूळ संकल्प मूळ**

---

माया, गुणमाया आणि मन ही तीन्ही पहिली सृष्टी होय. ती चंचलरुप भासते. दुसरा प्रकार म्हणजे पंचभूतादी दृश्य सृष्टी होय. आणि तिसरा प्रकार म्हणजे चार खाणींचा होय. (९) हे तीनही प्रकार कल्पनारूप आहेत. प्रत्यक्ष स्वानुभवाने कल्पनेचे निरसन होते. तेव्हा हे तीनही प्रकार म्हणजे सत्चिद्रूप, घनदाट असे परब्रह्मच होत, असे लक्षात येते. (१०) तिसऱ्या समासात वर सांगितलेला सृष्टिक्रम उलट्या क्रमाने पाहाता आला पाहिजे, असे म्हटले आहे. सृष्टीची एकूण २३ तत्त्वे सांगितली आहेत. त्यात मूळमायेची चौदा नावे, पाच महाभूते आणि चार खाणी यांचा समावेश आहे. (ही दासबोधाची मांडणी झाली. पण हंसराजस्वामी माण्डूक्योपनिषदाचा हवाला देऊन स्थूलदेहाची १९ तत्त्वे आणि सूक्ष्म देहाची १९ तत्त्वे यांना उद्देशून 'एकोणीस एकोणिस ' असे म्हणत असावेत, पण पुढील चरणाचा 'चौदा चारी तेवीस' याचा मेळ कसा घालायचा ते कळत नाही.) (११) माण्डूक्य श्रुती असे सांगते की, स्थूल देहातील वैश्वानर आत्म्याची एकोणीस मुखे आहेत. आणि सूक्ष्मदेहातील तैजस आत्म्याची एकोणीस मुखे आहेत. आणि चारी खाणी तर स्पष्ट आहेतच. अशा प्रकारे प्रकृतीची प्रत्येकी तेवीस तत्त्वे आहेत. (हे हंसराज स्वामींचे मत समर्थांच्या मताशी जुळत नाही.) (१२) या ठिकाणी काही गोष्टी संकेत म्हणून घ्याव्या लागतात. आपल्याला जे सांगावयाचे आहे. त्याच्या अनुराधाने अर्थ करावा लागतो. ते असू देत, प्रस्तुत चौदा तत्त्वे म्हणजे काय ते मुख्यत्वेकरून समजून घेतले पाहिजे. (१३)ते पुढे (पुढील २०-२१ व्या ओवीत) सांगितले आहे. हे सर्व चंचलात मोडते हे उमजले पाहिजे. संतांच्या संगतीने या मूळमायेला ओलांडून पुढे जावे. (१४) खोट्या मायेने दडपून जावे, आणि सत्य अशा परब्रह्माचा त्याग करावा. अशी भीड धरून फायदा काय ? हे घातक लक्षण आहे. (१५) चौथ्या समासात द्रष्टा म्हणजे पहाणारा आणि साक्षी म्हणजे जाणणारा यांचा भेद स्पष्ट करून सर्वांच्या अंतर्यामी असणारा तो जगदीश जगाचा व्यवहार कसा चालवतो याचा ऊहापोह केला आहे. उपासना म्हणजे अंतर्यामी आत्म्याची ओळख म्हणजे ती आपलीच ओळख असते. तेच खरे ज्ञान होय. (१६)

**जाणीव । ज्ञान उपासना हे अपूर्व । दोहोंसी पाहतां अभिनव[१२] । अधिष्ठान आपण असे।।१७।। तेंचि परब्रह्म जाणावें । दुजेवीण उगेंचि असावें । निर्विकार तें स्वभावें । असतचि असे ।।१८।। पांचवा चारी जिन्नस। फोडून सांगे विशेष । परब्रह्म जें का अविनाश । हा एक मुख्य जिन्नस ।।१९।। चैतन्य गुणसाम्य नटेश्वर । प्रकृतिपुरुष शक्तिईश्वर[१३]। शुद्धसत्व अर्धमात्रा [१३] गुणसाम्यविकार– । पावेतों आठवे ।।२०।। त्रिगुण मन माया अंतरात्मा । चवदा संकेत द्वितीय नामा । पांच भूतें तिसरे वर्मा । चारी खाणी जिन्नस चारी ।।२१।। ऐसा सूक्ष्म विचार । हा नरदेहींच जाणीव प्रकार । भोग्य जाणिजे इतर । हा सारभोक्ता[१४] ।।२२।। सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला। पुढें विचार कैसा जाला । ज्याचा तो जाणे ।।२३।। सहावा जें जें करणें । तें तें आत्मयाचे गुणें । द्रष्टा साक्षी ध्येय ध्यान । कर्ता भोक्ता आत्मा ।।२४।। आत्माराम उपासना । तेणें पावले निरंजना। निःसंदेह अनुमाना । ठावचि नाही ।।२५।। सप्तमीं समाधान जालें । तें बोलतां**

---

मूळ संकल्प म्हणजे मूळ जाणीव. तेच ज्ञान आणि तीच उपासना, ज्ञान आणि उपासना या दोहोंचे अधिष्ठान आपणच असतो. (१७) तेच परब्रह्म हे जाणून घ्यावे. कोणत्याही भिन्न तत्त्वावाचून ते अद्वैतानेच राहाते. ते स्वभावतःच निर्विकार असते. (१८) पाचव्या समासात चार पदार्थांची माहिती स्पष्ट करून सांगितली आहे. परब्रह्म हा त्यातील मुख्य पदार्थ होय. ते अविनाशी असते. (१९) १. चैतन्य, २. गुणसाम्य, ३.अर्धनारीनटेश्वर, ४. प्रकृतिपुरुष, ५.शिवशक्ती, ६.शुद्ध सत्त्व, ७.अर्धमात्रा, ८.गुणक्षोभिणी, (२०) ९.सत्त्व, १०.रजस्, ११.तम, १२.मन, १३.माया, १४.अंतरात्मा असे मूळमायेचे चौदा संकेत (नावे) आहेत. हा दुसरा पदार्थ होय. पाच महाभूते हा तिसरा पदार्थ होय. आणि चार खाणी हा चवथा पदार्थ होय. (२१) परब्रह्म, चौदा सूक्ष्म संकेत, पंचभूते व चार खाणी या सर्वांचे यथार्थ ज्ञान करून घेण्याचे सामर्थ्य नरदेहातच आहे. तो सारभोक्ता व इतर स्थावर जंगम पदार्थ भोग्य होत. (२२) तो अंतरात्मा जगदीश सर्व पदार्थांचे अंतरंग त्याला माहीत आहे. त्याला त्यामुळेच कशाबद्दलच संदेह राहिलेला नाही. हे सर्व सृष्टीचे ज्ञान त्याने कसे मिळवले, सर्वांना या विश्वप्रपंचात कसे गोविले, हे सर्व त्याचे त्यालाच ठाऊक ! (२३) सहाव्या अध्यायात असे सांगितले आहे की, या सृष्टीत जी जी कर्मे घडतात ती ती आत्म्यामुळे घडतात. तोच द्रष्टा आहे, तोच साक्षी आहे, तोच ध्येय आहे, आणि तोच ध्यान आहे. तोच कर्ता आणि तोच भोक्ता ही आहे. (२४) आत्मारामाच्या उपासनेच्या मार्गाने निरंजन ब्रह्माची प्राप्ती होते. याबाबतीत निःशंक असावे. येथे इतर तर्काला जागाच नाही. (२५)

**नाहीं गेलें । असार सार एकवटलें[१५] । तें निवडिलें पाहिजे ।।२६।। जड चंचळ निश्चळाचा। पिंडीं प्रत्यय पहावयाचा। जड तरी अंश भूतांचा । गुण आत्मयाचा चंचळ ।।२७।। निश्चळ व्यापक सर्वां ठाईं । समजणें त्यासी पाहणें[१६] काई । पिंडावरून प्रत्यय पाहीं । पंचभूतें जड ।।२८।। आत्मा माया विकार करी । आळ घालती ब्रह्मावरी । प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला।।२९।। आठवा नाना भेद केला । भोग व्हावा जीवात्मयाला। इंद्रिय विषय समुदायाला । निर्मून व्यवस्था लाविली ।।३०।। सृष्टीकरणीं अगत्य भेद । संहारें सहजचि अभेद । भेद अभेद हा संवाद[१७] । मायागुणें ।।३१।। आवाहनविसर्जन[१८]। हेंचि भजनाचें लक्षण । सकळ जाणती सज्जन । मी काय सांगू ।।३२।। नववा म्हणे जन स्वभावा । म्हणती आम्हां देव भेटावा । विचार सांडून गोवा[१९] । पडती बंधनाच्या।।३३।। देवासी जरी धुंडावें । तरी मायेपैलाड जावें । सूक्ष्माचीं चौदा नांवें । समजूनियां ।।३४।।**

---

सातव्या समासात असे म्हटले आहे की, ब्रह्माच्या प्राप्तीमुळे जे समाधान प्राप्त होते. ते बोलून दाखवल्यामुळे नष्ट होत नाही. असार आणि सार एकत्र मिसळले आहे ते मात्र नीट निवडले पाहिजे. (२६) जड, चंचळ आणि निश्चळ (ब्रह्म) यांचा अनुभव एका पिंडातच येतो. तो पहावा. शरीरातील जडभाग म्हणजे पंच भूतांचा अंश होय. चंचळ भाग हा आत्म्याचा गुण होय. (२७) निश्चळ (ब्रह्म) व्यापक असून सर्व ठिकाणी असते. ते समजून घ्यावे. ते सर्व व्यापक असल्याने कसे पहायचे ? पिंडावरून त्याचा अनुभव घेता येतो. पंचभूते तर जडच आहेत. (२८) आत्मा (अंतरात्मा) आणि माया हे सर्व विकार निर्माण करतात, आणि आळ मात्र ब्रह्मावर घातला जातो. प्रत्यक्ष अनुभव घेऊन जो हे सर्व विवरण करील तोच भला समजावा. (२९) आठव्या समासात अंतरात्म्याने सृष्टीतील विविध भेदांची निर्मिती केली. जीवात्म्यांना उपभोग घेता यावा म्हणून इंद्रिये आणि विषय निर्माण केले, आणि सृष्टीच्या व्यवहाराची व्यवस्था लावून दिली. याचे निरूपण केले आहे. (३०) सृष्टीच्या निर्मितीमध्ये भेद आवश्यकच आहेत. याउलट तिच्या उपसंहारामध्ये अभेद होत जाणे आवश्यक आहे. तेव्हा भेद आणि अभेद ही चर्चा मायेमुळे करावी लागते. (३१) मायेपासून सृष्टीची जडणघडण करत जाणे हे आवाहन आणि पुन्हा हा पसारा आवरता घेणे हे विसर्जन हीच आमची उपासना होय. (दुसरा अर्थ – ज्या ज्या नामरूपाशी संबंध येईल त्याच्या ठायी सगुण देवाची अंतरात्म्याची म्हणजेच आपल्या हृदयस्थ उपास्याची भावना करणे हे आवाहन आणि तो संबंध तुटला की तो अंतरात्मा स्वस्थानी गेला अशी भावना करणे हे विसर्जन होय.) सर्व सज्जनांना हे माहीत आहे, मी काय सांगणार ? (३२) नवव्या समासात लोकांच्या स्वभावाची तऱ्हा सांगितली आहे. लोकांना वाटते की, आपल्याला देव भेटावा. परंतु त्यासाठी विचार हे एकमेव साधन असता ते सोडून ते उगाचच बंधनाच्या घोटाळ्यात सापडतात. (३३) देवाचा शोधच घ्यायचा असेल तर त्यासाठी मायेच्या पलीकडे जावे लागते. सूक्ष्म अशा मूळमायेच्या चौदा नावांचा अर्थ नीट समजून घ्यावा लागतो. (३४)

**गुंतले तेचि उगवावे[२०] । हळुहळु मुळास जावें । मग समाधानें असावें । कल्पकोटी[२१]।।३५।। आतां शेवटील दहावा । साधक जनांसी विसांवा[२२] । संपूर्ण ग्रंथार्थ आघवा । आलोडून[२३] येथें आला ।।३६।। भोजनांतीं तृप्ति होत । तैसें ये ग्रंथाचें फलित[२४] । जें का निश्चळ सदोदित । परब्रह्म ।।३७।। जें आदि अंती जेथें तेथें । असतचि असे सभोंवतें । अवकाश निर्मळ निश्चळातें । दृष्टांतहीण।।३८।। व्यापकपणें अखंड । हें बोलणेंचि कुवाडें[२५] । व्याप्याविण व्यापक कोडें[२६]। कोणास म्हणावें ।।३९।। दृश्य नाहीं भास नाहीं । गुण नाहीं माया नाहीं । नाहीं नाहीं बोलणें नाहीं । शून्यासहित ।।४०।। जालें साधनाचें फळ । हिशेब मायेचा जाला[२७] सकळ । निर्गुण ब्रह्म जें निश्चळ । अंतरीं बिंबलें ।।४१।। भक्ताचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें । समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध।।४२।। उतरावया चंचळ सागर । दासबोध जहाज[२८] थोर । साधक पावती पैलपार । कुबडी तेथें होडगें ।।४३।। सतराशें एकसष्टी शक । संवत्सर विकारी नामक । शुक्लपक्ष ज्येष्ठाधिक।**

---

जेथे आपण गुंतलेले असतो. तो गुंता हळूहळू सोडवावा लागतो. मग हळूहळू मुळास जावे लागते. ते मूळ एकदा सापडले की, मग कोट्यवधी कल्पापर्यंत म्हणजे अनंत काळपर्यंत समाधानाचा अनुभव घेता येतो. (३५) आता शेवटचा दहावा समास पाहू. हा समास म्हणजे साधक जनांना विश्रांतिस्थान आहे. संपूर्ण ग्रंथाचा अभिप्राय येथे एकवटून आला आहे. (३६) भोजनाच्या अंती तृप्ती होते. त्याप्रमाणे येथे या ग्रंथाचे जे फलित आहे ते निश्चळ परब्रह्म येथे सदैव उपलब्ध होते. (३७) ते आरंभी आहे, अखेरीस आहे, जिकडे तिकडे सभोवताली आहे. या अवकाश व्यापलेल्या, निश्चळ आणि निर्मळ ब्रह्माला कशाचीच उपमा देता येत नाही. (३८) ते व्यापकत्वाच्या दृष्टीने अखंड आहे. खरे तर ते बोलणेही येथे गूढ कोड्याप्रमाणे ठरावे, कारण जे व्यापून टाकायचे त्याचाच अभाव असताना व्यापक तरी कोणास म्हणावे ? (ब्रह्माने अमुक गोष्ट व्यापली असे सांगण्यासाठी त्याच्याशिवाय दुसरा पदार्थ असायला हवा ना !) (३९) ते दृश्य नाही, त्याचा भास होत नाही, त्याच्या ठिकाणी गुण नाहीत, माया नाही, एवढे कशाला ? नाही नाही अशा प्रकारचे बोलणेही त्यांच्या संदर्भात बोलता येत नाही, त्याच्याबाबतीत शून्याचाही आरोप करता येत नाही. (४०) आता सर्व साधनांचे फळ प्राप्त झाले, मायेचा सर्व हिशेब पूर्ण झाला. कारण निर्गुण निश्चळ, ब्रह्माचे ज्ञान अंत:करणात पूर्णपणे ठसलेले आहे. (४१) भक्तांचा अभिमान बाळगणाऱ्या रामरायांनी कृपा केली आणि त्याचे फळ म्हणून रामरायांच्या कृपेचेच उद्गार असा हा दासबोध ग्रंथ तयार झाला. (४२) चंचळाचा सागर पार करण्यासाठी दासबोध हे एक मोठे जहाजच आहे. साधक त्या योगाने पलीकडच्या किनाऱ्याला पोहोचतील. त्या जहाजापर्यंत जाण्यासाठी लागणारे होडगे म्हणजे ही कुबडी होय. (४३)

**द्वादशी मंदवासर ।।४४।। रामदासीं अति आवडी । हातीं धरिली असे कुबडी । यदर्थीं संत श्रोते गोडी[२९]। अखंड जवळी ठेवती ।।४५।। इति श्री संकेत कुबडी । दासबोधींचें सार निवडी । वांकुडी परि आवडी । रामदासा ।।४६।। कुबडी ग्रंथ समाप्तः । श्रीरामार्पणमस्तु। श्रीगुरु हंसराज समर्थ । श्रीगुरु राघवहंस[३०] समर्थ ।। शके १७७८ नळनाम संवत्सरे । संवत १९१२ ।। श्रावणशु.७ रोज भृगुवासरे ते दिवसीं समाप्त ।। हें पुस्तक दल्लाराम सोनाराचें असे हें सत्य । हस्तअक्षर रावजी शेषराज पुराणिक पेट करमाळें येथील राहणार याचें असे। शुभं भवतु ।। श्रीगुरुराघवहंस समर्थ ।।श्रीराम।।[३१]**

---

शके सतराशे एकसष्ट साली विकारी नाम संवत्सरामध्ये अधिक ज्येष्ठ महिन्याच्या शुक्लपक्षातील द्वादशी तिथीला शनिवारी.(४४) रामदासांनी अत्यंत प्रेमाने ही कुबडी हातात धरली. त्यामुळे संत श्रोत्यांनीही प्रेमाने ही जवळ केली. (४५) अशी ही दासबोधाचे सार सांगणारी संकेतकुबडी आहे. ती वाकडी असली तरी श्रीरामदासांना ती आवडणारी आहे. (४६) येथे हा विसावा दशक पूर्ण झाला. त्याबरोबरच कुबडी हा ग्रंथही समाप्त झाला. श्री गुरू हंसराज समर्थ । श्रीगुरु राघवहंस समर्थ । शके १७७८, नळनाम संवत्सर, संवत् १९१२, श्रावण शु ।। ७, शुक्रवार या दिवशी समाप्त झाला. हे पुस्तक दल्लाराम सोनाराचे आहे. हें सत्य आहे. हस्ताक्षर रावजी शेषराज पुराणिक, राहणार करमाळा यांचे आहे. शुभं भवतु । श्रीगुरू राघवहंस समर्थ । श्रीराम ।।

एकूण ओव्या ६४७

**टिपा**

(१) तैत्तिरीयोपनिषदांतर्गत ब्रह्मानंदवल्लींतील आठव्या अनुवाकांत मानुषानंद, मनुष्यगंधर्वानंद, देवगंधर्वानंद, पितरानंद, आजानजदेवानन्द, कर्मदेवानन्द, देवानन्द, इन्द्रानंद, बृहस्पत्यानंद, प्रजापत्यानंद आणि ब्रह्मानन्द असे एकापेक्षां एक श्रेष्ठ असे अकरा प्रकारचे आनन्द वर्णिले आहेत. (२) चंचळ निश्चळाचा निर्णय पहिल्या समासांत स्पष्ट केला असला तरी त्यांत व्यापक कोण याचा विचार अंत:करणांत पूर्णपणें करावा. **पाठभेद** - निवाडा. (३) पूर्णत्वाच्या दृष्टीनें आत्माहि तसाच एकदेशी आहे. (४) नेट, आग्रह. (५) नेटानें प्रवेश करून घेतो. (६) हे तीन प्रकार पुढील ओंवीत दिले आहेत. श्री दासबोध २०-२-१५ ते १७ या तीन ओंव्यांत अनुलक्षून हा उल्लेख आहे. (७) जुन्या तिन्ही लेखी प्रतींत वरीलप्रमाणेंच अक्षरें स्पष्ट आहेत. श्रीदासबोधांतील ''चौदा पांच एकोणीस । एकोणीस चार तेविस । यांमध्यें मूळ चतुदर्श । पाहिलेंचि पहावे ।।१५।। २०-३ या ओवीस अनुलक्षून येथील ११-१२ या दोन ओव्या आहेत, हें स्पष्ट आहे. तथापि कुबडीकारांचे लक्ष ''जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्तांग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ।।३।। स्वप्नस्थानोऽन्त:प्रज्ञः सप्तांग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक् तेजसो द्वितीयः पादः''।।४।। या माण्डूक्यश्रुतीकडे गेलें असल्यानें, या श्रुतींस अनुसरून त्यांनी 'एकोणिस एकोणिस' असा पाठ योजिला असेल काय ? पण असें मानावें तर पुढील 'चौदा चारी तेवीस' चा अर्थ काय करावयाचा ? कीं लेखकाचा हस्तदोष असावा ? बाराव्या ओंवीवरून मांडुक्यांतील

(५ कर्मेंद्रिये + ५ ज्ञानेंद्रिये + ५ विषय + ४ अंत:करणचतुष्टये =) १९ मुखें + चार खाणी मिळून २३ तत्त्वें कुबडीकारांनी मानिलेलीं दिसतात. श्री दासबोधांत मूळमायेचे १४ सूक्ष्म संकेत + ५ महाभुतें + ४ खाणी अशी तेविसांची मिळवणी केली आहे. (८) पृच्छा, अपेक्षा, हेतु. (९) पुढील २०-२१ वे ओंवीत. (१०) लवकर, चांगले. (११) निरखून, खोल. (१२) नवल, अगदीं नवीन. (१३) - १. चैतन्य, २. गुणसाम्य, ३. अर्धनारीनटेश्वर, ४. प्रकृतिपुरुष, ५. शिवशक्ति (ईश्वर=शिव) ६. शुद्ध सत्व, ७. अर्धमात्रा, ८. गुणक्षोभिणी (गुणसाम्यविकार), ९-१०-११. त्रिगुण, १२. मन, १३. माया, १४. अंतरात्मा, हे चौदा संकेत. सत्कार्योत्तेजक सभेच्या दासबोधांतील या ठिकाणच्या टिपेत चौदा संकेतांमध्ये 'षड्गुणेश्वर' आहे, त्याऐवजीं येथें 'अर्धमात्रा' हा संकेत मानला आहे. (१४) परब्रह्म, चौदा सूक्ष्म संकेत, पंचभूतें व चार खाणी या सर्वांचे यथार्थ ज्ञान करून घेण्याचें सामर्थ्य नरदेहांतच आहे. तो सारभोक्ता व इतर सर्व स्थावर जंगम पदार्थ भोग्य होत. (१५) मिसळलें, एकत्र झालें. (१६) सर्वत्र व्यापक असणाऱ्या निश्चळ परब्रह्मास कसें पहावयाचें ? 'तें ज्ञानदृष्टीनें पहावें । पाहोन तेथेंचि अनन्य व्हावें ।' अथवा 'वस्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहणे ।' या श्रीसमर्थवचनानुसार तद्रूप होणें हेंच त्याचें दर्शन होय. (१७) चर्चा, भाषण. (१८) या दा.२०-८-३० या ओंवीवर सत्कार्योत्तेजक सभेच्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें टीप आहे. ''मायेपासून मांडणी करणें हे आवाहन व पुन्हा संहार करणें हें विसर्जन; हीच आमची उपासना.'' परंतु आवाहन (भजनपूजनार्थ देवास बोलावणें) व विसर्जन (भजनपूजनांतीं त्यास स्वस्थानीं पाठवणे) हे या शब्दांचे रूढार्थ पाहतां ''ज्या ज्या नामरूपाशी संबंध येईल त्याच्या ठायीं सगुण देवाची, अंतरात्म्याची म्हणजेच आपल्या हृदयस्थ उपास्याची भावना करणें हें आवाहन आणि तो संबंध तुटला की तो अंतरात्मा स्वस्थानी गेला अशी भावना करणें हें विसर्जन'' असा अर्थ येथें असावासें वाटतें. (१९) घोंटाळ्यांत. (२०) (अडचणींतून) मोकळे करावे, सोडवावे. (२१) अनंत काळ, कल्प-ब्रह्मदेवाचा एक अहोरात्र, किंवा एक हजार चौकड्या (चार युगें एक हजार वेळां जाणें) म्हणजे चार अब्ज बत्तीस कोटी वर्षे. (२२) विश्रांति स्थान. (२३) दीर्घ अभ्यास करून. (२४) फलश्रुति, गर्भित अर्थ. (२५) गूढ, कोडें. (२६) कौतुकानें. (२७) मायेचा सकळ हिशेब झाला -मायेचें सगळें देणें घेणे फिटलें, बाकी कांही राहिली नाही. (२८) पूर्वीच्या मुद्रित प्रतींत 'जहाज' बद्दल 'झाला' छापलें आहे. तथापि ''चंचळ (भव) सागर उतरून पैलतीरास जाण्यासाठीं दासबोध मोठ्या जहाजासारखा आहे. पण मोठी जहाजें खोल पाण्यांतच उभीं राहतात, त्या जहाजांत बसण्यासाठी लहान होडग्यांतून जावें लागतें. त्याप्रमाणें दासबोधाचें गूढ रहस्य सखोल बुद्धीलाच आकलन होईल; इतरांनी या कुबडीरूप होडग्याच्या आधारानें त्या खोल रहस्यांत प्रवेश करावा.'' हा ग्रंथकर्त्याचा अभिप्राय लक्षांत घेतां 'जहाज' शब्द येथें किती समर्पक आहे हें ध्यानीं येऊन संशोधनपूर्वक जुने ग्रंथ मुद्रित करण्याची आवश्यकता अधिकाधिक भासूं लागते. (२९) गोडीनें, प्रेमानें, (३०) श्री हंसराज स्वामींचे पट्टशिष्य व हंसकोशादि ग्रंथांचे कर्ते रघुनाथ भास्कर गोडबोले शास्त्री; यांचे विस्तृत चरित्र 'हंसपद्धति' या ग्रंथांत दिलें आहे. (३१) श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरांतील कुबडीच्या दोन प्रतींच्या शेवटचे लेखनशकविषयक उल्लेख पुढीलप्रमाणें आहेत - ''शके १७६२ ।। आश्वीन वद्य चतोर्दसि लेखन समाप्त । शारवरी संवत्सरी तासग्रामि प्रान्त मिरज.'' आणि ''श्रीरामदासकल्याणमहाराजार्पणमस्तु । ग्रंथप्रत समाप्ती श १७८० कालयुक्त नामसवंत्सरे भाद्रपद कृ. ४ भानुवासरे मुक्काम शाहूनगर । ग्रंथ गुणिका वोव्या येकंदर ६२९'' (या प्रतींत पहिल्या दशकाखेरी बाकीच्या दशकांची 'इति श्री सं०' ही समाप्तीची ओवी गणतींत धरली नाहीं.)

**।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।।**

# श्रीमन्नारायणहंसस्तवनम्

भद्रं प्रशान्तं कमनीयगात्रं, सुशोभिनेत्रं च प्रसन्नवक्त्रम् ।
दीनैकमित्रं करुणैकपात्रं, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।१।।

नारायणेत्याभिधधारकंच । नाम्नैव कैवल्यविधारकं च ।
वर्णेन गोरं करणेन गौरं, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।२।।

यस्यावलोकात्सुखिनो भवन्ति, सर्वेऽपि लोकाः प्रणताः स्वयं ये ।
त एव गच्छन्ति निजस्वरूपं, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।३।।

यत्सत्यया सत्यमिदं विभाति, यत्संविदा चेतति विश्वमेतत् ।
यस्य प्रमोदात्सुखवद्विभाति, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।४।।

यदाज्ञयेदं सृजति प्रजेशो, यदाज्ञया पालयतीह विष्णुः ।
यदाज्ञया संहरते हरोऽपि, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।५।।

यस्योपमानं न भवैच्च लोके, कल्पामि स्पर्शं न च पूर्णमेतत् ।
स्पर्शः करोत्येव हि स्पर्शतां न, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।६।।

श्रीमत्परिव्राजकचक्रचूडं, ज्ञानोपदेशाय गृहीतमूर्तिम् ।
अनुग्रहं धारयंतं जनेषु, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।७।।

यो सारसारं प्रविविच्य सर्व, अभेदबुद्ध्या प्रतिबोधयन्तम् ।
स्वयं प्रकाशं परमात्मरूपं, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।८।।

कुर्वन् यथा पाटिर आत्मसाम्यं, हीनेषु वृक्षेषु जनेषु तद्वत् ।
आत्मस्वरूपं प्रतिपादयन्तं, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।९।।

यस्यास्ति दीक्षा महती प्रशस्ता, गूढा परा पारमहंसिका च ।
बुधेकगम्या वयुनेन ग्राह्या, नारायणं तं गुरुमानतोऽस्मि ।।१०।।

नित्यानंद महोदधिं करुणया आर्द्रं प्रभुं निस्पृहम् ।
दीनानाथजनेषु चातक इव सार्द्रं महामेघवत् ।
वर्षन्तं प्रतिवासरं निरवधिं तत्रापि मय्याधिकम् ।
कुर्वन्तं करुणं च निर्भरतरां कूर्मस्य दृष्टिमव ।।११।।

इदं स्तोत्रं पवित्रं च महच्छुभफलं सदा ।
अनर्थव्यावृत्तिकरम् अखण्डानंददायकम् ।।१२।।

– हंसदास राघवहंस (रघुनाथशास्त्री गोडबोले) कृत

# आरती

जय जय जय जय आरति सद्‌गुरु नारायण हंसा ।
आरति ओंवाळितांचि देहबुद्धि नुरे सहसा ।।धृ.।।

मायाविपिनीं बहु जिव भ्रमले उमजेना कोणा ।
व्यवहारें सुख दुःख कष्ट भोगिती नाना ।।
या तळमळिची सद्‌गुरुलागीं आली बहु करुणा ।
म्हणुनी समर्थ व्यक्ति धरूनी उपदेशिति ज्ञाना ।।१।।

दर्शनमात्रें अधिकारातें पावती सकळ ।
व्यतिरेकानें निजरुप दावुनि तोडिति भवजाळ ।।
तेंचि अन्वयें पाहतां विरती सर्वहि तळमळ ।
यास्तव निजपदकमळीं लोळे चिमणेसें बाळ ।।२।।

– हंसपद्धतिकर्ते चिमणकवि अकलनुरकर

।। श्रीमत्सद्‌गुरुहंसराजचरणारविंदार्पणमस्तु ।।



॥ श्रीराम समर्थ ॥

# श्रीहंसराजस्वामीकृत वरदाष्टक

आता संतांसी विनवणी । सावध असावें श्रोतेजनी । परोपकारा लागुनी । वरप्रसाद मागों ॥१॥

श्रोते वक्ते बध्दांजली । ऐकावया सरसावली । गुरुमाउली प्रसन्न जाली । ह्मणती त्वरा करा ॥२॥

संत सद्गुरु अति उदार । चिद्गगनीं उदेला दिनकर । साधक मुमुक्षु त्या समोर । प्रार्थिते जाले ॥३॥

सद्गुरूसी जे अनन्य शरण । तत्काल व्हावें व्दैतखंडण । संत ह्मणती सुप्रसन्न वदन । तथास्तु तथास्तु ॥४॥

अहंकाराचा वारा । न लागो तया सकुमारा । निघती संतमुखोद्गारा । तथास्तु तथास्तु ॥५॥

कल्पनेची उष्ण झळी । न स्पर्शोंचि साधककुळी । ह्मणती संत मुखकमळीं । तथास्तु तथास्तु ॥६॥

माइकाची भीड न पडो । गुरुचरणीं वृत्ति दडो । संत ह्मणती तैसेंचि घडो । तथास्तु तथास्तु ॥७॥

स्वस्वरूपाचा विसरु । क्षणभरी न हो अवसरु । ऐकतां बोलती सद्गुरु । तथास्तु तथास्तु ॥८॥

गुरुनामेंवीण शिणे वाणी । तरी जिव्हा जावो झडोनी । संत उदार बोलती तत्क्षणीं । तथास्तु तथास्तु ॥९॥

गुरुवीण देखे आणिक । तरी तत्क्षणी फुटो हा मस्तक । संत बोलती अलोलिक । तथास्तु तथास्तु ॥१०॥

मी ब्रह्म हेंहि मुरो । परी सद्गुरुचरणीं उरो । संत ह्मणती वासना पुरो । तथास्तु तथास्तु ॥११॥

जाला एकचि जयजयकार । वरदाष्टकाचा प्रकार । मौनेंचि घालता नमस्कार । अनन्य भावें ॥१२॥

या वरदाष्टकाचे विश्वासें । लागती सद्गुरुचे कासे । तयांसी फल तें कायसें । फल रूप होये ॥१३॥